जागतिकीकरणामध्ये बी-बियाणे उत्पादित करून त्यांची विक्री करण्याचे स्वातंत्र्य असते. यामुळे जगातील देशांना सुधारित व अधिक उत्पादन देणारे बी-बियाणे प्राप्त होतात. यामुळे शेतीची उत्पादकता वाढते, बी-बियाण्यांच्या निर्मिती हक्कामुळे भारतातील शेतकऱ्यावर विपरित परिणाम होईल असे वाटते. परंतु भारतातील प्रयोगशाळेत वेगवेगळ्या हवामानात टिकून राहणाऱ्या वनस्पतीजन्य बी-बियाण्यांच्या नवनवीन जाती शोधून काढल्या जातील. भारतात 175 प्रकारचे संकरित बी-बियाणे आहेत. त्यातील 98 प्रकारचे बी-बियाणे भारतातील शास्त्रज्ञांनी निर्माण केलेले आहेत. जागतिकीकरणामुळे शास्त्रज्ञांच्या संशोधनवृत्तीस चालना मिळून शेती उत्पादनात वाढ होण्यास मदत होईल.

6) हरितगृह क्रांती :

देशात हरितगृहाच्या साहाय्याने शेती करण्याची नवीन पद्धत सुरू होत आहे. त्यामुळे सिमांत शेतकरी, अल्पभूधारक शेतकरी सुद्धा आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घेवू लागले आहेत. अल्पभूधारकांनी अल्प जमिनीतून मोठे उत्पादन मिळू लागले आहे. हरितगृहाच्या साहाय्याने शेती करण्यासाठी लागणारे भांडवल अल्प व्याजदराने बँका उपलब्ध करून देत आहेत. भारतीय फळे, फुले व भाजीपाला यांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध झाली आहे.

7) निर्यातीच्या रचनेत बदल :

जागतिकीकरणामुळे निर्यातीच्या रचनेत बदल झाले आहेत. भारतात जागतिकीकरणापूर्वी निर्यातीमध्ये ताग, तागाच्या वस्तू, कापूस, चहा, तेलबिया, मसाले इत्यादी वस्तूंचा समावेश होतो. आता जागतिकीकरणामुळे

ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (IIJIF)

अशा वस्तूंच्या निर्यातीत घट होवू लागली आहे तर तयार कपडे, तांदूळ, साखर, संगणक साहित्य, कॉफी, मासे व त्याचे पदार्थ इ. वस्तूच्या निर्यातीत वाढ झाली आहे.

ब) जागतिकीकरणाचे शेती विकासातील प्रतिकुल परिणाम :

1) बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्चस्व :

शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी नवनवीन संस्कारित बी-बियाण्यांचा शोध लावला जात आहे. या बी-बियाण्यांचे उत्पादन हक्क जी बहुराष्ट्रीय कंपनी घेईल तिच्याकडून बि-बियाणे खरेदी करावे लागेल. हे बियाणे साठविण्याचा व विक्री करण्याचा अधिकार शेतकऱ्यांना असणार नाही. संबंधित कंपनीला रॉयल्टी देवून बि-बियाणे खरेदी करावे लागतील. शेतकरी व संशोधक यांना जर बियाण्यांचे उत्पादन करायचे असेल तर त्यासाठी त्यांना परवाना घ्यावा लागेल.

2) अल्पभूधारकांना स्पर्धेत टिकणे कठीण :

जागतिकीकरणामुळे परकीय कंपन्या कृषी क्षेत्रात येत आहेत. या कंपन्यामुळे मोठ्या प्रमाणात भांडवल उपलब्ध असल्यामुळे त्या सुधारित बि-बियाण्यांचा अवलंब करून मोठ्या प्रमाणात उत्पादन काढतील. या कंपन्यानी जर अधिक शेती आपल्या ताब्यात घेतली व शेती उत्पादनाला सुरूवात केली तर सिमांत शेतकरी व अल्पभूधारक त्यांच्या स्पर्धेत टिकून राहू शकणार नाही.

3) बौद्धिक संपन्नता :

बौद्धिक संपन्नततेविषयीच्या तरतूदीनुसार भारतातील नवीन संशोधन व विकास विपरित परिणाम होईल.

4) शेतीची कारखानदारीकरण होईल :

जैविक तंत्रज्ञानाच्या आधारे उत्पादन मोठ्या प्रमाणात होऊ लागले तर शेती उत्पादन शेतीवर होण्याऐवजी प्रयोगशाळेत होऊ लागेल व परिणामी शेतीचे कारखानदारीकरण होईल.

निष्कर्ष :

नविन आर्थिक धोरणाची सुरूवात देशापुढे निर्माण झालेल्या आर्थिक संकटातून झालेली बहुराष्ट्रीय कंपन्यांना आपल्या अर्थव्यवस्थेची दारे खुली झालेली आहेत. देशात ज्या ठिकाणी सोयीसुविधा उपलब्ध आहेत, अशा ठिकाणीच केंद्रीकरण झाल्याने ग्रामीण भाग पूर्वीप्रमाणे आजही मागासलेला राहीला आहे. या भागाच्या विकासाशिवाय देशाला आर्थिक महासत्ताक होण्याचे स्वप्न पूर्ण करता येणार नाही. तेव्हा सरकारने ग्रामीण भागात पायाभूत सोयीसुविधा निर्माण करून द्याव्या म्हणजे उद्योगधंदे ग्रामीण भागात उभे राहतील.

देशातील शहरीकरणाचे प्रमाण ग्रामीण भागाच्या प्रमाणापेक्षा कमी आहे. ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती. शेती व्यवसाय महागडी बि-बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके, सिंचन व अवजारे यामुळे तोट्यात गेला आहे. देशात दिवसेंदिवस अवेळी पडणारा पाऊस, शेतीचा आकार कमी, वाढते कर्ज, कुटुंबातील अल्प साक्षरता, हवामानाची प्रतिकुलता अशा अनेक कारणांनी शेतकऱ्यांचे आत्महत्या सत्र थांबता थांबण्यास तयार नाही. तेव्हा सरकारने शेतीमध्ये पिकांच्या होणाऱ्या नुकसानीचा अंदाज घेवून विम्यापोटी सर्व रक्कम शेतकऱ्यांना द्यावी.

संदर्भ :

1. डॉ. खंदारे विलास - विकास आणि पर्यावरणीय अर्थशास्त्र, के. एस. अतकरे, कैलास पब्लीकेशन, औरंगपूरा, औरंगाबाद.
2. www.google.com
3. अर्थसंवाद - मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक (एप्रिल-जून 2015)
4. डॉ. डोळे, ना. य. - नवे आर्थिक धोरण, विद्या प्रकाशन, औरंगाबाद.
5. साठे मधूसूदन दत्तात्रय - जागतिक अर्थव्यवस्था - 2007 मेहता पब्लीशिंग हाऊस, दिल्ली.

❑❑❑

2017

Dr. Nitin V Changole

MAHAMUL/0305/[illegible]
ISSN-2319-[illegible]

Peer Reviewed International Refereed Research Journal

VIDYAWARTA®



Editor

Dr.Bapu G.Gholap

|| Index ||

1) RIGHT TO INFORMATION ACT: AN EMPIRICAL STUDY IN THE.....
Anupama Sharma, Chandigarh. || 09

2) Different aspects of Khushwant Singh's in History & Literature
Dr. Charu Agarwal, Dhampur || 13

3) A Study on Indian Accounting standards convergence with International Accounting....
Dr. Sunitha Alakanti, Hanamkonda, Telangana State || 16

4) Health Status of Rural-Tribal Women in Jharkhand
Baidehi Kumari, Ranchi || 22

5) Crime Against Women & the Legal Protection available in India
Adv.(Dr) Vijay Bahiram, Dhule (Maharashtra) || 25

6) AN ANALYTICAL STUDY ON FINANCIAL PERFORMANCE OF SELECTED.....
Rakesh Bhoi, Vallabh Vidyanagar || 29

7) IMPACT OF ENTREPRENEURSHIP TRAINING ON SKILL DEVELOPMENT AND EMPLOYABILITY-....
Saroj Bala Dewatwal, Jaipur, Rajasthan. || 33

8) Discovering the Rising Trends in Human Resource Management
Dr. Sabrina D'souza || 40

9) An Impact of Environment on Carbon Trading
Dr. Santosh Koner, Chatra Bankura || 44

10) WOMEN EMPOWERMENT AND THE INANE SOCIETY
Cassiana William Lawrence, Secunderabad, Telengana. || 46

11) A STUDY ON CORPORATE GOVERNANCE AND CSR FOR SUSTAINABLE.....
DilipKumar K. Parmar, V.V.Nagar (Gujarat) || 52

12) Religious Fanaticism Nurtured by Social Intolerance Reflected in Adiga's First Story of....
Vaibhao C. Patil, Amravati (MS) || 57

13) Gandhi on Women's Empowerment
Dr. Premapallavi C. B.,Chitradurga, Karnataka. || 60

14) Water Resources Management and Water Quality, Case of Bhopal (M.P.)
Mrs. Chhaya Sharam—Dr. Bharat Singh Goyal, Raisen (M.P.) || 62

http://www.vidyawarta.com/03-2017-1.html

15) STUDY OF THE WORK ORIENTATION OF PRIMARY SCHOOL TEACHERS IN RELATION....
Taddi Srinivasa Rao, Andhra || 65

16) IMMORAL PHARMACEUTICAL SALES PROMOTION PRACTICES OF [illegible]ES
Dr. Ramkrishna Shuk[illegible] Harshit Kumar Sharma, Bhopal || 72

17) IMPACT OF GLOBALIZ[illegible]N ON INDIAN MANAGEMENT PRACTI[illegible]
Dr. P.M. Taley, Amravati || 75

18) Implementation for IAY Scheme in Telangana State
Rapolu Venkateswarlu, Hyderabad || 79

19) Fluid Identities in Cyril Dabydeen's "The Rink" & "All the [illegible] Men"
R.VISWANATHAN—Dr SHEELA P. KARTHICK, Madurai || 84

20) Required Skills for Future Teachers in Changing World
Dr. Shashikant Yadav, Hazaribag, Jharkhand || 87

21) चंद्रपूर जिल्हयातील धान उत्पादकांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन
प्रा.विनोद माधव बरडे—प्रा.सौ.रिता विवेक सोनटके || 90

22) साहित्यातील 'प्रभाव' संकल्पना
प्रा. रा. ज. चाटे, परळी—वैजनाथ, जि.बीड || 95

23) देवदासींच्या जीवनातील होरपळ चित्रित करणारी कादंबरी : चौंडके
प्रा. डॉ. यशवंत हाके, ता.बदनापूर, जि.जालना. || 102

24) टोमॅटोच्या सुधारित लागवडीतून दर्जेदार उत्पादन
प्रा. साहेबराव दौलत निकम, नाशिक || 106

25) अकोला जिल्हयातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांच्या मूल्य आणि स्व संकल्पना.....
डॉ शोभना पु सावजी, अकोट.जि.अकोला || 109

26) कांदा समस्येवर कायमस्वरूपी उपाययोज[illegible] हवी
प्रा.डॉ.कृष्णा शंकर शहाणे, नाशिक || 114

27) आदिवासी तडवी भिल्लांची सामाजिक नाते संबंध व्यवस्था आणि परंपरा-एक शोध.
अजीज रशिद तडवी, जळगांव (महा.) (भारत) || 117

www.vidyawarta.com

28) पन्ही मेहदवी नबाबाच्या काळातील आर्थिक जीवन
डॉ. नितिन व. चांगोले, अमरावती || 121

29) दिव्यांगजन:समाजशास्त्रीय विवेचन
ममता सिंघल, कोटा (राज.) || 123

30) आचार्य शुक्ल और उनका इतिहास लेखन
डॉ॰ ओमप्रकाश नारायण द्विवेदी, जम्मू || 128

31) भारतीय दर्शन में प्रामाण्यवाद
डॉ॰ प्रवीण कुमार गुप्त, कुशीनगर (उ०प्र०)। || 130

32) माध्यमिक शिक्षा परिषद उत्तर प्रदेश एवं केन्द्रीय माध्यमिक शिक्षा परिषद द्वारा.....
राहुल गुप्ता–प्रो॰ बी॰ सी॰ दूबे, मेरठ || 135

33) भारतीय दर्शन में माया की परिकल्पना; आदि ग्रंथ के सन्दर्भ में
डॉ॰ हरप्रीत 'कौर', चण्डीगढ़ || 140

34) भीष्म साहनी के उपन्यासों में जीवनमूल्य:एक विश्लेषण
नवजोत कौर, कपूरथला। || 148

35) वैष्णवमूल्यों एवं आस्थाओं के सन्दर्भ में लक्ष्मीनारायण शर्मा का काव्य
डॉ॰ मुनीश कुमार, हमीरपुर, हिमाचल प्रदेश. || 154

36) प्राचीन भारत में राजा–राजकीय कानून और न्याय व्यवस्था
डॉ॰ ज्योति मिश्रा || 162

37) छेनियों का दंश....
डॉ॰ उत्तम कुमार शुक्ल, फतेहपुर (उ०प्र०) || 165

38) भाषा शिक्षण में कम्प्यूटर की भूमिका
देवेन्द्रसिंह ठाकुर, धरमपुरी, जिला–धार || 167

39) *रामानुजाचार्य और स्वामिनारायणके विशिष्टाद्वैत मतकी भिन्नता*
डो. द्युति जयेन्द्रकुमार याज्ञिक, अहमदाबाद. || 170

40) गुरूमति संगीत में भक्त नामदेव जी की रचनाएं
रतिंदरजित कौर || 176

www.vidyawarta.com/03 – http://www.printingarea.blogspot.com

28

पन्ही मेहदवी नबाबाच्या काळातील आर्थिक जीवन

डॉ. नितिन व. कांगोले
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

प्रस्तावना :

इ.स. १८ व्या शतकात गढा येथील गोंड घराण्याला उतरती कडा लागली. देवगडचे गोंड घराणे उदयास आले. या घराण्याने नागपूर शहराचा विस्तार केला. हे गोंड राजे मोगलांचे खंडणीदार होते. मुगल बादशाह औरंगजेबाने खंडणीच्या थकबाकी पोटी देवगडची मालमत्ता जप्त केली. त्यानंतर कोकशाहा हा राजा गादीवर आला. कोकशाहानंतर बख्त बुलंद गादीवर बसला याच कालखंडात अफगाणिस्तानातून आपले नशिब अजमाविण्याकरीता घोड्याच्या व्यापाराच्या निमित्ताने सुलतानखॉ आणि सरम्मसखा हे दोन बंधु नागपूरात आले आणि बख्त बुलंदच्या नोकरीत राहिले. त्यानंतर मोगलांचा वज्हाडचा सुभेदार अलीमर्दानखॉ याच्या नोकरीत एलीचपूर येथे आले. पुढे वज्हाडसुभा निजामाच्या अमलाखाली गेला. निजामाचा मुलगा निजामअली एलीचपूरचा अधिकारी होता. सुलतानखॉ आणि सरम्मसखां यांच्याशी त्याची ओळख झाली आणि सुलतानखॉ चा पुत्र इस्माईलखॉ याला त्याने हैद्राबादला नेले. अचलपूरमध्ये बाहेरुन आलेल्या घराण्यापैकी हे एक प्रतिष्ठीत घराणे होते. पुढे इस्माईलखॉ ला इ.स. १७५८मध्ये एलीचपूरची दिवाणगीरी मिळाली. या घराण्यात कर्तबगार नबाब म्हणून इस्माईलखॉ, सलाबतखॉ, नामदारखॉ, ईब्राहीमखॉ, गुलाम हसनअली खा आणि शम्सखातून यांनी अचलपूरच्या नबाबी घराण्याचा कारभार पाहिला.

सामान्य आर्थिक परिस्थिती :

विदर्भ पुर्वीपासूनच कृषीप्रधान प्रदेश आहे. विदर्भाची जमीन अत्यंत सुपीक काळी कसदार असल्यामुळे कृषी उत्पन्न उत्तम होते. विदर्भामध्ये मुख्य पिके ज्वारी, गहू, कापूस ही होती. तर सिंचन पिके म्हणून भुईमूंग, मिरची व जवस यासारखी पिके घेतली जात होती. सिंचनामध्ये दोन प्रकार होते. पाटस्थल आणि मोटस्थल त्यापैकी विदर्भात मोटस्थल सिंचन पद्धती प्रचलित होती. सामान्यत: शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून होती. फळ पिकामध्ये आंबा हे मुख्य पिक होते. त्याचप्रमाणे सातपुड्यातील उत्तम प्रतीचे सागवान आणि हळदू जातीचे लाकूड ही घरबांधणीसाठी लागणारी सामुग्री विपुल प्रमाणात उपलब्ध होती.

विदर्भाची जमीन अत्यंत काळी कसदार व सुपिक असल्यामुळे कृषी उत्पन्न उत्तम होते. म्हणून विदर्भामध्ये निजामाच्या काळापासून जमीन महसुलाची उत्तम व्यवस्था राखण्यासाठी देशमुख, देशपांडे, नबाब यांना नेमले होते. यांच्या जवळ शेकडो एकर जमीनी होत्या. ह्या जमिनीचे भाग कुळांना कसण्याकरीता देत असत. या शिवाय खतीब (धर्मगुरु), मशीदीमध्ये पाण्याचे टाके भरण्याकरीता एका हिंदुला ३६ एकर जमीन दान दिली होती. खतीबाकडे ६ गावात जमीन होती. (अचलपूर, सुर्जी, अंजनगांव, दर्यापूर, अडगांव, अकोट) या ठिकाणी आजही त्याच्या जमीनी आहेत.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर कुळ हा जमीनीचा मालक बनला. नबाबांनी जमीन महसुलाची व्यवस्था आपल्या अधिकारात ठेवली होती त्यासाठी त्याने जमीनीचे भाग, जहागिरी, इजारदारी, इनामदारी म्हणून दिले होते. याशिवाय कर्तृत्ववान व्यक्तीला बक्षिस म्हणून सुद्धा काही जमीनी दिल्या होत्या. वरील सर्व जमीनी करमुक्त होत्या. जमीन महसुलाचे काम देशमुख, देशपांडे, जहागिरदार, इनामदार, इजारदार, पाटील, कुळकर्णी ही वतनदार मंडळी जनतेपासून महसुल वसुली करुन सरकारात भरणा करीत होती. नबाबाचा महसुल यंत्रणेवर फारसा खर्च नव्हता परंतु एकंदरीत शेतकरी मात्र या दोन्ही शासन यंत्रणेमुळे भरडल्या जात होता, त्यामुळे नबाबी कालखंडात शेतकरी समाधानी असलेला दिसत नाही.

व्यापार :

विदर्भातील अर्थव्यवस्थेचा पाया कृषी उद्योगावर अवलंबून होता. या उद्योगात ८०% भाग शेती, शेतमजुरी व पुरक आणि सहाय्यक उद्योगात गुंतला होता. शेतीचा किफायतशिरपणा व्यापाऱ्यांनी शेतीमालाला भाव देण्यावर अवलंबून होता.

विदर्भाचा कापूस व्यवसाय जुना आहे. या कापसाला अमरावती कॉटन असे नाव होते. वज्हाडात बन्नी आणि जरी ह्या दोन प्रकारच्या कापसाच्या जाती प्रसिद्ध होत्या.

१) बन्नी :

बन्नी ही हलक्या जमीनीत पेरल्या जाणारी जात होती. एकरी ३२० पौंड असे उत्पादन होते. मुख्यत्वे करुन ही जात

हिंगणघाट विभागात पिकविल्या जात होती.

२) जरी :

जरी या जातीचा कापूस अचलपूरच्या परगण्यात पुर्णेच्या खोज्यात पिकविल्या जात होता. एकरी उत्पादन बन्नी सारखेच होते. परंतु लांब धाग्याचा, जाड व मजबुत असा यामध्ये फरक होता. व्यापारी सुद्धा जरीला जास्त पसंती दाखवायचा जरी आणि बन्नी एकत्र करुन हा कापूस परदेशी पाठविला जात होता. यालाच अमरावती कॉटन असे म्हटल्या जात असे.

अमरावती वरुन कापूस ५०० मैल अंतरावर मिर्झापूरला बैलगाडीने पाठविला जात होता. ४५० मैल अंतरावर कलकत्ताला नेल्या जात होता आणि येथून जहाजाने इंग्लंडला पाठविला जात होता. पुढे इंग्रजांनी नॅरोगेज रेल्वे मार्ग टाकला. मुर्तीजापूर-अचलपूर, मूर्तीजापूर-यवतमाळ, मुर्तीजापूर-पुसद, दारव्हा हा मार्ग इंग्रजांनी प्रस्तापित केला.

अमरावती कॉटन इंग्लंडच्या बाजारपेठेत मॅन्चेस्टरच्या गिरण्यामध्ये प्रसिद्ध होता. तो कापूस जवळजवळ पुर्णेच्या खोज्यातच पिकविल्या जात होता. अचलपूरात स्थानिक बाजारपेठ नसल्यामुळे तो अमरावतीला पाठविला जात होता. म्हणून त्याला अमरावती कॉटन असे नाव देण्यात आले. या व्यवसायामुळे रोजगार निर्मिती झाली, शेतीवरील बोझा कमी झाला, अचलपूरात विणकर उद्योग भरभराटीस आला. याशिवाय धातूची भांडी तयार करणे, स्फोटकांचा व्यवसाय, शस्त्रांचा व्यवसाय सुद्धा भरभराटीस आले. इ.स. १८४५ मध्ये भयानक दुष्काळ पडला होता. परंतु त्या दुष्काळात सुद्धा अचलपूर शहरावर फारसा परिणाम झाल्याचे दिसत नाही ही बाब लाक्षणिय मानली पाहीजे.

राजस्व व्यवस्था :

व-हाडचे शासन दोन सत्तेमध्ये विभागले होते निजाम आणि नागपूरकर भोसले दक्षिणच्या मोगली सहा सुभ्यात व-हाडचा सुभा हा अत्यंत सुपीक होता. याला दो अंमली शासन असे म्हटल्या जाते. निजाम, भोसले यांच्यात साठ-चाळीशीच्या तहाने यांची सांगता झाली. साठ टक्के भोसल्याना तर चाळीस टक्के राजस्व नबाबांना मिळत होते. चाळीस टक्क्यात अचलपूरचे प्रशासन चालविले म्हणजे नबाबांसाठी एक प्रकारे तारेवरची कसरत होती. तरी इस्माईलखॉ ते नामदारखॉ पर्यंत हा कारभार व्यवस्थित चालला.

मुख्य उत्पन्न कृषी राजस्व होते. जमीन महसुल इतर विभागापेक्षा जास्त होता. युद्ध आणि संरक्षण यावर सुद्धा भरपुर खर्च होता. त्यामुळे नबाबाची स्थिती सुदृढ राहत नव्हती. व्यापारातून कर मिळत होता.

वनविभाग फार विस्तीर्ण असल्यामुळे लाकुड, औषधी, कापूस व्यवसाय, विणलेली वस्त्रे, धातु उद्योग, शस्त्रोद्योग, दारुगोळा यापासून मिळणारा कर मोठ्या प्रमाणात होता.

व्यापारासाठी चलन ही महत्त्वाची बाब होती. प्रजेतील व्यवहार वस्तुविनिमय पद्धतीने चालत होता. परंतु व्यापारी उलाढालीकरीता नबाबानी चलन तयार केले. त्यासाठी अनेक टाकसाळी त्यांनी उघडल्या. यास टाकसाळीत तयार होणाज्या नाण्यांचा तपशिलची सन १८१० ची स्थिती पुढीलप्रमाणे होती.

अ.क्र.	चलन	टाकसाळीचे गांव	धातुचे वजन
१	एलीचपूर	एलीचपूर	२० मासे
२	अमराव्ती	अमरावती	२० मासे
३	बैतुल	बैतुल	१२ मासे
४	दारव्हा	दारव्हा	१८ मासे
५	अकोट	अकोट	१४ मासे

नामदारखॉचे वाघांबरी नावाचे नाणे चलनात होते. टाकसाळीवर सरकारचे नियंत्रण होते. यामध्ये एलीचपूर ही एक समृद्ध टाकसाळ होती.

अशाप्रकारे अचलपूरच्या नबाबाच्या काळातील आर्थिक जीवन होते.

सारांश :

१) येथील कृषी ही अतिशय सुपिक होती.

२) पन्ही मेहदवी नबाबाच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार शेती हा होता.

३) नबाबाला शेती, व्यापार, उद्योग व वने यातुन मोठ्या प्रमाणात कर प्राप्त होत असे.

४) या काळात अनेक समृद्ध टाकसाळी निर्माण झाल्या.

५) पन्ही मेहदवी नबाबाच्या काळातील आर्थिक जीवन संपन्न होते.

संदर्भ सुची :

१) महाराष्ट्र स्टेट गॅझेटीयर, अमरावती जिल्हा, दुसरी आवृत्ती १९६९

२) प्राचार्य बासीतांचा लेख, अचलपूर शहराचा इतिहास, इंडीयन हीस्टी कॉंग्रेस, १९७२, बिहार विद्यापीठ मुज्जफरपूर, बिहार

३) कारंजकर भि.दे., अमरावती शहराचा इतिहास.

४) काळे या.मा. व-हाडाचा इतिहास

५) देशपांडे य.खु., एलीचपूर-वज्हाडची जुनी राजधानी

६) श्री. अभईकर, एस.व्ही. यांचा नाणे संग्रह

७) श्री. वासुदेवराव खापर्डे यांचा खाजगी ऐतिहासिक वस्तु संग्रह.

❑❑❑

Jan-March 2018

विद्यावार्ता®

Peer Reviewed International Refereed Research Journal



Revised Edition

Editor

Dr.Bapu G.Gholap

Index

1) CONCEPT DEVELOPMENT THROUGH DIFFERENT METHODS IN CHEMISTRY
Dr. Rajwinder Kaur, Ferozepur City. || 10

2) A COMPARATIVE STUDY OF SOCIAL INTELLIGENCE OF SECONDARY.....
Vaishali Jagannath Korde, Prof. Dr. Arati P. Sapkale, Dhule. || 15

3) An analytical study on leverage position of Synbiotic Company
Ajitkumar R. Parmar, Vallabh vidyanagar. || 17

4) Higher Education in India – Quality Management and Sustenance
Dr. Aayesha Shaik, Hanamkonda. || 21

5) WATER MANAGEMENT IN INDIA: A CASE OF THE GROUNDWATER CRISIS
Ranjit Kumar Sen, Labpur, Birbhum || 28

6) ROLE OF MOBILE ASSISTED LANGUAGE LEARNING (MALL) FOR THE ENGLISH.....
G. SUNKANNA, Dr. K. SUNEETHA , Dr. V.B.CHITRA, A.P. India. || 34

7) Comparative Study of Moral Value among Urban and Rural people
Dr. Vinita Swarnkar, Raipur || 40

8) MASLIMS AT THE CROSSROAD
Prof. M.A Khan, Nagpur || 42

9) Defining Existentialism and its Presence in Girish Karnad's Yayati
Dr. Niranjana Shrivastava Malani, Khandwa || 44

10) Theme of Partition in Chaman Nahal's 'Azadi': A Critical Study
R. Srinivasa Rao, Dr. V. B. Chitra, Ananthapuramu-, Andhra Pradesh. || 47

11) The Political World in Rohinton Mistry's Such a Long Journey
Dr. Vedprakash Malani, Pandhana (Distt. Khandwa). || 51

12) "THE UNORGANISED WORKERS IN INDIA: AN ANYALYSIS"
Dr. Ram Shankar Das, Berhampur (Gm), Odisha. || 54

13) Comparative study of the development of environmental values in .....
Dr. (smt.) Gulrukh Hameed Khan, Jabalpur(M.P.) || 58

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

14) A Proposed Model for Small and Medium Size Enterprises (SMEs) to ....
Pramod Kumar Mishra, Dr. Devendra Kumar Pandey, Dr. Anil Singh Parihar, Dr. Anil Vashisht, Madhya Pradesh, Gwalior || 60

15) Tribal Development in Karnataka State : Some Observation
Manjula K.P, Dr. Krupalini H.S, Shimoga || 64

16) A STUDY OF THE INFLUENCE OF INTELLIGENCE ON ACADEMIC ACHIEVEMENT OF .....
Dr. Sonali N. Channawar, Mrs. Rupali Sharma , Mrs Sonalisa Das || 69

17) ग्रामीण विकासांत निर्मलग्राम पुरस्कार योजनेंची भुमिका : एक समाजशास्त्रीय अभ्यास
प्रा.प्रदीप दाजीबा पाटील, उमरगा, जि. उस्मानाबाद. || 75

18) महात्मा गांधीचा सत्याग्रहाचा सिध्दात
प्रा. डॉ. ए. टी. शिंदे, सिडको नांदेड || 78

19) दलितांचे मानवाधिकार आणि त्यांचे उल्लंघन : साहित्यांतर्गत संदर्भावलोकन
प्रा.कांबळे डी.आर., सोनखेड || 82

20) डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचा भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग
डॉ. नितिन व. चांगोले, अमरावती || 85

21) मुक्तीपर्व उपन्यास में अभिव्यक्त जीवन (भाग-२)
डॉ.विलास कांबळे, शिरुर ताजबंद ता.अहमदपूर जि. लातूर || 87

22) माध्यमिक शिक्षकांच्या सर्जनशील अध्यापनाकडे पाहण्याचा दृष्टीकोनाचा अभ्यास
वळवी योगेश विजेसिंग, प्राचार्या डॉ. एल. एस. मोरे, नवापूर || 90

23) अमरावती जिल्हातील प्रधानमंत्री ग्रामसडक योजना ग्रामीण विकासातील एक महत्वाचा स्त्रोत .....
डॉ. शशीकांत रु.कडू || 93

24) संत सेना महाराजांची अभंगवाणी : एक चिंतन
डॉ. आर. बी. धायगुडे, परळी–वै. || 95

25) महाराणी येसुबाई – व्यक्ती आणि कार्य
प्रा.डॉ. शरद आर. डवरे, कोराडी, जि. नागपूर || 98

26) "दलितांच्या हक्कासाठी डॉ. आंबेडकरांनी गोलमेज परिषदांमध्ये दिलेला लढा"
प्रा. वंदना तागडे, कारंजा (घा.), जि. वर्धा || 102

http://www.printingarea.blogspot.com
www.vidyawarta.com/03

20

डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचा भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग

डॉ. नितिन व. चांगोले
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती

****

प्रस्तावना :

डॉ. पंजाबराव देशमुख सामाजिक व राजकीय सुधारणांचे प्रवर्तक होते. राजकारणात प्रवेश घेण्यापूर्वी त्यांनी सामाजिक प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी प्रयत्न केला, राजकीय प्रक्रियेत सत्तास्थानी जातीय, सामाजिक व आर्थिक सुधारणाच्या कार्याला चालना दिली. त्यांच्या निर्णय प्रक्रियेत दोन्हींना सारखेच महत्त्व होते. सामाजिक ज्ञान निर्माण झाल्याशिवाय राजकीय सुधारणांना अर्थ राहत नाही. अशी त्यांची धारणा होती, म्हणूनच त्यांनी सर्वप्रथम शिक्षणासारख्या महत्त्वाच्या विषयाला हात लावला. समाज जागृत झाला म्हणजे राजकीय जागृती होते अशी त्यांची भावना होती.

कोणत्याही देशातील स्वातंत्र्य लढा वैयक्तिक असत नाही. राजकीय पक्ष, ध्येयवादी पक्ष व्यक्तीसमुह किंवा संस्था यांच्याद्वारे लढा उभारला जातो. डॉ. पंजाबरावांनी स्थापन केलेल्या सर्व संस्थांनी व त्यांच्याशी निगडीत कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला त्यांचे सर्व श्रेय डॉ. पंजाबराव देशमुखांना जाते. तीच त्यांच्या स्वातंत्र्य संग्रामातील कार्याची उपलब्धी होय.

१९२६ ते १९४७ पर्यंतच्या कालखंडात समाजहित व राजकीयहित याला तडा जाईल अशी एकही कृती डॉ. पंजाबराव देशमुखांनी केली नाही. त्यांनी स्वातंत्र्याला पोषक अशा सर्व घटना व व्यक्तींना प्रेरणा व समर्थन दिले.

खादी प्रचार अभियान :

गांधी युगात खादीचा वापर, निर्मिती, सुतकताई यावर अधिक भर देण्यात आला. स्वदेश चळवळीत खादीला अतिशय महत्त्व प्राप्त झाले होते. सविनय कायदेभंग व विदेशी वस्तुंवर बहिष्कार ही राजकीय स्वातंत्र्यांची प्रतीक बनली होती. काँग्रेस पक्ष व खादी यांचे एक समिकरणच झाले होते. हा कालखंड सविनय कायदेभंगाचा होता. अहिंसात्मक सत्याग्रहामुळे सरकारशी असहकार पुकारला होता. त्यात राष्ट्रीय पुढाऱ्यांना अटक झाल्याने सर्वत्र असंतोष पसरला. मे १९३० मध्ये गांधीना अटक करण्यात आली.

यावेळेस डॉ. पंजाबराव देशमुख, अमरावती डिस्ट्रीक्ट कौसिंलचे अध्यक्ष होते. त्यांनी खादी प्रचारासाठी जिल्हाभर यात्रा सुरु केली. त्यांचेसोबत थुगांवकर, दादासाहेब वाटाने, ॲड. चौबळ खादी कार्यकर्ते असत. प्रचार यात्रा वलगांव पासून सुरु झाली. सभेत शेतकऱ्यांची मुले व्याख्याने देत व खादीची विक्री करीत. डॉ. पंजाबराव देशमुखांना अटक होणार अशी चिन्हे दिसू लागली. काँग्रेस पक्षाचे सभासद नसुनही प्रत्येक राष्ट्रीय कार्यात डॉ. पंजाबराव देशमुखांनी सक्रीय भूमिका बजावली. भारतीय स्वातंत्र्याच्या प्रत्येक लढ्यात पक्षहित बाजुला ठेवून उडी घेणारा स्वातंत्र्य सैनिक म्हणूनच डॉ. पंजाबरावांचा उल्लेख करावा लागतो.[1]

भारत सेवक दल :

डॉ. पंजाबराव देशमुखांनी स्थापन केलेल्या भारत सेवक दलाचे शिबिर १९४० मध्ये वर्धा येथे आयोजित केले होते. या शिबिरात दुरुन शारीरिक शिक्षणासाठी आलेले २०० स्त्री पुरुष गांधीजींना सेवाग्राम येथे भेटले. दल प्रमुखांनी या संघटनेचा हेतु व तिचे शारीरिक, बौद्धिक व ग्रामउद्धाराचे कार्यक्रम महात्माजींच्या नजरेस आणून दिले. १९४१ मध्ये दादा धर्माधिकारी व आचार्य कृपलानी यांनी दलाच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले. पंडीत नेहरुंनी सुद्धा या दलाची भूमिका समजावून घेतली. संस्थेच्या माध्यमातून कार्यकर्त्यांमध्ये राष्ट्रीय व विधायक कार्य करण्यास प्रवृत्त करण्याचा सतत प्रयत्न डॉ. पंजाबराव देशमुखांनी केलेला दिसतो.

मराठा लीग :

दुस-या महायुद्धाच्या काळात नैसर्गिक संसाधनांची व मनुष्यबळाची उणीव ब्रिटीशांना जाणवू लागली. महात्मा गांधींनी सविनय कायदेभंग व असहकार पुकारल्याने सरकारने संस्थानिकांना गोंजारण्याचे प्रयत्न केलेत. युद्धातील विजयानंतर भारतात राजकीय सुधारणा करण्यात येतील अशी अभिवचने दिली जात होती.

कोल्हापूरचे छत्रपती राजाराम महाराज यांनी मराठा लीग ही संस्था स्थापन केली होती. मराठा समाजात जागृती व्हावी व तो संघटीत करावा हा मुळ उद्देश या संस्थेचा होता. युद्धासाठी ब्रिटीशांना लष्कर भरतीस चालना देणारी एखादी संघटना हवी होती व ब्रिटीशांची मर्जी सांभाळण्यासाठी या मराठा लीगचे ५ नोव्हेंबर १९३९ ला नाशिक येथे अधिवेशन भरले. तिला मराठा कॉन्फरन्स हे नाव दिल्या गेले. या कॉन्फरन्सने डॉ. पंजाबराव देशमुखांची

निमंत्रण डॉ. पंजाबरावांनी तात्काळ
ल्या पत्रात म्हटले होते, "अध्यक्ष म्हणून
नो तर ते तुम्हाला खपायचे नाही आणि
स्वत:चे विचार मी बदलविण्यास तयार

नी याच वेळेस सह्याद्री विमा कंपनीच्या
यासाठी डॉ. पंजाबरावांना नाशिकला
मध्ये त्यांनी जे भाषण केले ते जहाल
मुळेच मराठा कॉन्फरन्समध्ये एका
ग्रामचा या साम्राज्यवादाच्या युद्धाशी

या १२ वर्षाच्या कालखंडात डॉ.
व, शेतकरी संघ, भारत सेवक दल,
जी शिक्षण संस्था इत्यादी संस्थांचे
सर्व संस्था विदर्भातील सामाजिक,
जीवनांशी निगडीत होत्या. त्यांनी
संघाची स्थापना केली. त्यांच्या
झालेले किंवा संस्थेत कार्यरत
यातंत्र्य संग्रामात उडी घेतली होती.
फरकाडे यांना स्वातंत्र्य संग्रामातील
गरावास झाला होता. श्रद्धानंद
झाले.[४]

१९४२ ला दिल्लीच्या इम्पीरिअल
रेस कॉन्फरन्स आयोजित करण्यात
जाबराव देशमुख देवास संस्थानात
ानिकांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून ते
हजर होते. महायुद्धाचा काळ असल्याने अडचणीत
आलेल्या इंग्रजां सैनिक बळ पुरविण्यासाठी लढवय्या लोकांचे
राजे व महाराजांचे पाठबळ मिळविण्यासाठी या परिषदेचे आयोजन
करण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी "इंग्रजांना मदत करण्यापेक्षा
भारतीय स्वातंत्र्य लढ्यात आपल्या कर्तव्याचा योग्य वाटा उचलला
नाही तर काळ तुम्हाला क्षमा करणार नाही व स्वातंत्र्यासाठी शपथ
घेवून बलिदानासाठी सज्ज झाले पाहिजे असे आव्हान केले."
त्यांच्या स्फोटक भाषणामुळे सर्वत्र खळबळ निर्माण झाली व ही
राज्यसंस्थेला खुली चिथावणी आहे असा आरोप करण्यात आला
त्यामुळे देवास येथील अधिका-यांनी एक ठराव पास केला की,
डॉ. पंजाबरावांचे भाषण त्यांचे स्वत:चे आहे. संस्थानाशी त्यांचा
संबंध नाही व डॉ. पंजाबरावांचा देवास संस्थानाशी असणारा संबंध
याच क्षणापासून तोडून टाकण्यात येत आहे. परंतु मुंबई वरुन
खासेराव पवार देवासला आले व त्यांनी डॉ. पंजाबरावांनी आमच्या
वतीने भाग घेतला. त्यामुळे त्यांच्या भाषणाची संपूर्ण जबाबदारी
ही आमची आहे असे पत्र पाठविले.[५]

चले जाव आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर असे जहाल व स्फोटक भाषण करण्याची मानसिकता केवळ राष्ट्रप्रेमाने प्रेरित झालेली व्यक्तीच करु शकते हे यावरुन स्पष्ट होते.

क्रांतीसिंह नाना पाटील यांचे ग्रामराज्य शिबिर :

२ नोव्हेंबर ते ११ नोव्हेंबर १९४६ पर्यंत क्रांतीसिंह नाना पाटील यांचे ग्रामराज्य व-हाडात सुरु झाले. नाना पाटील सारख्या स्वातंत्र्य सेनानी व पराक्रमी पुरुषाला डॉ. पंजाबरावांनी व-हाडात आमंत्रित केल्यामुळे मध्यप्रांत व-हाडचे मुख्यमंत्री रविशंकर शुक्लांनी त्यांच्यावर भाषणबंदीचा हुकूम बजावला त्यामुळे क्रांतीसिंहांना भाषण करता येत नव्हते. पण दौ-यावर बंदी नव्हती. डॉ. पंजाबराव देशमुखांनी या देशभक्ताला व-हाडभर फिरविले, सत्कार घडवून आणले. लोकांनी क्रांतीसिंहाला ४०,०००/- रुपयांची देणगी दिली. व-हाडात डॉ. पंजाबराव देशमुख हे एकच नेते होते त्यांनी क्रांतिसिंहाच्या जहाल राष्ट्रभक्तीचा यथोचित गौरव केला. सरकारच्या रोषांची पर्वा केली नाही.[६]

डिफेन्स कौन्सिल :

सुभाषचंद्र बोसांनी स्थापन केलेल्या आझाद हिंद फौजेला देशद्रोही ठरवून त्यांच्यावर खटले भरण्यात आलेत. त्यांची ही सेना ब्रिटीशांचे युद्ध गुन्हेगार झाली. तेव्हा ब्रिटीशांविरुद्ध लढणा-या सत्तेचा बचाव करण्यासाठी पंडीत नेहरुंच्या अध्यक्षतेखाली एक डिफेन्स कौन्सिल स्थापन झाले होते व त्याद्वारे स्वातंत्र्य सैनिकांच्या कायदेशीर बचावासाठी देशातील विधीज्ञांना आवाहन करण्यात आले. त्यासाठी त्यांना कोणताही मोबदला देण्यात येणार नव्हता. तेव्हा या स्वातंत्र्य सैनिकांच्या बचावासाठी वज्हाडातून फक्त डॉ. पंजाबराव देशमुख गेले. आझाद हिंद सेनेतील एक मराठा सेनापती श्री. जगन्नाथ भोसले यांची संपूर्ण केस डॉ. पंजाबरावांनी लढविली. याचवेळेस पंडीत नेहरुंशी त्यांची मैत्री होऊन त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

व-हाडात अनेक कायदेपंडीत, विधिज्ञ व बॅरिस्टर मंडळी होती. पण केवळ डॉ. पंजाबराव एकटे संकटसमयी धावून गेले.

संस्थानिकांचा संघ, भारतीय संघराज्यात विलीनीकरण :

देवासच्या मंत्रीमंडळात कुठलेही खाते न स्विकारता मुलभूत सुधारणा घडवून आणण्याचे काम त्यांनी केले. देवास संस्थान व अन्य संस्थाने यातील संबंधाचे प्रश्न, इंग्रजांशी संबंधित प्रश्न याबाबतचे निर्णय डॉ. पंजाबराव देशमुख घेत असत.

नरेंद्र मंडळाचे ते सदस्य असल्याने त्यांचे वारंवार दौरे चालत. मुंबई, कोल्हापूर, बडोदा, इंदूर, ग्वाल्हेर, धोलपूर, दिल्ली इत्यादी शहर व संस्थाने यांना भेटी देत. या नरेंद्र मंडळात ९०

संस्थाने सहभागी होती. या संस्थानांना एकत्र ठेवण्याचे कार्य डॉ. पंजाबरावांनी केले.[५] त्यामुळेच स्वातंत्र्यानंतर सर्व संस्थाने भारतातील संघराज्यात विलीन करतांना वल्लभभाई पटेलांना अडचण गेली नाही. संस्थान संघराज्यात विलीन करण्याची पार्श्वभूमी व संस्थानिकांची मानसिकता डॉ. पंजाबराव देशमुखांनी तयार करुन ठेवली होती.

निष्कर्ष :

१) स्वातंत्र्यासाठी समाज एकरुप असला पाहिजे. जातीभेद, अनिष्ठ, घातक रुढी व परंपरा स्वातंत्र्य प्राप्तीतील अडथळे होत हे त्यांनी जाणले होते.

२) सामाजिक जाण निर्माण झाल्याशिवाय राजकीय सुधारणा होवू शकत नाही असे डॉ. पंजाबराव देशमुखांचे ठाम मत होते.

३) ग्रामीण तरुणांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी म्हणून डॉ. देशमुखांनी शिक्षणाचा शस्त्र म्हणून वापर केला.

४) शिक्षणाद्वारे स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेण्याविषयी तरुणांना प्रोत्साहन दिले.

५) खादी प्रचार अभियानाद्वारे शेतक-यांच्या मुलांना व्याख्यान देणे, खादीची विक्री करणे यासारख्या कार्यात सहभागी करुन चळवळीच्या प्रवाहामध्ये आणले.

तळटीपा :

१) सूर्यकर-सावरकर भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख जीवन व कार्य पृष्ठ क्र. २२०-२२१

२) तत्रैव पृष्ठ क्र. २९८

३) तत्रैव पृष्ठ क्र. २९९

४) वीर उत्तमराव मोहिते, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ क्र. २७०

५) तत्रैव, पृष्ठ क्र. २६५

६) तत्रैव, पृष्ठ क्र. ३०५

७) दौलतराव गोळे, डॉ. पंजाबराव देशमुख विशेषांक, सदन माळा क्रांतीविर देशभक्त पृष्ठ क्र. ३६-३७

संदर्भ ग्रंथ :

१) डॉ. पंजाबराव देशमुख : जीवन व कार्य सुदाम सावरकर व रा.ब. सुर्यकर

२) शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख : जन्म शताब्दी महोत्सव १९९७-९८ (मराठी आ.)

३) लोकराज्य : डॉ. पंजाबराव देशमुख विशेषांक मार्च २००१, मुख्य संपादक : निळ सत्यनारायण

४) जागतिक कृषक क्रांतीचा विधाता : लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, लेखक : वीर उत्तमराव मोहिते.

21

मुक्तीपर्व उपन्यास में अभिव्यक्त जीवन (भाग-२)

डॉ.विलास कांबळे

स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरुर ताजबंद

ता.अहमदपूर जि. लातूर

प्रस्तावना :

मोहनदास नैमिशराय दलित विमर्श से जुड़े साहित्यकार है। 'मुक्तिपर्व' उपन्यास के माध्यम से दलितों का शोषण, उत्पीड़न तथा सामाजिक विकृतियों को कलम बद्ध करने का काम किया है। इस उपन्यास की मुख्य कथा देश आजादी के पूर्व तथा देश आजादी के बाद भी दलितों को अपने अधिकार, हक्क प्राप्त करने के लिए संघर्षरत रहना पड़ता है। इस उपन्यास का नायक सुनीत है, उसके व्यक्तित्व के इर्द-गिर्द मुक्तिपर्व उपन्यास की कथा घुमती है। सुनीत के पिता बंसी अशिक्षीत थे, परंतु सामाजिक विषमता से परिचित थे। बंसी भले ही अशिक्षीत हो मगर रामलालने डॉ.बाबासाहेब आंबेडकर की विचारधारा तथा शिक्षा का महत्व बताया था। इसी कारण अपने बेटे सुनीत को पाठशाला में भेजा। सही देखा जाए तो उनकी आर्थिक परिस्थिती उतनी अच्छी नहीं थी, तो भी बेटे को शिक्षा दी।

गरिबों के कारण शिक्षा में बाधा : दलितों को शिक्षा से वंचित रखने के कारण रामलाल ने उन्हें शिक्षा देने की वजह से दलित बस्ती में ही स्कूल खोल दिए। दलित बस्ती में कलालखाने की इमारत में पाठशाला खोल दी। दलितों को शिक्षा का महत्व समझाने के कारण बस्ती के सभी बच्चे पाठशाला में दाखला ले चुके थे। मगर ज्यादा दिनों तक स्कूल में रह नही पाए। क्योंकि पेट की आग बुझाना कठिण था। भूखे पेट दिमाग की बत्ती नही जलती। सही तो कहा जाता है कि, 'पेट मे पड़ा चारा तो नाचने लगा बेचारा'। इसलिए स्कूल को अलविदा कर मजदूरी करने के लिए चले जाते है। क्योंकि घर की आर्थिक हालात बहुत ही खराब थी। इसी कारण पापी पेट की आग बुझाने के लिए काम-धंदे पर चले गए।

दलित जाति के लोगों को पेट भरना ही सबसे बड़ा दर्शन होता है। आरंभ में सभी बच्चे स्कूल जाते है, किंतु घर के कामों के

विदर्भ अर्थशास्त्र परिषद

४२ वे वार्षिक अधिवेशन २०१८

दि. २७ व २८ जानेवारी २०१८



अर्थसुमती

गो. सी. टोम्पे महाविद्यालय सार्वजनिक ट्रस्ट द्वारा संचालित (रजि. नं. ई १८२)

गो. सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

चांदूर बाजार जि. अमरावती. ४४४७०४ (महा.) दुरध्वनी क्र./ फॅक्स : (०७२२७) २४३२३३

E-mail-principalgstompe@gmail.com, Website : www.gstompetrust.org

राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद - नॅक (NAAC) बंगलोर द्वारा पुनर्मुल्यांकन- B श्रेणी

ISO 9001: 2008 CERTIFIED

मुख्य संपादक

डॉ. संजय कोठारी

गो. सी. टोम्पे महाविद्यालय सार्वजनिक ट्रस्ट द्वारा संचालित (रजि. नं. ई १८२)

गो. सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

चांदूर बाजार जि. अमरावती.

व्दारा आयोजित

विदर्भ अर्थशास्त्र परिषद

४२ वे वार्षिक अधिवेशन २०१८ दि. २७ व २८ जानेवारी २०१८

"अर्थसुमती"

संशोधन पत्रिका

परिषदेत सहभागी लेख

मुख्य संपादक

डॉ. संजय ज. कोठारी

(स्थानिक सचिव, विदर्भ अर्थशास्त्र परिषद)

सल्लागार मंडळ

प्राचार्य डॉ. राजेंद्र रामटेके
प्रा. राजीव शिंदे
डॉ. दि: व्य. जहागीरदार
डॉ. वनिता चोरे
डॉ. विजय कापसे
डॉ. संतोष कुटे
डॉ. करमसिंह राजपुत
डॉ. सुभाष गुर्जर
डॉ. राजेश बुरंगे

संपादक मंडळ

डॉ. विजय के. टोम्पे
डॉ. प्रविण वि. खोडे
प्रा. जयंत बनसोड
डॉ. नंदकिशोर गव्हाळे
प्रा. लालबा दुमटकर

प्रसिध्द होणाऱ्या लेखांतील मते त्या-त्या लेखकांची असतात यामधे संपादक व कार्यकारी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.

National Research Journal - ISSN 2278-9308

अनुक्रमणिका

अ.क्र.	संशोधन लेखाचे शिर्षक	संशोधकाचे नांव	पृष्ठ क्र.
१)	अल्पाधिकाराच्या संदर्भात खेळ सिद्धांताची अभ्यास पद्धती : एक अध्ययन	डॉ. महादेव आसाराम रिठे	१
२)	अनुभवनिष्ठता बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेची	डॉ. प्रशांत हरमकर	७
३)	बाजार संरचना-स्कंध बाजार आणि वस्तु सेवा कर (जी.एस.टी.) सैद्धांतीक विवेचन	डॉ. ममता आर. साहु	१३
४)	अल्पाधिकारी परिप्रेक्ष्यातुन ऑनलाईन बाजाराचे विश्लेषण	डॉ. सिद्धार्थ हरिदास मेश्राम	१६
५)	कृषी उत्पन्न बाजार समित्या - शेतकरी व सरकार - वास्ताविकता व अनुभव	डॉ. सुरेश जगताप	२१
६)	'बाजार संरचना - सैद्धांतिक विवेचन आणि प्रत्यक्ष अनुभव'	प्रा. विष्णु एकनाथ गुमटकर	२८
७)	'बाजार संरचना : मायकल पोर्टरचे योगदान	डॉ. उमेश भा. घोडेस्वार प्रा. विष्णु पवार	३२
८)	भारतातील बँकांची बुडीत कर्जे (एन.पी.ए.) ची कारणे, परिणाम व उपाय योजना	डॉ. संगीता जी. टक्कामोरे	३६
९)	व्यापारी अधिकोषांची थकित कर्ज आणि वसुलीचे धोरण	प्रा. रविंद्र बा. शेंडे	३९
१०)	भारतातील व्यापारी बँकांच्या बुडीत कर्जाची कारणमीमांसा	प्रा. डॉ. लाजवंती आर. टेंभुर्णे प्रा. दिपाली पडोळे	४३
११)	बँकांची बुडीत कर्जे (एन.पी.ए.) समस्या, आव्हाने आणि उपाययोजना	डॉ. राजेश उल्हासराव बुरंगे	४८
१२)	जागतिकीकरणामुळे बँकांच्या एन.पी.ए. मध्ये वाढ	प्रा.डॉ. जे.व्ही. गायकवाड	५२
१३)	व्यापारी अधिकोषांच्या अनिष्पादीत मालमत्तेचा प्रश्न	डॉ. किशोर साबळे	५५
१४)	वाणिज्य अधिकोषाची बुडीत कर्जे : समस्या, कारणे व उपाय	प्रा. महेंद्र गावंडे, डॉ. संजय धनवटे	६१
१५)	**भारतीय बँकिंग समस्या, आव्हाने व उपाय**	प्रा.डॉ. संजय कोठारी	६६
१६)	भारतीय व्यापारी बँकांच्या बुडीत कर्जे (एन.पी.ए.) समस्येवरील उपाय योजनांचे विश्लेषण	प्रा. डि.एस. गुर्जर	७२

१७)	राष्ट्रीयकृत बँका - बुडीत कर्ज (एन.पी.ए.) समस्या व उपाय	प्रा. जयंत मा. बनसोड	७७
१८)	भारतातील अनिष्पादित संपत्तीमुळे व्यापारी बँकेच्या कार्यक्षमतेवर होणारे परिणाम	डॉ. मृणालिनी नरेंद्र तापस	८२
१९)	NPA issue in India: An Analysis	Dr. Prashant Katole	84
२०)	A Study of Non-Performing Assets of Commercial Banks	Dr. Madhuri Pradeep Lele	91
२१)	Study of Non –Performing Assets and Its Impact on Banking Industry in India	Dr. Usha N. Patil	95
२२)	अकोला जिल्ह्यातील औद्योगिक विकास : एक अध्ययन	डॉ. पंकज मारोतीराव तायडे	१०२
२३)	यवतमाळ जिल्ह्यातील जिनिंग प्रेसिंग कारखान्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास (विशेष संदर्भ वणी तालुका)	डॉ. करमसिंग राजपुत	१०६
२४)	विदर्भात शेतीवर आधारीत उद्योगाची आवश्यकता : अडचणी व उपाय	प्रा. डॉ. विष्णु पा. कुटे	११०
२५)	नागपूर जिल्हयाचा औद्योगिक विकास समस्या व उपाययोजना	डॉ. विठ्ठल घिनमिने	११३
२६)	Natural Resources – Forests in Chandrapur District	Dr. Narendra K. Patil	११८



 ISSN : 2278-9308

व्यापारी अधिकोषांच्या अनिष्पादीत मालमत्तेचा प्रश्न

– डॉ. किशोर साबळे
श्री.शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय,
अमरावती.

प्रस्तावना :

देशाच्या अधिकोषण व्यवस्थेत अधिकोषण क्षेत्रातील सर्वोच्च संस्था म्हणजे रिझर्व बँक ऑफ इंडीया. ०१ एप्रिल १९३५ साली रिझर्व बँक ऑफ इंडीया कायदा १९३४ नुसार अस्तित्वात आली. देशातील वित्त व्यवस्थेचा विनियामक व पर्यवेक्षक या नात्याने कार्य करीत असतांना सर्व शेड्यूल बँकाची बँक म्हणून कार्य करते. भारतामध्ये स्टेट बँक व संलग्न बँका, राष्ट्रीयकृत बँका इतर सार्वजनिक बँका , खाजगी क्षेत्रातील बँका (ज्यामध्ये भारतीय व विदेशी बँका) सहकारी बँका, क्षेत्रीय ग्रामीण बँका अशा प्रकारची अधिकोषण व्यवस्था अस्तित्वात आहे. यातील अधिकतम बँका व्यापारी बँका म्हणून ओळखल्या जातात. देशातील एकूण ठेवीपैकी अधिकतम ठेवी देशातील या व्यापारी अधिकोषांकडे आहेत. आज या बँकाच्या अनिष्पादीत मालमत्तेचा प्रश्न निर्माण झाला आहे. एन.पी.ए. चा उच्च दर बँकाच्या लाभप्रदतेवर आणि एकंदरीत त्यांच्या अस्तित्वाला धोका पोहोचवत आहे.

१९९१ च्या आर्थिक सुधारणानंतर म्हणजेच जागतिकीकरण व उदारीकरणाचे पर्व १९९१ मध्ये सुरु झाल्यानंतर केंद्रशासनाने राष्ट्रीयकृत बँकातील समभाग विकण्यास सुरुवात केली. पूर्वी १०० टक्के शासकीय मालकीच्या या बँकात आता शासनाचे भांडवल ५१% पर्यंत कमी झाले आहे. यापूर्वी म्हणजे १९ जुलै १९६९ ला व त्यानंतर १९८० ला सरकारने बँकाचे राष्ट्रीयीकरण केले होते. शहरी वातावरणाशी आणि गरजांची जाणीव ठेवणाऱ्या या बँकाचे खऱ्या अर्थाने त्यानंतर ग्रामीण भागात आगमन झाले. आज देशातील कृषी आणि कृषीशी संबंधित व्यवसाय, मोठे उद्योग, लघु व कुटीर उद्योग, सेवा क्षेत्र, कमी व मध्यम उत्पन्नाच्या लोकांकरीता गृहबांधणी कर्जे आणि अलीकडे मोठ्या प्रमाणात उपभोग कर्जे व्यापारी बँका देतात. या बँकानी देशातील उत्पादकता आणि सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने महत्वपुर्ण भूमिका पार पाडली आहे. विकसित देशांचा आर्थिक विकास पाहिल्यास त्यांच्या आर्थिक विकासामध्ये व्यवस्थीत आणि नियोजीत वित्तीय संस्थांच्या वाढीला महत्व दिले असल्याचे दिसून आले. भारताच्या आर्थिक विकासामध्ये व्यापारी अधिकोषांची भूमिका लक्षात घेता आज विकासाकरीता कार्य करणाऱ्या या बँका थकबाकीच्या समस्येमुळे अडचणीत आलेल्या आहेत. देशातील ३८ पंजीकृत बँकाची अनिष्पादीत मालमत्ता ८ लाख कोटी रुपयापेक्षा अधिक झाली असल्याने त्याच्या वसुलीचा प्रश्न त्यांच्यासमोर उभा आहे. यातील ७०% थकबाकी सार्वजनिक क्षेत्रातील बँकाची आहे. समाजातील अतिरीक्त पैसा बचतीच्या स्वरुपात गोळा करुन गरजूंना कर्ज उपलब्ध करुन देणे व फायदेशीररीत्या गुंतवणे या उद्देशाने तयार झालेल्या या व्यापारी तत्वावरील बँका अनिष्पादीत मालमत्तेच्या समस्येमध्ये अडकलेल्या आहेत.

जेव्हा अधिकोषणची किंवा वित्तीय संस्थांची दिलेली कर्जे कर्जदारांकडून ९० दिवसापर्यंत थकीत राहते तेव्हा ती अनिष्पादीत मालमत्ता (छेप झशीर्षेीाळपस ॲीशीं) म्हणून जाहीर होते. बँकाच्या वाढत्या एन.पी.ए. करीता मोठे कर्जदार जबाबदार आहेत ज्यांच्याकडून कर्जे वसुल करणे बँकांना कठीण होऊन बसले आहे. याउलट बँकांनी लहान कर्जदारांना कर्ज दिल्यास बँकांचा एन.पी.ए. कमी राहील.

अधिकोषणाचा इतिहास :-

अगदी प्राचीन काळापासून आपल्याकडचा पैसा किंवा संपत्ती सुरक्षितपणे ठेवावी असे लोकांना वाटते आणि त्या गरजेतूनच बँकाचा जन्म झालेला आहे. भारतात अगदी रामायण, महाभारत काळापासून बँकींग अस्तित्वात असल्याचे उल्लेख मिळतात. परंतू त्यानंतरही भारतात बँक व्यवहार होत असल्याचे पुरावे भारतात येवून गेलेल्यांच्या प्रवास वर्णनामध्ये मिळालेले आहे परंतू त्यांचे त्यावेळचे स्वरुप आजच्या बँकींग व्यवस्थेची मेळ खात नाही. व्हेनीस शहरातल्या एकीकाळी ङ्बँकोरोसोङ्ब या नावाने ओळखल्या जाणाऱ्या ईमारतीजवळ बाकावर बसून तिथले सावकार पैशाचा ढीग करुन पैसे कर्जाऊ देणं, नाण्यांची अदलाबदल करुन देणे असे कार्य करीत असे. या बाकांना बँको असे म्हणत. यावरुन पुढे बँका हा शब्द प्रचलित झाला. बँक्रप्ट शब्द देखील असाच आला. बाकावर बसुन पैशाचे व्यवहार करतांना एखाद्याचं दिवाळं निघालं तर लोक त्याचा बाक उखडून टाकत असत त्यावरुन बँकक्रप्ट असं नाव पडलं.

आधुनिक बँकाचा इतिहास तसा फार जुना म्हणजे १७ व्या शतकात इंग्लंडपासून आधुनिक अधिकोषणाचा विकास झालेला आहे. १६९४ साली अधिकोषण व्यवसायाच्या विकासाकरीता बँग ऑफ इंग्लंडची स्थापना झाली. तशी इंग्लंडमध्ये आधुनिक बँक पध्दती १८ व्या शतकाच्या सुरुवातीला अस्तित्वात आली. तिसऱ्या एडवर्ड राज्याने १३०४ मध्ये साकारी सराफ नेमले होते. हे सराफ निरनिराळ्या देशांच्या चलनाच्या देवीघेवीचे व्यवहार करीत तसेच ते स्वत:जवळचा पैसा व्यापाऱ्यांना कर्ज म्हणून देत. त्यानंतर १७ व्या शतकात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली आणि उद्योगद्रव्यांच्या विकासाबरोबर वाढत्या भांडवल मागणीमुळे अधिकोषण व्यवसायाच्या विकासाला सुरुवात झाली. भारतामध्ये १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व नंतर २० व्या शतकात आधुनिक अधिकोषणाच्या विकास आणि विस्ताराला चालना मिळाली.

व्यापारी अधिकोषांचा कर्जपुरवठा :-

सुरक्षितता, तरलता आणि लाभता या तीन तत्वांची सांगड घालून अधिकोष ठेवी स्वीकारणे आणि कर्जे देणे ही महत्वाची कार्य करीत असतात भारतामध्ये आर्थिक नियोजन काळात व्यापारी अधिकोषांनी मोठ्या प्रमाणात विकास कार्याकरीता कर्जे उपलब्ध करुन दिलेली आहेत. भांडवल निर्मिती ही विकसनशील देशातील मोठी समस्या आहे. समाजातील बचती गोळा करुन गरजुंना कर्जाच्या स्वरुपात त्या उपलब्ध करुन देण्यात व्यापारी अधिकोषांनी वित्तीय मध्यस्थांची भूमिका योग्य प्रकारे पार पाडली आहे. व्यापारी अधिकोषांच्या कर्जपुरवठ्यामुळे देशातील अनेक लहानमोठ्या प्रकल्पांच्या विकासाला चालना मिळून उत्पादन आणि रोजगार निर्मितीला हातभार लागला आहे. शासनातील कृषी, उद्योगांना अल्प व मध्यम कालीन कर्जे देवून त्यांना उत्पादन वाढीसह प्रोत्साहीत करण्याचे कार्य करुन आवश्यक उत्पादक कार्यालाच कर्जपुरवठा देण्याचे धोरण नियोजन काळात या अधिकोषांनी अवलंबिले आहेत. कमी व मध्यम उत्पादन गटातील लोकांना गृहनिर्माण कार्यासाठी कर्जाची उपलब्धता करुन देवून लोकांच्या निवासाची व्यवस्था करण्याची भूमिका ही या अधिकोषांची आहे. याशिवाय शासकीय व्यापार या करीता या अधिकोषांनी कर्जपुरवठा केलेला आहे. देशाच्या प्रत्येक भागात अधिकोषांच्या शाखा उघडल्या गेल्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करुन एक नियोक्त्याची भूमिका या अधिकोषांनी पाकारली असल्याची स्पष्ट होते. रिझर्व बँक ऑफ इंडीयाकडून ०२ जून २०१७ ला प्रकाशीत आकडे याबाबत अधिक माहिती देतात. भारतातील पणजीकृत व्यापारी अधिकोषणची संख्या १,३०,४८२/- एवढी असून त्यांनी १४३९८९२२८३ खात्यांच्या माध्यमातून ८९२२११११२.१/- मिलियन रुपयाच्या ठेवी उभ्या केल्याचे तर १४४२३९६३६ खात्यांवर ६८७८४७२५.२ मिलियन कर्जे वाटल्याचे स्पष्ट होते.

पंजीकृत व्यापारी अधिकोषाची विभागनिहाय ठेवी व कर्जे मार्च –२०१५ (मिलियन रुपये)

विभाग	बँक कार्यालय	ठेवी		कर्जे	
		खात्यांची संख्या	ठेवी (रुपये)	खात्यांची संख्या	कर्ज येणे बाकी
उत्तर विभाग हरियाणा,हिमाचल प्रदेश, जम्मू काश्मिर, पंजाब, राजस्थान, चंदीगड, दिल्ली	२३८४३	२११,८१६,६८३	१७९३५४९८.०	१४९०९१८५	१५८६७५००.७
उत्तर पूर्व अरुणाचल प्रदेश, आसाम, मनिपूर, मेघालय, मिझोरम, नागालँड, त्रिपूरा	३३४५	३८४३२३१३	१५५४८०२.०	३२९९४६५	५३६०६१.६
पूर्व विभाग बिहार, झारखंड, ओरिसा, सिक्कीम, पं. बंगाल, अंदमान, निकोबार	२०८९३	२४२९२०६६७	११११३४९६.६	१६९०८१५५	५१७३२६७.८
मध्य भारत छत्तीसगढ, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, उत्तराखंड	२५९२६	३०७०६९८३३	११३९६७००.१	२००६४३२६	५५०१६९५.९
पश्चिम विभाग गोवा, गुजरात, महाराष्ट्र, दादर, नगर हवेली, दमण दिव	१९८२१	२३६००६७१९	२६८५३६२९.८	२४१८५२४१	२३३९९३०५.२
महाराष्ट्र	११८१०	१५४३८१४१५	२१५०००९५.१	१९५२४१५२	१९७७२९७९.७
दक्षिण विभाग आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, तामीलनाडू, लक्षदिप, पांडेचरी, तेलंगणा	३६६५४	४०३६४६०६८	२०३६६९८५.५	६४८७३२६४	१८३०६८९४.१
भारत (एकूण)	१३०४८२	१४३९८९२२८३	८९२२१११२.१	१४४२३९६३६	६८७८४७२५.२

स्त्रोत :– रीझर्व बँक ऑफ इंडीया बुलेटीन ०२ जून २०१७

व्यापारी अधिकोषांच्या थकबाकीचा प्रश्न :–

व्यापारी अधिकोषणची अनिष्पादीत मालमत्ता हा अलिकडच्या काळातील सातत्याने चर्चीला जाणारा विषय आहे. जेव्हा बँकांनी दिलेल्या कर्जाच्या हप्त्याची किंवा व्याजाची आणि मुद्दलाची परतफेड ९० दिवसापर्यंत होत नाही तेव्हा ती कर्जे अनिष्पादीत मालमत्ता म्हणून घोषीत केली जातात. अर्थात जेव्हा अधिकोष दिलेली कर्जे वसुल करण्यात अपयशी होतात किंवा ते परत येण्याची हमी असते अशी सर्व कर्जे अनिष्पादीत मालमत्ता म्हणून घोषीत होतात. भारतामध्ये आज १ लक्ष कोटी पेक्षा अधिक अनिष्पादीत खाती

परिणाम होवू शकतो. एन.पी.ए. वाढल्यामुळे बँकांना उत्पादक कार्याकरीताही कर्जे उपलब्ध करतांना अडचणी येवून त्याचा देशाच्या आर्थिक विकासावर परिणाम होण्याची शक्यता असते. बँकाची देयता आणि संपत्ती यामध्ये विसंगती निर्माण होवून त्यांच्या खर्चात वाढ होईल. ज्यामुळे बँकांच्या एकंदरीतच जोखीम क्षमतेवर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. ज्यामुळे त्यांच्या शेअर्सचे भावही भांडवल बाजारात कमी होतील.

समारोप :–

थोडक्यात विचार करता मोठा इतिहास लाभलेल्या या व्यापारी बँकांची देशाच्या आर्थिक विकासात अतिशय महत्वाची भूमिका राहिलेली आहे. चूकीच्या पध्दतीने किंवा चूकीव्या व्यक्तिंना मोठी कर्जे उपलब्ध करुन देवून त्यांची वसुली करण्यात या बँका अपयशी ठरल्या आहेत. मोठी कर्जे म्हणजे मोठा एन.पी.ए. त्यामुळे मोठ्या उद्योगपतींच्या कर्जाची वसुली करणे गरज आहे त्यामुळे बँकाचा एन पी ए अधिक वाढला आहे. त्याचा बँकांच्या कार्यक्षमता आणि कार्यक्षमतेवर अनिष्ट परिणाम होण्याची अधिक शक्यता असल्याने थकीत कर्जाच्या वसुलीवर या अधिकोषांनी आणि सरकारने काटेकोरपणे लक्ष केंद्रीत करणे ही गरज झाली आहे.

संदर्भ :-

१ गौतम एम. के., बनी बँकींग ॲन्ड फायनान्स वक्रतुंड पब्लीकेशन्स, मुंबई २०१२.

२. गोडबोले अच्युत, अर्थात, राजहंस प्रकाशन प्रा. लि. पूणे – २०१२.

३. सतपाल, ए. कम्पॅरीटीव स्टडी ऑफ नॉन परफॉरमींग असेट इन पब्लिक ॲन्ड प्रायवेट सेक्टर बँक इन न्यु एज ऑफ टेक्नॉलॉजी, इन्टरनॅशनल जनरल ऑफ करंट इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी – २०१४.

४. देसाई विनायक, वित्तीय संस्था आणि बाजार

५. गोखिलकर, विनायक आर्थिक संकल्पना डायमंड प्रकाशन पूणे – २००८.

६. http://m.rbi.org.in

७. thehinduenewspaper

८ manukijeet.com.

परिणाम होवू शकतो. एन.पी.ए. वाढल्यामुळे बँकांना उत्पादक कार्याकरीताही कर्जे उपलब्ध करतांना अडचणी येवून त्याचा देशाच्या आर्थिक विकासावर परिणाम होण्याची शक्यता असते. बँकाची देयता आणि संपत्ती यामध्ये विसंगती निर्माण होवून त्यांच्या खर्चात वाढ होईल. ज्यामुळे बँकांच्या एकंदरीतच जोखीम क्षमतेवर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. ज्यामुळे त्यांच्या शेअर्सचे भावही भांडवल बाजारात कमी होतील.

समारोप :–

थोडक्यात विचार करता मोठा इतिहास लाभलेल्या या व्यापारी बँकांची देशाच्या आर्थिक विकासात अतिशय महत्वाची भूमिका राहिलेली आहे. चूकीच्या पध्दतीने किंवा चूकीव्या व्यक्तिंना मोठी कर्जे उपलब्ध करुन देवून त्यांची वसुली करण्यात या बँका अपयशी ठरल्या आहेत. मोठी कर्जे म्हणजे मोठा एन.पी.ए. त्यामुळे मोठ्या उद्योजकांच्या कर्जाची रक्कम परत न आल्यामुळे बँकाचा एन.पी.ए. अधिक वाढला आहे. ज्याचा बँकांच्या लाभक्षमता आणि कार्यक्षमतेवर अनिष्ट परिणाम होण्याची अधिक शक्यता असल्याने थकीत कर्जाच्या वसुलीवर या अधिकोषांनी आणि सरकारने काटेकोरपणे लक्ष केंद्रीत करणे ही गरज झाली आहे.

संदर्भ :–

१. गौतम एस. के., मनी बॅकींग अॅन्ड फायनान्स वक्रतुंड पब्लीकेशन्स, मुंबई २०१२.
२. गोडबोले अच्चुत, अर्थात, राजहंस प्रकाशन प्रा. लि. पूणे – २०१२.
३. सतपाल, ए. कम्पॅरीटीव स्टडी ऑफ नॉन परफॉरमींग असेट इन पब्लिक अॅन्ड प्रायवेट सेक्टर बँक इन न्यु एज ऑफ टेक्नॉलॉजी, इन्टर नॅशनल जनरल ऑफ करंट इंजिनिअरींग अॅन्ड टेक्नॉलॉजी – २०१४.
४. देशपांडे विनायक, वित्तीय संस्था आणि बाजार
५. गोविलकर, विनायक आर्थिक संकल्पना डायमंड प्रकाशन पुणे – २००८.
६. http://m.rbi.org.in
७. thehinduenewspaper
८. mannkijeet.com.

4 TH YEAR - EDITION 16TH

JANUARY - MARCH 2017

NATIONAL RESEARCH JOURNAL ISSN 2319-6289

आर्थिक घडामोडींचे त्रमासिक

अर्थविश्व

EDITOR :
DR. SANGITA TAKKAMORE


विद्यासागर कला महाविद्यालय, खैरी (बिजेवाड़ा) रामटेक
द्वारा आयोजित

विदर्भ अर्थशास्त्र परिषद

४१ वे वार्षिक अधिवेशन

दि. ४ व ५ मार्च २०१७

विशेषांक



डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे शेतीविषयक विचार

प्रा. डॉ. जे. व्ही गायकवाड
या. द. व. देशमुख महाविद्यालय,
तिवसा, जि. अमरावती,
मोबाईल क्र. ९८५०१६३६९७

प्रस्तावना-

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, एक यशस्वी कर्तृत्वान कायदेपंडीत, कुशल व धुरंदर राजकारणी सच्चे समाजसेवक आणि देशभक्त, देशातील गरीबांचे कैवारी, उच्च विद्या विभुषित अशा बिरूदानीं असलेलं व्यक्तीमत्व म्हणजे डॉ. बाबासाहेब उर्फ भिमराव रामजी आंबेडकर होय. गौतम बुध्द, कबीर आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या विचारसरणीचा पगडा आंबेडकरावर दिसून येतो. या महान व्यक्तिमत्वाच्या प्रभावामुळेच आंबेडकरांच्या जीवनाला आणि विचाराना दैदिप्यमान प्रकाशदिशा प्राप्त झाली. राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, इतिहास अशा अनेक विषयांचा त्यानी सखोल अभ्यास केला अर्थशास्त्रांच्या बाबतीत विचार करता ते एक अर्थशास्त्राचे अभ्यासक, समीक्षक मानवी कल्याणाचे बहूजन सुखाय बहुजन हिताय अर्थशास्त्रज्ञ होते त्याचे अर्थशास्त्रीय विचार हे त्यांनी लिहीलेल्या विविध ग्रंथ, मासिके व बाहिष्कृत भारत मधिल अग्रलेख आणि त्यांच्या विविध व्याख्यानामधुन प्रकर्षाने जाणवतात. भारत सरकारने नुकतीच त्यांची १२५वी जयंती संपुर्ण देशभर साजरी केली. या पार्श्वभूमिवर त्यांचे शेतीविषयक विचारांचा परामर्ष घेण्यासाठी सदर पेपर लिहीण्यात आला आहे सद्य काळात शेती व्यवस्थेसमोर जी आव्हाने उभी आहेत ती आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य डॉ. आंबेडकराच्या शेतीविषयक विचारात आहे का? यावर प्रकाश टाकण्याचा छोटेखानी प्रयत्न या ठिकाणी करण्यात आला आहे.

शेतीविषयक विचारः-

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी राजकीयदृष्टया स्वातंत्र्य मिळाले परंतु भारतीय जनता आर्थिक व सामाजिक दृष्टया मागासलेली होती प्रंचड गरिबी, आर्थिक व सामाजिक विषमता मोठया प्रकारावर दिसत होती शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार परंतु ती

मागासलेली होती शेतकरी, शेतमजुर यांना दारिद्रयाने जखडले होते. दिनदलितांची अवस्था, त्यांच्या व्यथा अतिशय भयावह स्थितीमध्ये होत्या या सर्व स्थितीमध्ये बदल घडवून आणण्यासाठी या प्रश्नाकडे त्यांनी गांभीर्याने पाहिले एकुणच शेती व शेतकरी यांचा विकास झाल्याशिवाय ग्रामीण भागातील समाज सुधारणार नाही अशी त्यांची भावना होती याकरीता त्यांनी वेगवेगळया व्याख्यानांमध्ये, भाषाणांमध्ये, आर्थिक लेखामध्ये आपले परखड विचार मांडले आहेत त्याचा धावता आढावा खालीलप्रकारे घेता येईल.

डॉ. आंबेडकराचे शेतीविषयक विचार अभ्यासताना शेतजमिनीच्या धारण क्षेत्राची मालकी, त्याचा आकार व त्यावरिल उपाययोजना, सामुदायिक शेती, सहकारी शेती, शेतीचे राष्ट्रीयकरण व जमिन सुधारणा या सर्व बाबीविषयी त्याची मते खालीलप्रमाणे-

१) शेतजमिनीचा मालकी हक्क -

शेती विकासाचा संबंध हा जमिन धारणेशी जमिनीच्या मालकिशी जोडला आहे. हा संबंध फक्त आर्थिक घटकाशी नसुन तो सामाजिक अस्मितेशी आहे. तत्कालीन व्यवस्थेत आणि आजच्या विद्यमान काळात उच्च वर्गाकडे मोठ मोठया आकाराच्या जमिनी आहेत हा वर्ग स्वत: जमिन न कसता तो कुळा कडून कसून घेतो कुळांकडून शेतीची सर्व कामे करुन घेतली जातात कुळांची मोठया प्रकणावर पिळवणूक केली जाते कूळांना संरक्षण नसल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थती फारशी समाधानकारक नाही याचाच अर्थ यातुन वर्गव्यवस्था अधिक मजबूत व बळकट होत असल्याचे दिसून येत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

२) शेतजमिनीचा आकार -

शेतीच्या उत्पादकतेचा संबंधी हा शेतजमिनीच्या आकाराशी जोडलेला आढळतो किफायतशीर धारण क्षेत्र म्हणजे उत्पादन खर्च वजा केल्यानंतर राहीलेल्या उत्पादनावर कुंटुबाचा संपूर्ण खर्च भागविला जातो एवढे उत्पन्न देणारा जमिनीचा आकार (तूकडा) किफायतशीर धारण क्षेत्र होय. किफायतशीर धारण क्षेत्रास आर्थिक धारण क्षेत्र असेही म्हणतात. हे विचार आंबेडकरांना मान्य नव्हते त्यांच्या मते शेती हा व्यवसाय पोटभरण्याचा नसुन तो राष्ट्रीय व्यवसाय आहे. शेती हे राष्ट्राच्या उत्पन्नाचे महत्वपूर्व साधन असल्यामुळे त्यात वाढावा (Surples) निर्माण झाला पाहिजे शेतीमधुन उदरनिर्वाहापेक्षा ज्यादा उत्पादन (उत्पन्न) वाढले

तरच देशाची आर्थिक सामर्थ्य वाढेल. किफायतशीर धारण क्षेत्राच्या बाबतीत ते असे म्हणतात की, लहान आकार हा किफायतशीर ठरु शकत नाही. तसेच मोठे धारण क्षेत्र किफायतशीर ठरेल असे नाही कारण मोठया आकाराच्या जमिनीचे व्यवस्थापन सक्षमतेने करता येत नाही त्याकडे दूर्लक्ष होते. डॉ. बाबसाहेब आंबेडकराच्या मते, किफायतशीर धारण क्षेत्राचा संबंध फक्त शेतीच्या आकाराशी नसुन शेती करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या भांडवल, श्रम, उपलब्ध साधने यांच्याशी आहे या सर्व बाबी सहज व परवडणाऱ्या किंमतीमध्ये उपलब्ध झाल्या तर लहान क्षेत्रही लाभदायी ठरु शकेल आणि मोठे क्षेत्रही फायदेशीर होईल. म्हणजेच केवळ शेती उत्पादकतेचा संबंध हा जमिनीच्या आकाराशी नसून उत्पादनासाठी लागणारी सर्व साधनांची उपलब्धता त्याची बाजारातील किंमत या मुलभूत बाबीशी जोडला आहे हा विचार आजच्या काळामध्ये व्यवहार्य स्वरूपाचा वाटतो भारतामध्ये धारणक्षेत्राचे आकारमान वेगाने कमी होत असल्याचे आढळून येते १९६१ -६२ मध्ये २.६ हेक्टर १९७१-७२ मध्ये २.२ हेक्टर, १९८१-८२ मध्ये १.६७ हेक्टर आणि सध्या ते ०.४१ हेक्टर इतकी कमी झालेला आढळते वारसा हक्क कायदयाने जमिनीचे विभाजन आणि अपखंडन मोठया प्रमाणावर होत असल्याने शेजमिनीचे तुकडे पडत आहे या पार्श्वभूमिवर शेतीच्या उत्पादकतेचा संबंध हा फक्त लहान धारण क्षेत्राशी कारणीभूत ठरतो असे नसून त्याचा संबंध हा शेतीत वापरली जाणारे तंत्रज्ञान, हवामान, जमिनीची कस, पावसाचे प्रमाण, सिंचनाच्या सूविधा, शेतमालाची किमंत, हमीभाव, शासनाचे धोरण. सरकारी गूंतवणूक, अधिकोषण व वाहतूक सूविधा या सर्व बाबी विचारात घेणे आवश्यक आहे. दुर्देवाने भारतात या बाबीकडे दुर्लक्ष होताना दिसते परिणामी शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढत नाही असे मत त्यांनी मांडले.

३) सामुदायीक शेती-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी सामुदायीक शेतीची संकल्पना मांडली जातीभेद व वर्गभेद नष्ट करण्यासाठी हा मार्ग सूचविला गावकऱ्यांनी भेदभाव न करता सर्वांनी सामुदायीकपणे शेती करावी, सर्वच स्तरावरिल शेतकऱ्यांनी, जमिनदारानी आपली शेती सामुदायीक शेतीमध्ये एकत्र करुन शेती केल्यास जमिनदार किंवा कुळ तसेच शेतमजुर असा कोणताही वर्ग राहणार नाही असा विचार त्यांनी मांडला. सामुदायीक शेतीचा मार्ग

स्विकारल्यामुळे उत्पादनामध्ये प्रचंड वाढ होईल तसेच शासनाला मिळणारे उत्पन्न वाढेल कायद्याच्या चौकटीमध्ये सामुदायीक शेतीची अमंलबजावणी केल्यास सर्वाना फायदा होईल तसेच या शेतीप्रकारामध्ये सहभागी न होणाऱ्या शेतमालकावर कारवाई करण्याची तरतूद असावी असे परखड मत त्यांनी मांडले आर्थिक क्षेत्रातील उद्योगाबरोबर शेतीमध्ये शासनाच्या हस्तक्षेपा पासून स्वातंत्र्य म्हणजे खाजगी मालकांच्या हूकुमशाहीचे दुसरे नाव होय. शेती हा शासकीय उद्योग असावा. विम्याप्रमाणे शासनाने सर्व जमिनी ताब्यात घेवुन शेतीचे राष्ट्रीयीकरण करण्यावर त्यांचा भर होता जमिन ही कुळाची असो जमिनीदारांची असो अथवा खाजगी मालकिची असो या सर्वाना योग्य ती मोबदला नुकसान भरपाई स्वरूपात देण्याचा त्यांचा आग्रह होता.

आर्थिक समानता प्रस्थापित झाल्याशिवाय सामाजिक किंवा राजकीय समानता प्रस्थापित होणार नाही अशा त्यांचा ठाम विश्वास होता. संसदीय लोकशाहीच्या चौकीटीत कायद्याच्या आधारावच शासकीय समाजवादाचा डोलारा उंभा करुन स्वातंत्र्य समता आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा एक प्रशस्त मार्ग म्हणजे सामुदायीक शेतीचा प्रयोग होय असे प्रभावी विचार त्यांनी मांडले.

४) खोती पध्दती-

खोती पध्दती ही (मुंबई) कोकणी भागातील रत्नागीरी, ठाणे, रायगड या भागात प्रचलित होती या पध्दतीमध्ये शेतसारा गोळा करण्यासाठी शासनाने खोताची नियुक्त केली होती यामध्ये कुळाना कनिष्ठ भूधारक तर खोताला वरिष्ठ भूधारक समजले जात असे भारतातील जमिनदारी पध्दतीशी ही मिळतीजुळती पध्दती असून यामध्ये जमीन कसणाऱ्यांची म्हणजेच कुळांची मोठ्या प्रमाणात आर्थिक पिळवून केली जात असे वेठबिगारी पध्दतीने खोत कुळांची (शेतकऱ्यांचे) शोषण करित खोत गावातील शेतकऱ्यांना गुलामासारखे वागणूक देत असून विनामेहनताना त्यांच्या कडून पाहिजे तेव्हा काम करुन घेत असल्याने शेतकऱ्यांची चोहोबाजूनी पिळवणूक होत होती अशा परिस्थीतीमध्ये बाबासाहेबांनी कोकणातील खोती पध्दती नष्ट करण्याच्या चळवळीचा पाया १९२९ मध्ये रत्नागिरी येथे रोवला खोती पध्दतीचा अंत करुन भूधारकांच्या रक्त शोषणाला मुठमाती देण्याचा आंबेडकरांनी निर्धार केला. यासाठी

आंबेडकरांनी वेगवेगळया चळवळी उभ्या केल्या. १७ संप्टेबर१९३७ मध्ये आंबेडकरांनी मुंवई कायदे मंडळीत खोती पध्दती नष्ट करण्याविषयी विधेयक मांडले खऱ्या अर्थाने स्वातंत्र्यप्राप्ती नंतर या चळवळीला यश मिळाल असले तरी खोत पध्दती नष्ट करण्याचे काम बाबासाहेबांनी केले. दुसऱ्या शब्दात सांगावयाची झाल्यास स्वातंत्र्योत्तर काळातील भूमिसूधारणाची बीजे डॉ. आंबेडकराची खोती अंताच्या विधेयकामध्ये सामावलेली आहेत.

५) सहकारी शेती -

देशातील शेतीची दुरावस्था थांबविण्यासाठी सहकारी शेतीचा पुरस्कार त्यांनी केला सहकारी शेतीमध्ये जमिनीची मालकी हक्क कायम ठेवून जमिनी एकत्र करुन आधूनिक पध्दतीने शेती करण्याचा एक मार्ग म्हणजे सहकारी शेती होय. सहकारी शेतीच्या प्रकारामुळे शेतीचे उत्पादन वाढेल तसेच शेतकरी भूमिहीन बननार नाही त्यामुळे सहकारी पध्दतीने शेती करावी असे मत बाबसाहेबांनी मांडले सहकारी शेतीमध्ये गावातील शेतकरी आपल्या जमिनी एकत्र करुन त्यांवर उत्पादन घेतात. शेतकऱ्याचा मालकी हक्क अबाधित ठेवून सहकारी शेतीचा उपक्रम राबविता येईल. यामध्ये शेतकऱ्यांची उत्पन्न चं शेतीची उत्पादकता वाढेल. लोकशाही पध्दतीने सर्व कारभार होत असल्यामुळे सर्वाच्या फायदयांचा हा उपक्रम होईल असे मत त्यांनी मांडले बेकारी कमी करण्यासाठी शेतीचे प्रश्न सोडविण्यासाठी औद्योगीकरण हा प्रभावी उपाय खात्रीलायक असल्याने मत मांडले. शेतीमधिल उत्पादन वाढीसाठी अधिक भांडवल गूंतवणूक केल्यास बेकारी कमी न होता ती वाढेल यासाठी या सर्वांवर प्रभावी मार्ग म्हणजे या औद्योगिकरण होय. शेतीमधिल बेकार व्यक्तीना उद्योगामध्ये काम मिळेल तसेच शेतीवरील भार कमी होण्यास मदत होईल म्हणजेच देशामध्ये औद्योगिकरण आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

सारांश-

स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत शेती विकासाबाबत अनेक योजना राबविल्या काळानुसार शेती करण्याची पध्दती बदलली, पीक पध्दतीत बदल झाला, उत्पादन वाढले, हरितक्रांती, दुग्धक्रांती, झाली. या सर्व बाबीमुळे भौतिक सुबत्ता आली. परंतु शेतकऱ्याची दुरावस्था संपलेली नाही. आजच्या काळात ५५ प्रतिशत लोक उदरनिर्वाहासाठी शेतीवरच अवलंबून

D.V.P. TEOSA

आहेत. सर्वाधिक रोजगार निर्मितीची क्षमता कृषीमध्ये असून राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा १३ प्रतिशत पर्यंत कमी झालेला आहे. याचा अर्थ ५५ प्रतिशत लोकांना राष्ट्रीय उत्पन्नातील १३ प्रतिशत हिस्सा मिळतो यावरुन आर्थिक विषमता किती मोठी आहे याची कल्पना येते. शेती हा व्यवसाय बेभरवशाचा असल्यामुळे अनेक शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त होत असून सर्वाधिक आत्महत्याची नोंद महाराष्ट्रात झालेली आढळते ग्रामीण भागामध्ये अनेक बाबीचा अभाव तर शहरी भागातध्ये अमाप संपत्तीचे वाटप होत असल्यामुळे चंगळवादी प्रवृत्ती वाढत आहे आजची युवा पिढी शेती पासून दूर जात आहे भविष्यामध्ये शेती आणि शेतीशी संबंधीत सर्व क्षेत्र जीवंत ठेवण्यासाठी शासनाने यामध्ये पुढाकार घेणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेबांनी जे शेतीच्या संदर्भात विचार मांडले ते आजच्या काळात अतिशय महत्वाचे ठरतात. किफायतशीर धारण क्षेत्राच्या संदर्भात भांडवल श्रम, हवामान या सर्व बाबी महत्वाच्या आहेत असा मुलभूत विचार मांडला सहकारी शेती सामुदायीक शेती, शेतीचे राष्ट्रीयकरण, खोती पध्दती नष्ट करणे असे विविध उपाय शेती विकासासाठी म्हणजेच उत्पादन वाढविण्यासाठी सांगितले.आंबेडकरांनी सूचविलेल्या लोकशाही समाजवाद आणि सामुदायीक शेती योजनेमुळे शेतकऱ्याची दुरावस्था कमी होण्यास मदत होईल त्यामुळे त्यांनी सूचविलेल्या मार्गाचा अवलंब करणे गरजेचे आहे.

संदर्भ-

१) जाधव नरेंद्र (२०१३) : लसावी माझ्या समग्र अभिव्यक्तीचा, ग्रंथाली प्रकाशन, पुणे.

२) मुणगेकर भालचंद्र (१९९१) : डॉ. आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार, नॅशनल सेमिनार ऑन द लांइफ मिशन.

३) धनंजय किर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र, मुंबई.

४) दया पवार (१९९१) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ मुंबई,

५) अर्थतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांक- मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अर्थसंवाद त्रैमासिक एप्रिल ते जून २०१६ खंड- ४० अंक-१

६) अर्थसंवाद - मराठी अर्थशास्त्र परिषदेची त्रैमासिक जुलै ते संप्टेबर २०१६ खंड-४० अंक-२.

269

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची
संशोधन पत्रिका

अर्थमीमांसा

भारतीय सौर शके १९३९
(जानेवारी-जून २०१८ / खंड ११, अंक १)

✦ Integral Humanism and Sustainable Development Goals

- विकास आणि आर्थिक विषमता -

✦ A Comparative Account of Globa! Economic Inequality

✦ विषमता वाईटच पण दारिद्र्य अधिक वाईट

✦ भारताचा आर्थिक विकास आणि विषमता

✦ आर्थिक विकास व विषमता

✦ Economic Development And Gender Inequality in India

✦ Male-Female Disparity in India

✦ जागतिकीकरण - भारताचा विकास आणि विषमता

✦ Disparity in Occupational Pattern in India

ISSN 2320-0197

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची
संशोधन पत्रिका

अर्थमीमांसा

भारतीय सौर शके १९३९

(जानेवारी-जून २०१८/ खंड ११, अंक १)

□ प्रमुख संपादक □
दि.व्यं.जहागिरदार

□ सल्लागार मंडळ □
श्रीनिवास खांदेवाले
प्रमोद लाखे
प्रशांत हरमकर
जनार्दन काकडे

□ संपादकीय पत्रव्यवहार □
दि. व्यं. जहागिरदार
''व्यंकटेश'', १२, गुलमोहर कॉलनी,
कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२
दूरध्वनी (०७२१)-२६६१८५१

अनुक्रमणिका

- Integral Humanism and Sustainable Development Goals
  - Ashok Modak १

- विकास आणि आर्थिक विषमता -

- A Comparative Account of Global Economic Inequality
  - Manjusha Musmade १९
- विषमता वाईटच पण दारिद्र्य अधिक वाईट
  - अनिल पडोशी २९
- भारताचा आर्थिक विकास आणि विषमता
  - जे.व्ही.गायकवाड ३५
- आर्थिक विकास व विषमता
  - वैशाली देशमुख ४१
- Economic Development And Gender Inequality In India
  - Prashant Katole ५०
- Male-Female Disparity in India
  - R. Y. Mahore ५९
- जागतिकीकरण - भारताचा विकास आणि विषमता
  - मारोती तेगमपुरे ७४
- Disparity in Occupational Pattern in India
  - Yogesh G. Paylimode ७९

ISSN 2320-0197

भारताचा आर्थिक विकास आणि विषमता

जे.व्ही.गायकवाड
या.द.व.देशमुख महाविद्यालय,
तिवसा, जि.अमरावती.

आजच्या आधुनिक युगामध्ये देशाचा आर्थिक विकास किती झाला या बाबी ऐवजी देशातील लोकांना, विस्थापितांना, समाजाला विकासांच्या किती संधी मिळाल्यात, विकासाची फळे त्यांना मिळाली काय? या महत्त्वाच्या बाबी समजल्या जात आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर आर्थिक विकास मोजण्यासाठी विविध निर्देशांक वापरले जात आहेत. १९३४ मध्ये राष्ट्राचा विकास मोजण्यासाठी प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ सायमन कुझनेट यांनी राष्ट्रीय उत्पन्न, स्थूल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) ही संकल्पना मांडली. तेव्हापासून देशांचा आर्थिक विकास मोजण्यासाठी सर्वच देश जीडीपी चा वापर करीत आहे. काही प्रमुख देश जीडीपी बरोबर गिनी, सहगुणक, मानव विकास निर्देशांक, स्थूल देशांतर्गत समाधान किंवा कल्याण यासारख्या निर्देशांकाचा वापर करीत आहे. गिनी सहगुणक (निर्देशांक) कॅरॅडो गिनी यांनी मांडला. आर्थिक विषमता मोजण्यासाठी जागतिक बँकेने तो स्वीकारला. मात्र हा निर्देशांक सामाजिक लाभ मोजण्यासाठी अपयशी ठरला. देशामधील लोकाचे राहणीमान, जीवनमान सुधारले. पायाभूत-मूलभूत सुविधा (आरोग्य, शिक्षण, घरे, पाणी, वीज, वाहतूक इ.) मिळाल्या. सामाजिक कल्याण झाले म्हणजे खरा विकास होय. थोडक्यात राष्ट्रीय उत्पन्न वाढीबरोबर देशातील लोकांना अन्नसुरक्षितता, पोषण व आरोग्य सुविधा, स्वच्छता व पाणीपुरवठा, निवारा, वैयक्तिक सुरक्षा, आरोग्य व कल्याण सुविधा, शिक्षण आणि विविध क्षेत्रामध्ये स्वातंत्र्य संधीची उपलब्धता निर्माण करून देणे म्हणजे आर्थिक विकास होय.

भारतामध्ये १९५१ पासून खऱ्या अर्थाने नियोजनाच्या माध्यमातून आर्थिक विकासाला सुरुवात झाली. पंचवार्षिक योजनेमध्ये आर्थिक विकासाचे उद्दिष्टये, विकास दर, या प्रमुख बाबी यावर भर देऊन जीडीपी वाढविण्यावर भर देण्यात आला. १९५१ पासून २०१७ पर्यंत म्हणजेच बाराव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत आर्थिक विकासाची माहिती खालील प्रमाणे देता येईल.

तक्ता क्र. १

भारतातील पंचवार्षिक योजना आणि विकास दर

अ.क्र.	योजना	कालावधी	आर्थिक विकास	
			अपेक्षित दर	प्रत्यक्ष दर
१.	पहिली योजना	१९५१ ते ५६	२.१	३.६
२.	दुसरी योजना	१९५६ ते १९६१	४.५	४.२१
३.	तिसरी योजना	१९६१ ते १९६६	५.६	२.७२
४.	चौथी योजना	१९६९ ते १९७४	५.७	२.०५
५.	पाचवी योजना	१९७४ ते १९७९	४.४	४.८३
६.	सहावी योजना	१९८०ते १९८५	५.२	५.५४
७.	सातवी योजना	१९८५ ते १९९०	५.००	६.०२
८.	आठवी योजना	१९९२ ते १९९७	५.७	६.६८
९.	नववी योजना	१९९७ ते २००२	६.५	५.३५
१०.	दहावी योजना	२००२ ते २००७	८.००	७.२
११.	अकरावी योजना	२००७ ते २०१२	९.००	६,५
१२.	बारावी योजना	२०१२ ते २०१७	१०.००	-

संदर्भ: Govt. of India, Planning Commission.

भारतामध्ये आतापर्यंत १२ पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्यात व प्रत्येक योजनेमध्ये निर्धारित केलेली सर्व उद्दिष्टये पूर्ण करता आली असे नाही. पहिली, दुसरी, पाचवी, सातवी आणि आठवी योजनेमध्ये निर्धारित उद्दिष्टये पूर्ण करून आर्थिक विकासाचा दर पूर्ण करता आला. विशेषत: १९९१ या वर्षी जागतिकीकरणाचा स्वीकार केल्यानंतर मोठ्या प्रमाणात उत्पादन वाढेल अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षामध्ये निर्धारित उद्दिष्टये आठवी योजनेचा अपवाद वगळता बाकी योजनामध्ये पूर्ण करता आलेली नाहीत. म्हणजेच विकासाचा वेग कमी झालेला आढळतो.

२१ व्या शतकाच्या पूर्वार्धात जगातील विकसित देशांना आर्थिक अरिष्टांनी ग्रासले असले तरी काही विकसनशील देशांनी आपल्या अर्थव्यवस्थेची प्रगती उल्लेखनीय केली. सन २००९ मध्ये ब्राझील, रशिया, भारत व चीन या चार विकसनशील देशांची नवीन अर्थव्यवस्था निर्माण करून त्याला ब्रिक्स संघटना असे संबोधले आहे हे प्रमुख चार देश २०५० पर्यंत अमेरिका व युरोपीय संघातील देशाच्या पुढे जाऊन वेगवान विकास साध्य करतील अशा आशावाद २००१ मध्ये गोल्डमॅन सैच नावाच्या आर्थिक सल्लागार संस्थेचे अर्थशास्त्रज्ञ जिम ओ निल यांनी ब्रिक्स देशाच्या संदर्भात व्यक्त केला आहे. ब्रिक्स देशाच्या अर्थव्यवस्थेचा आकार मोठा असून जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी ४०

ISSN 2320-0197

प्रतिशत लोकसंख्या या चार देशात असून एकूण क्षेत्रफळापैकी २५ प्रतिशत क्षेत्रफळ या चार देशांचे आहे. घरगुती उत्पादन १५.४ ट्रिलीयन डॉलर असून या चार देशांच्या अर्थव्यवस्था एकमेकांना पूरक आहेत. सन २००७ चा अहवाल भारताच्या विकासाच्या संदर्भात आर्थिक अनुकूल होता. विकास पूर्ण अनुमानापेक्षा अधिक गतीने झाल्याचे नमूद केले याचे कारण म्हणजे भारतात मध्यम वर्गाच्या संख्येमध्ये वेगाने वाढ झालेली होती. जगामधील ३० विकसित शहरापैकी १० शहरे भारतात आहेत. भारतामध्ये आर्थिक विकासासाठी पायाभूत संरचनेत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक खाजगी क्षेत्राच्या माध्यमातून होतांना आढळते. ऊर्जा, रस्ते निर्माण वाहतूक, उद्योगधंदे, रेल्वे, सेवाक्षेत्र, सिंचन अशा सर्वच क्षेत्रामध्ये गुंतवणुकीच्या संदर्भात आघाडी घेतल्याने आर्थिक विकासाला चालना मिळत आहे. एन.डी.ए. सरकारच्या काळात पारदर्शकतेवर भर देऊन मेट्रो सेवा, बुलेट ट्रेन, रस्ते व वाहतुकीच्या साधनात वाढ, औद्योगिक व सेवा क्षेत्रामध्ये आवश्यक ती गुंतवणूक करून आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यावर भर दिला जात आहे. संपूर्ण जगामध्ये सामाजिक प्रगतीच्या निर्देशांकामध्ये २०१६ मध्ये १३३ देशामध्ये भारताचा ९८ वा क्रमांक लागतो. त्याचा निर्देशांक ५३.९२ इतका आहे. सामाजिक प्रगती व फिनलँड देशाचा प्रथम क्रमांक दिसून येतो. भारतामध्ये २०१३ ते २०१६ या कालावधीत सामाजिक प्रगतीचा निर्देशांक सुधारत गेल्याचे दिसून येते. २०१३ तो ३९.५१ इतका होता तो २०१६ मध्ये ५३.९२ इतका झाला. सामाजिक कल्याणाबाबत ४४ वरून ५८.५९ इतका वाढला तसेच सामाजिक संधी याबाबत २०१३ मध्ये ४५ क्रमांक होता तो कमी होऊन २०१६ मध्ये ३८.५१ इतका झाला.

आर्थिक विषमता :

भारतामध्ये योजना आयोगाने आर्थिक नियोजनाची प्रमुख चार दीर्घकालीन उद्दिष्ट्ये निश्चित केली होती ती म्हणजे उत्पादनात कमाल वाढ करून राष्ट्रीय व दरडोई उत्पन्नाची उच्च पातळी गाठणे, पूर्ण रोजगार प्रस्थापित करणे, उत्पन्न आणि संपत्तीमधील विषमता कमी करणे आणि समता न्याय व शोषणमुक्त समाजवादी समाजरचना प्रस्थापित करणे. जलद आर्थिक वृद्धी आणि रोजगार विस्ताराच्या संधीत वाढ, उत्पन्न आणि संपत्तीमधील विषमता कमी करणे, आर्थिक केंद्रीकरणावर रोख लावणे, मुक्त आणि समतेवर आधारित समाज निर्मितीची मूल्य निर्माण करणे इत्यादी उद्दिष्ट्ये आपल्या सर्व योजनांची आहेत. आतापर्यंत भारत सरकारला उत्पन्न आणि संपत्तीमधील विषमता कमी करणे याबाबतीत अपेक्षित यश मिळाले नाही. विषमतेच्या बाबत भारत देश जगातील दुसऱ्या क्रमांकाचा बनला आहे. देशामध्ये व्यक्ती किंवा कुटुंबात उत्पन्नाची होणारी असमान वाटणी म्हणजे आर्थिक विषमता होय. विषमता ही लोकसंख्येच्या शेकडा प्रमाणाशी उत्पन्नाचे शेकडा प्रमाण यातून दाखविली जाते. उदा. देशामध्ये १ प्रतिशत लोकसंख्येकडे देशातील एकूण उत्पन्नापैकी ५३ प्रतिशत उत्पन्न आहे. गिनी निर्देशांकावरून विषमता मोजली जाते. गिनी सहगुणक ० (शून्य) असेल तर देशात पूर्णत: उत्पन्नाची वाटणी समान झालेली आहे. गिनी निर्देशांक १ (एक) असेल तर देशात सर्व उत्पन्न एकाच व्यक्तीला मिळाले. गिनी निर्देशांक जेवढा जास्त तेवढा त्या देशात विषमता अधिक

समजली जाते. १९९० मध्ये भारताचा गिनी निर्देशांक ४५ होता तो २०१३ मध्ये ५१ पर्यंत वाढला याच काळात चीनचा गिनी निर्देशांक अनुक्रमे ३३ वरून ५३ एवढा झाला म्हणजेच या दोन्ही देशात वरील काळात मोठ्या प्रमाणावर ग्रामीण व शहरी भागात आर्थिक विषमतेत वाढ झालेली दिसून येते. भारतामध्ये एकूण संपत्ती मधील ५४ प्रतिशत संपत्ती अतिश्रीमंत किंवा लक्षाधीश व्यक्तीच्या नियंत्रणाखाली आहे.

Swiss Multinational Financial Services Company ने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार भारतामध्ये अतिश्रीमंत ५ प्रतिशत लोकांकडे एकूण संपत्तीमधील ६८.६ प्रतिशत संपत्ती असून वरच्या १० प्रतिशत श्रीमंत लोकांकडे ७६.३ प्रतिशत संपत्ती आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या संस्थेने अतिलोकसंख्या असलेल्या भारत आणि चीन यांना देशामध्ये वाढत्या विषमतेच्या बाबतीत चेतावणी दिली आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या मते भारत आणि चिनमधील उच्चवृद्धी दरातून विषमता वाढत चालली आहे. गेल्या २५ वर्षामध्ये भारतात प्रचंड विषमता वाढलेली दिसून येते. मार्च २०१६ मध्ये Forbes Magazine मध्ये भारतातील १० अब्जाधीशांची नावे व त्यांची संपत्ती प्रसिद्ध केली आहेत. संपत्ती विषयी आकडेवारी बिलीयन अमेरिकन डॉलरमध्ये असून कंसात दिली आहे. १) मुकेश अंबानी (२२.७) २) दिलीप संघवी (१६.९) ३) हिंदुजा फॅमिली (१५.२) ४) अझिम प्रेमजी (१५.०) ५) मिस्त्री पलॉन्जी (१३.९) ६) लक्ष्मी मित्तल (१२.५) ७) गोदरेज फॅमिली (१२.४) ८) शिव नाडार (११.४) ९) कुमार बिर्ला (८.८) १०) सायरस पुनावाला (८.६) या दहा श्रीमंत व्यक्तीची एकूण संपत्ती १३५.४ बिलीयन अमेरिकन डॉलर एवढी आहे व टाईम्स ऑफ इंडिया ने १६ जानेवारी २०१७ रोजी प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार भारतात ८४ अब्जाधीश आहेत. त्यांच्याकडे एकूण संपत्ती २४८ अब्ज अमेरिकन डॉलर एवढी आहे. भारतामध्ये ५७ अब्जाधीशाकडे २१६ बिलीयन अमेरिकी डॉलर एवढी संपत्ती आहे. २१६ बिलीयन अमेरिकी डॉलर संपत्ती खालच्या (गरीब) ७० प्रतिशत आहे. ही आर्थिक विषमतेची भयावह स्थिती आहे.

आर्थिक विषमता निर्माण होण्याची कारणे :

१) संपत्तीचे /उत्पन्नाचे असमान वितरण
२) रोजगार निर्मितीच्या संधीमधील भिन्नता
३) भौगोलिक भिन्नता
४) आर्थिक वृद्धीमधील फरक
५) शैक्षणिक संधीची कमतरता
६) देशातील कर पद्धती
७) आर्थिक उदारीकरण-जागतिकीकरणाचे धोरण
८) वेतन आयोगाद्वारे
९) शासकीय धोरण
१०) ग्रामीण क्षेत्र व शहरीक्षेत्र यामध्ये फरक
११) असंघटित क्षेत्राकडे दुर्लक्ष

आर्थिक विषमतेचे परिणाम :

१) देशामध्ये श्रीमंत व गरीब असे दोन वर्ग निर्माण होऊन वर्गसंघर्ष निर्माण होतो.
२) सामाजिक अशांतता निर्माण होते
३) देशामध्ये राजकीय अस्थैर्य निर्माण होऊ शकते.
४) गुंतवणुकीची दिशा बदलवून श्रीमंतांना अधिक फायदे
५) गरिबाचे राहणीमान, जीवनमान खालावते
६) उत्पादन व उपभोग खर्चाची रचना बिघडते
७) देशातील अब्जाधीश व लक्षाधीश वर्ग

ISSN 2320-0197

सरकारवर दबाव निर्माण करून आपणास हवे तसे निर्णय घेण्यास भाग पाडतात.

८) शाश्वत विकास प्रक्रियेमध्ये अडथळा निर्माण होतो.

९) मूलभूत सुविधा गरिबांना मिळत नाही.

आर्थिक विषमता कमी करण्यासाठी उपाययोजना:

१) सरकारने कर माफी, कर सवलती बंद कराव्यात.

२) कंपनी, औद्योगिक कर कमी करू नये. ते वाढविण्यात यावे

३) श्रीमंत शेतकरी/बागायत शेतकरी/व्यापारी वर्गावर जास्त दराने कर लावण्यात यावे.

४) कर संरचना बदलवून अधिक लोकांचे प्रमाण वाढवावे.

५) कर चुकविणारे, बुडविणारे यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई.

६) प्रत्यक्ष कराचा वाटा अप्रत्यक्ष करांच्या तुलनेत जास्त राहण्यावर भर.

७) चलन विरहित व्यवहार वाढविण्यासाठी उपाय चालू ठेवावे.

८) काळा बाजार, भ्रष्टाचार करणाऱ्यांवर वेळेवर कारवाई करावी.

९) सरकारने आरोग्य, शिक्षण, सामाजिक सुरक्षितता व दारिद्र्य निर्मूलनाच्या योजनेवरील खर्च वाढवावा.

१०) ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा निर्मितीवर भर द्यावा.

११) कौशल्य विकासाच्या संधी निर्माण करून ग्रामीण भागाकडे लक्ष देण्यात यावे.

१२) विजेची उपलब्धता, उत्पादन यावर भर देऊन ग्रामीण भागाला पुरेशी वीज पुरवावी.

१३) लक्षाधिश व्यक्तीसाठी दत्तक खेडी योजना राबवावी.

१४) अति उत्पन्न असणाऱ्या वर्गाकडून गरीब वर्गाला घरे, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, इत्यादी साठी खर्च केल्यास त्यास आयकरातून सवलत द्यावी.

१९९१ च्या नवीन जागतिकीकरणाच्या धोरणामध्ये उदारीकरण ही एक महत्त्वाची प्रक्रिया आहे. भारतीय अर्थव्यवस्था जास्तीत जास्त बाजाराधिष्ठीत व सेवा प्रधान बनविण्याच्या हेतूने खाजगी आणि विदेशी गुंतवणुकीला चालना देण्यात आली. नव्हे त्याच्यासाठी शासकीय स्तरावरून विविध सवलती देण्यात आल्या. आयात करात कपात, बाजारावरील निर्बंध हटविणे, कर कपात, विविध सवलती जाहीर करून उच्च वृद्धिदर निर्माणतेसाठी प्रयत्न झाले. म्हणजेच आर्थिक विकासासाठी-रोजगार संधी निर्माणतेसाठी खाजगी क्षेत्रांना फार मोठ्या प्रमाणावर स्वातंत्र्य मिळाले. उदारीकरणाच्या धोरणातून खाजगी क्षेत्राचा विकास होण्यास मदत झाली परंतु उदारीकरणाच्या लाभापासून ग्रामीण व शहरी भागातील मोठी लोकसंख्या दूर फेकल्या गेली. उदारीकरणाचा फायदा श्रीमंत अधिक उत्पन्न असणाऱ्या वर्गाला झाला. कमी उत्पन्न असणाऱ्या, असंघटित क्षेत्रातील वर्गाला यांचा कमी झाला. म्हणजेच उदारीकरणातून आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात वाढली.

भारतामध्ये शेतीमधील उत्पन्नापेक्षा औद्योगिक व सेवा क्षेत्रातील उत्पन्न प्रतिशत जास्त आहे. औद्योगिक क्षेत्रामध्ये प्रगत भांडवल प्रधान तंत्राचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असल्याने उत्पादन वृद्धीचा दर वाढत आहे. शेतीमध्ये मात्र श्रमप्रधान तंत्र, अपुरे गुंतवणूक, जलसिंचनाचे अर्धवट कामे,

कोरडवाहू जमीन, नैसर्गिक हवामान इत्यादी कारणांमुळे शेतीमधील उत्पादनात अपेक्षित वाढ झालेली दिसत नाही. पायाभूत सुविधा सेवा व औद्योगिक क्षेत्रासाठी मोठ्या प्रमाणावर निर्माण केल्या जात असून कृषी क्षेत्रासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात गुंतवणूक अथवा पायाभूत सुविधा निर्माण होत नसल्याने हे क्षेत्र विकासाच्या प्रक्रियेत मागे आहे. म्हणजेच शेतीवर अवलंबन असणारा वर्ग गरीब तर सेवा औद्योगिक क्षेत्रातील वर्ग श्रीमंत अशी विषमता आढळते. रोखे बाजार, बँकिंग पद्धतीमधील कर्जवाटप, मुद्राबाजार, वीज, रस्ते, पाणी, वाहतुकीची साधने, दळणवळणाची साधने या सुविधा औद्योगिक क्षेत्रासाठी सेवा क्षेत्रासाठी पुरविल्या जात असून शेती क्षेत्राला पुरेशी वीज सुद्धा मिळत नाही. त्यामुळे प्राथमिक (शेती), द्वितीय (उद्योग), आणि तृतीय (सेवाक्षेत्र) क्षेत्रामध्ये उत्पन्न-उत्पादन याबाबतीत मोठ्या प्रमाणावर विषमता आढळून येते.

सारांश :

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत विषमता वाढत असेल तर तो खरा विकास नाही. स्थैर्यासह विकासाचे धोरण सरकार राबवीत असेल व पूर्ण रोजगार निर्माण करणाऱ्यावर भर देत असेल तर तो खरा विकास होय. विकासाचा अंतिम उद्देश लोकाचे राहणीमान, जीवनमान उंचावणे हा असून विकासाचा लाभ समाजातील प्रत्येक व्यक्तीला मिळाला पाहिजे. देशामधील साधनसंपत्तीचा वापर काही मोजके व्यक्ती अब्जाधीश करत असतील आणि अनेक व्यक्ती दारिद्र्यामध्ये जीवन जगत असतील तर त्याला आर्थिक विकास म्हणता येणार नाही म्हणजेच शासनाने वाढत्या विषमतेला रोखण्यासाठी व आर्थिक विषमता दूर करण्यासाठी विशेष प्रयत्न व प्रभावी उपाययोजना करणे अपेक्षित आहे.

संदर्भ सूची :

१) जे.एफ.पाटील (२००५) : आर्थिक विकास व वृद्धी, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२) पाटील आनंद (२०१३) : भारतातील सर्वसमावेशक विकासाची वस्तुस्थिती, राज्यसेवा परीक्षा.

३) अर्थसंवाद (आक्टो. ते डिसें. २०१६) : मराठी अर्थशास्त्र परिषदेची त्रैमासिक.

३) अर्थसंवाद (जुलै ते सप्टें. २०१३) : मराठी अर्थशास्त्र परिषदेची त्रैमासिक.

४) अर्थविश्व (जाने. ते फेब्रु. २०१३) : आर्थिक घडामोडीची त्रैमासिक, रामटेक.

५) योजना मासिक (जुलै २०१३), कार्यालय, मुंबई.

♦♦♦

विदर्भ अर्थशास्त्र परिषद

४२ वे वार्षिक अधिवेशन २०१८

दि. २७ व २८ जानेवारी २०१८

2017 - 2018



अर्थसुमती

गो. सी. टोम्पे महाविद्यालय सार्वजनिक ट्रस्ट द्वारा संचालित (रजि. नं. ई १८२)

गो. सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

चांदूर बाजार जि. अमरावती. ४४४७०४ (महा.) दुरध्वनी क्र./ फॅक्स : (०७२२७) २४३२३३

E-mail-principalgstompe@gmail.com, Website : www.gstompetrust.org

राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद - नॅक (NAAC) बंगलोर द्वारा पुनर्मूल्यांकन - B श्रेणी

ISO 9001: 2008 CERTIFIED

मुख्य संपादक

डॉ. संजय कोठारी

 ISSN : 2278-9308

अनुक्रमणिका

अ.क्र.	संशोधन लेखाचे शिर्षक	संशोधकाचे नांव	पृष्ठ क्र.
१)	अल्पाधिकाराच्या संदर्भात खेळ सिद्धांताची अभ्यास पद्धती : एक अध्ययन	डॉ. महादेव आसाराम रिठे	१
२)	अनुभवनिष्ठता बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेची	डॉ. प्रशांत हरमकर	७
३)	बाजार संरचना-स्कंध बाजार आणि वस्तु सेवा कर (जी.एस.टी.) सैद्धांतीक विवेचन	डॉ. ममता आर. साहु	१३
४)	अल्पाधिकारी परिप्रेक्ष्यातुन ऑनलाईन बाजाराचे विश्लेषण	डॉ. सिद्धार्थ हरिदास मेश्राम	१६
५)	कृषी उत्पन्न बाजार समित्या - शेतकरी व सरकार - वास्ताविकता व अनुभव	डॉ. सुरेश जगताप	२१
६)	'बाजार संरचना - सैद्धांतिक विवेचन आणि प्रत्यक्ष अनुभव'	प्रा. विष्णु एकनाथ गुमटकर	२८
७)	'बाजार संरचना : मायकल पोर्टरचे योगदान	डॉ. उमेश भा. घोडेस्वार प्रा. विष्णु पवार	३२
८)	भारतातील बँकांची बुडीत कर्जे (एन.पी.ए.) ची कारणे, परिणाम व उपाय योजना	डॉ. संगीता जी. टक्कामोरे	३६
९)	व्यापारी अधिकोषांची थकित कर्ज आणि वसुलीचे धोरण	प्रा. रविंद्र बा. शेंडे	३९
१०)	भारतातील व्यापारी बँकांच्या बुडीत कर्जाची कारणमीमांसा	प्रा. डॉ. लाजवंती आर. टेंभुर्णे प्रा. दिपाली पडोळे	४३
११)	बँकांची बुडीत कर्जे (एन.पी.ए.) समस्या, आव्हाने आणि उपाययोजना	डॉ. राजेश उल्हासराव बुरंगे	४८
१२)	जागतिकीकरणामुळे बँकांच्या एन.पी.ए. मध्ये वाढ	प्रा.डॉ. जे.व्ही. गायकवाड	५२
१३)	व्यापारी अधिकोषांच्या अनिष्पादीत मालमत्तेचा प्रश्न	डॉ. किशोर साबळे	५५
१४)	वाणिज्य अधिकोषाची बुडीत कर्जे : समस्या, कारणे व उपाय	प्रा. महेंद्र गावंडे, डॉ. संजय धनवटे	६१
१५)	**भारतीय बँकिंग समस्या, आव्हाने व उपाय**	प्रा.डॉ. संजय कोठारी	६६
१६)	भारतीय व्यापारी बँकांच्या बुडीत कर्जे (एन.पी.ए.) समस्येवरील उपाय योजनांचे विश्लेषण	प्रा. डि.एस. गुर्जर	७२

विदर्भ अर्थशास्त्र परिषद -४२ वे वार्षिक अधिवेशन २०१८ ISSN : 2278-9308

जागतिकीकरणामुळे बँकांच्या एन.पी.ए. मध्ये वाढ

- प्रा.डॉ.जे.व्ही. गायकवाड
या.द.व. देशमुख महाविद्यालय, तिवसा

भारताच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वपूर्ण घटक म्हणून बँकाकडे पाहिले जाते. भारतामध्ये बँकींग व्यवसाय नवीन नाही. मनस्मृतीमध्ये याबाबतचे दाखले आपणास मिळतात. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतामध्ये बँकींग व्यवसाय म्हणावा तसा नव्हता परंतू स्वातंत्र्योत्तर काळात व्यापारी बँकाचा विकास झाला असला तरी तो फारसा समाधानकारक नाही. बँकांचे व्यवस्थापन, कर्जविषयक धोरण, वाढता एन.पी.ए., सरकारचा छुपा हस्तक्षेप, रिअल इस्टेटमध्ये वाढती गुंतवणूक विविध बँकांचे विलीनीकरण अशा विविध कारणामुळे बँकांवरील सर्वसामान्य जनतेचा विश्वास कमी होत आहे. आर्थिक विकास आणि विकेंद्रीत सामाजिक न्याय यांची गती वाढविण्यासाठी बँकींग क्षेत्राची भूमिका महत्वपूर्ण असली तरी बँकांच्या कार्याची व्याप्ती सर्वत्र एकसारखी नाही. वाढत्या नागरीकरणामुळे गरजा वाढत असून या गरजा पुर्ण करण्यासाठी बँकांची कर्ज वाटपाचे व्याप्ती वाढत आहे. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर भारतामध्ये बँकींग क्षेत्राची सर्वच क्षेत्रात गुंतवणूक-कर्जवाटप वाढते आहे. रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणाखाली नागरी बँका, राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका कार्यरत आहेत. बँकींग सेवा सर्वत्र उपलब्ध व्हावी. प्रादेशिक विषमता दूर करण्याचा प्रयत्न होतांना दिसून येतो. नागरी भागाबरोबर ग्रामीण भागाकडे लक्ष देवून शाखा विस्तार वाढविला जात आहे. १९६९ मध्ये आणि १९८० मध्ये २० बँकांचे राष्ट्रीयीकरण यासाठीच करण्यात आले.

आर्थिक विकास आणि व्यावसायिक विकास हा मानवाचा गुणधर्म असून त्यास देशाची सीमा बंधने घालू शकत नाही. ॲडम स्मिथ अथवा डंकेल यासारख्या अर्थशास्त्रज्ञांनी मुक्त व्यापार, जागतिकीकरण, उदारीकरण यासारख्या संकल्पनांना स्विकारून आर्थिक विकास साधावा असे सूचविले म्हणून गॅट करार, आणि जागतिकीकरण याचा स्विकार जगातील बहुतेक सर्वच देशांनी केला आहे. १९९१ पर्यंतच्या आर्थिक वर्षामध्ये बँकांच्या आर्थिक लेख्यामध्ये (वार्षिक ताळेबंद) वाटप केलेल्या कर्जावरील व्याज जे कमाविलेले आहे परंतू प्रत्यक्षात वसुल न झालेले व्याज उत्पन्नात जमा घेण्यात येत होते हे कागदावरिल नफ्याचे वाटप प्रत्यक्षात रोख स्वरूपात केले जात होते. नफ्यातून निर्माण झालेला निधी इतरत्र गुंतविला जात होता. वसूल न होणारी कर्जे ताळेबंदामध्ये दाखविली जात होती. आर्थिक लेख्यांची पारदर्शकता नष्ट केली जात होती. त्यामुळेच भारत सरकारच्या अर्थमंत्रालयाने १४ ऑगस्ट १९९१ मध्ये उच्चस्तरीय समिती रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर एम. नरसिंहम यांच्या अध्यक्षतेखाली नेमून बँकींग क्षेत्रातील सुधारणाबाबत शिफारस करण्याची जबाबदारी या समितीवर सोपविण्यात आली. या समितीने आपला अहवाल ३१ मार्च १९९१ ला सादर करून त्यामध्ये एन.पी.ए. (अनुत्पादक मालमत्ता किंवा अनुत्पादीत कर्जे) संदर्भात कडक निकष दिले आहेत.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील बँकांचे जे विविध निकष आहेत ते सर्वांनी पाळावे म्हणजेच १) बँकांनी मालमत्ताचे वर्गीकरण करावे. २) उत्तम मालमत्ता, चांगली मालमत्ता, संशयीत मालमत्ता आणि बुडीत मालमत्ता असे वर्गीकरण करावे. ३) संशयीत व बुडीत मालमत्तेच्या संदर्भात त्यांनी मिळविलेल्या नफ्यातूनच तरतूद करावी. ४) एन.पी.ए. चे निकष खाजगी व राष्ट्रीयकृत बँकांनी पाळावे तसेच सहकारी बँकांनी सुद्धा यांची अंमलबजावणी करावी म्हणजेच बँकांनी आपल्या ताळेबंद पत्रकामध्ये पारदर्शकता निर्माण करण्याच्या हेतूने महत्त्वपूर्ण सुधारणा करून त्याची अंमल बजावणी करावी असे समितीने सूचविले. एन.पी.ए. निकष लागू केल्यानंतर बँकांची आर्थिक स्थिती ढासळली. परंतु कालांतराने बँकांच्या आर्थिक लेख्यामध्ये पारदर्शकता

निर्माण झाली. बँका आर्थिकदृष्ट्या सुदृढ होण्यास मदत झाली. एन.पी.ए. चे प्रमाण लक्षात घेता अशक्त बँका आणि आजारी बँका असे वर्गीकरण करण्यात आले. ज्या बँकांचे भांडवल पर्याप्तता रिझर्व्ह बँकेने ठरवून दिलेल्या प्रमाणापेक्षा ७५% पेक्षा कमी आणि किंवा अनुत्पादक कर्जाचे प्रमाण १०% पेक्षा अधिक आहे अशा बँकांना अशक्त बँका तर ज्या बँकाचे अनुत्पादक कर्जाचे प्रमाण १५% पेक्षा अधिक आहे त्यांना आजारी बँका म्हणून वर्गीकृत केले. बँकावरील जागतिकीकरणाचा परिणाम म्हणजे एन.पी.ए. आणि आर्थिक मंदी यांचा बँकींग व्यवसायावर विपरीत परिणाम झाला असून आर्थिक मंदीमुळे नवीन चांगले कर्जदार मिळू शकत नाही. ही वस्तुस्थिती बँकांसमोर असल्याचे चित्र पुढे निर्माण झाले, म्हणजेच बँकींग व्यवसायावर मर्यादा आली.

अमेरिकेत सन २०१० मध्ये ११८ बँका बुडाल्या. अमेरिकेमध्ये बँकींग व्यवसाय अजुनही सावरला नसून दर महिन्याला काही बँका बुडीत निघत आहे. त्यामध्ये काही छोट्या तर काही मध्यम बँका आहेत. लोकांकडे कर्ज फेडण्यासाठी पैसे नाहीत. ऑगस्ट २०१० मध्ये आठ बँका बुडीत निघालेल्या आढळतात. सन २०११ मध्ये तब्बल ६४ अमेरिकन बँका तेथील सरकारला बंद कराव्या लागल्या. सरासरी दर महिन्याला आठ बँका बंद होत असल्याचे सरकारी आकडेवारीवरून स्पष्ट होते. भारतातील बँकांच्या एकूण वितरीत कर्जाच्या तुलनेत अनुत्पादित कर्ज (एन.पी.ए.) यांचे प्रमाण २०००-२००१ मध्ये १२ प्रतिशतवरून २००७-२००८ मध्ये २.४ प्रतिशत पर्यंत कमी झाले. परंतु डिसेंबर २०१२ मध्ये पुन्हा ते प्रमाण ३.७ प्रतिशतने उंचावले. विदेशी आणि खाजगी क्षेत्रातील बँका आणि सध्या राष्ट्रीयकृत बँकांमधील वाढती एन.पी.ए. ची मात्रा चिंताजनक बाब असल्याचे रिझर्व्ह बँक आणि केंद्रीय मंत्रालयाने म्हटले आहे. जगामध्ये विकसीत राष्ट्रामध्ये एन.पी.ए. चे प्रमाण सरासरी ३ प्रतिशत आहे. जर्मनी ३.०० प्रतिशत, जपान २:४ प्रतिशत, ब्रिटन ४.० प्रतिशत, अमेरिका ३.९ प्रतिशत, ब्राझील ३.५ प्रतिशत, रशिया ६.० प्रतिशत, भारत ३.६ प्रतिशत, चिन १.० प्रतिशत, दक्षिण अमेरिका ४.० प्रतिशत अशी एन.पी.ए. संदर्भात आकडेवारी असून लहान बँकांवर त्याचे विपरीत परिणाम होत असून त्या बंद होत आहेत. एन.पी.ए. मुळे व्यावसायिक अडचणी वाढत असून त्या बंद करून त्यांचे विलीनीकरण करण्यात येत आहेत. त्यामुळे बँकांची संख्यात्मक घट होत असल्याचे सार्वत्रिक चित्र विविध देशामध्ये पहावयास मिळत आहे. बँकांच्या विलीनीकरणामुळे आणि बँका बंद पडत असल्यामुळे विविध बँकांमधील कर्मचारी बेकारीच्या अवस्थेमध्ये आहेत. कर्मचाऱ्यांचे सर्व नियम पायदळी तुडवून नवीन नियुक्ती कमी पगारावर होत आहे. म्हणजेच जागतिकीकरणाचा कर्मचाऱ्यावर सार्वत्रिक प्रतिकुल परिणाम होत आहे.

सन २००१ नंतर विविध राष्ट्रीयकृत बँकांनी कर्ज वाटपासाठी पुढाकार घेतल्याने ग्राहकांना त्यांच्या राहणीमानात सुधारणा करता आली. सन २००५ ते २००८ या काळात कमीत कमी व्याजदरामध्ये गृहकर्ज वाटप करण्याची स्पर्धा दिसून येते. भारतीय स्टेट बँकेबरोबरच इतर राष्ट्रीयीकृत बँकांनी गृहकर्ज वाटपाचे धोरण स्विकारले. ७ ते ८ प्रतिशत व्याजदर असल्याने सर्वच बँकांच्या कर्जवाटपात स्पर्धात्मकता वाढली. वाहन कर्ज, घरगुती वापराची उपकरणे यासाठी कर्ज बँकांनी उपलब्ध करून दिलीत. कर्ज वितरणामध्ये सर्वच बँकांनी आघाडी घेतल्याने अनेकांची कारची स्वप्ने सुद्धा साकार झालीत. लोकांच्या राहणीमानात सुधारणा झाली. थोडक्यात २०११ पर्यंत बँकींग क्षेत्रातील एकंदर कार्यत्मकतेत वाढ आणि वित्तीय सर्वसमावेशकतेच्या दृष्टीने लक्षणीय प्रगती दिसून आली. बँकाच्या प्रति कर्मचारी व्यवसाय २००१ मधील २.१ लाख रूपयावरून २०१२ मध्ये ८.३ लाख रूपयापर्यंत वाढला. शाखांची संख्या वाढली. प्रतिशाखा सरासरी व्यवसाय २००१ वर्षामध्ये ३४.७ लाखावरून २०१२ मध्ये ९९.३ लाख रूपये झाला. प्रत्येक १००० लोकामागे ठेव खातेदार संख्या ११ वर्षात ४१६ वरून ७३४ पर्यंत वाढली. प्रत्येकी १००० लोकसंख्ये मागे कर्ज खातेदार संख्या ही २००१ मध्ये ५१, वरून २०१२ मध्ये १०६ अशी दुप्पट झाली. गुंतविलेल्या मालमत्तेवरील परतावा २००१ मध्ये ०.५४ प्रतिशत वरून २०१२ मध्ये १.०५ प्रतिशत ने सुधारला. थोडक्यात जागतिक मंदीच्या काळात भारतीय बँकांनी सरासरी १ प्रतिशत परतावा मिळवून

नफा क्षमता कायम ठेवली. परंतु सन २००९ वर्षापासून भारतीय अर्थव्यवस्थेत जागतिक मंदीचे परिणाम दिसू लागले. रिझर्व्ह बँकेने पतनियंत्रणांच्या साधनाद्वारे बँकांच्या कर्ज वाट्यावर नियंत्रण राखण्याच्या धोरणामुळे गृहकर्ज व्याजदरात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. सन २०१२-२०१३ मध्ये गृह कर्ज व्याजदर १२ ते १३ प्रतिशत होता. गृहकर्जा प्रमाणेच वाहन कर्ज सुद्धा महाग झालेली आढळतात याचा परिणाम आर्थिक विकासावर झालेला दिसुन येतो.

एन.पी.ए. वाढीची मुख्य कारणे :-

१) ताळेबंद पत्रकामध्ये वाटप केलेले कर्जावरील व्याज (लाभांष)
२) जागतिक आर्थिक मंदी
३) सर्वच क्षेत्रामध्ये बँकांनी अती कर्जवाटपाचे धोरण स्विकारले.
४) जागतिकीकरणामुळे बँकींग क्षेत्र विस्तारले परंतू लहान बँका, मध्यम बँका बुडीत निघाल्यात.
५) रिअल ईस्टेटमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणुक.
६) कर्ज वसुलीमध्ये दिरंगाई.
७) बँकींग क्षेत्रातील सुधारणांची, धोरणांची योग्य अंमलबजावणी नाही.
८) व्यवस्थापकीय अडचणी व पारदर्शकतेचा अभाव इ.
९) शासनाचे कर्जमाफीचे धोरण.
१०) लहान व मध्यम बँकांकडे असलेला अकार्यक्षम कर्मचारी वर्ग

भारतात विद्यमान परिस्थितीमध्ये शासनाच्या धोरणामुळे औद्योगिक क्षेत्रामधील शेती आणि सेवा क्षेत्रातील गुंतवणुक वाढती असली तरी सर्वच क्षेत्रात ती सारखी नाही. औद्योगिक व सेवाक्षेत्रामध्ये प्रचंड प्रमाणात कर्जाचे वाटप असून शेती क्षेत्राकडे दूर्लक्ष होतांना आढळते. नोटबंदी, जी.एस.टी., जागतिकीकरण, यामुळे बँकींग व्यवसायाला पाहिजे त्याप्रमाणात गती मिळालेली दिसत नाही. आर्थिक विकासांच्या प्रक्रियेमध्ये बँकांचा मोठा वाटा असल्याचे चित्र असले तरी बँकांच्या अडचणीमध्ये वाढ होत असून वाढता एन.पी.ए. ही समस्या मोठ्या प्रमाणात सर्वच बँकांना सतावत आहे. सरकार एन.पी.ए. ची समस्या सोडविण्यासाठी बँकांचे विलीनीकरण व इतर उपाय योजना आखत असल्याचे दिसून येते.

एन.पी.ए. आणि त्याचे परिणाम यांची बँकांनी धास्ती न बाळगता बँकांनी व्यवसायात वाढ करण्यासाठी चांगले कर्जदार सतत शोधले पाहिजे, एन.पी.ए. च्या अडचणीतून बाहेर पडण्यासाठी व्यावसायकि व्यवस्थापनाचे तंत्र आत्मसात करून बँकांना उर्जितावस्थेत आणले पाहिजे. लोकांनी सोन्यामध्ये गुंतवणुक न करता बँकींग क्षेत्रामध्ये आपला पैसा गुंतविला पाहिजे. यासाठी बँकांनी विविध योजना, आकर्षक व्याजदार दिला पाहिजे आणि आपला व्यवसाय वाढविला पाहिजे. विविध सवलती, दिर्घ मुदतीच्या ठेवीवर अधिक व्याजदर, विमा योजना, व्यावसायिक व्यवस्थान, नविन प्रयोग व उपाय योजना करून स्पर्धात्मक वातावरण निर्माण केल्यास बँकांबरोबर देशांचा विकास होईल. यासाठी बँकांनी व सरकारने पुढाकार घेण्याची नितांत गरज आहे.

संदर्भ :-

१) श्रीकांत जाधव, एन.पी.ए. व्यवस्थापन आणि निकष एप्रिल २०१५
२) मुकुंद महाजन, भारतीय बँक प्रणाली, जून २००५, निराली प्रकाशन
३) अर्थसंवाद, ऑक्टोंबर ते डिसेंबर २०१३
४) अर्थसंवाद, एप्रिल ते जून २०१४

ISSN 2320 - 0197

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची
संशोधन पत्रिका

अर्थमीमांसा

भारतीय सौर शके १९३९
(जुलै-डिसेंबर २०१७ / खंड १०, अंक २)

- रोकडरहित भारतीय अर्थव्यवस्था – एक अभ्यास
- सोव्हियत राज्य क्रान्ती १९१७ च्या निमित्ताने
- **Inter-Relationship between Inflation, Agricultural Productivity and Economic Growth in India**
- मानव विकास अहवाल – २५ वर्षाचा आढावा
- विलियम जे. बाऊमोल : एक द्रष्टा अर्थतज्ञ
- २०१७ चे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक वर्तणूक अर्थशास्त्राला
- जॉन रॉल्सचा न्याय सिद्धांत
- वस्तू व सेवा कर : भारतीय अर्थव्यवस्थेला एक वरदान
- जीएसटी : अप्रत्यक्ष करप्रणालीची एक नवी आर्थिक सुधारणा
- ग्रंथ परिचय
- ४१ व्या वार्षिक अधिवेशनाचा अहवाल

ISSN 2320-0197

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची
संशोधन पत्रिका

अर्थमीमांसा

भारतीय सौर शके १९३९
(जुलै-डिसेंबर २०१७/ खंड १०, अंक २)

□ प्रमुख संपादक □
दि.व्यं.जहागिरदार

□ सहयोगार मंडळ □
श्रीनिवास खांदेवाले
प्रमोद लाखे
प्रशांत हरमकर
जनार्दन काकडे

□ संपादकीय पत्रव्यवहार □
दि. व्यं. जहागिरदार
''व्यंकटेश'', १२, गुलमोहर कॉलनी,
कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२
दूरध्वनी (०७२१)-२६६१८५१

अनुक्रमणिका

- रोकडरहित भारतीय अर्थव्यवस्था - एक अभ्यास
  - हरिहर रामकृष्ण तिवारी १
- सोव्हियत राज्य क्रान्ती १९१७ च्या निमित्ताने
  - श्रीनिवास खांदेवाले ७
- Inter-Relationship between Inflation, Agricultural Productivity and Economic Growth in India
  - Samit L. Mahore १४
- मानव विकास अहवाल - २५ वर्षाचा आढावा
  - मृणालिनी फडणवीस
    प्राची देशपांडे २७
- विलियम जे. बाऊमोल : एक द्रष्टा अर्थतज्ञ
  - धीरज सु. कदम ३९
- २०१७ चे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक वर्तणूक अर्थशास्त्राला
  - प्रशांत हरमकर ४७
- जॉन रॉल्सचा न्याय सिद्धांत
  - मुक्ता जहागिरदार ५८
- वस्तू व सेवा कर : भारतीय अर्थव्यवस्थेला एक वरदान
  - कपिल चांद्रायण ६८
- जीएसटी : अप्रत्यक्ष करप्रणालीची एक नवी आर्थिक सुधारणा
  - उमेश भाऊराव घोडेस्वार ७२

ग्रंथ परिचय

- 'भारतातील आर्थिक सुधारणांची २५ वर्षे'
  - गौतम कांबळे.....७८
- ४१ व्या वार्षिक अधिवेशनाचा अहवाल ८२

ISSN 2320-0197

२०१७ चे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक वर्तणूक अर्थशास्त्राला

प्रशांत हरमकर

सहाय्यक प्राध्यापक, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती.

प्रस्तावना :

यंदाचे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक वर्तणूक अर्थशास्त्रातील (Behavioural Economics) योगदानाबद्दल रिचर्ड एच. थॅलेर ह्यांना बहाल करण्यात आले आहे. वर्तणूक अर्थशास्त्राचा आरंभ हा मार्शलच्या उपयोगिता विश्लेषणापासून झालेला आहे. उपयोगितेच्या आधारे मागणीचे विश्लेषण मार्शलने केलेले आहे. मागणीचा संबंध हा अर्थशास्त्राशी असून उपयोगितेचा संबंध मानसशास्त्राशी आहे. मात्र उपयोगितेच्या मापनातील त्रुट्या लक्षात घेऊन पुढे उपभोगक्ताच्या वर्तवणूकीवर भर देण्यात आला. ह्यातून पुढे हिक्सचे तटस्थता वक्र विश्लेषण, सॅम्युअलसनचे अभिव्यक्ती पसंती सिद्धांत ह्यामधून वर्तणूक अर्थशास्त्राच्या शाखेचा विकास होत गेला. उपभोगक्त्याची बाजारात प्रत्यक्षात कशी वर्तणूक असते ते लक्षात घेऊन जोखमी व अनिश्चितेच्या बाजार स्थितीचे विश्लेषण बर्नोली, न्युमन-मॉर्गस्टन, फ्रिडमन-सेवज, मार्केविज इत्यादी अर्थशास्त्रज्ञांनी केलेले आहे. थॅलेरच्या समकालीन वर्तणूक अर्थशास्त्रांतर्गत आर्थिक घटनांवर प्रकाश नोबेल पारितोषिवक विजेते हर्बट सिमॉन, मॉअराईस आलाइस, डेनियल काहनमेहन, रॉबर्ट शिलार, युजीनी फामा आणि पेटर हॅनसन ह्यांनी टाकलेला आहे. त्यांनी वर्तणूक दृष्टीकोनातून आर्थिक घटनांचे विश्लेषण केलेले आहे. त्यांचे हे योगदान मान्यता प्राप्त आहे. शिवाय ह्या योगदानाचा विस्तार झालेला आहे. ह्या परंपरेमधील अमेरिकन अर्थशास्त्र रिचर्ड थॅलेर आहे. ते वर्तणूक अर्थशास्त्राचे संशोधक आणि प्रोफेसर म्हणून शिकागो विद्यापीठात कार्यरत आहे. अर्थशास्त्राच्या संशोधनामध्ये आर्थिक व्यवहार घडून येत असतानाचे मानसशास्त्रीय अंतरंग त्यांनी उलगडून दाखविलेले आहे. मानवी वर्तणूकीच्या दृष्टिकोनातून आर्थिक घटकांचा विचार केलेला आहे. वास्तववादी विश्लेषण करीत असतांना लोक आर्थिक निर्णय घेतांना कशा प्रकारे विचार करतात, लोकांची वर्तणूक कशा प्रकारची असते व अंतिमत: आर्थिक निर्णय कशा प्रकारे घेतला जातो ह्याचे निर्वचन केलेले आहे. मानव वर्तणूकीतून आर्थिक निर्णय घेतले जातात ह्याच्या मापनासाठी नवीन संधीची तरतूद आणि संस्था आहे. ज्यामुळे सामाजिक लाभामध्ये वाढ होत आहे.

अर्थशास्त्र आणि मानसशास्त्र :

अर्थशास्त्र मानवी वर्तणूकीमध्ये गुंफलेले आहे. यामधून बाजाराची आणि आर्थिक निर्णयाची स्थिती कळते. लोकांच्या वर्तणुकीतूनच गुंतागुंत अस्तित्वात येते. ह्या गृहीतकाच्या आधारे उपयुक्त

अशा प्रारूपाची मांडणी ह्या पूर्वी केलेली आहे. व्यक्ती किंवा लोक आपल्या नियोजनर्तगत आपले निर्णय अंमलात आणू शकतात. ह्यामधून वैयक्तिक लाभाची सुरक्षा केली जाते. अशा प्रकारचे मानव वर्तणूकीचे हे सुलभ प्रारूप आहे. ज्याच्या मदतीद्वारे पुढे सिद्धांताची मांडणी केलेली आहे. महत्त्वाच्या आणि गुंतागुंतीच्या आर्थिक समस्याबाबत उपाय शोधण्यात आलेले आहे. शिवाय सिद्धांत आणि वास्तव यादरम्यानचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. अर्थशास्त्राचे उद्दिष्ट बाजार आणि आर्थिक मांडणी (economic setting) यामधील आंतरकृती व मानव वर्तणूक ह्यामधील सहसंबंधाचे विश्लेषण करणे आहे. ह्यामधूनच मानव वर्तणूकीच्या संदर्भात प्रारूप विकसित केलेले आहे. मानव वर्तणूक ही गुंतागुंतीची संकल्पना आहे. तरी देखील आर्थिक प्रसंगामध्ये विवेकी निर्णय घेतल्या जातो यावर भर थॅलेर ने दिलेला आहे. विवेकी निर्णयाची संकल्पना प्रस्तुत करतांना इच्छाशक्ती मर्यादित आहे. जसे की निर्णय घेतांना स्वहीत लक्षात घेतल्या जाते. स्वहीत निर्णय घेण्याकरिता मार्गदर्शन करीत असते. सोबतच निर्णय घेतांना न्याय आणि समानतेची काळजी घ्यावी लागते. आधिक्याने संज्ञात्मक सामर्थ्य (cognitive abilities) स्वयंनियंत्रण आणि प्रेरणा महत्त्वपूर्ण बदल घडवून आणू शकतात. याद्वारे वैयक्तिक पातळीवर निर्णय घेतले जातात.

वर्तणूक अर्थशास्त्राची प्रारूपे मांडतांना काही गृहीतके मानलेली आहे. ज्यामध्ये अभिकर्ता विवेकी मानला आहे. ह्या गृहीताच्या आधारावरच समर्थपणे विश्लेषण वर्तणूक अर्थशास्त्राचे केलेले आहे. वर्तणूक अर्थशास्त्राचे विवेचन विविध आर्थिक वादप्रश्न आणि बाजाराच्या संदर्भात करतांना नव अभिमतपंथीय अर्थशास्त्रज्ञांनी दर्शवून दिलेला आहे अर्थशास्त्रज्ञ आणि मानसशास्त्रज्ञाच्या दस्ताऐवजासह विवेकी गृहीत मानून सुद्धा व्यवस्थाबद्ध विचलन (systematic division) घडून येते. मानसशास्त्राद्वारे प्रकाश टाकून पारंपरिक आर्थिक विश्लेषण करण्यात आलेले आहे. थॅलेरच्या विश्लेषणामुळे वर्तणूक अर्थशास्त्राची शाखा भरभराठीला आलेली आहे. त्याचा महत्त्वपूर्ण असा प्रभाव आर्थिक विवेचनावर पडलेला आहे.

गेल्या चार दशकापासून रिचर्ड थॅलेर वर्तणूक अर्थशास्त्राच्या विकासामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. ह्या शाखेची त्यांनी सैद्धांतिक आणि अनुभवनिष्ट मांडणी केलेली आहे. मानसशास्त्रा कडून आर्थिक विश्लेषणावर नव्याने प्रकाश टाकलेला आहे. ज्यामुळे संपन्न अशी वर्तणूक अर्थशास्त्राची बैठक निर्माण झालेली आहे. ज्यावरून मानवी प्रवृत्तीचे आकलन आणि भविष्यकथन करता येते. ज्याचा आर्थिक व्यवहारावर काय परिणाम होतो हे सांगता येते. ह्याला अनुसरून सिद्धांताचा विकास आणि अनुभवनिष्ट चाचण्या घेण्यात आलेल्या आहे. ज्याचा लाभ समकालीन आर्थिक संशोधनाला झालेला आहे. रिचर्ड थॅलेरचे योगदान म्हणजे आर्थिक विश्लेषणाचा विस्तार आणि परिशुद्धता हे आहे. ज्याचा संबंध मर्यादित विवेकीपणा (limited rationality),उचितपणा संबंधीचे आकलन (perception about fairness) आणि स्वयं नियंत्रणाची उणीव (lack of self control) ह्या तीन मानसशास्त्रीय वैशिष्ट्याशी आहे. ज्याचा परिणाम आर्थिक निर्णयावर घडून येतो.

अ) मर्यादित विवेकवाद :

रिचर्ड थॅलेरच्या पूर्वी आर्थिक निर्णयाच्या

संदर्भात केलेल्या सैद्धांतिक विश्लेषणामध्ये मानलेली गृहीते वास्तव नव्हती. ह्याचा संबंध दृश्य विकल्पाशी होता. ह्या सर्वांचा दीर्घकाळात परिणाम घडून येणारा होता. जो की ते अगदी अनुल्लंघनीय कार्य (insurmountable task) आहे. म्हणून आर्थिक निर्णय घेतांना विवेकावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. अर्थशास्त्रामध्ये हर्बट सिमॉनने विवेकी संकल्पनेची मांडणी केलेली आहे. ह्यातून मर्यादित विवेक संकल्पना मांडण्यात आलेली आहे. संघटन घडून येण्यासाठी संगनमत घडून येण्याची अट पूर्ण व्हावी लागते. मात्र लोकांना निरुपयोगी अशा मर्यादा असतात. म्हणून आर्थिक निर्णय घेण्याकरिता सोपे-सरळ नियम करावे लागतात. मर्यादित विवेकतेचे उदाहरण रिचर्ड थॅलेरला शोधून मिळालेले आहे. मानसिक मापनाच्या सिद्धांताचे (Theory of Mental Accounting) विश्लेषण करतांना लोकांचे संघटन, मांडणी आणि वित्तीय निर्णयाचे मूल्यांकन केलेले आहे. यामधून मानवी प्रवृत्तीनुसार निर्णय आपल्या मनाप्रमाणे घेतले जातात. ह्याचे मापण करता येते. वैयक्तिक निर्णयाचे मापन त्याच्या परिणामाच्या आधारे करता येते. शिवाय एकूण संपत्तीच्या आधारे देखील मापन करता येते. लोकांच्या घरच्या अंदाजपत्रकावरून मापन करता येते. कुटुंबाच्या उत्पन्न आणि खर्चावरून हे मापन होऊ शकते. पैशाचा उपभोग घेतांना काही अडथळे निर्माण होतात. बचतीसारख्या उपभोगातील अडथळ्यामुळे अधिकोषण खात्यात पैसे गोळा होतात. ज्यामुळे उपभोगक्ताचा एकूण खर्च जास्त असतो. मात्र अशा पैशाचा उपभोग घेतला जात नसून दीर्घकाळासाठी बचत करून ठेवला जातो. ज्यातून काही अल्पकालीन गरजा भागविल्या जातात. वित्तीय बचतीकरिता नियोजन केल्या जाते आणि दीर्घकाळात बचतीचे संरक्षण केल्या जाते.

मानसिक मापनाचे मूलतत्त्व म्हणजे आर्थिक निर्णय घेतांना संदर्भ बिंदूचा (किंमत) उपयोग केला जातो. प्रत्येक वेळेच्या आर्थिक परिस्थितीमध्ये भिन्नता असते ह्यामुळे मानसिक मापनात देखील भिन्नता निर्माण होते. एक संदर्भ बिंदू ही जेव्हा किंमत असते तेव्हा त्या आधारे वस्तूची खरेदी केल्या जाते. अशा वस्तूची कमी किंमत (lower price) कोठे आहे. ह्याचा शोध इंटरनेटसारख्या साधनाद्वारे घेतला जातो. वस्तूच्या बाजारामध्ये प्रवेश संदर्भ बिंदूचा आधार घेऊन केला जातो. शिवाय चांगला व्यवहार (good deal) घडून येतो. अशा भिन्न संदर्भ बिंदूचा उपयोग मानसिक मापनाकरिता केला जातो. याद्वारे आर्थिक निर्णयामध्ये पुढाकार घेतला जातो. यातूनच आर्थिक निर्णयाचे सामर्थ्य दिसून येते.

उदाहरणाद्वारे ह्याचे स्पष्टीकरण करीत असतांना एक उपभोगक्ता १०० स्वीडिश क्रोनमध्ये एक वस्तू विकत घेतो. जो की ही वस्तू इतर विक्रे त्यापेक्षा स्वस्त आहे. वस्तूची निवड करण्याकरिता तो इतरही विक्रेत्याकडे गेलेला होता. ह्या वस्तू खरेदीचा खर्च १००० क्रोन ऐवढा होता. जर त्याचा खर्च १०,००० क्रोन असेल तर तो वस्तू खरेदी करणार नाही. कारण तीच वस्तू जर त्याला स्वस्त दरामध्ये उपलब्ध होत असेल तर तो स्वीडिश क्रोन मध्ये बचत करेल. ह्याचे स्पष्टीकरण करताना प्रतिशत प्रमाणावर प्रकाश टाकलेला आहे. शिवाय बचतीचा संबंध संदर्भ बिंदूशी आहे. याचे थॅलेर आणि त्याच्या सहकाऱ्याद्वारे अध्ययन करण्यात आलेले आहे. जसे टॅक्सी ड्रायव्हरचा भर हा

कामाच्या तासावर असतो. याविरुद्ध त्याचा सवडीचा वेळ आणि कुटुंब असते. या आधारावर टॅक्सी ड्रायव्हर त्याला पाहिजे एवढे उत्पन्न मिळवून त्याचा दिवस संपवितो. विशिष्ट पातळीपर्यंतचे उत्पन्न मिळाल्यामुळे तो त्याच्या उद्दिष्टापर्यंत पोहोचतो. शिवाय श्रम नियमनामुळे सुद्धा त्याला त्याचे काम संपवावे लागते. टॅक्सीचा प्रवास करणारे अनेक उपभोगक्ते असतात. त्यामुळे तासाप्रमाणे टॅक्सी ड्रायव्हरचे उत्पन्न उच्चतम पातळीवर जात असते. अशा कामाची मागणी जोपर्यंत कमी होत नाही तो पर्यंत असे काम खूप दिवसापर्यंत केल्या जाऊ शकते. भिन्न नियमासह तो कमी काम करून आधिक्याने उत्पन्न प्राप्त करू शकतो. कारण आधिक्याने शहरामधील टॅक्सी अनेक लोकांची गरज आहे.

शासक (govern) निर्णय घेत असतांना त्याच्याकडे पूर्वानुभव असतो. तसेच स्वत:चे त्याचे आकलन देखील असते. सामान्यपणे विक्रीतून आधिक्याने पैसे मिळवले जात असतात. प्रत्यक्षात आपण पैसे देऊन समान वस्तू विकत घेत असतो. ह्याला थॅलेरने निसर्गदत्त देणगीचा परिणाम (endowment effect) असे संबोधले आहे. हे संबंध वर्तणूकीतून घडत असते. ह्याचा प्रसिद्ध असा प्रयोग १९९० मध्ये थॅलेर, डेनियल काहनमेन आणि जॅक नुकिची ह्यांनी केला आहे. एका गटाच्या हातात सुशोभित असे मग देण्यात आले. यादुच्छिक (random) पद्धतीद्वारे हा प्रयोग करण्यात आला. तर हे मग दुसऱ्या गटाकडे विक्री करण्याकरिता देण्यात आले. ज्यांची निवड दोन्ही गट यादृच्छिक पद्धतीने निवड करतील. सरासरीने त्या मगाचे मूल्य समांतरपणे उच्चतम पातळीवर पोहोचले होते. एकूणच अर्ध्या मगची विक्री ह्यामधून होते. शिवाय ह्यामधून बाहेर पडलेल्या मगाचे मूल्य उच्चतम पातळीवर पोहोचते. नियंत्रित गटाकडे एकही मग पोहोचत नाही. फार कमी वेळात अर्धे मग बदलून दुसऱ्या हातामध्ये जातात.

निसर्गदत्त देणगीचा परिणाम हा दीर्घकालीन परिणाम असतो. वस्तू आणि सेवांच्या व्यापारामध्ये कपात घडून येऊ शकते. निर्माण झालेला कायदेशीर विवाद सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. थॅलेरने निसर्गदत्त देणगीच्या परिणामाचे स्पष्टीकरण करताना लोकांचा कल कसा आहे या आधारे विश्लेषण केलेले आहे. आलेला अनुभव नकारात्मक भावनेचा असेल तर हानी किंवा नुकसान सबळपणे घडून येते. शिवाय सकारात्मक अनुभूती हा मोठा लाभ घडवून आणतो. तसाच काही वेळेला हानी पोहचण्याचा देखील अनुभव असतो.

लाभ किंवा हानी ही संदर्भ बिंदूवर अवलंबून असते. आर्थिक निर्णय घेण्यासाठी संदर्भ बिंदू महत्त्वाचा असतो. सवलतीच्या दरात विक्री म्हणजे उपभोगक्त्याकरीता संदर्भ किंमती उच्चतम पातळीवर असतात. वस्तू खरेदी करण्याचा प्रयत्न केला जातो तेव्हा चांगल्या प्रकारचा व्यवहार घडून येतो. जर पुढे वस्तूची विक्री झाली तर मात्र समान किंमतीला होणार नाही. दुसरे उदाहरण म्हणजे गुंतवणूकदार शेअर बाजारमधील लाभ व हानीचा व्यवहार स्पष्ट करीत नाही. तरी देखील प्रत्यक्षात रोख्याची विक्री झालेली असते. ह्यामध्ये गुंतवणूकदार पुढाकार घेतात. सामान्यपणे हानी दर्शविणारे रोखे स्वत:कडे बाळगून ठेवतात. कारण त्याला अपेक्षा असते की ह्यापेक्षा चांगली परिस्थिती निर्माण होईल किंवा ह्यापेक्षा आणखी चांगला लाभ प्राप्त होईल. विक्री झालेले रोखे यशस्वी ठरतात. ह्या कडून

क्रमश: लाभ प्राप्त केला जातो. अनुभव असा सुद्धा आहे की, जोखमीचा विस्तार घडून येतो तेव्हा इच्छा पुढाकार घेऊन शेअर बाजार किंवा जुगारामधील लाभ पैशामध्ये प्राप्त होतो. ह्या दोन्ही व्यवहारामध्ये फार मोठी जोखीम आहे. ह्या व्यवहारामध्ये नुकसान देखील होऊ शकते. मात्र झालेले नुकसान जेव्हा कमी क्लेशकारक वाटते ह्याला थॅलेरने घर मुद्रा परिणाम (house money effect) असे संबोधले आहे.

ब) उचीतपणा संबंधीचे आकलन :

जेव्हा लोक आर्थिक निर्णय घेतात तेव्हा केवळ लाभ किंवा हानीचा विचार करीत नाही तर स्वत:चे मापण देखील करीत असतात. न्याय काय आहे ह्याचा विचार करतात. कल्याण घडून येण्याकरिता सहकार्य आणि दृढ ऐक्य ह्या दोन्ही बाजू सकारात्मक असतात. जर नकारात्मकता असेल तर मत्सर आणि द्वेष असतो. दीर्घकाळाबाबत मानवी वर्तणूकीचे अध्ययन करताना उचीतपणाचे आकलन ही संकल्पना महत्त्वाची ठरते. आर्थिक निर्णय प्रक्रियेमध्ये ती प्रमुख भूमिका पार पाडते. लोक भौतिक लाभाकडून परावृत्त होऊन वितरण कशा प्रकारे झाले आहे याला महत्त्वाचे मानले जाते. मूलभूत न्याय नियमाचे उल्लंघन करणांऱ्याच्या शिक्षेसाठी वैयक्तिक व्यय निर्माण केला जातो. केवळ न्याय नियमनामुळे प्रभावित होत नाही तर त्यापेक्षाही अन्यायाने प्रभावित झालेले असतात.

आक्षेप घेतला जातो की प्रयोगशाळेतील प्रयोग वास्तव जीवनाला लागू होऊ शकत नाही. अशा प्रकारचे उदाहरण सापडणे सोपे नाही. जो की न्याय वर्तणूक प्रयोगशाळेच्या बाहेर देखील दिसून येईल. समजा अनपेक्षितपणे पाऊस आला. ह्यामुळे अनपेक्षितपणे छत्र्यांची मागणी वाढली. मात्र जर विक्रेत्याने वाढती मागणी लक्षात घेऊन छत्र्याची किंमत वाढवली असेल तर अनेक उपभोक्ते ह्यावर नकारात्मक प्रतिक्रिया देतील. विक्रेत्याची वर्तवणूक लोभी प्रवृत्तीची राहील. बरेचदा कंपन्या देखील न्याय नियमाचे उल्लंघन करतात. जर उपभोगक्तांनी त्यांच्या वस्तूवर बहिष्कार टाकला तर त्यांना शिक्षा होऊ शकते. बरेचदा वस्तूंच्या किंमती वाढविल्या जातात. त्यामुळे आधिक्याने काय न्याय आहे याबाबत सबळ भावना असू शकतात. जेव्हा असा टप्पा येतो तेव्हा श्रम बाजारातील वेतन दर प्रभावित होतात. याकडून तुलनात्मक विश्लेषण विविध रोजगार गटाचे केल्या जाते. वेतन दरामध्ये कपात करून लाभ प्राप्त करणे कठीण आहे. जर सध्याचे वेतन दर संदर्भ बिंदूच्या खाली असतील तर लोक ह्यामधून गळून पडणार नाही. पण स्फितीच्या दरापेक्षा कमी वेतन दरामधील वाढ योग्य राहील. मात्र तरी देखील वास्तविक अटी अंतर्गत वेतन दरामध्ये कपात घडून येते.

क) स्वयं नियंत्रणाची उणीव :

ग्रीक अख्यायिकामधील प्रसिद्ध अशी कथा आहे की साहसी खलाशी दीर्घ समुद्र प्रवासाला जातात. तेव्हा खलाशाचा प्रमुख त्याच्या सवंगड्याना सूचना देतो की मोहीत करणाऱ्या जलपरीचे गाणे ऐकायला येत आहे. ह्या जलपरी आपल्या गाण्याने मोहून खलाशाचा नाश करीत असे. खलाशाना ही वारंवार निर्माण होणारी मोठी समस्या वाटत होती. ही समस्या त्यांनी त्यांचा राजा इथाका (Ithaca) ला सांगितली. तेव्हा त्याने त्यावर उपाय सांगितला की आपल्या कानामध्ये मेण घालून कान बुझवून टाकावे व आपल्या निश्चयापासून ढळू नये.

खलाशाची ही कथा पेचप्रसंग सोडविण्याचा सारांश आहे. असे पेचप्रसंग आपल्या जीवनाच्या सर्वच पातळ्यावर येतात. आपण अनेक वस्तूचा उपभोग घेत असतांना अल्पकालीन प्रलोभनामुळे दीर्घकालीन कल्याणाकडे दुर्लक्ष करतो. व्यक्ती हा खाणे-पिणे, धूम्रपान, उपभोग आणि बचत करीत असतो. पण ह्याबरोबरच त्याची दीर्घकालीन ध्येय असतात. निवृत्तीनंतरचे नियोजन असते. व्यक्ती हा न्यूनतम उत्पन्नातून दीर्घकालीन शिक्षण घेतो. त्याचे अध्ययन सुरू असते. ह्याचा लाभ त्याला भविष्यामध्ये प्राप्त होत असतो.

आपल्या जागरूकतेपेक्षाही आपला अनुभव आपल्या गाठीशी बांधलेला असतो. जो पुढे जाऊन आपल्या उपयोगी येतो. हजार क्रोनचे मूल्य पुढील वर्षी काय राहील ह्याचे आकलन आपण करू शकतो. निश्चितच ते हजार क्रोन पेक्षा कमी राहील. पारंपरिक आर्थिक सिद्धांतामध्ये सवलतीच्या (discount) संदर्भात विश्लेषण केलेले आहे. हे विवेचन स्थिर घटकाच्या आधारावर केलेले आहे. पण उत्पन्न आणि खर्चामध्ये घट प्रत्येक महिना किंवा वर्षाला घडून येते. ह्या गृहीताचा उपयोग करून भविष्यातील दोन विकल्प क्रमवारपणे शिल्लक राहतात. शिवाय खलाशाच्या उदाहरणातील पेचप्रसंगानुसार जेव्हा दोन विकल्पापैकी एकाची निवड करावी लागते तेव्हा तुमच्या विचारामध्ये बदल करण्याची आवश्यकता असते. अनुभवाचा उपयोग हा जागरूकतेमुळे वेळेमध्ये चांगल्या प्रकारे करता येतो.

रिचर्ड थॅलेर आणि हर्श शेफ्रिन ह्यांनी कोंडी किंवा पेचप्रसंगाचे विश्लेषण केलेले आहे. कोंडी किंवा पेचप्रसंग अंतर्गत तणावामुळे निर्माण होतात. ह्या दरम्यान स्वत:चे नियोजन आणि स्वत: करिता नियोजन असावे लागते. नियोजन स्वत:च्या विचाराचे असावे. दीर्घकालीन आनंददायी उद्दिष्टासह निर्णय घेण्यात यावा. आधिक्याने अल्पकालीन उद्दिष्टावर नियंत्रण (governed) असावे. हा विभाग आधुनिक मानसशास्त्राद्वारे स्वीकारण्यात आला आहे. ह्याला साहाय मज्जाततंत्रूशास्त्र (neuroscience) मधील अलीकडच्या संशोधनाने केलेले आहे. ज्या करिता खलाशाचे उदाहरण देता येईल. ह्या पेचप्रसंगामधून सुचविलेला उपाय हा स्वत:च्या नियोजनाला मदत करतो. स्वत:च्या अल्पकालीन कृती यामधून वगळतो. ह्यामुळे पारंपरिक सैद्धांतिक विश्लेषणापेक्षा हे विवेचन बरेच पुढे आहे. जो की आधिक्याने क्षमता ह्या कृतीमध्ये दर्शविलेल्या आहे. उणीवापेक्षा कृती नेहमीच चांगली असते. काही संदर्भात कृती नियंत्रित ठेवून मानसिकतेचे मापन केल्या जाते. अल्पकालीन अतिरिक्त व्यय ह्याद्वारे टाळल्या जाऊ शकतो. दीर्घकालीन दृष्टिकोनातून समाजाला मदत होण्याकरिता स्वयं नियोजन केल्या जाते ह्या करिता संस्था आणि नियमनाची रचना केली जाते.

वर्तणूकीचे अर्थशास्त्र :

विवेकी वर्तणूकीबाबत वर्तणूकीचे अर्थशास्त्र प्रश्न निर्माण करतो. हा प्रश्न वित्तीय बाजाराला लागू पडतो. रिचर्ड थॅलेरसह रॉबर्ट शिलारने वित्तीय वर्तणूकीच्या (behavioural finance) संशोधन क्षेत्राची मांडणी केलेली आहे. ह्या संदर्भातील संशोधनाकडे पाहिले तर बाजार अस्थिर आहे. प्रभावी बाजाराच्या सिद्धांतामध्ये असंगतता दिसून येते. थॅलेरने दर्शविले आहे कि, समभागासाठी नकारात्मक बाजार मूल्याचे मापन करता येते. जो की अवास्तविक आहे. कारण ज्याला मूल्य नाही

असे समभाग वगळले जाऊ शकता. प्रयोगासह विषयवस्तूची चाचणी घेत असतांना विविध गुंतवणुकीमधून निवड करावी लागते. लोक संवेदनशीलपणे काळाच्या समांतर पातळीवर निवड करतात. अल्पकाळात न्यूनतम जोखीम रोख्यांना पसंती देण्याचा गुंतवणूकदारांचा कल असतो. मात्र विविध गुंतवणूकीच्याद्वारे अंतर्गत क्षमतेचा परिणाम दीर्घकाळात प्रस्तुत होतो. समभागाची निवड उच्चतम जोखमीच्या स्थितीत केली जाते.

उपभोगक्ताचा अविवेकीपणा पुढाकार घेत असतांना सामाईक बाजाराचा सराव समजावून घ्यावा लागतो. सवलतीचे किंवा सूचनाचे प्रकार आढळून येतात. तीन विकत घ्या दोनचे पैसे द्या. (Buy Three Pay for Two) उपभोगक्ताच्या समजानुसार त्याला लाभ मिळतो आहे. म्हणून किंमतीच्या मूल्यांकनासाठी तो संदर्भ बिंदू कडे वळतो. अनेक पराजीताना वेष्टून घेतल्या जाते. टुर्मील विजेत्यांना आधिक्याने प्रगट करून लॉटरी आणि पैजेचा (betting) बाजार चालविल्या जात असतो. उपभोक्तांना कर्ज घेण्याकरिता आमिषे दाखवली जातात. अर्टीमध्ये सवलती दिल्या जातात म्हणून लोक कर्ज घेतात. अन्यथा लोकांना कर्ज घेणे परवडत नाही. थॅलेरचे संशोधन बाजार आणि त्याचे अंतरंग दर्शविणारे आहे. ज्याचा संबंध वर्तणूकीच्या अर्थशास्त्राशी आहे. बाजार युक्तांना ओळख प्राप्त करून देतो. ज्यामुळे प्रतिकूल आर्थिक निर्णय टाळण्यास मदत होते.

अनेक प्रकारच्या परिस्थितीमध्ये प्रलोभनासह नियोजनाची गरज आहे. ज्याचा संबंध अनेक देशामधील अल्कहोल आणि आम्ली पदार्थाच्या सेवनाच्या निर्बंधाशी आहे. इतर संदर्भामध्ये निर्बंध लक्षात घेतली तर ते पोहच पासून दूर (far-reaching) आहे. वर्तणूक अर्थशास्त्राच्या संशोधनामध्ये समाजाला लाभ मिळण्यासाठी तरतूदी केल्या जातात. राज्यकर्ते आणि निर्णयकर्ते वैकल्पिक रचनाची मांडणी करून त्याचा उपयोग करतात. रिचर्ड थॅलेरने आक्षेप घेतला आहे की, अनेक क्षेत्रामध्ये सार्वजनिक आणि खाजगी संस्था आहे ज्या की कृतीशील असायला पाहिजे (सोबतच निवडीचे स्वातंत्र्य असले पाहिजे) योग्य दिशेने जाण्याचा प्रयत्न वैयक्तिक पातळीवर केला गेला पाहिजे. या दरम्यान आणखी एक विचार केला जातो की, अनेक देशांना एकाच एककामध्ये ठोसल्या जाते. ह्यामध्ये इंग्लंड आणि अमेरिकेचा समावेश आहे. सार्वजनिक प्रशासनामध्ये सुधारणा करणे हे या अभिकर्त्यांचे उद्दिष्ट आहे. ह्या करिता वर्तणूक अर्थशास्त्राच्या अंतरंगाचा उपयोग केला जातो. सुधारणा ह्या साध्या विचारानें देखील होऊ शकतात. कशा प्रकारे कर्तव्य चुकण्याचा पर्याय विषद केला आहे. जो की त्याचा एक परिणाम आहे. शिवाय कृतीशील निवड काही बाबतीत करता येते. ह्याचे उपयोजन किंवा हा सिद्धांत निवृत्ती बचत, मानवी अवयवाचे दान आणि पर्यावरणीय धोरणामध्ये लागू होतो. लोकांना चालू वर्षामध्ये आधिक्याने बचत करणे कठीण वाटू शकते कारण ह्यामुळे प्रत्यक्ष कपात आजच्या उपभोगामध्ये होते. तरी देखील भविष्याच्या सुरक्षिततेकरिता आधिक्याने बचत केल्या जाते. विशेषत: वेतनामध्ये वाढ घडून आली तर बचत आधिक्याने होईल. ''उद्यासाठी बचत करा'' ह्या अंतरंगाचा उपयोग करून आधिक्याने भविष्याकरिता किंवा भविष्यातील सुरक्षितता कार्यक्रमांना महत्त्व टिलेले आहे. ह्याची रचना थॅलेर

आणि शेल्मो बेनाटट्झी ह्यांनी केलेली आहे. ह्याचा अर्थ असा की, वैयक्तिक पातळीवर व्यावसायिक निवृत्ती बचतीमध्ये वाढ घडून येते. हा कार्यक्रम म्हणजे वैयक्तिक बांधीलकीचा आहे. भविष्यातील वेतन वाढीतून बचतीचा वाटा आवंटित (वितरित) केला जातो. अमेरिकेमधील अनेक कंपन्या ह्याचा यशस्वीपणे उपयोग करतात. काही कंपन्या तिमाही अशा प्रकारच्या कार्यक्रमाची समीक्षा करते अथवा पितृतुल्य भावाने मूल्यांकन केल्या जाते. पण महत्त्वाचे असे की हा कार्यक्रम संपूर्णपणे स्वेच्छेने आणि सर्वांचा सहभाग मिळविण्यासाठी मुक्त असतो.

सामाजिक प्राधान्यतेला आर्थिक निर्णयामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. थॅलरचे विश्लेषण अंमलबजावणीला महत्व देणारे आहे. त्यांच्या संशोधनाची परिणामकारकता उच्चत्तम पातळीची आहे. न्यायाला प्रभावित करणारी वर्तणूक उपभोक्ता आणि श्रम बाजारामध्ये घडून येते. अनेक आर्थिक अभिकर्ते एकत्रितपणे बाजारामध्ये आंतरकृती घडवून आणतात. ह्याचा संबंध वर्तणूक वित्ताच्या क्षेत्राशी आहे. गुंतवणूकदाराची मानसिकता आणि मध्यस्थाच्या मर्यादा ह्याच्यामधील संयोग वित्त बाजारातील किंमर्तींना प्रभावित करीत असतो. वर्तणूक अर्थशास्त्राच्या साह्याने रिचर्ड थॅलेर ह्याने वित्तीय बाजाराचे विश्लेषण केलेले आहे. त्याचे याबाबतचे योगदान विशेष महत्त्वाचे मानल्या जाते. म्हणून त्याच्या वित्तीय बाजाराच्या विश्लेषणावर प्रकाश टाकणार आहोत.

बाजार प्रवेश आणि वर्तणूक वित्त :

मानवाची वर्चस्ववादी वर्तणूक प्रयोगशाळेतील चाचण्या किंवा वैयक्तिक पातळीवर अविवेकी ठरते. अविवेकी वर्तणूक ही स्पर्धात्मक बाजारामध्ये टिकत नाही. विवेकी वर्तणूक ही वित्तीय बाजाराला प्रभावित करते. उपभोगक्ताच्या वर्तणूकीच्या आधारावर विवेक किंमती आणि अर्थव्यवस्थेमधील वितरणाला प्रभावित केल्या जाते.

थॅलरचे फार मोठे योगदान वित्तीय बाजाराच्या अध्ययनामध्ये आहे. वर्तणूक वित्त क्षेत्राचा संस्थापक म्हणून त्याला संबोधले जाते. यामध्ये वर्तणूक अर्थशास्त्राचा उपयोग करून संपत्ती किंमतीच्या आकृतीबंधाचे विश्लेषण केलेले आहे. पारंपरिक संकल्पनाच्या आधारे गुंतवणूकदाराची विवेकता आणि बाजार कार्यक्षमतेमध्ये समेट घडवून आणणे कठीण आहे. थॅलेर ने गुंतवणूकदाराच्या मानसशास्त्राचे प्रारूप प्रस्तुत केलेले आहे. यासंदर्भात अनुभवनिष्ट गोंधळाचे विश्लेषण केलेले आहे. शेअर बाजारामध्ये समभागाच्या किंमतीबाबत भविष्यकथन केल्यामुळे समभागाच्या विमा हप्त्याबाबत गोंधळ निर्माण होतो हा स्वाभाविक परिणाम आहे. याबाबत विश्लेषण करीत असतांना भविष्यकथनाची सांगड मानसिक मापनाच्या सिद्धांताशी (mental accounting theory) घालून पुराव्यासह सूचना केलेल्या आहे. मुलभूततेपासून (Fundamental) किंमती दूर जातात त्यामुळे बाजार कार्यक्षमता आणि गुंतवणूकदाराची विवेकता यामध्ये समेट घडवून आणणे कठीण होते.

वर्तणूक वित्ताचे विश्लेषण वेगवेगळ्या पहाण्या करून केलेले आहे. गुंतवणूकदाराच्या अविवेकीपणामुळे संपत्तीच्या किंमती प्रभावित होतात एवढे पुरेसे नाही. सोबतच वित्त बाजारामध्ये खरेदी विक्री व्यवहारावर (aribitrage) मर्यादा असायला पाहिजे. या मर्यादा नसल्यामुळे विवेकी गुंतवणूकदाराकरिता अडथळा ठरतात. ज्यामुळे

गैरप्रकार घडून गुंतवणूकदाराची पिळवणूक होते. थॅलेरच्या वर्तणूक वित्ताने दोन वादप्रश्नावर प्रकाश टाकलेला आहे.

१) गुंतवणूकदाराच्या मानसशास्त्राद्वारे संपत्ती किंमतीच्या ध्वनितार्थाचा शोध घेणे.

२) वित्त बाजारातील किंमती भंग पावतात त्याकरिता खरेदी विक्री व्यवहारावर मर्यादा घालणे.

१) गुंतवणूकदाराचे मानसशास्त्र आणि संपत्ती किंमतीचा ध्वनितार्थ :

पारंपरिक वित्तीय प्रारूपामध्ये व्यापारी विवेकी मानलेले आहे. ज्यामुळे बाजारामध्ये योग्य विश्वास बाळगून असतो. मात्र नवीन माहितीच्या आधारे ह्यामध्ये सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. नवीन माहितीच्या आधारे परिक्षण करण्यात आले. घसरलेल्या आणि वधारलेल्या रोख्याचा आढावा घेऊन परीक्षण केलेले आहे. पर्यायी विश्लेषणामध्ये आधिक्य प्रतिक्रिया गृहीत मानलेली आहे. आधिक्य प्रतिक्रिया गृहीतामध्ये तिरकस विभागीय माध्य प्रत्यावर्ती (cross sectional mean reversion) आकृतीबंध असतो असे बॉन्टड आणि थॅलेरने शोधून काढलेले आहे. त्यांच्या निर्वचनामध्ये विवाद अनुभवनिष्टतेच्या आधारावर झालेला आहे. विशेषत: मूल्य घटलेल्या रोख्याचा परतावा उच्चत्तम होता. तरीसुद्धा गुंतवणूकदार आणि जोखिम ह्यामध्ये व्यवस्थाबद्ध मेळ बसविणे जोखमीच्या क्षतिपुर्ततेकरिता आवश्यक आहे. सोबतच उच्च जोखीम विमा यामध्ये (Premia)आहे.

बेनार्टत्झी आणि थॅलेर ह्यांनी वर्तणूक वित्ताचे स्पष्टीकरण केलेले आहे. ह्याला समभाग अधिमूल्य गोंधळ (equity premium) असे म्हटलेले आहे. शेअरशी संबंधित परतावा लक्षात घेता.याकडून प्रत्यक्षात रोख्याचा मेळ प्रमाण अपेक्षित उपयोगिता प्रारूपाशी (standard expected utility model) घातलेला आहे. अरूंद कंसात्मकता (narrow bracketing) आणि मूल्य घसरणी विरूद्ध आधार घेऊन स्पष्टीकरण केलेले आहे. त्याच्या प्रारूपामध्ये मूल्य घसरण्याचा विरूद्ध परिणाम अवलंबून आहे. यावर कशा प्रकारे गुंतवणूकदार संदर्भ बिंदूची (किंमत) पुर्नमांडणी करतात ते अवलंबून आहे. बेनार्टत्झी आणि थॅलेरने शोधून काढले की, मूल्य घसरणीचे स्पष्टीकरण म्हणजे समभाग अधिमूल्य (equity premium) आहे. ह्याकरिता गुंतवणूकदाराच्या मूल्यांकनाचा कालावधी एक वर्ष मानलेला आहे. लघुदृष्टीमूल्याचे हानी तिटकाऱ्याचे (Myopic loss aversion) स्पष्टीकरण करतांना त्याचे सहाय्य पर्याप्त प्रमाणात प्रयोगशाळा परिक्षणाला मिळालेले आहे. बारबेरीज ह्यम आणि थॅलेर याबाबत म्हणतात की, अरूंद कंसाद्वारे स्पष्टीकरण केल्या जाऊ शकते की लहान कुटुंबे शेअर बाजारामध्ये सहभागी का होत नाही ह्याला शेअर बाजारामधील सहभाग गोंधळ असे म्हटलेले आहे. तरी देखील वित्तीय अर्थशास्त्रामध्ये सर्वसामान्य सहमती घडून येत नाही. शिवाय नवअभिमतपंथीय प्रारूपाचा विस्तार झालेला आहे. जोखीम अधिमूल्याद्वारे योग्य स्पष्टीकरण वर्तणूक प्रारूपाचे वित्तीय बाजाराच्या संदर्भात करता येते. ज्या रोख्याचे मूल्य घसरलेले आहे ते टिकून राहून कृतीशील होतात असे स्पष्टीकरण थॅलेरने केलेले आहे.

२) गैरसमज व खरेदी विक्री व्यवहारावर मर्यादा :

वित्तीय बाजाराच्या परताव्याचे विश्लेषण निरीक्षणावरून करता येते. वर्तणूक वित्ताच्या तरतुदीचे

योगदान यामध्ये महत्त्वाचे आहे. याचा अर्थ असा होत नाही की परतावा हा प्रत्यक्षात परिणाकारक आहे. आधिक्य प्रतिक्रिया वर्तणूकीच्या नियमाविरूद्ध आहे. यादरम्यान आर्थिक घटना ह्याचा मेळ गुंतवणूकदाराची विवेकता आणि कार्यक्षम बाजारासोबत बसविलेत आहे. कारण बाजारामध्ये किंमतीचे चूकीचे निश्चितीकरण (mispricing) घडून येते. ज्यामुळे बाजारातील कार्यक्षमता भंग पावते.

बंद समाप्ती निधी (closed end fund) ह्याचा अर्थ गुंतवणूक निधी होय. शेअर बाजारावर गुंतवणूक व्यापार आधारलेला असतो. शेअर बाजारामार्फत स्वत:ची संपत्ती समभाग म्हणून सार्वजनिक कंपन्यामध्ये गुंतविल्या जाते. गुंतवणूक निधीला गोंधळाचा संदर्भ आहे. गुंतवणूक समभागाचे मूल्यमापन भिन्न प्रकारे केल्या जाते. मात्र त्यामध्ये संपत्ती स्वत:ची असते. शेअर बाजारामध्ये किंमती भंग पावतात आणि खरेदी विक्री व्यवहारावर मर्यादा असायला पाहिजे. ह्या संदर्भातील पायाभरणीचे काम इर्वींग आणि थॅलेर ह्यांनी केलेले आहे. ली, शेलीफर आणि थॅलेरने विश्लेषण प्रस्तुत केलेले आहे की गोंधळाचा आधार गुंतवणूक निधी आहे. सोबतच अविश्वास आहे. व्यापारी ज्यादा वेळामध्ये अपेक्षित परतावा देतात. ह्याचा संबंध विवेकी अपेक्षाशी आहे. इतर कालावधीमध्ये अपेक्षित किंमत कमी धरल्या जाते. ह्या चढउतारामुळे व्यापारी भावनिक होतात. परिणामत: जास्त अस्थिरता निर्माण होते. ही अस्थिरता किंमती आणि गुंतवणूक निधीबाबत दिसून येते. विवेकी व्यापाऱ्यांना जोखमीची हानी भरून निघण्याची आवश्यकता असते. तरीदेखील गुंतवणूक निधीबाबत पुढाकार घेऊन सवलती दिल्या जातात.

महत्त्वपूर्ण अशा आर्थिक घटना ह्या सिद्धांताचा मेळ घातला जातो. सामान्य गुंतवणूकदाराच्या भावना लक्षात घेऊन गुंतवणूक निधीबाबत सवलती दिल्या जातात. गुंतवणूक निधीची नव्याने मांडणी केली जाते. अस्तित्वातील गुंतवणूक निधीची विमा हप्त्याद्वारे विक्री केल्या जाते. याकरिता न्युनत्तम पातळीवर सवलती दिल्या जातात. गुंतवणूक निधीच्या सवलतीचा सहसंबंध हा इतर संपत्तीच्या किंमतीशी आहे. जो की गुंतवणूकदाराच्या भावनाद्वारे प्रभावित होतात. गुंतवणूक निधीच्या सवलतीचे मापन गुंतवणूकदाराच्या भावना लक्षात घेऊन निर्वचन आणि मूल्यांकन केल्या जाते. पर्यायी स्पष्टीकरण सवलतीच्या आधारावर विवेकी गुंतवणूकदारांचे केल्या जाते. खरेदी विक्री व्यवहाराच्या मर्यादा लक्षात घेऊन समायोजन घडवून आणल्या जाते. सामान्यपणे गुंतवणूकदाराच्या भावनाच्या मापनाचा उपयोग गुंतवणूक निधी सवलती करिता केल्या जातो. ज्याचा संबंध अनेक अशा संपत्ती किंमतीच्या घटनाशी व प्रसंगाशी आहे.

समारोप :

एकूणच रिचर्ड थॅलेरने अर्थशास्त्र आणि मानसशास्त्रामध्ये पूल बांधणीचे कार्य केले आहे. अर्थमानसशास्त्रीय विवेचन करतांना वैयक्तिक पातळीवर निर्णय घेण्याचे विश्लेषण केलेले आहे. ह्यामधून अनुभवनिष्ट निष्कर्ष आणि सैद्धांतिक अंतरंग उलगडून दाखविले आहे. ह्यामधून नवीन आणि तीव्रतेने विस्तार पावणारे शास्त्र म्हणून वर्तणूकीचे अर्थशास्त्र उदयाला आले आहे. ह्याचा गूढ असा प्रभाव अर्थशास्त्राच्या संशोधन आणि धोरणाच्या अनेक क्षेत्रावर पडलेला आहे. हा दृष्टिकोन विवेकी

वर्तणूकीशी संबंधित आहे. नियोजनकर्ता प्रारूप असो अथवा स्वयं नियंत्रण समस्येची नवीन चौकट असो ह्याचे विश्लेषण सामाजिक प्राधान्याच्या संदर्भात केलेले आहे. न्यायाच्या संदर्भात नवीन प्रमाणबद्धता मांडलेली आहे. वर्तणूक अर्थशास्त्राने धोरणकर्त्याच्या निर्णयावर प्रकाश टाकलेला आहे. ज्यामुळे योग्य निर्णय घेण्यास मदत होते.

संदर्भ सूची :

1) Benartzis and R.H. Thaler (1999) : Risk Aversion or Myopia? Choice in Repeated Gambles and Retirement investment, Management Science.

2) Benartzi's and R.H. Thaler (2013) : Behavioural Economics and Retirement Savings Crisis, Science.

3) De Bondt and R.H. Thaler (1987) : Further Evidence on Investor overreaction and stock Market Seasonality, Journal of Finance.

4) De Bondt and R.H. Thaler (1985) : Does the Stock Market overact ?, Journal of Finance.

5) Jolls C.C. Sunstein and R.H. Thaler (1998) : A Behavioural Approach to Law and Economics, Stanford Law Review.

6) Kahneman D. Konetsch J.L. and R.H. Thaler (1991) : The endowment effect, Loss Aversion and status Bais, Journal of Economic Perspective.

7) Lee C.M.C., A. Sheifer and R.H. Thaler (1991) : Investor sentiment and the closed end fund Puzzle, Journal of Finance.

8) Thaler R.H. 91994) : Psychology and saving policies, American Economic Review

9) Thaler R.H. (1999) : Mental Accounting Matter, Journal of behaviour Decision Making.

10) Thaler R.H. (2015) : Misbehaving : The Making of Behavioural Economics, Norton and Company, New York.

11) Sujoy Chakravarty (2017) : Behavioural Economics and Richard Thaler's contribution, Economic and Political Weekly, Vol. LII, No. 46.

12) Shrivastava Anand (2017) : Why Behavioural Economics will not save world, Economic and Political Weekly, Vol. LII, No. 46.

◆◆◆

ISSN 2320 - 0197

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची
संशोधन पत्रिका

अर्थमीमांसा

भारतीय सौर शके १९३८
(जानेवारी-जून २०१७ / खंड १०, अंक १)

- Inter-disciplinarity in Social Science Research : Shifting Goals and Missing Paths
- अर्थसंकल्प २०१७-२०१८ : दशा आणि दिशा
- The Empirical Analysis of the Relationship between Agricultural and Industrial Sectors in India
- अनौपचारिक क्षेत्रातील व्यवसायांचे अध्ययन - संदर्भ अमरावती शहर
- जलयुक्त शिवार अभियान - सिंचन विकास व पाणी उपलब्धता

-युरोपियन महासंघातून ब्रिटनचे निर्गमन (Brexit)-

- ब्रेक्झिट : २१ व्या शतकातील अर्थकारणाचे राजकारण
- Brexit : Trade relations between India and United Kingdom
- ब्रेग्झिट : कारण परिणाम मीमांसा
- ब्रेग्झिट : कारणे व परिणाम
- युरोपियन महासंघातून इंग्लंड बाहेर जाण्याची कारणे व परिणाम
- ब्रिटनचे युरोपियन संघातून बहिर्गमन - एक धावता दृष्टीक्षेप
- ब्रेग्झिट : जागतिकीकरणाकडून राष्ट्रीयकरणाकडे

ISSN 2320-0197

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची
संशोधन पत्रिका

अर्थमीमांसा

भारतीय सौर शके १९३८

(जानेवारी-जून २०१७/ खंड १०, अंक १)

□ प्रमुख संपादक □
दि.व्यं.जहागिरदार

□ सल्लागार मंडळ □
श्रीनिवास खांदेवाले
प्रमोद लाखे
प्रशांत हरमकर
जनार्दन काकडे

□ संपादकीय पत्रव्यवहार □
दि. व्यं. जहागिरदार
''व्यंकटेश'', १२, गुलमोहर कॉलनी,
कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२
दूरध्वनी (०७२१)-२६६१८५१

अनुक्रमणिका

- Inter-disciplinarity in Social Science Research : Shifting Goals and Missing Paths
  - R S Deshpande.....१
- अर्थसंकल्प २०१७-२०१८: दशा आणि दिशा
  -कपिल दिलीप चांद्रायण.....१४
- The Empirical Analysis of the Relationship between Agricultural and Industrial Sectors in India
  - Samit L. Mahore..... १९
- अनौपचारिक क्षेत्रातील व्यवसायांचे अध्ययन - संदर्भ अमरावती शहर
  - जे.व्ही.गायकवाड २९
- जलयुक्त शिवार अभियान - सिंचन विकास व पाणी उपलब्धता
  - मंगला भाटे.....३५

-युरोपियन महासंघातून ब्रिटनचे निर्गमन (Brexit)-

- ब्रेक्झिट : २१ व्या शतकातील अर्थकारणाचे राजकारण
  - श्रीनिवास खांदेवाले.....४०
- Brexit : Trade relations between India and United Kingdom
  - Sneha Deshpande.....४५
- ब्रेग्झिट : कारण परिणाम मीमांसा
  - सोनल जनबंधू , वैशाली देशमुख.....५२
- ब्रेग्झिट : कारणे व परिणाम
  - महादेव आसाराम रिठे..... ५६
- युरोपियन महासंघातून इंग्लंड बाहेर जाण्याची कारणे व परिणाम
  - मोरेश्वर के. नन्नावरे
    एस. एन. ताडे.....६१
- ब्रिटनचे युरोपियन संघातून बहिर्गमन -एक धावता दृष्टीक्षेप
  -अंजली कुलकर्णी ६९
- ब्रेग्झिट : जागतिकीकरणाकडून राष्ट्रीयकरणाकडे
  -प्रशांत हरमकर.....८१

ISSN 2320-0197

ब्रेग्झिट : जागतिकीकरणाकडून राष्ट्रीयकरणाकडे

– प्रशांत हरमकर
अर्थशास्त्र विभाग,
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय,
अमरावती.

प्रस्तावना :

राष्ट्रीय सार्वमत ब्रिटनमध्ये २३ जून २०१६ मध्ये घेण्यात आले. ब्रिटनच्या लोकांनी ५२ विरूद्ध ४८ प्रतिशत मतदान करून युरोपियन समुदायातून ब्रिटनने बाहेर पडण्याचा (बर्हिगमन) कौल दिला. युरोपियन समुदाय म्हणजे २८ देशाचे सिमारहीत क्षेत्र असून वस्तू, सेवा, गुंतवणूक आणि श्रमाची मुक्तपणे गतीशीलता आहे. युरोपियन समुदायातून ब्रिटन बाहेर पडणार म्हणून याला म्हणजे ब्रेग्झिट (Brexit) असे संबोधण्यात आले आहे. मिशेल ग्रोव्ह ह्यांनी ब्रेग्झिटचे नेतृत्व केलेले होते. त्यांनी मध्यम स्वरूपाची मोहीम याकरिता उघडलेली होती. या देशातील लोक पुरेसे कुशल आहे असे मत तयार करून ब्रेग्झिटला अनुकूल मतदान करण्यात आले. मात्र दोषारोपण लेबर पक्षाच्या पुढाऱ्यावर केल्या गेले होते. मात्र आंतरराष्ट्रीय पातळीवर काळजी केल्या जात होती की ब्रेग्झिट हा ट्रम्पिझम मधून तर उद्‌भवला नाही कारण हा सर्व राष्ट्रीयकरणाच्या प्रवृत्तीचा भाग आहे.

आधुनिक युरोपचा पिता जीन मोनेट याचे सुप्रसिद्ध वाक्य आहे की, ''आर्थिक एकीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे. मात्र याकरिता अंतर्गत विरोध दूर करायला पाहिजे.'' तर फ्रॅन्को पोवोलसेलो असे म्हणतो, ''नवीन समुदाय अथवा संघाची बांधणी करण्याचा मार्ग टप्प्याटप्प्यानी पुढे जात असतो. यामधून आर्थिक एकीकरण घडून येत असते याला वळण देण्याचे काम राजकीय एकीकरणाच्या नेतृत्वातून घडून येत असते.'' युरोपियन समुदाय हा महत्त्वाकांक्षी राष्ट्र प्रकल्प असून यामधून ब्रिटन बाहेर पडत आहे. ह्यामुळे या राजकीय अरिष्टाला नियंत्रित करणे कठीण आहे. त्यामुळे युरोपियन समुदायाची मूलगामी संकल्पना अपयशी ठरल्यामुळे जग सुन्न झालेले आहे.

ब्रेग्झिट निर्णयाचे घटक :

युरोपियन समुदायाच्या शक्तीशाली दबावाला नाकारून ब्रिटनने बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. याकरिता ब्रिटनने लोकशाही मार्गाचा स्विकार करून सार्वमत घेतले. सार्वमताने ब्रिटन बर्हिगमनाचा निर्णय दिला. या सार्वमताला वैचित्र्यपूर्ण असे पैलू आहे. या पैलूंमुळेच ब्रिटन युरोपियन समुदायातून बाहेर पडला.

या पैलूचा विचार मुख्यत्वे चार प्रकारात करता येतो. कारण हा निर्णय गुंतागुंतीचा आहे. प्रथमत: युरोपियन समुदायामध्ये एकूण २८ देश होते. या देशांमध्ये अंतर्गत पातळीवर आर्थिक, राजकीय लष्करी हित आणि प्रजासत्ताक मापनामध्ये भिन्नता होती. दुसरे विकासाच्या दृष्टीकोनामधून देखील त्यांच्यात देशांमध्ये भिन्नता आहे. तिसरे ब्रिटन

प्रजासत्ताक देश जरी असला तरी तात्पुरत्या व्हिसावर असणाऱ्या परदेशी रहिवाशाचे प्रमाण जास्त आहे.त्यामुळे वांशिक प्रजासत्ताकता ब्रिटनमध्ये आढळते. चवथे, ब्रिटनचा बहुपक्षीय व्यापार गुंतागुंतीचा आहे. ह्या सर्वांचा परिणाम ब्रिटनच्या बर्हिगमनावर झालेला आहे.

ब्रिटनची युरोसंशयवृत्ती :

ब्रिटनचा युरोसंयमवृत्ती (Eurosceptism) फार हेकेखोर आहे. महायुद्धानंतरच्या काळात ब्रिटीश राजकारण याहून पुढे गेलेले होते. युरोपियन समुदायाची स्थापना व्हावी याकरिता ब्रिटनने सुरवातीला पुढाकार घेतला होता. विन्सर्टन चर्चिल (१९४६) युरोपियन समुदायाच्या अनुकूल होते. मात्र ब्रिटन युरोपियन समुदायात सामील झाला नाही. ब्रिटन १९५१ मध्ये पॅरिस कराराच्या बाहेर राहिला. हा करार युरोपियन कोळसा आणि स्टिल समुदयाचा होता. पुढे हा करार युरोपियन समुदायाचा भाग ठरला.

ब्रिटनने १९५७ मध्ये रोम करारावर सह्या केल्या नाही. त्यामुळे युरोपियन आर्थिक समुदाय स्थापित होत असतांना ब्रिटन त्याचा भाग होऊ शकला नाही. १९६० च्या दशकाच्या मध्यात ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेमध्ये स्थिरावस्था (Stagnation) निर्माण झाली. त्यावेळी टोरी शासनाने युरोपियन समुदायाचे अस्थायी सदस्यत्व प्राप्त केले. मात्र ब्रिटनला युरोपियन समुदायामध्ये सामील करून घेण्यात बरेच अडथळे होते. फ्रान्सने नकार अधिकाराचा वापर करून ब्रिटनच्या सदस्यत्वाला नाकारले. युरोपियन समुदायाच्या सदस्यत्वावरून ब्रिटीश राजकारण नेहमीच विभागल्या गेले होते. १९७० च्या निवडणूकामध्ये युरोपियन समुदायाचे कायम सभासदत्व हा मुख्य वादप्रश्न ठरला होता. ब्रिटन युरोपियन समुदायामध्ये १९७३ मध्ये सामील झाला. लेबर पक्ष सत्तेत असतांना फ्रान्सने ब्रिटनच्या सदस्यत्वाला होकार दिला. याकरिता युरोपियन आर्थिक समुदाय करार १९७३ संमत केला. या करारामध्ये रोम करार समाविष्ट होता. मात्र ब्रिटन आणि रोम करारामध्ये विरोध होता ही वस्तुस्थिती होती. १९७४ च्या निवडणूकांमध्ये लेबर पक्षाने आश्वासन दिले की, युरोपियन आर्थिक सुदायासोबत पुनर्वाटाघाटी केल्या जातील. मात्र १९७५ मध्ये लेबर पक्ष विभागल्या गेला. त्यानंतर सार्वमत घेण्यात आले. २/३ बहुमताने युरोपियन आर्थिक समुदायाच्या सदस्यत्वाला विरोध झाला. तरी सुद्धा ६७.२ प्रतिशत मते युरोपियन समुदायाच्या बाजूने होती. या विरोधाभास स्थितीमुळे अंतिमत: टोरी आणि लिबलर पक्षाने युरोपियन समुदायातील समावेशनाला स्थगिती दिली. सार्वमतावरून लेबर पक्ष विभागला गेला. लेबर पक्षाला छेद गेल्यामुळे लेबर पक्ष हा टोरी आणि लिबरल पक्षाच्या जवळ आला. कारण त्याचे मुख्य लक्ष सामाजिक पाया होता.

मागरिट थॅचर सत्तेत आल्यानंतर टोरी पक्षाला विभाजनाचा सामना करावा लागला. थॅचर ह्यांनी १९८६ मध्ये युरोपियन करारावर सह्या केल्या. या करारांतर्गत ब्रिटनचा युरोपियन समुदायामध्ये समावेश आणि समान चलनाचे वेळापत्रक बसविण्यात आले. मात परत कृषी अर्थसहाय्य, अन्नाची प्रमाणके, विविध वस्तु व्यापारावरील नियंत्रणे यावरून विरोध झाला ब्रिटनने १९८५ मध्ये शेनगेन करार जो की सीमा नियंत्रणाच्या संदर्भात होता त्याला स्थगिती दिली. १९९० मध्ये ब्रिटन मौद्रिक संघाशी जोडला गेला. मात्र इतर काही राज्यानी यामधून दोन वर्षात माघार घेतली. १९९२ मध्ये चलन बाजारात तीव्र सट्टेबाजी झाली. यामुळे

युरोझोन बाजूला पडला.

युरोपियन समुदायाचा विस्तार १९९२ मध्ये राजकीय संघाकडून आर्थिक संघाकडे झाला. याकरिता मॅस्ट्रिच करार करण्यात आला. टोरी शासनाने मॅस्ट्रिच करारावर सह्या केल्या. मात्र सार्वमत घेण्यात आले नाही. त्यामुळे पक्षामध्येच विरोध झाला. ब्रिटनच्या शासनाने युरोपियन समुदायाशी अनेक वेळा वाटाघाटी केल्या. कलमांमधून माघार घेतली आणि सवलती सुद्धा मिळवल्या होत्या.

लेबर पक्षांतर्गत टोनी ब्लेअर ह्यांनी युरोपियन प्रकल्पाला सहाय्य करून उत्साहवर्धकता निर्माण केली होती. २००१ मध्ये नीस करारावर सार्वमत घेण्याचे ब्लेअर यांनी कबूल केले होते. कोणत्याही प्रकारचा सांविधानिक अडथळा नव्हता.यावर पार्लमेंटमध्ये चर्चा घडवून आणता आली असती. मात्र ब्लेअर ह्यांनी माघार घेतली. युरोपियन समुदायातील अनेक सदस्य देशांनी नीस करार नाकारला होता. नीस कराराला प्रतिस्थापित करून त्याऐवजी लिसबन करार आणण्यात आला. ब्रिटनने २००७ मध्ये लिसबन करारावर सह्या केल्या. ब्रिटीश पार्लमेंटच्या संमती शिवाय याला मंजूरी देण्यात आली होती. त्यामुळे डेव्हिड कॅमरून ह्यांनी विरोध केला होता.यावर युरोपियन समुदायामध्ये राहण्याबाबत आक्षेप घेण्यात आला. त्यानंतर २०१३ मध्ये सार्वमत घेण्याची घोषणा करण्यात आली.अनेक राजकीय पुढाऱ्याचे म्हणणे होते की,टोरी आणि लेबर पक्ष युरोपियन समुदायाबाबत दुटप्पी भूमिका घेत आहे. राजकीय पक्षांनी सबळ भूमिका घेऊन युरोपमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला यामुळे ब्रिटन दुभंगला गेला.

ब्रिटीश राजकारणाची स्थापना आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था, आंतरराष्ट्रीय राजकारण आणि अंतर्गत एकवाक्यता (internal cohesion) या तीन तत्वावर आधारलेली आहे. ब्रिटन हा मुक्त व्यापार विजेता देश आहे. जागतिक युद्धाशी जुळलेला देश आहे. आनंदी वस्तू साठी (jolly goods) वर्गीय युद्ध सुरू आहे. राष्ट्रीय अरिष्ट निर्माण होऊन राष्ट्रीय कर्ज, युद्धे, उग्र प्रवृत्ती, घसरते वेतनाचे दर आणि प्रादेशिक विषमता ब्रिटनमध्ये आहे. यासर्वांच्या पुढे असणारा वादप्रश्न म्हणजे विदेशी स्थलांतरित रहिवाश्याचा प्रश्न ब्रिटनला भेडसावतो आहे.

मुक्त बाजार प्रारूप :

दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपने नवउदारमतवादाचा स्वीकार केला. ज्यामध्ये बाजाराच्या विवेकावर संपूर्णपणे विश्वास होता. नवउदारमतवादाच्या मते बाजार हा स्वयंशोधक म्हणजे दुरूस्ती करणारा (self correcting), स्वयंम्-समतोलक (self stabilising) आणि संसाधनाचे कार्यक्षम वितरण करू शकतो. बाजार उच्चवचनाची समस्या देखील दूर करू शकतो. असे गृहीत मानले आहे की, बाजार सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून सेवा देतो. बाजार काय करू शकतो याचे प्रस्तुतीकरण त्याच्या परिणामावरून होते. याबाबत नोम चॉमस्की असे म्हणतात की,''नवउदारीकरणातंर्गत जागतिक कायदे (world order) शासनाला आर्थिक प्रक्रियेतून बाहेर जायला सांगतात.शासनाची भूमिका ही केवळ हमी घेण्याची आहे. बाजार कार्यक्षमपणे कार्य करतो. वस्तू,सेवा आणि संपत्तीचे योग्य प्रकारे वितरण करतो.

मागरिट थॅचर आणि रोनाल्ड रिगन ह्यांच्या अर्थशास्त्राचा आधार मुक्त बाजारच होता. वाशिंग्टन कराराने उदारीकरण आणि खाजगीकरणाचा फैलाव केला. अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक विजेते फ्रेन्डरिक वॉन हायेक (१९७४) ह्यांनी सामाजिक न्याय आणि राजकीय हस्तक्षेपाला विरोधच केला होता. तर वाशिंग्टन कराराचे समर्थन केले होते.

तसेच त्याचा भर खाजगीकरण, उदारीकरण, वित्तीयकरण, निर्नियंत्रणे (deregulation), करांमध्ये कपात, श्रमिक संघटना दुर्बळ करणे आणि सार्वजनिक सेवांच्या आऊटसोर्सिंगवर होता.

केन्थ जासफच्या विचारसरणीचा प्रभाव थॅचर कॉबनटवर होता. मुक्त बाजार कार्यक्रमपत्रिका स्विकारतांना त्यांनी सर्वांची मते वळवली होती. उदारीकरणाला पर्याय नाही असे बोलल्या जात होते. उदारीकरणाचे पुरस्कर्ते मिल्टन फ्रिडमन आणि शिकागो विद्यापीठातील मौद्रिक अर्थशास्त्रज्ञ म्हणत होते की, केवळ मौद्रिक धोरणामुळे स्फिती नियंत्रित केल्या जाऊ शकत नाही. स्फितीला नियंत्रित करण्याकरिता उदारीकरणाचा मार्ग योग्य आहे. रोखे बाजार आणि वित्तीय बाजारामध्ये निर्नियंत्रणानी पुढाकार घेतला होता. आर्थिक धोरणे बँकर्स (Bankers)आणि मोठ्या निगमाच्या अनुकूल बनविल्या गेले. केंद्रीय बँकेनी आपली धोरणे बदलावित असतांना वित्तीय जोखमी आणि भांडवल नियंत्रणाची भूमिका दुर्लक्षित केली होती.

उदारीकरणाच्या भूमिकेबाबत टोनी ब्लेअर बोलले की, ज्या देशांनी उदारीकरणाची भूमिका स्विकारून स्पर्धा निर्माण केली त्यांना यश प्राप्त झालेले आहे. खुलेपणा आणि बदलावर भर देण्यात आला. त्यामुळे स्पर्धा वाढून कल्याणकारी राज्याचा ऱ्हास झाला. विशेषत: ११ सप्टेंबर २००१ नंतर नवउदारीकरण धोरणांना अपयश येऊ लागले. २००८ च्या जागतिक अरिष्टांच्या यातना सर्व जगाने सहन केल्या. देशीय बाजारामध्ये संसाधने आणि उत्पन्नाचे असमान वितरण झाले. सामाजिक परतावा आणि खाजगी परताव्या मधील अंतर विस्ताराणारे होते. प्रत्यक्षात नवउदारीकरण धोरणाकडे दुर्लक्ष केले तर बाजार संपत्तीचे बुडबुडे निर्माण करू शकतो. मात्र बाजार स्वयं दुरूस्त यंत्रणा म्हणून प्रस्तुत होतांना दिसला नाही.

ब्रिटीश अर्थव्यवस्था आणि ब्रेक्झिट प्रक्रिया :

टोरीचे शासन २०१० मध्ये सत्तेत आले. या शासनाने सार्वजनिक खर्चात कपात करायला सांगितली होती. वित्तीय रेटिंग एजन्सीने (Financial Rating Agency) ब्रिटनला तिहेरी AAA प्रत दिलेली होती. आणि मानव संवर्धनाचा प्रस्ताव दिलेला होता. २००८ मध्ये वित्तीय अरिष्ट निर्माण झाल्यानंतर अरिष्टातून बाहेर येण्याकरिता युरोपियन समुदायाने नियंत्रणे लावली होती. जगामध्ये लंडन शहर वित्तीय भांडवल निर्नियंत्रणे ठेवणारे आहे. युरोपियन समुदाय आणि ब्रिटन यांच्या धोरणामध्ये परस्पर विरोध असल्यामुळे ब्रेक्झिट घडून आले. सोबतच ब्रिटनला तिहेरी AAA प्रत मिळाल्यामुळे वित्तीय तुटीमध्ये कपात करण्यास सांगितले. धोरणामध्ये ताठरता आणायला सांगितली. ब्रिटनमध्ये युद्धांची वारंवारिता असल्यामुळे राष्ट्रीय ऋण हा वादप्रश्न होता. त्यामुळे ह्याला अनुसरून संरक्षण बजेटमध्ये कपात करायला सांगितले होते. मात्र ब्रिटन करिता कपात घडवून आणणे कठीण होते.

ब्रिटनमध्ये युद्ध आणि सार्वजनिक कर्जाचा परस्पर संबंध ऐतिहासिक आहे. शंभर वर्षाच्या नंतर म्हणजे मार्च २०१५ मध्ये ब्रिटनने पहिल्या महायुद्धाकरिता घेतलेल्या कर्जाचा शेवटचा हप्ता दिला. मनुष्य आणि युद्धसामुग्रीची गतिशीलता ब्रिटन कडून साम्राज्याकडे दुसऱ्या महायुद्धाकरिता झाली. लष्कराने दुसरे महायुद्ध जिंकले मात्र मोठ्या प्रमाणात आर्थिक हानी झाली. याकरिता कर्जाऊ मुदती करार (Lend Lease Agreement) अमेरिकेसोबत करण्यात आला. महायुद्धानंतर ब्रिटनने अमेरिकेसाठी राजकीय नेतृत्व सोडून दिले. ब्रिटनची आर्थिक

ऋणग्रस्तता वाढली होती. ब्रिटनला प्राप्त झालेल्या एकूण कर्जामध्ये अमेरिकेचा वाटा २५ प्रतिशत होता. अमेरिकेने युरोपची पुर्नबांधणी आणि मार्शल योजनेकरिता मोठी आर्थिक मदत केलेली होती.

१९६० च्या दशकामध्ये युद्धोत्तर पुनर्भरणाकरिता आर्थिक मदत कर्जाच्या स्वरूपात प्राप्त झाली. यामुळे शोधन शेषामध्ये तुटीचा सामना ब्रिटनला करावा लागला होता. परिणामत: स्टर्लिंग-पाऊंडचे मूल्य घसरले होते. बेरोजगारी आणि आर्थिक स्थिरावस्था (Economic stagnation) निर्माण झाली होती. मजदुर संघटना विरूद्ध बेरोजगारी, वेतनाचे दर आणि प्रतिकूल अटी होत्या. म्हणून ब्रिटनने तात्काळ मदतीसाठी आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीची मदत घेतली. याकरिता आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीने सहाय्य केले. जो दोन दशकापूर्व जगातील मोठा साम्राज्यवादी देश होता त्याला अशा प्रकारची मदत मिळवावी लागली. यावेळी राष्ट्राच्या दुराभिमानाचा सखोल व्रणच सोडल्या गेला. ब्रिटनला १९७५ मध्ये युरोचे सदस्यत्व प्राप्त झाले. यातूनच अरिष्टाची निर्मिती झाली.

युरोपमधून ब्रिटन बाहेर वळला होता. त्यामुळे प्रजासत्ताक देशांपासून दूर गेला. त्यामुळे आर्थिक परिणाम त्याच्या पारंपारिक क्षेत्रावर घडून आले. थॅचरची आर्थिक सुधारणांची (LPG) सुरूवात उद्योग आणि उत्पादन आधारभूत रचनेमध्ये केली होती. जागतिक वित्तीय भांडवलाकरिता वित्तीय बाजार निर्नियंत्रित करण्यात आला होता. दुय्यम बाजार (ancillary market) सेवाकरिता कायदेशीर नवप्रर्वतने आणि कौशल्ये घडवून आणण्यात आली. यामध्ये आंतरराष्ट्रीय बाजार संस्था समाविष्ट होत्या. सार्वजनिक ऋण अरिष्टाचे मोठे धक्के लंडन शहराला १९८० मध्ये बसायला लागले होते. सट्टेबाजांनी करार खाजगी क्षेत्र आणि विकसनशील देशांशी केलेले होते. यामधून वित्तीय, अधिकोषण आणि लवादासंबंधीच्या (aribitration) सेवा प्राप्त झाल्या. लंडन तेजी मध्ये असतांना त्याचा प्रभाव इतर भागावर दिसून आला नाही. उत्पन्न आणि रोजगार घसरलेला होता. वर्गीय केंद्रीकरणामुळे भौगोलिक विभागणी होऊन ब्रेग्झिट घडले.

आर्थिक मंदीचा सामना ब्रिटन १९९१ मध्ये करीत होता. याचे कारण लंडनचे वित्त क्षेत्र होते. ब्रिटनचे राजकीय नेते युरोपियन समुदायावर दोषोरोपण करीत होते. कारण विनिमय दर आणि उच्च व्याजदराची मांडणी युरोपियन समुदायाद्वारे केल्या गेली होती. अनेकदा विनिमय दर यंत्रणा युरोपियन समुदायाच्या हाताबाहेर गेली होती. द्विपक्षीय गुंतवणूक करार (Bilateral Investment treaties) अंतर्गत नवीन संधी देण्यात आल्या. बहुराष्ट्रीय बाजार वाटाघाटी अंतर्गत जागतिक व्यापार संघटनेने दोहा फेरी प्रस्तुत केली. अमेरिका आणि युरोपिय समुदाय यामधूनच द्विपक्षीय व्यापार गुंतवणूक करायला लागले. अशा द्विपक्षीय कराराची संख्या १९८८ मध्ये ३०९ होती. ही संख्या वाढत जाऊन २००२ मध्ये २१८१ तर २०१५ मध्ये २९२६ एवढी झाली. याबाबतचे बाह्य दृश्य पाहिले तर ब्रिटनने जुन्या प्रजासत्ताक देशांना चांगल्या संधी प्राप्त करून देण्याकरिता सवलती दिल्या होत्या.

या दरम्यान ब्रेग्झिटची मोहिम उघडण्यात आली. याचा संबंध प्रजासत्तेकतेशी असून वेगळा होण्याचा आवाज होता. यामधूनच विदेशी लोकांच्या स्थलांतरणाला विरोध झाला. ब्रिटनमध्ये वंशभेद माननारा म्हणून युनायटेड किंगडम इन्डीपेन्डस पक्ष आहे. या पक्षाचे नेतृत्व निमेल फरागे करीत होते. हा पक्ष ब्रिटन आणि पूर्व युरोपमध्ये कार्यरत होता. बिंदू आधारित प्रणाली (Point Based System)

आस्ट्रेलियाने लागू केली होती. हेच प्रारूप ब्रिटनने स्विकारले. युरोपियन समुदायामध्ये ब्रिटन सामील झाल्यानंतर ऐच्छिक भागीदार म्हणून भारत, दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड आणि कॅनडा या देशांना प्रस्तुत केला. या प्रजासत्ताक देशांशी बिंदू आधारित प्रणालीद्वारे द्विपक्षीय करार करण्यात आला. त्याद्वारे विदेशी स्थलांतरितांना ब्रिटन खुला करण्यात आला. जो श्रीमंत आहे, चांगला रोजगार, संपत्ती आणि विशेषाधिकार आहे त्यांना स्थानिक प्रमाणेच कमी किंमतीवर स्थानिक सेवा दिल्या होत्या.

असमान वितरण आणि वर्गीय युद्ध :

आर्टक, चौधरी आणि मार्कल यांच्या अध्ययनानुसार (२०१०) व्यापार उदारीकरणाच्या समायोजनाचा व्यय मोठा आहे. जो की व्यापार उदारीकरणाचा उदय सार्वजनिक पातळीवर झालेला आहे. ब्रेग्झिट म्हणजे अज्ञानांचे अविवेकी मत नव्हते तर व्यापार उदारीकरणामुळे झालेला हानीतून हे मत तयार झालेले होते. निश्चितच हा वादप्रश्न मुक्त व्यापारापासून होणाऱ्या तोट्यामधून निर्माण झाला होता. सुक्ष्म पातळीवर भेद केला तर हा पदवीधर आणि पदवीधर नसणाऱ्यामधील होता. व्यापार उदारीकरणाचा विस्तार होतांना त्याचा संबंध कुशल श्रमिक पुरवठ्याशी आहे. मात्र प्रत्यक्षात वेतनाचे दर प्रतिकूल अटीवर ठरतात. जसे की अमेरिकेमध्ये सरासरी तासाप्रमाणे वेतनदर वाढलेले नाही. तर दुसऱ्या बाजूला स्फिती आहे. त्यामुळे सरासरी वेतन ७० प्रतिशतने घसरलेले आहे. हीच परिस्थिती ब्रिटनमध्ये आहे.

नवउदारीकरणाच्या काळात उत्पन्न वितरणामध्ये विरूपणांनी (distoration) पुढाकार घेतलेला आहे. अमेरिका आणि ब्रिटनमध्ये नवउदारीकरणाचे लाभ प्राप्त करण्याकरिता उच्च उत्पन्न गटातील लोकांवरील कराचे दर कमी केलेले आहे. त्यावरून विचार केला तर धनाढ्यासाठी कर कपातीच्या धोरणामुळे रेगन लोकप्रिय झाले होते. सिमांत कर कपातीचा दर ७० प्रतिशत वरून २८ प्रतिशतवर आणण्यात आला होता तर थॅचरनी सुद्धा कर कपातीचा दर ८३ प्रतिशत वरून ४३ प्रतिशतवर आणण्यात आला होता. सद्य:स्थितीत तळाला असलेले २० प्रतिशत ब्रिटीश लोक ३७.८ प्रतिशत उत्पन्न कर देतात तर उच्चभ्रू २० प्रतिशत ३४.८ प्रतिशत कर देत असल्याचे आढळून येते.

मुक्त व्यापार असतांना नवउदारीकरणाच्या पुरेशा अटी राहतील अशी युरोपियन समुदायाने वचनबद्धता दिली होती. युरोपियन समुदायनेच युरोपचा एक बाजार (single market) असावा असा विचार मांडला होता. यामुळे पेढ्या युरोपियन खंडामध्ये विभागल्या गेल्या तर छोटे उत्पादक स्थानिक क्षेत्रामध्ये उत्पादनांचा पुरवठा करीत होते. अशा प्रकारे एकीकरणाची प्रक्रिया संपादित केल्या जात होती. मात्र एकीकरणाद्वारे उत्पादकतेचे स्वतंत्र लाभ प्राप्त व्हायला पाहिजे. हे लाभ प्राप्त करण्यात बाजार अपयशी ठरला. कारण युरोपमध्ये सांस्कृतिक विविधता आणि उपभोगक्त्याच्या पसंतीमध्ये भिन्नता होती.

मुक्त व्यापार वाढत असतांना सहकारी व्यापार भागीदार देशांना त्याचे लाभ प्राप्त होत असतात. आर्थिक मापके आणि तुलनात्मक व्ययाचा आधारावर व्यापारामध्ये वाढ घडून येते. आर्थिक वृद्धी आणि उत्पन्न वाढ घडून येते. बंद अर्थव्यवस्थेच्या तुलनेत खुल्या अर्थव्यवस्थेमध्ये लोक अधिक चांगले जीवनमान जगतात. मात्र एवढे पुरेसे नाही. प्रश्न हा मुक्त व्यापारापासून मिळणाऱ्या अनुकूल लाभाच्या विभागणीचा आहे. प्रत्यक्षात मुक्त व्यापारामध्ये लाभाचे वितरण असमान

होते. प्रत्येकाला मिळालेला लाभ अल्पसा असतो.

मुक्त व्यापार धोरणे ब्रिटनमध्ये राबवली जात असतांना श्रमिक गतिशीलता ब्रिटन सारख्या उच्च उत्पन्न देशाकडून ग्रीस आणि पोर्तुगाल सारख्या न्यून उत्पन्न देशाकडे होत होती. तेव्हा व्यापार भागीदार देशांनी वेतनदरामध्ये समानता आणण्याचा प्रयत्न केला. परिणामत: गरीब देशामध्ये वेतनाचे दर वाढले तर श्रीमंत देश घसरणाऱ्या वेतन दराचा सामना करीत होते. सोबतच बेरोजगारी वाढत गेली. जसे की मेक्सिको सोबतच्या मुक्त व्यापार करारामुळे अमेरिकेतील अकुशल श्रमिकांच्या वेतनाचे दर घसरलेले होते. अशा प्रकारची स्थिती ब्रिटन आणि अमेरिका या दोन्ही देशामध्ये होती. ब्रिटनमधील युवा बेरोजगाराचे प्रमाण मध्य २००४ ते २०१४ च्या दरम्यान पुरूष बेरोजगाराचे प्रमाण १८.४ प्रतिशतने वाढलेले होते तर स्त्री बेरोजगाराचे प्रमाण २००२ ते २०१४ च्या दरम्यान १४ प्रतिशतने वाढलेले होते.

कष्टकरी वर्गाकरिता मुक्त व्यापार प्रतिकुल परिणाम घडवून आणणारा आहे. मात्र निगमामध्ये काम करणाऱ्या उच्चभ्रू वर्गाकरिता लाभदायक आहे. ब्रिटन मधील लंडन हे शहर अति उच्च उत्पन्न गटातील लोकांचे शहर आहे. असे असतांना देखील उत्पन्न आणि संपत्तीमध्ये वाढ घडून येतांना दिसली नाही. प्रत्यक्षात याचे प्रतिबिंब असे उमटले की, लोकांनी सार्वमताचा मार्ग निवडून युरोपियन समुदायातून बाहेर पडण्याचा निर्णय दिला. लंडन शहर सोडून ब्रिटन मधील इतर भागातील लोकांनी ब्रेग्झिटच्या बाजूने निर्णय दिला तर लंडन शहराने ब्रेग्झिटच्या विरूद्ध निर्णय दिला हे देखील लक्षात घ्यायला पाहिजे.

ब्रिटीश लोक बोलत होते की जागतिकीकरणामुळे सर्व लोकांसाठी संपत्ती आणि समृद्धता निर्माण होणार आहे. मात्र ते बोलले नव्हते की यामधून युद्धे देखील निर्माण होणार आहे. जागतिकीकरणातून मर्यादित प्रमाणात संपत्ती निर्माण झाली आणि सामाजिक मनोरा (social pyramid) कोसळला. The equality trust च्या अहवालानुसार ब्रिटनमधील तळातील १० प्रतिशत लोकांचे सरासरी उत्पन्न ८,४६८ पाऊंड होते तर वरच्या उत्पन्न गटातील १० प्रतिशत लोकांचे उत्पन्न दहापट जास्त होते. म्हणजेच वेतनदरामध्ये उच्चत्तम विषमता होती. वरच्या उत्पन्न गटातील १ प्रतिशत लोकांचे उत्पन्न २,५९,९१७ पाऊंड होते तर यामधील ०.१ प्रतिशत लोकांचे सरासरी उत्पन्न ९,४१,५८२ पाऊंड होते. प्रत्येक वेळी अरिष्ट होत असतांना वर्गयुद्ध घडून येत होते. ही वर्ग युद्ध विषमतेमुळे घडून येत होते.

आर्थिक अनिश्चितता वाढल्यामुळे पूर्वीपेक्षा वर्गीय युद्ध मोठे होते. ब्रेग्झिटने दर्शविले की बाजार यांत्र कार्य करू शकत नाही. मुक्त बाजार प्रादेशिक विषमतेला नियंत्रित करू शकत नाही. ब्रिटनचे हे राष्ट्रीय प्रश्न होते. त्यामुळे ब्रिटनने विभक्तवादी भूमिका निवडली आहे. लंडन संपूर्णपणे युरोपियन बाजारामध्ये समाविष्ट असल्यामुळे त्याच्या आर्थिक व राजकीय शक्तीची घसरण झालेली आहे. ब्रिटन मधील लोकांची अपेक्षा आहे की उत्पन्न विषमता कमी होऊन रोजगाराच्या संधी वाढल्या पाहिजे. नाही तर वर्गयुद्ध घडू शकते. वर्ग युद्धातून वंशभेदाचा ध्वन्वार्थ निघतो आहे. त्यामुळे या वादप्रश्नावर नवीन प्रकारचे राजकारण होत आहे. संपूर्ण ब्रिटनमध्ये वंशविद्वेशातून हल्ले घडून आलेले आहे.

ऋण अरिष्ट आणि मुलभूत हक्काचे विचलन :

नवउदारमतवादी अर्थशास्त्रज्ञ आणि राजकीय शिस्तीच्या सामंजस्यामुळे एकच बाजाराची

(single market) संकल्पना अस्तित्वात येऊन युरोची निर्मिती झालेली होती. मात्र ही संकल्पना माहितीचा अभाव आणि वास्तव जगाकडे दुर्लक्ष या गृहितावर आधारलेली होती. त्यामुळे ही संकल्पना नैतिक धोक्याची आहे असे ग्रीस देशाच्या अनुभवावरून सिद्ध होते. ग्रीस मध्ये ऋण अरिष्ट घडून आले. हे अरिष्ट सोडवण्यासाठी जर्मनीच्या बँकांनी वित्तीय मदत केली. तसेच आंतरराष्ट्रीय मुद्रा निधी आणि पश्चिमेकडील राज्याचा उपयोग करून बेलआऊट निधी (bailout fund) मिळविल्यानंतर देखील ग्रीस ऋण अरिष्ट सोडविण्यात अपयशी ठरला. त्याने ऋणाचे आकारमान लपविण्याचा फसवा मार्ग अवलंबला होता. ऋण बाजारामध्ये ग्रीस ने पुढाकार घेतला होता याचे कारण पश्चिमी राज्य हा सर्व खर्च करून घेतील आणि ऋणको देश कोणतेही नुकसान न होता यामधून बाहेर पडेल असे गृहीत मानले होते. त्यामुळे प्रतिकूल परिणाम होऊन ग्रीस ऋण अरिष्ट घडून आले.

एकूणच युरोपमध्ये सार्वजनिक पातळीवर ऋण अरिष्टाची समस्या दिसून आली. नवउदारमतवादी अर्थशास्त्रज्ञ आणि राजकीय नेत्यांनी ही समस्या सोडविण्याकरिता खर्चामध्ये कपात करायला सांगितली होती. बाजार लोकशाही (market democracy) मध्ये खर्च कपात घडवून आणण्याचे समर्थन करण्यात आले. ज्यामुळे राजकीय आणि सांविधानिक जोखमी वाढल्या होत्या. कठोर मापके आणि कल्याणकारी योजनामध्ये कपात केल्यामुळे गरीब वर्ग प्रभावित झाला. OECD देशाच्या तुलनेत ब्रिटनमधील गरीब वर्ग अधिक प्रभावित झाला. ९ डिसेंबर २०१० च्या निर्णयामुळे उच्च शिक्षणावरील खर्चा (अर्थसहाय्य) मध्ये ८० प्रतिशतने कपात करण्यात आली. यामुळे ब्रिटनमधील विद्यार्थी वर्ग प्रभावित झाला. हे सर्व घडून येण्याचे कारण राजकीय वर्गाला अतिआत्मविश्वास होता की, आम्ही या सर्व समस्या सोडवू शकतो.

जर्मनी देखील कठोर (austerity) धोरणांच्या अनुकूल होता. मात्र या धोरणानी जर्मनीमध्ये आर्थिक वृद्धी घडवून आणली नाही. जर्मनीने खाजगीकरण घडवून आणले, वेतनदरामध्ये कपात केली. निवृत्तीवेतन, सार्वजनिक क्षेत्रातील श्रमिक आणि आरोग्य सुरक्षा क्षेत्रामध्ये आर्थिक सुधारणा घडवून आणण्यात आल्या म्हणजेच नवउदारीकरणाच्या काळात शासनाची भूमिका संकुचित झाली. अशाच प्रकारची मापके ब्रिटनने सामाजिक क्षेत्रावर लावली होती. याचाच अवलंब पुढे पोर्तुगालने देखील केला, अशा प्रकारची धोरणे राबविण्याचा दबाव युरोपियन समुदाय सर्वच देशावर निर्माण करीत होता. ऋण भांडवलाचा प्रवेश वाढावा याकरिता अंदाजपत्रकिय आणि राजकोषीय धोरणामध्ये बदल केला जात होता.

युरोपच्या राष्ट्रीय शासनाने सर्वसामान्य लोक आणि एकीकरणाची उद्दिष्टे चुकवली (missing) होती. कारण प्रत्येक देशावर कर्ज होते. युरोपियन समुदाय ऋण समस्येतून सुटका करण्यास मदत करेल असे जर्मनीला देखील वाटत होते. सर्व देश समान आहे असे मानल्यामुळे मोठ्या देशाच्या प्रभावाचे नुकसान झाले त्यामुळे आपसात सदस्य देशांचे तंटे सुरू झाले. अशी प्रकरणे सोडविल्यास जर्मनी आणि फ्रान्स कार्यक्षम असल्याने सांगितल्या जाऊ लागले.

लहान सदस्य राष्ट्राकरिता युरोपियन समुदायाच्या पातळीवर संरक्षण धोरणाबाबत सहमती घडवून आणण्यात आली. कारण लहान सदस्य राष्ट्राची शासनाची भूमिका संकुचित झालेली होती. याचाच अर्थ युरोपियन समुदयाचे प्रशासन शक्तीशाली

राष्ट्रांकडे होते. युरोपियन समुदायाचे व्यवस्थापक सामाजिक अधिकार आणि दिर्घकालीन आर्थिक सुधारणांमध्ये संतुलन राखू शकले नाही. याचा परिणाम लोकशाही राज्यामध्ये तफावत दिसून आली. ही तफावत सर्वसामान्य लोक आणि धोरणकर्त्याच्या दरम्यान होती. बाजार लोकशाही संकल्पना बेकायदेशीर कृत्य आहे हे युरोपियन समुदाय आणि आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीने समजवून घेतले पाहिजे. अंतिमत: युरोप खंडामध्ये अस्थिरता निर्माण झाली, आर्थिक सहकार्य आणि राजकीय एकिकरणातून संपन्नता निर्माण होईल असे आश्वासन दिले होते पण तसे घडून आले नाही. त्यामुळे असुरक्षितता वाढून ब्रेग्झिट घडले होते.

ब्रिटनला युद्धांची पार्श्वभूमी :

ब्रिटीश अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ म्हणजे शस्त्रात्र निर्माणी पेढ्या आणि शस्त्रात्राची विक्री आहे. ब्रिटन मधल्या वित्तीय युद्धामध्ये शस्त्रात्राचे दलाल गुंतलेले आहे. शीत युद्धाचा अंत झाला असला तरी अफगाणिस्तान, सोमालिया, सुदान, झाक, येमन, सिरिया आणि इतर ठिकाणच्या युद्धामध्ये ब्रिटन प्रमुख भूमिका पार पाडत आहे. जगातील प्रमुख युद्धांमध्ये ब्रिटन गुंतलेला आहे. अंदाजपत्रकीय तुटीमध्ये यावर दुर्मिळपणेच चर्चा घडून येत होती. युद्धावरील पैशाच्या स्वरूपात होणाऱ्या खर्चावर देखील चर्चा फारशी होत नव्हती. ब्रिटन नाटोचा (North Atlantic Treaty Organisation - NATO) सदस्य देश देखील आहे. एकूणच संपूर्ण जगामध्ये नाटो संघटना युद्ध आणि शस्त्रात्र कार्यक्रमाच्या बाबतीत निर्दयी म्हणून प्रसिद्ध आहे. युरोपियन समुदायाचे सामान्य विदेशी धोरण आहे. याला जोडून संरक्षण धोरणातंर्गत एकीकरणावर चर्चा घडून येत होती. या संरक्षण एकीकरणाच्या धोरणामध्ये ब्रिटन राहणार होता का? हा खरा वादप्रश्न होता.

यामधून हीच ब्रेग्झिटची मोहिम सुरू झाली. ब्रिटनच्या युरोपियन समुदायातील सदस्यताबाबत नाटो म्हणाले की, ''राहायाचे नाही आणि शिल्लक ठेवायचे नाही.'' बराक ओबामा ह्यांनी ब्रिटनला विनवणी केली की, संरक्षण सहकार्याकरिता ब्रिटनने युरोपच्या बाजूने असावे. युरोपियन समुदायाला मदत करावी. या सर्व मोहिमेला ब्लादीमिर पुतिन सहाय्य करीत होते. कारण या सर्वांचा खरा लाभधारक रशिया ठरणार होता. गेल्या काही वर्षामध्ये विरोधामुळे शासनाच्या भूमिकेत व्यापकता आली होती. या सर्व प्रक्रियेत रशिया असतांना वित्तीय मदत देखील करणार होता. त्याच्या या कारणाला करूणा असेल तर तो केवळ राजनयांचा भाग होता. अमेरिका युद्धपिपासू देश असून या सर्वामध्ये युरोप महत्त्वाचा घटक होता. अमेरिकेचा पूर्वेला विस्तार करण्याची महत्त्वाकांक्षा होती त्यामुळे पोलंड आणि युक्रेनचे लष्करीकरण करण्यात आले होते. तर रशियाला याबाबत पुर्नविचार करण्याची गरज होती. या सर्वांमुळे नाटो प्रभावित झाला होता.

जॉन कॅरीने सार्वमताचा निकाल जाहीर केला आणि युरोपियन समुदायातून बाहेर पडण्याचा मार्ग मोकळा झाला. याचवेळी अमेरिका स्वत:चे राष्ट्रीय हीत जपण्याचा प्रयत्न करीत होता. नाटो किंवा Transtanic Trade and investment partnership - TTIP अंतर्गत वाटाघाटी झाल्या होत्या. तरी देखील हे विसरल्या गेले होते की, युरोपियन समुदाय प्रकल्प हा अमेरिकेने पुरस्कृत केलेला होता. जागतिक महायुद्धानंतर केंद्रीय बौद्धिक अभिकरण (Centre Intelligent Agency) ने या प्रकल्पाला सहाय्य केले होते. हे सहाय्य हॅरी ट्रयूमन पासून रिचर्ड निक्सन अध्यक्ष असेपर्यंत करण्यात आले. संयुक्त युरोप हा सोव्हियत रशियाला प्रतिस्पर्धी

आणि कराराच्या आधारावर उभा करायचा होता. त्यावेळी अमेरिका नाटोच्या उपयोग रशियाला वेढा घालण्याकरिता करीत होता. तर पूर्वेकडे विस्तार घडून येण्यासाठी युक्रेनला चिथावण्यात आलेले आहे. यादरम्यान ब्रिटनने सार्वमत घेऊन युरोपियन समुदायातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या एकाच वेळी गती देणे अधिक कठीण झालेले आहे.

नाटोने पोलंड मधील वार्स्वा मध्ये ८ व ९ जुलै २०१६ रोजी ब्रेग्झिटच्या पार्श्वभूमीवर बैठक बोलवली होती. मात्र नाटोने सर्व भर रशियाविरूद्ध युद्धसामुग्रीच्या बांधणीवर दिला होता. या बैठकीमध्ये ओबामा म्हणाले की, ब्रेग्झिटचे संक्रमण होतांना कायदा आणि शांतता आवश्यक आहे. रशिया विरूद्ध जाणे म्हणजे युरोपला धोक्यात घालणे आहे. ओबामा म्हणाले की, युरोपच्या एकत्रिकरणामुळे जे संपादन केले आहे. त्याची आपण हानी करणार नाही. कॅमरून ह्यांनी युरोपियन समुदायातून बाहेर पडण्याच्या वेदना व्यक्त करीत असतांना नाटोसंबंधीच्या बांधिलकीमध्ये कोणत्याही प्रकारचा फरक पडणार नाही आणि रशियाच्या विरूद्ध आपली भूमिका बदलणार नाही याची हमी दिली. त्याचबरोबर सूचित करण्यात आले की युरोपियन समुदायाला गंभीर धोका रशियाकडून आहे. ब्रेग्झिट घडून आल्यामुळे ब्रिटनचे संबंध प्रभावित होतील. यादरम्यान ब्रिटनला आपल्या छावण्या पोलंड, इस्टोनिया आणि युक्रेन मध्ये विस्तृत तयारी आणि संघर्षासाठी रशिया विरूद्ध तयार ठेवाव्या लागतील. यामुळे देखील ब्रिटन युरोपियन समुदायाची बाहेर राहू इच्छित आहे. युरोपियन समुदायाची सर्वसामान्य संरक्षण धोरणे ब्रिटनकरिता अडथळा होईल यामुळे ब्रेग्झिट अंमलात आले.

समारोप :

ब्रेग्झिट घडून येण्यामध्ये ब्रिटनचे आर्थिक राजकीय, लष्करी हित दडलेले आहे. नवउदारीकरण धोरणांचा स्विकार केल्यामुळे ब्रिटनचा आर्थिक गोंधळ झालेला आहे. म्हणून ब्रिटनमध्ये ऋण अरिष्ट, उत्पन्न विषमता, वर्गीय युद्ध आणि मुलभूत सेवामध्ये कपात घडून आलेल्या आहे. याचाच अर्थ नवउदारीकरणाची धोरणे ब्रिटनमध्ये संपूर्णपणे अपयशी ठरलेली आहे. युरोपियन समुदायाचा सदस्य ब्रिटन असल्यामुळे आपला ठसा जगाच्या राजकारणामध्ये उमटविण्याकरिता स्वतंत्रपणे निर्णय होऊ शकत नाही, जगातील विविध युद्धाशी ब्रिटनचा संबंध आहे. ब्रिटनचे लष्करी हीत जपण्यामध्ये युरोपियन समुदाय आडकाठी ठरत आहे. परिणामत: ब्रिटनने युरोपियन समुदायातून बर्हिगमनाचा निर्णय घेतला आहे.

संदर्भ सूची :

1. साठे मधुसूदन (२००८) : युरोपची आर्थिक प्रगती, डायमंड पब्लिकेशन, पुणे.
2. Pinder John and Ushewood Simon (2013) : The European Union, Oxford Univ.,UK.
3. Persaud Avinash (2016) : Brexit and other Hirbingars of a return to dangerous of 1930's Vol. L1 No. 33, Aug. 13 EPW.
4. D'souza Radhu (2016) : Britain Global chicken coming Home to Roost Vol. L1, No. 33, Aug 13,EPW.
5. Sarkar Abhijit (2016) : Spoil of Brexit for India, Vol. L1 No. 33, Aug. 13, EPW.
6. Dey Shamabu (2016) : Fall of Market Democracy, Vol. L1, No. 33, Aug. 13, EPW.
7. Nikarge Sachin (2016) : The Big exit and It's Global Bricolage, Vol. L1, No. 33, Aug. 13, EPW.
8. Wariavwall Bharat (2016) : Europe after Britain's Departure : Community to Nation State, Vol. L1, No. 33, Aug. 13, EPW.
9. Oncli T. Sabari (2016) : Is Brexit Moment a Lehaman Moment ? Fear factor in Financial crisis, Vol. L1, 29, July 16, EPW.

◆◆◆

NI No. MAHMUL 03498

ISSN 2455-9504

RESEARCH AWAKENING

ational Multi-Disciplinary Peer Reviewed & Refereed Journal
(Bi-Annual Journal)

olume : 03

ISSUE : April 2017
to
Sept. 2017



-: Published by :-
Principal : Dr. Smita R. Deshmukh
Shri Shivaji Arts & Commerce College,
Morshi Road, Amravati. (M.S.) India

Dr. P. D. Harankar

RNI No. MAHMUL 03498 ISSN 2455-9504

RESEARCH AWAKENING

National Multi-Disciplinary Peer Reviewed & Refereed Journal
(Bi-Annual Journal)

Volume : 03

ISSUE : April 2017
to
Spet. 2017



-: Published by :-
Shri Shivaji Arts & Commerce College,
Morshi Road, Amravati. (M.S.) India

Contents

1) Physical Activeness Of Children, Effect On Their Health — 01
Dr. Rakesh A. Badgujar

2) Role of Training & Skill Development for Employees — 08
Dr. Prof. P.M. Taley

3) **आवड व कौशल्यातून उद्योग निमिर्ती – एक वाटचाल** — १५
प्रा. जयंत बनसोड

4) महाश्वेतादेवीच्या कथात्म साहित्यातील अभिप्रेरणा व मूल्ये — २३
संजय पंजाबराव गोहण

5) नव्वदोत्तरी कवींच्या कवितेतील स्वःकाव्यसंवेदना – एक शोध — ३४
प्रा. डॉ. शोभा रोकडे

6) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शेती विकासाचा दृष्टिकोन — ४३
डॉ. आनंद बनकर

7) चित्रलेखा उपन्यास में पाप–पुण्य संबंधी विचार — ५१
डॉ.अनिल अ.पाखरे

8) **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणासंबंधी विचार** — ६१
प्रा.डॉ. अनिलकुमार ब. दडमल

9) 21 वीं सदी : भूमंडलीकरण के दौर से गुजरता हुआ भारत — ७०
डॉ.प्रवीण दि.देशमुख

१०) **राजकारण क्षेत्रातील महिला सहभाग** — ८०
प्रा.साधना देशमुख

११) विचार ज्योती मुक्ता साळवेंचे क्रांतिकारी विचार. — ८५
प्रा. डॉ. प्रमोद भी. गारोड

१२) **विमौद्रिकीकरण : अनुकूल ते प्रतिकूल परिणामकारता** — ९०
डॉ. प्रशांत हरमकर

१३) **धूमिल के काव्य में राजनीतिक चित्रण** — १०१
प्रा. डॉ. वाय.सी. मेंढे

१४) धादांत खैरलांजी : एक आकलन — १०६
प्रा. डॉ. सुशील गंगाराम मेश्राम

ISSN 2455-9504

विमौद्रिकीकरण : अनुकूल ते प्रतिकूल परिणामकारता

डॉ. प्रशांत हरमकर
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
श्री शिवाजी कला व वाणिज्य
महाविद्यालय,

प्रस्तावना :-

आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये केंद्र सरकारने तिसऱ्यांदा विमौदिकीकरणाचा निर्णय घेतला होता. यापूर्वी १९४९ आणि १९७८ मध्ये विमौद्रिकीकरणाची अंमलबजावणी केली होती. त्यानंतर ८ नोव्हेंबर २०१६ रोजी प्रधानमंत्री ह्यांनी घोषणा केली की काळ्या पैशाविरूद्ध सर्जिकल स्ट्राईक करणार आहोत. विमौद्रिकीकरणाचा (demonitisation) निर्णय घेऊन चलनातून ५०० आणि १००० रू. च्या नोटा रद्द करण्यात आल्या. याकरिता वित्त मंत्रालयाने गॅझेट नोटिफिकेशन काढून विमौद्रिकीकरणाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली. प्रधानमंत्री ह्यांनी विमौद्रिकीकरण करताना ह्याची तीन उद्दिष्ट स्पष्ट केली. i) बनावटी नोटावर नियंत्रण आणणे ii) बँक खात्यामध्ये नसणारा अमापनीय आणि कर टाळून जमा केलेल्या काळ्या पैशाला आळा घालणे आणि iii) आतंकवादी ह्यांच्या वित्तीय व्यवहारासाठी उच्च मूल्य नोटाचा वापर करतात याला आळा बसावा. या तीन उद्दिष्टांना अनुसरून विमौद्रिकीकरणाची प्रक्रिया पार पाडण्यात आली.

काळी अर्थव्यवस्था आणि व्यवहार :-

सध्या घडवून आणलेले विमौद्रिकीकरणही काही कायदेशीर बाब अथवा तरतूद नाही. विमौद्रिकीकरणामुळे खातेधारकांनी बँक खात्यामध्ये चलनी नोटा जमा केल्या. त्यामुळे उत्पन्न कर विभागाला उत्पन्न कर टाळणाऱ्याचे अनेक स्त्रोत लक्षात आले. काळ्या पैशावर नियंत्रण

आणण्याकरिता शासनाला विर्मोद्रिकीरणाचा कठोर निर्णय घ्यावा लागला. नवीन सरकार हे ह्याच्या लोकप्रियतेमुळे सत्तेत आले. त्यांनी आपला अधिकार वापरून यापूर्वी सौम्य प्रमाणात भ्रष्टाचाराविरूद्ध पाऊले उचलली होती. सामान्यपणे भारतात असे दिसून येते की, काळा पैसा हा रोख पैशाच्या स्वरूपात भ्रष्टाचारी अधिकारी, राजकारणी वर्ग आणि व्यावसायिकांकडे आहे. ह्याचा उपयोग उपभोग्य, आरामदायक वस्तूची खरेदी आणि स्थावर मालमत्ता किंवा संपत्ती खरेदी करण्याकरिता केला जातो. या देशातील भ्रष्टाचार आणि काळ्या पैशाचे स्वरूप रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे माजी गव्हर्नर आय.जी. पटेल ह्यांनी १९७८ मध्ये स्पष्ट केले होते. ह्याच्यानुसार लक्षवेधी निर्णय हा क्वचितच घ्यावा लागतो कारण बेकायदेशीरपणे मिळविलेल्या काळ्या पैशाबाबत लोक संतुष्टता मानतात. असा दिर्घकाळापासून लबाडीने कमावलेला काळा पैसा स्थावर मालमत्तेच्या स्वरूपात असतो किंवा रोख स्वरूपात असतो. हा रोख स्वरूपातील पैसा सुटकेस किंवा घरातील उश्यामध्ये भरून ठेवलेला असतो. बेसावधपणे काळा पैसा गोळा केला जातो. अशा पैशाचे रूपांतरण स्थावर मालमत्तेमध्ये करण्याची संधी शोधल्या जात असते. अशाप्रकारची कृती देय अभिकर्त्याकडून (Paid Agent) केल्या जाते. जो की काळ्या पैशाचे रूपांतरण करून देतो. थोडा लाभ प्राप्त करण्यासाठी अर्थव्यवस्थेमध्ये काळ्या पैशाचे प्रमाण मोठे आहे.

अमापनीय आणि कर टाळून रोख स्वरूपात बाळगलेल्या काळ्या पैशाचे प्रमाण प्रचंड आहे. अशा स्वरूपातील रोख पैशाला सर्वात प्रथम नोकरशाह आणि राजकीय वर्ग जबाबदार आहे. ह्याचबरोबर खाजगी क्षेत्राचा देखील भ्रष्टाचारामध्ये समावेश आहे. विशेषत: यामध्ये मोठ्या खाजगी कंपन्याचा समावेश आहे. मात्र खाजगी क्षेत्र अशा प्रकाराना फारशी प्रसिद्धी देत नाही आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांवरचे खटले टाळतात.

आपण सर्वजण केवळ मागणी बाजूने घडून येणाऱ्या भ्रष्टाचाराचा विचार करतो. मात्र पुरवठा बाजूच्या भ्रष्टाचाराचा देखील विचार होण्याची आवश्यकता आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात व्यावसायिक आणि निगम क्षेत्र समाविष्ट आहे. विमौद्रिकीकरणाचा परिणाम हा केवळ मागणी बाजूला असणाऱ्या लोकांवर होतो. कारण ते पैसे घेणारे आहे. जो की ते उपभोग्य वस्तू, सोने, स्थावर मालमत्ता खरेदी करण्याकरिता रोख पैशाचा उपयोग करतात. मात्र व्यावसायिक कर

टाळून रोख रक्कम बाळगणाऱ्या उद्यमशील व व्यावसायीकाचे कार्य होणार आहे. जो की ह्यांनी दिर्घकाळापासून रोख पैसा गोळा केलेला आहे. जो लपवून ठेवलेला आहे. जीवीकेसाठी ठेवलेला आहे. व्यावसायिकाकडची रोख रक्कम चालू मागणी करीता असते. विशेषत: व्यापाऱ्याकडे असलेला रोख स्वरूपातील पैसा कार्यकारी भांडवल म्हणून दर्शविल्या जातो. कार्यकारी भांडवलाला साठा केलेले मूल्य म्हणता येणार नाही. विमौद्रिकीकरण साठा केलेल्या रोख पैशाला लक्ष करते म्हणून रोख पैशाचे व्यवहार करताना यामध्ये निवडकानाच प्रवेश मिळणार आहे.

भारतातील भ्रष्टाचाराच्या अध्ययनावरून असे दिसून येते की, लाच देणे, अंतर्गत (Under dealing) व्यवहार आणि शासंकपूर्ण व्यवहार होतात याला अमान्य करून चालत नाही. अशा व्यवहाराचे प्रमाण मोठे आहे. २००० रू. च्या नोटांचा पुरवठा बाजारात केल्यानंतर याचा परिणाम बँकामध्ये खाते नसणाऱ्या लोकांवर झाला. परत बेकायदेशीर व्यवहार घडून आले तर गरीब व्यवहारामधून बाहेर फेकल्या गेले.

बँकामध्ये खाते नसणाऱ्यांचा गोंधळ निर्माण झाला. याला अनुसरून त्यांनी इतर मार्गाचा अवलंब केला. तर उच्च मूल्याचे व्यवहार वित्तीय व्यवहारामध्ये समाविष्ट झाले नाही. मोठ्या प्रमाणात स्थावर मालमत्ता आणि ज्वेलरी खरेदीचे व्यवहार घडून आले. भारत हा बाजार अर्थव्यवसथा उद्योन्मुख होणारा देश आहे. अशा अर्थव्यवस्थेमध्ये वित्तीय अर्थव्यवस्थेमध्ये समाविष्ट न होणाऱ्या व्यवहाराचे प्रमाण २२.२ प्रतिशत, चीनमध्ये १२.७ प्रतिशत तर जपानमध्ये ११ प्रतिशत आहे. भारतामध्ये वित्तीय व्यवहारामध्ये समाविष्ट न होणारे व्यवहार म्हणजे विवाह समारंभ होय. यामध्ये अवास्तव खर्च केला जातो. कोणतेही शासन जेव्हा प्रभावीपणे हल्ला अमापनीय पैशाबाबत करतो तेव्हा यामध्ये राजकीय पक्षाला मिळणाऱ्या देणग्याचा समावेश करणे देखील योग्य ठरेल.

काळ्या पैशाचा संबंध हा प्रामुख्याने राजकीय लोकांशी संबंधित आहे. निवडणूकांच्या उद्देशाने जो निधी जमा केला जातो त्याचा विचार होण्याची आवश्यकता आहे. बेकायदेशीर निधीचा वापर राजकीय पक्ष करतात. अशा बेकायदेशीर निधीचा वापर सभासद निवडणूकांमध्ये उभे राहण्याकरिता केला जातो. असे व्यवहार अत्यंत गुप्त ठेवले जातात. जो की पुढे जाऊन त्याचा राजकीय व्यवसाय होतो. ह्याचा संबंध गुन्हेगारीशी देखील आहे. गुन्हेगारी आणि राजकारण

ह्याचा परस्पर संबंध आहे. काळ्या पैशाचा उपयोग करून राजकीय प्रतिनिधी निवडणूका लढतात. राजकारण हे भ्रष्टाचाराचे उगमस्थान आहे. अप्रामाणिक मार्गाने पैसे मिळवण्याची गंगोत्री आहे. ज्यामुळे कार्यकारी राजकीय अर्थव्यवस्था दूषित होते. विमौद्रिकीकरणामुळे देश भ्रष्टाचार मुक्त होईल का? राजकारणातील काळ्या पैशाला आळा बसेल का?

निवडणूक आयोगाचे प्रमुख नसीम झईदी यांनी केंद्र सरकारला स्पष्टपणे सांगितले की, निवडणूक सुधारणा करायच्या असेल तर निवडणूकामधील काळा पैसा कमी करावा लागणार आहे. निवडणूका दरम्यान लाच देणे आणि देय बातम्या (Paid News) ह्याला अपराध मानावे. निवडणूक आयोगाला अधिकार बहाल करावा की अशा प्रकारचा व्यवहार करणाऱ्या राजकीय पक्षाची नोंदणी रद्द केल्या जाईल. सध्या १९०० राजकीय पक्ष नोंदणीकृत आहे. केवळ ४०० उमेदवारांनी स्पर्धा करून निवडणूका गेल्या दशकामध्ये लढवल्या आहे. राजकीय पक्षाला ज्या देणग्या मिळतात ह्या उत्पन्न करातून वगळलेल्या आहे. अगणित प्रतिकृती पक्ष (dummy) आहे. ज्याचा वापर काळ्या पैशाचे रूपांतरण पांढऱ्या पैशामध्ये करून घेण्यासाठी केला जातो. झईदीनी विनंती केली आहे की, त्यांनी दिलेल्या शिफारशीचा विचार करावा. राजकीय पक्षानी आपली हिशोब तपासणी करून मान्य करून घ्यावी. देणगी स्विकारण्याबाबत नियंत्रणे असावी. मात्र निवडणूकाचा हेतू लक्षात घेता राजकीय पक्ष मर्यादांना लागू करीत नाही. झईदीनी सांगितलेल्या शिफारशी विधी आणि न्याय मंत्रालयाकडे परिक्षणाकरिता सध्या थंड बस्त्यामध्ये पडलेल्या आहे.

राजकीय पक्ष देणगी स्विकारताना कायद्याला अगदी कायदेशीरपणे झुकवतात. वित्तीय कायदा २०१६ नुसार वित्त मंत्री अरूण जेटली ह्यांनी सिंहावलोकन करून Section (२३) १ मध्ये सुधारणा केल्या. यानुसार विदेशामधून मिळालेल्या देणग्या आहे. ह्यांना Foreigen Contribution (Regulasim) Act लागू आहे. ह्यालाच FCRA म्हटल्या जाते. जो की भारतीय कंपनीची व्याख्या बदलवितो. यामध्ये निगम भांडवलाचा (Corporate equity) समावेश आहे. ज्यामध्ये विदेशी भागधारकांवर मर्यादा घातलेली आहे. विदेशी भागधारकांवर मर्यादा घालणे आवश्यक होते कारण २०१४ च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूका होण्यापूर्वी दिल्ली उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, बेकायदेशीर देणग्या बीजेपी आणि काँग्रेस पक्षाला

विदेशी स्त्रोतांच्या माध्यमातून मिळालेल्या आहे. विशेषत: या देणग्या वेदांत स्टर्लाईट, सिसा, गोवा माईनिंग आणि मेटल इत्यादी मार्फत अनिल अग्रवाल ह्यांच्याकडून प्राप्त झाल्या होत्या. FCRA मध्ये दुरूस्ती करण्यापूर्वी हे घडून आले होते. FCRA नुसार विदेशी स्त्रोताची व्याख्या नव्याने करताना म्हटले आहे की ज्यामध्ये विदेशी भागधारकांचे प्रमाण ५० प्रतिशतपेक्षा जास्त आहे. त्यांना विदेशी देणगी म्हटले आहे.

निवडणूकांमधील काळा पैशामध्ये कपात करा असा आदेश पहिल्यांदा दिला असा नाही. यापूर्वीही १९९८ मध्ये केंद्राचे गृहमंत्री इंद्रजीत गुप्ता ह्यांनी शिफारस केली होती. ह्याच प्रकारची शिफारस १९९९ आणि २००८ मध्ये भारत सरकारने राजकीय पक्षांना केलेली होती मात्र ह्याचा फारसा परिणाम निवडणूकांवर जाणवला नाही.

विमौद्रिकीकरणाची प्रक्रिया :-

उच्च मूल्य असणाऱ्या ५०० आणि १००० रू. नोटा चलनातून वगळण्यात आल्या. लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना संपुष्टात आणल्याचे म्हटल्या जात आहे. या निर्णयाचा खरा फटका काळ्या अर्थव्यवस्थेला बसावा हाच ह्या मागील प्रमुख उद्देश होता. अशा प्रकारचे विमौदिकीकरण यापूर्वी १६ जानेवारी १९७८ मध्ये करण्यात आले होते. ज्यामध्ये १०००, ५००० आणि १०००० रू. नोटा वगळण्यात आल्या होत्या. ज्याचा वापर बेकायदेशीर व्यवहाराकरिता केला जात होता. मात्र ह्यावेळी विमौदिकीकरणाचा परिणाम मर्यादित लोकांवर झाला. कारण ज्या नोटा चलनातून वगळल्या होत्या त्याचे व्यवहारातील प्रमाण ०.६ प्रतिशत होते. या उच्च मूल्य नोटाचा वापर सामान्य माणूस करीत नव्हता. मात्र सध्याची परिस्थिती वेगळी आहे. ज्या उच्च मूल्य नोटा एकूण चलनातून वगळल्या त्याचे व्यवहारातील प्रमाण ८५ प्रतिशत आहे. या नोटांचा वापर व्यवहारामध्ये सर्वच लोक करीत होते.

भारतीय रिझर्व्ह बँकेने आक्टोबर १९८७ मध्ये ५०० रू. ची नोट निर्गमित केली तर नोव्हेंबर २००० मध्ये १००० रू. ची नोट निर्गमित करण्यात आली. उच्च पातळीच्या मूल्याचे व्यवहार सुलभ व्हावे आणि स्फिती नियंत्रित करण्याकरिता हा निर्णय घेण्यात आला होता. सध्या

जे विमौद्रिकीकरण घडून आले ह्याचे प्रमुख उद्देश बनावटी नोटांना आळा, आतंकवादाच्या वित्तीय व्यवहाराला अडथळा आणि काळ्या पैशाला फटका बसावा हेच होते.

तज्ञाच्या मते, जुन्या नोटा व्यवहारातून रद्द करण्याची प्रक्रिया यापूर्वी २००५ आणि २०१३ मध्ये घडून आलेली आहे. मात्र विमौद्रिकीकरण घडवून आणताना टप्याटप्याने नोटांच्या मालिका (Serises) रद्द करण्यात आल्या. राज्याचे उद्दिष्ट साध्य करणे हा विमौद्रिकीकरणाचा हेतू होता. विमौद्रिकीकरण घडवून आणताना जुन्या नोटा बँकामध्ये जमा करणे हा महत्त्वाचा निर्देशांक होता.

विमौद्रिकीकरणाची प्रक्रिया घडून आल्यानंतर राखीव पैशाचा प्रवाह हा शुद्ध रोख अर्थव्यवस्थेतून औपचारिक बँर्कीग व्यवस्थेमध्ये आला. यामुळे मोठी उसळी बँर्कीग अर्थव्यवस्थेमध्ये तत्परतेने घेतलेली आहे. एकूणच आकड्यांना धक्का बसला. उच्च मूल्य नोटाची थकबाकी मार्च २०१६ पर्यंत १४१७९.४३ अब्ज होती. एकूण रोख रक्कम लोकांच्या हातात होती. अनुसूचित व्यापारी अधिकोष (Schedual Commercial Bank) ५७४.३८ अब्ज कोटी रू. होते. तर एकूण रोख पैसा अधिकोषण क्षेत्राकडे ६५३.३८ अब्ज होता. अनुसूचित व्यापारी अधिकोषाकडे भागभांडवल लागू केले तर अधिकोषांकडे मोठी थकबाकी होती. विमौद्रिकीकरणामुळे अधिकोषाकडची आवक वाहून १२४५९.४३ अब्ज झाली. प्रत्यक्षात काळ्या पैशाच्या स्वच्छतेमुळे ही रक्कम कमी झालेली होती. शिवाय याचा संबंध विनिमय, नवीन नोटा आणि ठेवीमध्ये नसलेल्या रोख पैशाशी होता. जर या आवक प्रवाहाला रोख पैशाचा प्रवाह जोडला तर अधिकोषाना ५० प्रतिशत पर्यंत थकबाकी प्राप्त होईल. ज्यामुळे अधिकोषाची तरलता १०.८ पट वाढेल. ही तरलता महत्त्वपूर्ण रोखे भाग बाजाराचा घटक राहील. परिणामतः रोख्यांच्या किंमती वाढतील. अधिकांष रोख्याच्या किंमती वाढल्यामुळे अधिकोषांना लाभ प्राप्त होतील. यामुळे अधिकोषाचे ताळेबंद पत्रक संतुलित होईल. अधिकोषानी जे कर्ज वाटप केलेले होते त्याच्या थकबाकीमुळे अधिकोषाची हानी झालेली होती. अधिकोषाकडे रोख रक्कमेचा प्रवाह वाढल्यामुळे अधिकोषाकडची तरलता वाढली ज्यामुळे कर्जाचे दर स्वस्त होऊन कर्जाची मागणी वाढेल.

अर्थव्यवस्थेवर घडून आलेले परिणाम :-

विमौदिकीकरणाची गांभीर्यता समजून घेणे आवश्यक आहे. विमौदिकीकरण घडून आल्यानंतर चलनाचे वितरण कशा पद्धतीने झाले. चलन हे लोकांच्या व्यवहाराकरिता असलेले विनिमयाचे माध्यम आहे. चलनातून लोकाचे व्यवहार घडून येत असतात. २०१५-१६ च्या चालू बाजार किंमतीला चलनाचा प्रवेश (Velocity) समग्र देशीय उत्पादाच्या (GDP) ५.२ प्रतिशत होता. मार्च २०१६ मध्ये उच्च मूल्य नोटा १४१७९.४३ अब्ज रू. होत्या. हे मूल्य शुद्ध रोख अर्थव्यवस्थेला सहाय्य करून लोकांचे व्यवहार घडवून आणतात. हे व्यवहार किती घडवून आणले यावरून प्रवेग प्राप्त होतो. जो की ह्याचे मूल्य ८८६२ अब्ज रू. होते. आतापर्यंत रोख व्यवहार ९० प्रतिशत पर्यंत केल्या जात होते. विमौदिकीकरणामुळे चलन प्रवेग घसरून जीडीपी च्या १ प्रतिशत पर्यंत आलेला आहे.

टिम्बर्ग आणि अय्यर यांच्या अध्ययनानुसार अनौपचारीक ऋण बाजाराचे प्रमाण (Informal Credit Market) २० प्रतिशत आहे. अशा बाजाराचा आधार रोख पैसाच आहे. जो की हा रोख पैशाचा प्रवाह ऋणको कडून निर्माण होतो. जो की पुढे धनकोच्या संपत्तीचा भाग होतो. विमौद्रिकीकरणामुळे रोख पैशाला आळा बसला. काळ्या पैशाची सफाई करण्यात आली. याचा परिणाम अनौपचारी बाजारातील ऋणको आणि धनकोच्या सखोल व विस्तारीत संबंधावर झ ाला. ह्याच्या व्यवहारामध्ये घसरण निर्माण झाली.

उच्च मूल्य नोटांची (५०० व १००० रू.) व्यवहारामधील संख्या २२ अब्ज होती. १००० रू. च्या नोटा रद्द होऊन २००० रू. च्या नोटा बाजारात आल्या. याची संख्या १८.८ अब्ज आहे. विर्मोद्रिकीरणानंतर ३० दिवसामध्ये प्रतिदिन ६२९ दशलक्ष नोटा जमा केल्या जात होत्या. विमौद्रिकीकरणाचा परिणाम अमापनीय आणि कर टाळून रोख स्वरूपात बाळगलेल्या पैशाच्या साठ्यावर झालेला आहे. मात्र अशाप्रकारचे विमौदिकीकरण स्फिती आणि वित्तीय अरिष्ट घडवून आणण्यास कारणीभूत ठरू शकते. विनिमय व्यवहार करताना पुरेशा नवीन नोटा उपलब्ध झाल्या नाही. यामुळे लोकांचा अपेक्षाभंग झाला. जिविका आणि उपभोगाचा संकोच झाला. कुटुंबाच्या उत्पन्नाचा संकोच झाला. बचती प्रभावित झाल्या. रोख रकमाचे रूपांतरण बँक ठेवीमध्ये झाले.

वाढलेल्या बँक ठेवी ह्या कोणत्याही प्रकारे व्याजदारावर अवलंबून नव्हत्या. विमौदिकीकरणाचा धक्का व्यापाराला बसून व्यापारामध्ये घसरण घडून आली.

विमौद्रिकीकरणाचा परिणाम हा बांधकाम क्षेत्रातील श्रमिकांवर पाहायला मिळाला. जे श्रमिक राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पामध्ये कार्यरत होते त्यांना रोजचे वेतन रोख पैशामध्ये मिळत होते. विमौद्रिकीकरणामुळे रोख पैशाचा स्त्रोत आटला. आवश्यकतेपेक्षा रोख वेतन कमी मिळू लागले. श्रमिकांच्या श्रमाचे नुकसान झाले. कॉन्ट्रक्टरचा नफा घटला आणि प्रकल्पाची कामे देखील थांबली होती.

लहान आणि मध्यम शहरे यामधील व्यापारी व दुकानदार हे केवळ रोख पैशामध्ये व्यवहार करतात, घाऊक व्यापारी किरकोळ व्यापारांना आणि किरकोळ व्यापारी विक्रेत्याशी व्यवहार रोख पैशामध्येच करतात. क्रेडिट कार्डद्वारे व्यवहार करण्याची संभाव्यताच कमी असते. त्यामुळे व्यवहारामध्ये घसरण घडून आलेली आहे.

भारत रोख चलनावर आधारित अर्थव्यवस्था आहे. त्यामुळे रोख पैशाचा तुटवडा घडून आला. यामुळे आर्थिक कृती आकुंचित पावली. अशाप्रकारची स्थिती टिकून राहीली तर तीव्रतेने समग्र देशीय उत्पाद (GDP) मध्ये कपात होईल. कृषी बाजारातील कृषी वस्तूच्या किंमती रोख पैशाच्या तुटवड्यामुळे घसरलेल्या आहे. कृषी वस्तूच्या किंमतीतील घसरण हंगामी नसून रोख पैशातील मागणी व पुरवठ्याचा परिणाम आहे. परिणामत: कृषी रोजगारावर देखील याचा प्रतिकूल परिणाम घडून येईल. अनेक स्थलांतरीतांवर खेड्याकडे परत जाण्याचा दबाव वाढलेला आहे. शासनाचे प्रवक्ते धैर्याने आपली बाजू मांडत असताना सांगत आहे की विमौद्रिकीकरणामुळे प्रतिकूल स्थिती घडून आलेली आहे. मात्र तशी वाईट स्थिती घडून आलेली नाही. विमौद्रिकीकरण लोकप्रिय झाले. ह्याला सहाय्य लोकांनी केले. असे असले तरी लोकांमध्ये अशांतता आहे.

विमौद्रिकीकरणामुळे अल्पकालीन प्रतिकूल परिणाम बाजारातील व्यवहार आणि उत्पादन पातळीवर होतो. अर्थव्यवस्थेच्या समग्र पातळीवर होतो. परिणामत: किंमत पातळी देखील घसरू शकते. जर समग्र मागणी घसरली आणि मुद्रा पुरवठ्यामध्ये घट केली तर किंमती घसरतात.

ह्याचा परिणाम उत्पादनावर होऊन रोजगार प्रभावित होतो. हे अल्पकालीन परिणाम दूरगामी घडून येतात. या सर्व कारकांचा अर्थ मान्य केला तर विमौद्रिकीकरण अरिष्ट घडवून अर्थव्यवस्थेला प्रभावित करेल व सार्वजनिक खर्चात वाढ घडवून आणेल.

आक्षेपार्हया बाबी :-

भारत रोखरहीत सामाजासाठी (Cashless Society) तयार होत असल्याचे म्हटल्या जात आहे. मात्र अजुनही बँका आणि ATM वर गर्दी पहायला मिळते. रोख चलन वापराची पद्धती एकाएकी बंद होणार नाही. ह्याला काही काळ निश्चितच जावा लागेल. ATM च्या रांगामध्ये लोक तासोनतास उभे राहीले, काही ATM च्या रांगामध्ये मृत्यु घडल्याच्या नोंदी देखील आहे. लोकांच्या पैशाचे नुकसान झाले. विमौदिकीकरणाची प्रक्रिया म्हणजे शिष्टाचाराविरूद्ध जाऊन घेतलेला अयोग्य विचार आहे. विना तयारी घेतलेला पुढाकार आहे.

विमौद्रिकीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवर अनुकूल आणि प्रतिकूल परिणाम घडून आले. हा बराच काळ चर्चेचा विषय राहणार आहे. मात्र विमौद्रिकीकरण शासनाने लागू केले. याविरूद्ध अनेक प्रकारच्या याचिका उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाकडे दाखल झालेल्या आहे. ह्यामुळे विर्मोद्रिकीरण आव्हानात्मक आहे.

विमौद्रिकीकरणाची अंमलबजावणी अधिसूचना (notification) काढून लागू करण्यात आले. अधिसूचना क्र. ३, ३४०७ (E) आणि ३४०८ (F) सहाय्यक विभाग २ विभाग (२६) अंतर्गत भारतीय रिझर्व्ह बँकेने विमौद्रिकीकरणाची प्रक्रिया अंमलात आणून ५०० रू. आणि १००० रू. च्या सर्व नोटाची मालिका (Series) रद्द करण्यात आली. याविरूद्ध याचिका उच्च न्यायालयामध्ये आहे. याबाबत आक्षेप घेताना असे म्हटले आहे की, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या विभाग २६ नुसार Any series चा अर्थ All Serise होऊ शकत नाही. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या कायद्यामध्ये विमौद्रिकीकरण करताना Any Series चा अर्थ All Series घ्यावा असा उल्लेख नाही. म्हणून हा निर्णय सांविधानिक नसल्याचा आक्षेप घेतला जात आहे. विमौद्रिकीकरणाची प्रक्रिया पार पाडताना लोकसभेची संमती घेण्याची आवश्यकता होती.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या कलम २६ (२) नुसार सरकारला सौम्यपणे विमौद्रिकीकरण घडवून आणण्याचा गौण अधिकार आहे. ही कृती घडवून आणत असताना संपूर्णपणे दक्षता आणि व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता होती. रोख पैसे काढण्याचा व परिवर्तीत करण्याच्या मर्यादाचा विस्तार करण्याची आवश्यकता होती.

रोख पैसे काढण्यावर आणि विनिमयावर मर्यादा घतल्या आहे. अशा कोणत्याही प्रकारची तरतूद भारतीय रिझर्व्ह बँकेच्या कायद्यामध्ये नाही. अधिसूचना ३४०७ संविधानाच्या कलम ७३ अंतर्गत केलेली अंमलबजावणी आहे. रोख पैसे काढणे आणि परिवर्तीत करताना मर्यादा असेल तर हा संपत्ती अधिकाराचा भंग आहे. अंमलबजावणीचे आदेश हा कायदा असू शकत नाही.

संपत्तीचा अधिकार हा संविधानाच्या कलम ३००-A नुसार मिळालेला आहे. संपत्तीचा अधिकार हा सामान्य अधिकार आहे. विमौदिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे संपत्ती अधिकाराचे स्वामित्वहरण झालेले आहे. संविधानाचे कलम २१ संपत्तीच्या वंचनाविरूद्धचा अधिकार बहाल करतो. तर अधिसूचना ३४०७ संपत्तीच्या अधिकारांना भंग करतो. जसे की बँक खात्यातून पैसे काढताना आणि नोटा परिवर्तीत करताना मर्यादा होत्या. ही बंधने निर्माण झाल्यामुळे संपत्तीच्या अधिकारापासून वंचित ठेवल्या गेले. जर लोकसभेमध्ये कायदा संमत होऊन अंमलबजावणी झाली असती तर विमौद्रिकीकरणाला सांविधानिक अडथळे निर्माण झाले नसते.

समारोप :-

विमौद्रिकीकरण नंतर मर्यादित रोख रक्कम बँकामधून काढता येते हे मुळीच योग्य नाही. जर खाजगी गुंतवणूकीला रेटा द्यायचा असेल तर खाजगी उद्योगाच्या अतिरिक्त कार्यक्षमतेपर्यंत उत्पादन करावे लागते. यासाठी रोख पैशावर मर्यादा फार काळपर्यंत ठेवणे योग्य राहणार नाही. रोजगाराकरिता देशीय मागणी आणि देशीय उत्पादनामध्ये वाढ घडून येणे आवश्यक आहे. आपणास जागतिक मागणीवर फार काळ अवलंबून चालणार नाही. कारण अजुनही जागतिक अर्थव्यवस्था अस्थिर आहे. सोबत डॉलरच्या तुलनेत रूपया घसरतो आहे. जो अर्थव्यवस्थेला धक्के देऊ शकतो. चलनाचे मूल्य घसरत असेल तर आंतरराष्ट्रीय बाजारात पत घसरते.

लोकांना मागणीनुसार अजुनही पुरेशी रोख रक्कम मिळत नाही. जो कि दुरदृष्टी आणि नियोजनाचा अभाव असलेली विमौदिकीकरणाची कृती आहे. ज्यामुळे देशाचा प्रत्येक भाग आणि अर्थव्यवस्थेचे प्रत्येक क्षेत्र प्रभावित झालेले आहे. आकस्मिकपणे विमौदिकीकरण घडवून आणताना सुसज्जता नव्हती. ज्यामुळे विमौदिकीकरण सहजपणे हाताळता आले नाही. अशा प्रकारची कृती नागरीकांचा चलनावरील विश्वास गमावू शकतो. कायद्याची अंमलबजावणी करताना सुसज्ज, नियोजनबद्ध आणि दुरदृष्टी वापरून करावी लागते. विमौदिकीकरण काळ्या पैशावर नियंत्रण ठेवण्याकरिता अल्पकाळाकरिता योग्य ठरू शकते. पण दिर्घकाळात काळ्या पैशावर नियंत्रण ठेवायचे असेल तर तात्पुरते उपाय पुरेसे नाही. कारण काळा पैसा दिर्घकालीन प्रक्रिया आहे. ह्याला उपाय देखील दिर्घकालीनच करावे लागणार आहे.

संदर्भ सूची :-

1) Demis Rajkumar J. and Shetty S.L. (2016) : Demonetisation 1978, the Present and Aftermath Nov. 26, Vol. LI, No. 48, EPW.

2) Nag Ashok (2016): Lost due to Demonetisation, Nov. 26, Vol. LI, No. 48, EPW.

3) Kumar Alok Prasana (2016) : Demonetisation and role of law, Des 10, Vol. LI, No. 50, EPW.

4) Ghandy Kobad (2016) : Demonetisation : One step forword, Two step back, Des. 10, Vol. LI, No. 50, EPW.

5) Editorial (2016) : Loss of Reputation, Des. 31, Vol. LI, No. 53, EPW.

6) Sheety S.L. (2016) : Apprehension about Macroeconomic Seenario, Des. 10, Vol. LI, No. 50, EPW.

7) Arun Kumar (2016) : Eastimation of the size of the Black economy in India 1996-2012, Nov. 26, Vol. LI, No. 48, EPW.

○○○

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

₹

ISSN 0973-8452

अर्थसंवाद

भारतीय सौर कार्तिक–पौष १९३९

ऑक्टोबर–डिसेंबर २०१७ / खंड ४१, अंक ३

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।
www.marthpari.org

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

अर्थसंवाद

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

ऑक्टो.-नोव्हेंबर-डिसेंबर २०१७ / खंड ४१ / अंक ३

अनुक्रमणिका

१. मंजूषा मुसमाडे : नोबेल-वर्तनवादी अर्थशास्त्राचे उपयोजन आणि मर्यादा १९१

२. शि. ना. माने : क-कर्जाचा, म-माफीचा, कच्च्या मडक्याच्या, कोरड्या मात्रेचा २०१

३. प्रशांत हरमरकर : संयुक्त वनव्यवस्थापन : आराखडा आणि अनुभवनिष्ठ विश्लेषण २०६

४. डॉ. अविनाश कुलकर्णी : मुंबई असो वा मोर्मुगोवा : कोळसा वाहतुकीची काजळी आणि काळजी २१८

५. आशिष सुधाकरराव निमकर : पश्चिम विदर्भाच्या दारिद्र्यव्यवस्थेचे चिकित्सक अध्ययन २२३

६. योगेश पायलीमोडे : भारतातील व्यावसायिक क्षेत्राची संरचना व उत्पन्नातील प्रमाण २३१

७. तेजस्विनी बाजीराव मुडेकर : चाणक्यकालीन करनिती ... २४०

८. सौ. माधुरी ओंकार वर्तले, डॉ. पी. एस. गायकवाड पुणे विभागातील बीज भांडवल योजेनमुळे महिला उद्योजकांचा विकास २४५

९. मंजूषा मुसमाडे : ग्रंथ परीक्षण २५४

१०. अर्थ शब्दांची वाट पाहे : शि.ना.माने - बॉयोबँक २५९

जे. एफ. पाटील : चलनीकरण, निश्चिलनीकरण, पुनश्चलनीकरण २६१

११. वृत्तसंकलन : मराठी अर्थशास्त्र परिषद ४१ वे अधिवेशन-सूत्रसंचालकांचा अहवाल २६२

१२. मराठी अर्थशास्त्र परिषद ४१ वे अधिवेशन-कार्यवाहांचा अहवाल २७३

प्रमुख संपादक
राहुल शं. म्होपरे
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

सहाय्यक संपादक
चंद्रकांत जाधव
(य.च.वारणा महाविद्यालय,वारणा नगर)

सल्लागार मंडळ
(२०१५-१८)
तेजस्विनी मुडेकर
अरुण पिसे
राजेंद्र गव्हाळे
विजय भोपाळे

संपादकीय पत्रव्यवहार
राहुल शं. म्होपरे
विद्यापीठ क्वार्टर नं. डी-३४,
सायबरसमोर,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
ता. करवीर, जि. कोल्हापूर
पिन : ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

लेखातील मते लेखकांचीच

संयुक्त वन व्यवस्थापन : आराखडा आणि अनुभवनिष्ठ विश्लेषण

प्रशांत हरमरकर†
सहाय्यक प्राध्यापक, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती.

प्रस्तावना

आर्थिक विकास आणि वनसंरक्षण यामधील द्वंद्व दिवसेंदिवस वाढणारे आहे. एकाच वेळी ही दोन्ही उद्दिष्टे साध्य करणे म्हणजे तारेवरची कसरत करणेच आहे. हे आव्हान तज्ज्ञ आणि धोरणकर्त्यांसमोर आहे. पर्यावरणाचे संतुलन ढासळू न देता, वनांचे संवर्धन व विकास साध्य करायचा आहे. वने ही महत्त्वाची नैसर्गिक संपदा आहे. यावर कागद, फर्निचर इ.सारखे महत्त्वाचे उद्योग अवलंबून आहेत. मात्र, वनसंसाधनांचा अनियोजितपणे वापर झाल्यामुळे जंगलांचा प्रचंड प्रमाणात ऱ्हास व शोषण झालेले आहे. वनांचे संवर्धन व विस्तार होण्याच्या दृष्टिकोनातून लोकसहभाग महत्त्वाचा मानण्यातूनच राष्ट्रीय वननीती १९८८ ची निर्मिती झाली. लोकांच्या सहभागातून वनक्षेत्राचा विकास आणि संरक्षण महत्त्वाचे मानले गेले.

पर्यावरण अर्थशास्त्र - मानवी वर्तणूक व आंतरकृती

संयुक्त वनव्यवस्थापनाचा विचार पर्यावरण अर्थशास्त्रांतर्गत (Environmental Economics) होतो. पर्यावरणाचे अर्थशास्त्र आर्थिक कृती आणि पर्यावरण यांमधील संबंध विशद करते. शिवाय, हवामानातील बदल, अणुऊर्जेचा पुनर्उपयोग (Recycle), वनसंवर्धन आणि वन्यजीव संरक्षणाचे विश्लेषण पर्यावरण अर्थशास्त्रांतर्गत केले जाते. अर्थशास्त्राची ही शाखा पर्यावरणीय समस्या सोडवणुकीच्या दृष्टिकोनातून विचार करते. पर्यावरणीय धोरणे आणि जीवनमानाचा दर्जा उंचावणे, पर्यावरण संवर्धन यांचा विचार बौद्धिक आणि व्यावहारिक पैलूंद्वारे केला जातो.

मानव पर्यावरणाचे शोषण करीत आहे. पर्यावरण त्याचे मोल आधिक्याने चुकवत आहे; म्हणून पर्यावरणीय ऱ्हासाबाबत तत्काळ जागरूक होण्याची आवश्यकता आहे. लोकांची जागरूकता आणि लोकसहभागामुळे बदल आणि सुधारणा घडून येऊ शकतात, ज्यामुळे पर्यावरणाची गुणवत्ता सुधारू शकते. पर्यावरणीय धोरणाचा संबंध मानवाच्या वर्तणुकीशी आणि आधिक्याने मानवाच्या आंतरकृतीशी आहे. सोबतच जैव भौतिक पर्यावरण आणि मानव यांमधील आंतरकृती समजावून घ्यावी लागेल. पर्यावरणीय धोरणाचा मुख्य उद्देशच तळापर्यंत धोरणे पोहोचवून सामान्य लोकांचा सहभाग वाढविणे हा आहे. असे झाले, तरच पर्यावरणीय धोरणांना यश प्राप्त होऊ शकते. यामुळे वैयक्तिक आणि सामूहिक पातळीवर

† आजीव सभासद क्रमांक : १३७९ भ्रमणध्वनी : ९४२०६३३१२८, ई-मेल : haramkarp@yahoo.com

पर्यावरणाची बांधणी योग्य प्रकारे केली जाऊ शकते. ज्ञान आणि कौशल्याद्वारे जबाबदार सहभाग आणि परिणाम घडवून येतो. यातून सामाजिक, आर्थिक समस्या सोडविल्या जातात. व्यवस्थापनामुळे पर्यावरणाची गुणवत्ता सुधारते.

गेल्या काही वर्षांमध्ये वन व्यवस्थापनामध्ये बदल घडून आलेले आहेत. हे परिवर्तन विकेंद्रीकरण आणि लोकाभिमुख वनीकरणामुळे घडून येत आहे. संयुक्त वन व्यवस्थापनामुळे संघटितपणे वनाचा ऱ्हास थांबविता येतो. वनाच्या उत्पादकतेचे पुनर्भरण करून उत्पादकता वाढविता येते. अशा परिस्थितीत वनांचा ऱ्हास थांबवून त्यांचे नविनीकरण घडवून आणण्याचा परिणाम संयुक्त वन व्यवस्थापनाद्वारे करता येतो. स्थानिक समूहाच्या सहभागामुळे वनसंसाधनांवर नियंत्रण आणि प्रवेशाबाबत पुढाकार घेता येतो. वनांचे व्यवस्थापन आणि संरक्षण घडून येते. वन संसाधनांवरचा दबाव कमी होतो. वनांचा ऱ्हास झालेल्या क्षेत्रामध्ये शाश्वत वन निर्मितीकरिता पुढाकार घेऊन, वने पूर्वस्थितीमध्ये आणता येतात. नवीन वनीकरण करता येते. अशा प्रकारच्या ऱ्हास झालेल्या वनांमध्ये वनराई निर्माण करण्याचे काम संयुक्त वनव्यवस्थापन करते. स्थानिक समूह वन संवर्धनाला साहाय्य करतात. संयुक्त वन व्यवस्थापनाद्वारे मोठ्या प्रमाणात वित्तीय परतावा आणि लाभ प्राप्त होतो.

वनधोरण १९८८ आणि २००६

भारतामध्ये सर्वांत प्रथम १९८८ च्या वनधोरणामध्ये स्पष्टपणे नमूद केले होते की, स्थानिक समूहाचा सहभाग वनव्यवस्थापनामध्ये असणे आवश्यक आहे. यामधून १९९० मध्ये संयुक्त वनव्यवस्थापनाला सुरुवात झाली. १९८८ ला वनाधिकार कायद्याला मंजुरी मिळाल्यामुळे स्थानिक समूहांच्या वनभूमीबाबत अधिकारांचा विस्तार झाला. या कायद्याद्वारे केंद्र सरकारने स्थानिक समूहांना अधिकार बहाल केले. विशेषत: १९८८ नंतर वनविभागामध्ये विकेंद्रीकरणाची प्रक्रिया वाढत गेली. जसे, भारतामधील पंचायत समितीचे अधिकार वाढत गेले. पंचायत समितीच्या अधिकारांमध्ये वाढ होण्याकरिता पंचायत विस्तार अनुसूचित कायदा (Panchayat Extension to Schedule Area Act - PESA) पेसा १९९६ मध्ये पारित करण्यात आला. या कायद्यामुळे ग्रामसभांना लघु वनोत्पादनाबाबत अधिकार प्राप्त झाला. यामुळे आदिवासी समूहांच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण झाले. मूळ समूहांना अधिकार प्राप्त झाले. कायद्यामुळे ग्रामसभेला कार्यक्षमता प्राप्त झाली. ज्यामुळे मूळ समूहांच्या चालीरीती व परंपरांचे संरक्षण आणि जोपासना करण्यात आली. समूहांना त्यांची सांस्कृतिक ओळख व समूहांची संसाधने यांना कायद्यामध्ये बसविण्यात आले. यातूनच पुढे जैवविविधता कायदा २००२ (Biodiversity) पारित करण्यात आला. याकरिता स्थानिक स्वराज्य संस्थांची म्हणजे ग्रामसभा व पंचायत समित्यांची मते घेण्यात आली. अशा प्रकारच्या कायद्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदाने देणे, इतरांना जैविक उत्पादनांच्या उपयोगाच्या परवानगीला नकार देणे आणि वनोत्पादनाकरिता शुल्क आकारण्याचा अधिकार बहाल करण्यात आला. पेसाची अंमल-बजावणी अगदी तळापासून करण्यात आली. सोबत जैवविविधता संरक्षण कायदा अमलात आणण्यात आला. पेसा कायदा आणि जैवविविधता संरक्षण कायदा म्हणजे शासनाची स्थानिक समूहाप्रति बांधिलकी आणि अधिकारांचे विकेंद्रीकरण दर्शवितात.

वनधोरण २००६ चे मुख्य ध्येय जळणासाठी लाकूड, चराई, लघु वनोत्पादने आणि ग्रामीण व आदिवासी समूहांसाठी लागणाऱ्या लाकडांची आवश्यकता पूर्ण करणे आहे. २००६ चे वनधोरण राज्यांनी राबवत असताना वनव्यवस्थापन हे प्राथमिक

कार्य आहे, याला व्यवस्थापनामधील सर्व अभिकर्ते जबाबदार आहेत. वनधोरण स्थानिक, आदिवासी समूहांना साहाय्य करणारे आहे. याचा संबंध वनसंरक्षण, वनांचे पुनर्निर्माण आणि वनांच्या विकासाशी आहे. आदिवासी आणि ग्रामीण समूहाचा पहिला अधिकार वनोत्पादनावर आहे म्हणून भारतामध्ये संयुक्त वनव्यवस्थापन फार लोकप्रिय झाले. २००६ च्या वन धोरणाने संयुक्त वनव्यवस्थापनाला पुढाकार देत असताना स्थानिक समूहांना वनव्यवस्थापनामध्ये वन विभागामार्फत प्रवेश मिळवून दिलेला आहे. स्थानिक समूहांच्या मदतीने ऱ्हास झालेल्या जंगलांचे पुनर्निर्माण व संरक्षण करायचे आहे.

वनधोरण १९८८ आणि २००६ यांनी विकेंद्रीकरणावर मुख्य भर दिलेला आहे. कारण, विकेंद्रीकरणाची प्रक्रिया स्थानिक समूहांना लाभ प्राप्त करून देणारी आहे. स्थानिक समूहांना अधिकार प्राप्त झाल्यामुळे बहुमोल संसाधनांचे व्यवस्थापन करण्याची क्षमता स्थानिक समूहांमध्ये निर्माण झालेली आहे. २००६ चे वनधोरण व वनाधिकार कायदा पर्यावरण, वन व वन्यजीव संरक्षण, जंगलाचे शोषण व ऱ्हास थांबविण्यासाठी प्रतिबंध घालतो. वनधोरणामुळे विकेंद्रीकरणाची प्रक्रिया घडून आल्यामुळे वनांमध्ये सुधारणा घडून येण्यास साहाय्य झाले. भारतीय वने आणि वन्यजीवांकरिता संयुक्त वनव्यवस्थापन म्हणजे आदर्श वस्तुपाठ आहे. संयुक्त वनव्यवस्थापनामुळे जंगलांमधील दुर्गम खेडी वननियोजनाशी जोडली गेल्यामुळे स्थानिकांना प्रवेश, सहभागादी अधिकार कायदेशीररीत्या प्राप्त झाले. शिवाय, बाजार प्रवेश व वनोत्पादनाचा शाश्वत व्यावसायिक उपयोग करून घेतला जाऊ लागला. जंगलांवरचे अतिक्रमण, भूमीचे शोषण आणि समूहांच्या अधिकारांना सुरक्षितता प्राप्त झाली. संयुक्त वनव्यवस्थापन ही सामान्य व्यूहनीती असून, समूहांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारी आहे.

संयुक्त वनव्यवस्थापनाचा कार्यक्रम

भारतामधील वनांचा सातत्याने घडून येणारा ऱ्हास थांबविणे, हे संयुक्त वनव्यवस्थापनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. संयुक्त वनव्यवस्थापनाचा कार्यक्रम हा समूहाच्या जंगलांमधील कार्याशी जुळलेला आहे. भारतामधील वनांचे मोठ्या प्रमाणात शोषण झालेले आहे. जर स्थानिक समूहांचा वाढता सहभाग संयुक्त वनव्यवस्थापनामध्ये राहिला, तर वनांचे शोषण आणि ऱ्हास थांबविता येतो. संयुक्त वनव्यवस्थापनाचा कार्यक्रम हा संयुक्त वनव्यवस्थापन समितीअंतर्गत कार्यरत असतो. भारतामधील सर्व भागांमध्ये या कार्यक्रमाचा विस्तार झालेला आहे. यामुळे वनांचे समावेशी विकेंद्रीकरण झालेले आहे. राज्याच्या मालकीच्या वनांमध्ये समूहांचा सहभाग वाढून, समूहांच्या साहाय्याने अनेक कार्ये पार पाडली जात आहेत. संयुक्त वनव्यवस्थापनांतर्गत वनोत्पादनाला बाजार प्राप्त करून देणे, वनांचा ऱ्हास थांबविणे, वनांचे पुनरुज्जीवन करणे, वनभूमीचे संरक्षण करणे, समितीच्या सभासदांना लाभ प्राप्त करून देणे आणि समूहांच्या दारिद्र्यामध्ये कपात घडवून आणणे, ही संयुक्त वनव्यवस्थापनाचे मुख्य कार्य आहे. देशातील विविध राज्यांमध्ये वनव्यवस्थापन घडून येत असताना काही कार्यात्मक भिन्नतादेखील आढळून येते.

गेल्या २० वर्षांपासून भारतामध्ये संयुक्त वनव्यवस्थापनाचा कार्यक्रम राबविला जाऊन यशस्वी झालेला आहे. भारतामध्ये संयुक्त वनव्यवस्थापनांतर्गत १,०६,४८२ खेडी यशस्वीरीत्या कार्य करीत आहेत. केंद्र सरकारचे उद्दिष्ट १,७०,००० खेड्यांपर्यंत संयुक्त वनव्यवस्थापनेचे कार्य पोहचविण्याचे आहे. महाराष्ट्राच्या संदर्भात विचार केला, तर ११,७८९ संयुक्त वनव्यवस्थापन समित्या खेड्यांमध्ये यशस्वीरीत्या कार्य

करताहेत. महाराष्ट्र शासनाचे उद्दिष्ट १५,००० खेड्यांपर्यंत हा कार्यक्रम पोहचविण्याचे आहे. वन विभाग आणि स्थानिक समूह संयुक्तपणे कार्य पार पाडतात. अशा परिस्थितीत संतुलनाचे पुनर्भरण आणि आवश्यकतेनुसार सहभाग म्हणजे संयुक्त वनव्यवस्थापन होय.

संयुक्त वनव्यवस्थापन समिती - संदर्भ महाराष्ट्राचा

राष्ट्रीय वननीती १९८८ व २००६ आणि महाराष्ट्र राज्याचे वनधोरण २००८ नुसार वनक्षेत्राचा विकास आणि संरक्षण लोकांच्या सक्रिय सहभागातून अपेक्षित आहे. केंद्र सरकारच्या पर्यावरण व वनमंत्रालयाने जून १९९० पासून ग्रामीण पातळीवर वनसंरक्षण समित्यांची बांधणी करायचा निर्णय घेतला. त्यानुसार ग्रामपातळीवर वनसंरक्षण समित्या बांधण्यात आल्या. महाराष्ट्र शासनाच्या १६ मार्च, १९९२ च्या निर्णयानुसार संयुक्त वनव्यवस्थापन समितीची निर्मिती करण्यात आली. त्यानुसार त्यांच्या कामकाजाची निश्चित प्रणाली तयार करण्यात आली. संयुक्त वनव्यवस्थापन समितीची कार्ये पुढील प्रमाणे आहेत.

१) समूहांच्या निर्वाह व कृतीमध्ये सुधारणा घडवून आणणे.

२) संयुक्त वनव्यवस्थापनातंर्गत वनाच्या संवर्धनाचे मापन करणे.

३) समूहाची जागरूकता वाढविताना सूक्ष्म नियोजन आणि वनसंरक्षणाकरिता नियोजन करणे.

संयुक्त वनव्यवस्थापन समिती स्थानिक समूहांमधून निर्माण झालेली आहे. या समितीची निवड खेड्यांमधील स्थानिक लोक करतात. मात्र वनाधिकारी या समितीचा सचिव असतो. संयुक्त वनव्यवस्थापन समिती वनसंरक्षणासाठी सूक्ष्म नियोजन आणि वनांचे व्यवस्थापन करते. वनविभाग सूक्ष्म कार्यक्रमाची अंमलबजावणी करतो. संयुक्त वनव्यवस्थापनाकडून त्याचे लाभ प्राप्त होतात. या लाभाची वाटणी वनविभाग आणि स्थानिक समूहांमध्ये होते. प्रामुख्याने सूक्ष्म नियोजनांतर्गत प्राप्त होणारे लाभ म्हणजे लाकूड, वनोत्पादने, रोपवनाची लागवड व वनांचे पुनर्निर्माण आणि समूहांच्या गरजा परिपूर्ण करून वनव्यवस्थापन केले जाते.

वनक्षेत्राच्या परिसरात राहणाऱ्या लोकांच्या विकासाकरिता समन्वित ग्राम वनीकरण समृद्धी योजना महाराष्ट्र राज्यामध्ये राबविण्यात आली. त्याला अनुसरून वनविकासाशी निगडित रोजगार निर्मितीवर भर देण्यात आला. हा उद्देश लक्षात घेऊन ग्रामीण विकास आणि वनसंवर्धनाची सांगड घालून, एकात्मिक वनविकास योजना म्हणून समन्वित ग्राम वनीकरण योजना राबविण्यात आली. या वनविकास प्रणालीच्या माध्यमातून आणि संयुक्त वनव्यवस्थापनाद्वारे राष्ट्रीय वनीकरणाचा कार्यक्रम राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये राबविला जातो. २०१० मध्ये ४७ वनविकास यंत्रणा कार्यरत होत्या. यांच्याद्वारे राज्यातील ३३ जिल्ह्यामध्ये २४०७ गावांत राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रम राबविण्यात आला.

राष्ट्रीय कार्यक्रम राबविताना अंमलबजावणीतील त्रुटी लक्षात घेता, केंद्र शासनाने राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी २००९ मध्ये सुधारित मार्गदर्शक तत्त्वे अंमलबजावणीसाठी नमूद करण्यात आली. याचा मुख्य उद्देश वनव्यवस्थापनाचे विकेंद्रीकरण हाच होता. या सुधारित मार्गदर्शक तत्त्वानुसार संयुक्त वनव्यवस्थापन समितीमार्फत कालापव्यय न होता, योग्य वेळात निधीचे हस्तांतरण करणे, संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांच्या क्षमतांची बांधणी करणे, वनोत्पादनाच्या मूल्यवृद्धीमध्ये सुधारणा करणे, वनोत्पादनाला बाजारपेठ मिळवून देणे, ग्रामस्थांचे जीवनमान उंचावणे ही उद्दिष्टे नव्याने समाविष्ट करण्याचे

संयुक्त वन व्यवस्थापन समितीने ठरविले. राज्य वन विकास यंत्रणा कार्यरत असून सर्व वनविकास यंत्रणा या यंत्रणेच्या सदस्य आहेत.

महाराष्ट्रामध्ये वनालगत असलेल्या गावांची संख्या २०१० नुसार १२,६०० आहे. या सर्व गावांमध्ये संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांची बांधणी केलेली आहे. प्रत्येक तालुका पातळीवरील वनपरिक्षेत्रात सरासरी ३५ ते ४० संयुक्त वनव्यवस्थापन समित्या कार्यरत आहेत. विशेषत: महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेचा निधी वापरून वनीकरण आणि वनसंवर्धनाच्या कामांना गावपातळीवर चालना देण्यात आलेली आहे. संयुक्त वनव्यवस्थापन समितीवर वन विभागाचे नियंत्रण आहे. ही समन्वय समिती असून, विविध विकास योजना राबविण्यासाठी ती मदत करते.

तक्ता क्र. १ : महाराष्ट्रामध्ये संयुक्त वनव्यवस्थापन समितीअंतर्गत सूक्ष्म नियोजन (वर्ष २०१३)

अ. क्र.	वन परिक्षेत्र	संयुक्त वन व्यवस्थापन समिती	मंजूर सूक्ष्म नियोजन	सूक्ष्म नियोजनहिर्गत वनक्षेत्र (हेक्टर)
१.	औरंगाबाद	१,१९२	५२८	२,४५,२०६.५९
२.	ठाणे	१,८५४	१८५४	३,६५,६६३.७८
३.	नागपूर	१,८५२	४२२	४,१६,८१४.०१
४.	पुणे	१,१७४	४१६	१,६४,१७०.५६
५.	चंद्रपूर	५३१	२६४	९२,०६७.९७
६.	गडचिरोली	८५८	२७९	२,४७,५५५.२०
७.	यवतमाळ	९९१	२८७	१,८७,७०७.००
८.	धुळे	९९०	४५९	३,२६,२८८.२४
९.	कोल्हापूर	१,७८८	२५३	३,४२,०८७.३०
१०.	नाशिक	१,२७७	५५१	३,८२,९३८.७५
११.	अमरावती	६१०	२३१	९२,७३१.४६
	एकूण	**१३,११७**	**५,५४४**	**२८,६३,२३०.८७**

स्रोत : वनविभाग,महाराष्ट्र राज्य २०१३-१४, www.mahaforest.gov.in./internal php

वरील तक्ता क्र. १ मध्ये महाराष्ट्र राज्यातील संयुक्त वन व्यवस्थापन समिती अंतर्गत सूक्ष्म नियोजन कशा प्रकारे करण्यात आले, ते स्पष्ट होते. महाराष्ट्राच्या पातळीवर प्रमुख ११ वनपरिक्षेत्रे आहेत. औरंगाबाद, ठाणे, नागपूर, पुणे, चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ, धुळे, कोल्हापूर, नाशिक आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्राचे वनपरिक्षेत्र विभागले आहे. सर्वांत जास्त नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ आणि अमरावती वनपरिक्षेत्रामध्ये जंगलांचे प्रमाण जास्त आहे. महाराष्ट्रामध्ये २०१३ नुसार १३,११७ संयुक्त वनव्यवस्थापन समित्या असून, ५,५४४ सूक्ष्म नियोजन आराखडे कार्यरत आहेत. या सूक्ष्म नियोजनांतर्गत २८,६३,२३०.८७ हेक्टर क्षेत्र व्यापलेले आहे. वन व्यवस्थापन समितीच्या तुलनेत सूक्ष्म नियोजन आराखडे

कमी असल्याचे दिसून येते. एका संयुक्त व्यवस्थापन समितीबरोबर एक सूक्ष्म आराखडा, असे प्रमाण घेतले, तरी १३,११७ सूक्ष्म नियोजन आराखडे होतात. सूक्ष्म नियोजन आराखड्याचे प्रमाण निम्म्यापेक्षा कमी असल्याचे आढळून येते. याचा अर्थ सर्वच संयुक्त वन व्यवस्थापन समित्या सूक्ष्म नियोजन आराखडे राबविण्यात कार्यक्षम ठरू शकलेल्या नाहीत. यामुळे लोकसहभाग वाढण्याच्या दृष्टिकोनातून आधिक्याने प्रयत्न होण्याची आवश्यकता आढळून येते.

लोकसहभागाची व लाभाची परिणामकारकता

स्थानिक समूहाचा सहभाग वाढविणे, ही संयुक्त वनव्यवस्थापनाची मुख्य संकल्पना आहे. यातून राष्ट्रीय पातळीवर १ लक्ष संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांनी २२.९ दशलक्ष हेक्टर वनाचे संरक्षण केलेले आहे. वनांच्या पुनर्निर्माणावर भर देऊन, भूमीवरचे वनांचे आच्छादन वाढविण्याचा प्रयत्न केलेला आहे. संयुक्त वनव्यवस्थापन हा कायदा (Law) नसून, आदेश (Order) आहे. ज्यामुळे वनांपासून खूप सारा निधी गोळा होणार नाही; मात्र लोकांमधून वनसंरक्षणाला उत्तेजन प्राप्त होणार आहे. या कार्यक्रमाद्वारे वनांच्या नियोजनामध्ये लोकांना जोडले व समूहांच्या गरजा भागविण्याचा प्रयत्न केला, तर २००६ च्या वनकायद्यांमुळे वनांवरील हक्क समूहांना प्राप्त झाले. संयुक्त वनव्यवस्थापनाचा खेड्यांच्या पातळीवर कोणता परिणाम घडून आला, हे पुढील तक्त्यावरून स्पष्ट होते. वनविभागाने २०१३-१४ पर्यंतची अद्ययावत आकडेवारी उपलब्ध करून दिली असल्यामुळे त्या अनुषंगाने विवेचन केलेले आहे.

तक्ता क्र. २ : महाराष्ट्रातील संयुक्त वन व्यवस्थापनांतर्गत खेड्यांना प्राप्त होणारे लाभ (वर्ष २०१३)

अ. क्र.	परिक्षेत्र	विभाग	जिल्हा	तालुका	गाव	उत्पन्न
१.	औरंगाबाद	औरंगाबाद	औरंगाबाद	औरंगाबाद	म्हैसमाळ	१,३४,९१७
२.	औरंगाबाद	औरंगाबाद	औरंगाबाद	औरंगाबाद	ऋलोरा	५६,८६०
३.	औरंगाबाद	औरंगाबाद	औरंगाबाद	सोयगाव	विठ्ठलवाडी	३८.०००
४.	औरंगाबाद	बीड	बीड	पारळी	कलावंती तोंडा	३७,०००
५.	ठाणे	अलिबाग	रायगड	पनवेल	पांडवकडा	४,३३,०००
६.	ठाणे	अलिबाग	ठाणे	कर्जत	असाणे	३,२३.००
७.	ठाणे	शहापूर	ठाणे	शहापूर	बागवल	२,५०,०००
८.	ठाणे	ठाणे	ठाणे	वसई	अरनाळा	१,७३,३१३
९.	नागपूर	भंडारा	भंडारा	पवनी	देवरीगोंदी	१,२०,०००
१०.	नागपूर	भंडारा	भंडारा	भंडारा	दवडीपार	६०.०००
११.	नागपूर	भंडारा	भंडारा	लाखणी	बराडखिन्ही	५०,०००
१२.	नागपूर	गोंहिया	गोंदिया	सडक-अर्जुनी	खुर्शीपार	३८,५४८
१३.	पुणे	पुणे	पुणे	हक्ती	मोरदरी	४०,३७,२००
१४.	पुणे	पुणे	पुणे	मुळशी	आतकरवाडी	४०,३८,२००

१५.	पुणे	पुणे	पुणे	पुणे	ढोणाजे	४०,३८,२००
१६.	पुणे	पुणे	पुणे	मावळ	आठवण	१०,००,०००
१७.	चंद्रपूर	चंद्रपूर	चंद्रपूर	बल्लारपूर	गिलबोली	३५,४५,११२
१८.	चंद्रपूर	चंद्रपूर	चंद्रपूर	मूल	अगाडी	६,९६,६३०
१९.	चंद्रपूर	चंद्रपूर	चंद्रपूर	मूल	जनाला	१३,३९,६०३
२०.	चंद्रपूर	चंद्रपूर	चंद्रपूर	मूल	सातारा-तुकम	६,८४,५८४
२१.	गडचिरोली	वाडसा	गडचिरोली	देसाईगंज	पिंपळगाव	६,९२,६१४
२२.	गडचिरोली	वाडसा	गडचिरोली	देसाईगंज	शंकरपूर	४,२३,९९७
२३.	गडचिरोली	वाडसा	गडचिरोली	देसाईगंज	डोंगरगाव	१८,२८२
२४.	गडचिराली	वाडसा	गडचिरोली	खुरखेडा	रानवाही	२,२८५
२५.	यवतमाळ	अकोला	वाशिम	कारंजा	मासोलाखुर्द	३१,४५०
२६.	यवतमाळ	पुसद	यवतमाळ	दिग्रस	कोलुरा	२५,०००
२७.	यवतमाळ	अकोला	अकोला	अकोला	मालराजुरा	४४,६७९
२८.	यवतमाळ	अकोला	वाशिम	कारंजा	खुराड खुर्द	२६,३००
२९.	धुळे	धुळे	धुळे	धुळे	लालिंग	२,१८,८००
३०.	धुळे	नंदुरबार	नंदुरबार	आकारणी	तोरणमाळ	६,९३,३८९
३१.	धुळे	नंदुरबार	नंदुरबार	आकारणी	कलापाणी	१,३३,९४८
३२.	धुळे	यावल	जळगाव	यावल	आडगाव	३,४५,६५५
३३.	कोल्हापूर	सातारा	सातारा	जावळी	कास	१८,५३,०१०
३४.	कोल्हापूर	सातारा	सातारा	सातारा	ढोसेघर	१३,७२,६६०
३५.	कोल्हापूर	सातारा	सातारा	महाबळेश्वर	अवकाळी	१३,२७,८९०
३६.	कोल्हापूर	सातारा	सातारा	महाबळेश्वर	अवकाळी	१३,२७,८९०

स्रोत : वनविभाग,महाराष्ट्र राज्य, www.mahaforest.gov.in./fckimagefile/Benefit sharing 2013-14)

तक्ता क्र. २ हा २०१३-१४ मध्ये महाराष्ट्रातील वनपरिक्षेत्रानुसार खेड्यांमधील संयुक्त वन-व्यवस्थापनांतर्गत कार्यरत समित्या असून, वन उपज व सूक्ष्म आराखड्यांतर्गत उत्पन्न प्राप्ती करतात. महाराष्ट्रामध्ये १३,११७ संयुक्त वन व्यवस्थापन समित्या कार्यरत असल्या, तरी प्रामुख्याने ज्यांचे उत्पन्न त्या परिक्षेत्रामध्ये जास्त आहे, अशा चार गावांची निवड करून वरील तक्त्यामध्ये सरल यादृच्छिक नमुना (Simple random sampling) पद्धतीने गावे दर्शविलेली आहेत. पुणे आणि कोल्हापूर वन परिक्षेत्रातील संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांनी वार्षिक १०लाख ते ४० लाखांपर्यंत उत्पन्न प्राप्त केलेले आहे.

विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ आणि अमरावती या परिक्षेत्रांमध्ये समृद्ध वनसंपदा आहे. या परिक्षेत्रांमध्ये ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, पेंच व्याघ्र प्रकल्प, बोर वन्यजीव

अभयारण्य, नवेगाव राष्ट्रीय अभयारण्य आणि नागझिरा वन्यजीव अभयारण्य आहे. यामध्ये दुर्गम भागांमध्ये खेडी आदिवासी समूहांसह वसलेली आहेत. चंद्रपूर परिसरातील गिलबीली, अगाडी, जनाला आणि सातारातुकम या खेड्यांचे ६ लक्ष ते ३५ लक्ष रु. वार्षिक उत्पन्न आहे. गडचिरोली परिक्षेत्रातील पिंपळगाव आणि शंकरपूर या खेड्यांमधील उत्पन्न ४ ते ७ लक्ष रु.च्या दरम्यान आहे, तर डोंगरगाव आणि रानवाडीचे उत्पन्न कमी आहे. अमरावती परिक्षेत्रातील अंबाडा, खेतकडी, गोंडवाघोली आणि वडगाव फत्तेपूर या सर्वांचे संयुक्त वन व्यवस्थापनांतर्गत वार्षिक उत्पन्न १ लक्ष रुपयांच्या वर आहे. ठाणे वन परिक्षेत्रातील पांडवकडा, असाणे, बागवल आणि अरनाळा या चारही खेड्यांमधील वार्षिक उत्पन्न संयुक्त वनव्यवस्थापनांतर्गत १ ते ४ लक्ष रुपयांच्या दरम्यान आहे. सोबतच धुळे वन परिक्षेत्रातील लालिंग, तोरणमाळ, आडगाव व कलापाणी या खेड्यांचे उत्पन्न १ ते ४ लक्ष रुपयांच्या दरम्यान असल्याचे स्पष्ट होते. नागपूर वन परिक्षेत्रातील देवरीगांदी, नाशिक परिक्षेत्रातील केळी रूहमानवाडी आणि औरंगाबाद वन परिक्षेत्रातील म्हैसमाळ याच खेड्याचे वार्षिक उत्पन्न १ लक्ष रुपयांच्या वर आहे. नागपूर, यवतमाळ, नाशिक व औरंगाबाद या वनपरिक्षेत्रातील संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांचे उत्पन्न १ लक्ष रुपयांपेक्षा कमी आहे. पण, असे असले तरी याचा अर्थ संयुक्त वन व्यवस्थापन समित्या अकार्यक्षम व कुचकामी आहेत, असा होत नाही. वनधोरण १९८८ व २००६; तसेच संयुक्त वन व्यवस्थापन कायद्याचा उद्देश मोठ्या प्रमाणात उत्पन्न प्राप्त करणे नसून, वनांचे संरक्षण करणे, नियोजनामध्ये लोकांचा सहभाग वाढविणे व स्थानिक समूहांच्या गरजा भागविणे असल्यामुळे वनसंवर्धन आणि पुनर्निर्माणामध्ये संयुक्त वन व्यवस्थापनाचा महत्त्वाचा सहभाग असल्याचे स्पष्ट होते.

अनुभवनिष्ठ विश्लेषण

संयुक्त वन व्यवस्थापन समितीने कशा प्रकारचा बदल घडवून आणला, याचे विश्लेषण महाराष्ट्र शासनाच्या वन विभागामार्फत प्रसिद्ध केलेल्या संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या विविध अहवालांवरून स्पष्ट होते.

अ) अनुभव सातारातुकमचा

चंद्रपूर वनपरिक्षेत्रामध्ये बल्लारपूर तालुक्यात सातारातुकम हे छोटेसे आदिवासी खेडे आहे. हे खेडे चंद्रपूरहून २५ कि.मी. दूर आहे. सातारातुकम मूळ वनविभागामध्ये येत असून, हा भाग राखीव वनक्षेत्राचा आहे. सातारातुकममध्ये संयुक्त वन व्यवस्थापन समितीचा कार्यक्रम नोव्हेंबर १९९७ पासून चालू आहे. गेल्या काही दशकांपासून चराई मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे वनाचा ऱ्हास घडून आला. संयुक्त वन व्यवस्थापनामुळे वनांची पुनर्निर्मिती घडून आल्यामुळे सातारातुकम भागामध्ये वनांची पूर्वस्थिती निर्माण झाली. येथील जंगलांचा विस्तार होऊन, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प अस्तित्वात आला. सातारातुकममधील संयुक्त वनव्यवस्थापनाचे कार्य लक्षात घेऊन, जागतिक बँकेने अर्थसाहाय्य केले असल्यामुळे २८५ हेक्टर वनक्षेत्र समितीच्या अंमलाखाली आणण्यात आले. ९६ लोकांची समिती बनविण्यात आली. याच्या साहाय्याने सूक्ष्म नियोजन आराखड्यांतर्गत कृषी, वन संरक्षण आणि व्यवस्थापन करण्यात आले. जंगलांमधील शिकारीला आळा घालण्यात आला. नव्याने वनीकरण झालेल्या जंगलांचे संरक्षण करण्याकरिता रखवालदारांची नेमणूक करण्यात आली. वनकटाई आणि लाकूड कटाईला प्रतिबंध घालण्यात आला.

मातीची धूप होऊ नये, याकरिता नाल्यावर चेकडॅम बसविण्यात आले. ऱ्हास झालेल्या ६० हेक्टर वनक्षेत्रामध्ये बांबू, शिसम, खैर आणि साग वृक्षांची

लागवड करण्यात आली. लघुउद्योग व दुग्धोत्पादनाला चालना देण्यात आली. औषधी वनस्पतींचा विकास व त्यांच्या वनीकरणाला चालना देण्यात आली आहे. याकरिता संयुक्त वनव्यवस्थापन समितीकडून प्रशिक्षण दिले जाते. वनस्पतींचे अध्ययन केले जाते. महिला बचत गटांची निर्मिती करून अन्नधान्य खरेदीकरीता महिला बचत गटांकडून अर्थसाहाय्य केले जाते. फिश टँकची (Fish tank) निर्मिती करून, मासेमारीचा व्यवसाय व विक्रीतून स्थानिकांकरिता रोजगारनिर्मितीचे कार्य करण्यात आले आहे. संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या कार्यातून जे उत्पन्न प्राप्त होते, त्या उत्पन्नामधून शेतीकरिता कर्ज दिले जाते. याकरिता दर शेकडा २% व्याजदर आकारला जातो. जर संबंधित व्यक्तींनी कर्जे परत केली नाहीत, तर त्यांची संपत्ती अधिगृहीत (mortagaged) केली जाते. वनीकरणाच्या योजनेमुळे बांबूच्या रोपांचे वनीकरण करण्यात आल्यामुळे स्थानिकांना अल्प रोजगार प्राप्त झाला. तसेच, चंद्रपूरमध्ये कागद उद्योग असल्यामुळे बांबूला चांगली मागणी आहे.

संयुक्त वनव्यवस्थापनामुळे जंगलांचे पुनर्निर्माण झाल्यामुळे जंगलांची पूर्वस्थिती निर्माण होऊन वाघ आणि बिबट्या इ. प्राणी जंगलांमध्ये परतलेले आहेत. शिवाय, शिकारीला प्रतिबंध घातला गेला आहे. स्थानिक लोक वनांमध्ये फारच अल्प प्रमाणात शिकार करतात. परिणामतः साताऱातुकमच्या वनपरिक्षेत्रात वन्यप्राण्यांची संख्या वाढत आहे. या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात गवत आणि चारा निर्माण होतो, तो नागपूरमधील गोरक्षणामध्ये पाठविला जातो व यातून उत्पन्न प्राप्त होते. जंगलांमध्ये वणवा लागला, तर आग विझविण्यासाठी संयुक्त वनव्यवस्थापन समितीने निधी उभारलेला आहे. त्यामुळे वणव्यापासून जंगलांची सुरक्षा होण्याची तरतूद केलेली आहे.

ब) यश निमजीचे

निमजी गाव वनालगत असल्यामुळे संयुक्त वन व्यवस्थापनाचा कार्यक्रम राबविण्यात आला. नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर परिसरामध्ये निमजी गाव आहे. फेब्रुवारी २००७ पासून संयुक्त वनव्यवस्थापनाचा कार्यक्रम राबविला जात आहे. या परिसरामध्ये अतिचराईमुळे मोठ्या प्रमाणात जमिनीची धूप झाली असल्यामुळे जमिनी नापीक झाल्या आहेत. संयुक्त वनव्यवस्थापनाला चांगला प्रतिसाद मिळाल्यामुळे २०१२ व २०१३ या वर्षांमध्ये संत तुकाराम वनग्राम योजनेंतर्गत निमजी गावाला जिल्हास्तरावर उत्कृष्ट कार्याबद्दल प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. महिला बचत गटाद्वारे १९,००० बांबूची रोपे तयार करून देण्यात आली. याकरिता वनविभागाने २०१३ मध्ये २५,००० रुपयांचे अनुदान दिले, तर महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत १,२५,००० रोपे तयार करून देण्यात आली. शिवाय, संयुक्त वनव्यवस्थापनाचे जलसंधारण घडून येण्याकरिता वनराई, बंधारे, दगडी बांध, नालाबांध आणि सिमेंट बंधारे बांधण्यात आले. संपूर्णपणे चराईबंदी व कुऱ्हाडबंदी करण्यात आली. या परिसरामधून मोठ्या प्रमाणात अवैधरीत्या रेती काढून नेली जात असल्यामुळे पाण्याची पातळी घटली होती; म्हणून अवैधरीत्या रेती काढून नेण्यावर प्रतिबंध घालण्यात आला. वणवा लागू नये म्हणून प्रतिबंधक उपाय योजण्यात आले. वनांमधील अतिक्रमणावर प्रतिबंध घातले गेले. वन्य प्राण्यांकरिता पाणवठे बांधण्यात आल्यामुळे उन्हाळाभर वन्य प्राण्यांना पाणी उपलब्ध होते.

संयुक्त वन व्यवस्थापन समिती; निमजी वन महोत्सव, जागतिक पर्यावरण दिन, वन्यजीव सप्ताह आदी कार्यक्रमांचे आयोजन करते. यातून पर्यावरण-विषयक जाणीव व जागरूकता वाढवली जाते. सोबतच; आरोग्य, आर्थिक उत्पन्नात वाढ, सामाजिक कर्तव्य,

स्वच्छता इत्यादींवर मार्गदर्शन केले जाते.

क) ढगा, लागदड आणि मासोद गावांचे वनव्यवस्थापन :

वर्धा वनविभाग वर्धा जिल्ह्यांतर्गत संयुक्त वनव्यवस्थापन समिती ढगा, लादगड आणि मासोद या समित्यांनी वनपर्यटनाचा विकास केलेला आहे. या वनपर्यटनांमधून संयुक्त वनव्यवस्थापन समितीला उत्पन्न प्राप्त झालेले आहे. ढगा येथे श्री क्षेत्र महादेव संस्थान असून, महाशिवरात्रीला येथे यात्रा भरते, तर वर्षभर निसर्गप्रेमींची येथे वर्दळ असते. या यात्रेचे नियोजन वनविभागाने संयुक्त वनव्यवस्थापन समितीकडे दिलेले आहे. या यात्रेकरिता १ ते १.२५ लक्ष लोक येतात. या यात्रेच्या माध्यमातून संयुक्त वनव्यवस्थापन समितीला १,२७,२७० रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले. समितीने यात्रेच्या नियोजनाकरिता केलेला खर्च ६८,००० रुपये इतका होता. हा खर्च वजा जाता, समितीला एकूण ६०,४७० रु. उत्पन्न प्राप्त झाले. शिवाय, संयुक्त व्यवस्थापन समितीने निसर्ग परिचय केंद्र, रस्तादुरुस्ती, वड व पिंपळ वृक्षांची लागवड, पर्यटन वाढावे म्हणून पर्यटकांकरिता शेड, सिमेंट बेंचेस, वॉच टॉवर, बालोद्यान, सोलर स्ट्रीट लाईट, धाम नदीवर ३३ मीटरचा सिमेंट प्लग बांधलेला आहे. वनपर्यटनाच्या दृष्टिकोनातून वाढ व्हावी, यासाठी ढगा, लागदड आणि मासोद संयुक्त वनव्यवस्थापन समितीने व्यवस्थापन केलेले आहे. त्यामुळे वर्षभर निसर्गप्रेमी या परिसराला भेट देतात, हे संयुक्त वनव्यवस्थापन समितीचे यशच आहे.

ड) यशोगाथा शहापूर वन विभागाची

शहापूर वन विभाग ठाणे वनपरिक्षेत्रांतर्गत येतो. या वनपरिक्षेत्रांतर्गत ढिळे संयुक्त वनव्यवस्थापन समिती कार्यरत आहे. सातत्याने घडून येणाऱ्या जंगलतोडीमुळे या परिसरात खुटाळ व बोडके वनक्षेत्र निर्माण झाल्यानंतर प्रथमत: या क्षेत्रात संपूर्णपणे कुऱ्हाडबंदी व कोयताबंदी करण्यात आली. वनसंरक्षणाच्या संदर्भात ढिळे संयुक्त वनव्यवस्थापन समितीने सक्रिय सहभाग घेतला आहे. २०१३ च्या अहवालानुसार वनांमधून जे एकूण उत्पादन होते, त्याचे विक्री मूल्य ९४,७०० रु. होते, तर खर्च ५५,४३४ रु. होता. परिणामी, ढिळे संयुक्त वनव्यवस्थापन समितीला एकूण नफा रु.३९,२६६ मिळाला होता. ढिळे संयुक्त वन व्यवस्थापन समितीला वनांचे संरक्षण व वृक्षलागवडीकरिता ९८,००० रु. आणि क्षेत्रविकासाकरिता ९८,००० रु. असे एकूण १,९६,००० रु. अनुदान शासनाकडून प्राप्त झाले होते.

स्थानिक क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांतून शहापूर वनविभागातील दहिवली व कळगाव येथे १९९८ पासून संयुक्त वनव्यवस्थापन समितीची स्थापना झाली. सातत्याने झालेल्या जंगलतोडीमुळे येथे कुऱ्हाडबंदी व कोयताबंदी करण्यात आली. वनसंरक्षणाची कामे हाती घेऊन साग, बोंडा, ऐन, धावडा इत्यादी वृक्षांची लागवड करण्यात आली. २००९ मध्ये रु. २,८०,३०७ व कळगावला रु. ३,४०,४६२ नफा वनउपजांमधून या दोन्ही वनव्यवस्थापन समित्यांना प्राप्त झाला होता.

वरील सातारातुकम, निमजी, ढगा, लागदड व मासोद आणि शहापूर वनविभागातील ढिळे, दहीवली आणि कळगाव येथील संयुक्त व्यवस्थापन कार्यक्रमाची अंमलबजावणी स्तुत्य आहे. एखाद्या योजनेमध्ये लोकांचा सहभाग वाढविला, त्यांना जोडून घेतले, तर ती योजना यशस्वी होते व त्याचे लाभ लोकांना प्राप्त होतात, हे वरील अनुभवनिष्ठ विश्लेषणावरून सिद्ध होते.

समारोप

वनधोरण २००६ ने वनांवर स्थानिक समूहांना अधिकार मिळवून दिला. पण, खऱ्या अर्थाने स्थानिक समूहांना हा वनांवरील अधिकार संयुक्त वन-

व्यवस्थापनामुळे प्राप्त झाला आहे. संयुक्त वन-व्यवस्थापनाच्या कार्यक्रमांमुळे समूहांना वनांमधून घरगुती आणि जीविकेच्या गरजा पूर्ण करता आल्या. समूहाच्या जीविकेमध्ये संयुक्त वनव्यवस्थापन समिती मध्यवर्ती भूमिका पार पाडते. सीमान्तिक सामाजिक समूह संयुक्त वनव्यवस्थापन समितीला प्रस्तुत करतात. यामुळे वनोत्पादनापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे, वनाच्या संवर्धनाचे आणि अधिकारांचे विकेंद्रीकरण झालेले आहे. वनव्यवस्थापनामुळे समूहामध्ये समानतेची भावना निर्माण होते; त्याहीपेक्षा याचा संबंध सामाजिक न्याय आणि जीविकेमधील सुधारणांशी आहे.

शासनाच्या अनेक योजनांमध्ये निधी आणि माहितीच्या अभावामुळे अडचणी निर्माण होतात. परिणामी, या योजना अपयशी होतात. ही संभाव्यता संयुक्त वनव्यवस्थापन कार्यक्रमालाही लागू पडते. या योजनेमधून कायमस्वरूपी रोजगार निर्माण करणे कठीण आहे. जो रोजगार या कार्यक्रमांमधून समूहांना प्राप्त होतो, तो अल्पावधीकरिता आहे. त्यामुळे शाश्वत उत्पन्न प्राप्त होत नाही. उत्पन्नामध्ये अनियमितता राहते. समूह भूमिहीन असल्यामुळे आदिवासी आणि दुर्गम भागांमध्ये बेरोजगारी तीव्र रूप धारण करते. परिणामी, आदिवासी व दुर्गम भागांमध्ये कुपोषणाची समस्या जटिल झालेली आहे. अनेक ठिकाणी जंगलांपासून प्राप्त उत्पन्नामध्ये समूहाच्या उत्पन्न सुरक्षिततेबाबतच्या उणिवा आहेत. तरुणवर्गाचा जोपर्यंत अधिकाधिक सहभाग वाढत नाही, तोपर्यंत जंगलांचे संरक्षण होऊ शकत नाही; म्हणून संस्थात्मक क्षमतेची बांधणी आणि दृढनिश्चयाने व्यवस्थेमध्ये बदल घडवून आणण्याची आवश्यकता आहे. असे झाले, तरच संयुक्त व्यवस्थापन समितीचा प्रभाव वाढेल व हा प्रभाव सर्वत्र समान दिसेल.

संदर्भ सूची

१) Bandi Madhusudan, Forest Right Act, Land distribution and livelihood of forest depend people, Economic & Political Weekly, Jan. 15, Vol. - L, No. 4. 2015.

२) Bhattacharya Rabindra, Environment Economics, Oxford University Press, New Delhi.2008.

३) Futehally Laeeq, Our Environment, National Book Trust, India. 2010.

४) Ghate Rucha & Chate Suresh, Joint Forest Management Role of Communication and Harvesting Behaviour : Evidence from field explain in India, working paper No. 53, SANDEE Khathmandu, Oct. 2010.

५) Lal J.B., India Forest Myth & Reality, Natraj Publication, Dehradun. 1989.

६) Lele Sharadchandra & Memon Ajit, Demoratizing Forest Governance in India, Oxford University Press, New Delhi. 2014.

७) Ramkrishna P.S., Ecology and Sustainable Development, National Book Trust, India. 2013.

८) Savyasaachi, Forest Right Act 2006 : Undermining the fundamental position of forest, Economic and Political Weekly, April 9, vol. XLVI, No. 15. 2011.

९) Smith Stephan, Environment Economics, Oxford University Press, New Delhi. 2011.

१०) Govt. of India, National Forest Policy Ministry of Environment and Forest, New Delhi.1988.

११) Govt. of India, National Forest Policy Ministry of Environment and Forest, New Delhi.2006.

१२) महाराष्ट्र शासन, संयुक्त वन व्यवस्थापन समिती, निमजी अहवाल, वनविभाग, नागपूर.२०१३.

१३) महाराष्ट्र शासन, संयुक्त वनव्यवस्थापन समिती, ढिळे, दहीवली आणि कळगाव अहवाल, वनविभाग, शहापूर, ठाणे. २०१३.

१४) महाराष्ट्र शासन, संयुक्त वनव्यवस्थापन समिती अहवाल, ढगा वनविभाग, वर्धा.२०१३.

१५) महाराष्ट्र शासन, संयुक्त वनव्यवस्थापन समिती, सातारातुकम, वन विभाग, मूल, चंद्रपूर.२०१३.

१६) शासननिर्णय, महसूल व वनविभाग, ग्रामीणांच्या सहभागातून वनव्यवस्थापन २५.४.२००३.

१७) शासननिर्णय, महसूल व वनविभाग, ग्रामीणांच्या सहभागातून वनव्यवस्थापन २७.४.२०१०.

◆


कला म्हणजे काहीतरी करण्याचा सुंदर मार्ग,
विज्ञान म्हणजे काहीतरी करण्याचा प्रभावी मार्ग,
तर व्यवसाय म्हणजे काहीतरी करण्याचा आर्थिक मार्ग.

- इलबर्ट हुब्बार्ड

विदर्भ अर्थशास्त्र परिषद

४२ वे वार्षिक अधिवेशन २०१८

दि. २७ व २८ जानेवारी २०१८



अर्थसुमती

श्री. दोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

मुख्य संपादक

डॉ. संजय कोठारी

ISSN : 2278-

बँकाची बुडीत कर्जे (एन.पी.ए.) समस्या, आव्हाने आणि उपाययोजना

डॉ. राजेश उल्हासराव चुटके
अर्थशास्त्र विभाग
श्री. शिवाजी कला व वाणिज्य
महाविद्यालय, अमरावती.

प्रस्तावना :-

रिझर्व बँकेने आंतरराष्ट्रीय दबावातून ही संकल्पना विशीष पुरावटा करण्यास संस्थांना अधिकाराचे आणि राजिनाम्याचे ठरविले. सर्वप्रथम ही संकल्पना राष्ट्रीयकृत बँकामधून लागू केली. त्यानंतर खाजगी बँकातून लागू केली.

ज्या कर्जावर प्रत्यक्षात व्याजाचे उत्पन्न मिळत नाही, ती मालमत्ता अनुत्पादक मालमत्ता होय. सदरची संकल्पना प्रथमत: ज्यावेळी खाजगी बँकातून लागू करण्यात आली त्यावेळेस सदरची संकल्पना ही फक्त खाजगी बँका अडचणीत यायात आणि खाजगी बँकाचे अस्तित्वच संपुष्टात आणावे.

सुरुवातीस अनुत्पादक मालमत्तेचा कालावधी १ वर्ष होता. त्यानंतर तो १८० दिवसांचा करण्यात आला. सध्या खाजगी बँकातून हा कालावधी ९० दिवसांचा तर पतसंस्थातून हा कालावधी १८० दिवसांचा करण्यात आलेला आहे. कदाचित, भविष्यात हा कालावधी ३० दिवसांवर देखील आणला जाऊ शकेल. म्हणजेच ज्या बँकेत खात्यावर ठरलेल्या कालावधीचे व्याज प्रत्यक्षात खात्यात जमा नाही झाले तर ते संपूर्ण कर्ज खाते अनुत्पादक मालमत्तेत धरले जाते, आणि जर हप्तेबंद कर्ज खात्यात ठरलेल्या कालावधीचे हप्ते थकले तर ते संपूर्ण कर्ज अनुत्पादक मालमत्तेत धरले जाते, अशी कर्जे अनुत्पादक मालमत्ता झाल्यास ती खाती नियमित होईपावेतो त्या खात्यावर व्याजाची आकारणी न करता त्याचे व्याजाची रक्कम उत्पन्नात न धरता ती रक्कम वाजूला नोंद करुन ठेवली जाऊ लागली, आणि सदरचे उत्पन्न म्हणून धरण्यात यावयंद बसून आर्थिक पत्रकात वस्तुस्थितीदर्शक माहिती आणि परिस्थिती समोर येऊ लागली. त्यामुळे दिलेली कर्जे अनुत्पादक मालमत्ता होऊ नये म्हणून त्यावर नियंत्रण ठेवणे हीच बाब महत्वाची होऊन बसली आहे.

खाते अनुत्पादक झाल्यास संस्थांना दुहेरी मार सहन करावा लागतो. एक तर सदर खात्यावर मागील व्याज प्रत्यक्षात वसूल होईपावेतो त्या खात्यांना व्याजाची आकारणी करता येत नाही, आणि अशी खाती अनुत्पादक मालमत्ता होऊन किती कालावधी झाला त्यानुसार १० ते १०० टक्के तरतूद संस्थेला झालेल्या नफ्यातून करावी लागते. त्यामुळे संस्थांच्या नफ्यावरही त्याचा विपरीत परिणाम होऊ लागला, असे सर्व संस्थांना वाटू लागले. परंतु, प्रत्यक्षात परिस्थिती तशी नसून खऱ्या आर्थिक परिस्थितीचे त्यामुळे आकलन होऊ लागले. त्यामुळे दिलेली कर्जे अनुत्पादीत मालमत्ता होऊ नये म्हणून काळजी घेणे आवश्यक झालेले आहे.

समस्या :-

खाजगी संस्थांची प्रवृत्ती मुळात तारण घाहून कर्ज देण्याची आहे. सदरची प्रवृत्ती बदलून व्यवसायाच्या आवश्यकतेनुसार कर्ज देण्याची प्रवृत्ती निर्माण झाली पाहिजे. अर्थात याचा अर्थ असाही नाही की, संस्थांनी तारण घेऊच नये. भारतीयांची सांस्कृतिक मनोवृत्ती सहजासहजी तारण घेतल्याशिवाय कर्जासाठी तारण घेणे हे आवश्यकच ठरते. परंतु, तारण घाहून कर्ज न घेता व्यवसायातील तारण तत्वावर घेऊन त्याच्या व्यवसायाच्या आवश्यकतेनुसार कर्ज दिले पाहिजे. त्यासाठी कर्जदाराची प्रामाणिकता, व्यवसायाची विश्वासार्हता आणि कार्यक्षमता, व्यवसायाची क्षमता या बाबी त्याच्या आर्थिक पत्रकावरुन आणि नवीन व्यवसायासाठी

ISSN : 2278-9308

प्रकल्प अहवालावरून तपासून आणि कर्जदाराची बाजारातील पत पाहूनच कर्ज अदा केले पाहिजे.

कर्ज अदा केल्यावर कर्जाचा विनियोग ज्या कारणासाठी कर्ज मंजूर केले आहे त्याच कारणासाठी होत असल्याची आवश्यक कालावधीच्या अंतराने खात्री केली पाहिजे, आणि दिलेल्या कर्जाचा वापर किंवा विनियोग अन्य कारणासाठी होत असल्यास त्यावर नियंत्रण ठेऊन त्या कर्जाची मुद्दलपूर्ण परत मागणी केली पाहिजे, अन्यथा ते कर्ज त्यास मुदत असली तरी ते कर्ज अनुत्पादित मालमत्ता ठरते.

चेकिंग कर्जखात्यावर सलग एन.पी.ए. मुक्तीचे कालावधीत व्याजाची रक्कम जमा होत नसल्यास किंवा हप्तेबंद कर्जाच्या बाबतीत एन.पी.ए. मुदतीच्या कालावधीतील हप्त्यांची आणि व्याजाची रक्कम जमा होत नसल्यास सदरची खाती एन.पी.ए. होत असतात. तसेच चेकिंग खात्यावर सलग एन.पी.ए. च्या मुदतीत कालावधीत व्यावसायिक व्यवहार झाले नाही, तरी असे खाते एन.पी.ए. असते, तसेच चेकिंग खात्याच्या संदर्भात कर्जदाराने एन.पी.ए. च्या मुदतीच्या कालावधीतील मालसाठा पत्रके संबंधी डेटर्स आणि संबंधी क्रेडीटर्स याचा माही दिल्या तरी अशी खाती देखील एन.पी.ए. मध्ये जातात. बँकेला तारण दिलेला माल साठा, मशिनरी, बिल्डींग, फर्निचर इत्यादींचे अस्तित्व संपत्त्यावरही अशी खाती एन.पी.ए. मध्ये जातात. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे एखाद्या ग्रुप मधील दोन किंवा त्यापेक्षा जादा खाते असल्यास त्यापैकी एखादे खाते जरी एन.पी.ए. मध्ये गेल्यास, त्या ग्रुपमधील सर्व खाती एन.पी.ए. मध्ये गेल्यास, त्या ग्रुपमधील सर्व खाती एन.पी.ए. होतात, आणि अशा पध्दतीने कर्ज खाती एन.पी.ए. होऊ नये म्हणून शाखा पातळीवर वेळीच काळजी घेतली पाहीजे.

कर्ज अदा करतानाच कर्जाचे व्याज किंवा हप्ता कर्ज प्रकाराप्रमाणे कधी भरावा लागेल याची स्पष्ट माहिती आणि जाणीव कर्जदाराला करून दिली पाहिजे. एका महिन्याचे व्याज किंवा एखादा हप्ता जरी कर्जदाराने भरला नाही, तरी अशा खात्यावर शाखाधिकारी यांनी नजर ठेऊन कर्जदाराशी फोनवर किंवा पत्राने संपर्क साधून त्याला व्याजाची/हप्त्याची रक्कम भरणेस भाग पाडले पाहिजे, आणि फोनला किंवा पत्रालाही दाद देत नसल्यास कर्जदाराची प्रत्यक्ष भेट घेऊन त्याला ती रक्कम भरण्यास भाग पाडले पाहिजे.

दोन महिन्यांचे व्याज अगर हप्ते थकल्यास तशा सुचना लेखी पत्राने कर्जदारासोबतच त्याच्या जामीनदारांना करून दिल्या पाहिजेत आणि पत्र दिलेले असली तरीही कर्जदाराशी आणि जामीनदाराशी फोनवर संपर्क साधून त्याला व्याजाची / हप्त्याची रक्कम भरणेस प्रवृत्त केले पाहिजे.

चेकिंग खात्यावर जर सलग महिनाभर व्यावसायिक व्यवहार होत नसल्यास त्या कर्जदाराची समक्ष भेट घेऊन कर्जदार खात्यावर व्यवहार का करीत नाही याची माहिती घेतली पाहिजे आणि त्याला त्याचे कर्जखात्यामार्फतच व्यावसायिक व्यवहार करावयास भाग पाडले पाहिजे. ज्या चेकिंग खात्यावर सलग दोन महिने व्यावसायिक व्यवहार झाला नसल्यास तसे लेखी पत्राने संबंधित कर्जदारास आणि त्याच्या जामीनदारास कळविले पाहिजे, आणि त्या कर्ज खात्यामार्फतच व्यावसायिक उलाढाल करणेस भाग पाडले पाहिजे. ज्या चेकिंग खात्याच्या बाबतीत साठा पत्रके, व्यापारी देणे-घेणे याचा मेळेवर येत नसतील, त्यांचेशी समक्ष तसेच फोनवरून संपर्क साधून त्यास त्याप्रमाणे पूर्णता करण्यास भाग पाडले पाहिजे. तरीही सलग दोन ते तीन महिने साठा पत्रके न आल्यास समक्ष भेट देऊन माल साठ्याची तपासण करून स्वत:च्या हाताने साठा पत्रक तयार करून त्याची यादी तयार करून त्यावर कर्जदाराची स्वाक्षरी घेण्यात येऊन ती प्रत त्याच्या कर्ज फाईलला लावली पाहिजे. मोठ्या कर्जदारांच्या बाबतीत साधारणत: दर तीन महिन्यांनी समक्ष साठा तपासणी करून त्याचा अहवाल दप्तरी ठेवला पाहिजे, छोट्या कर्जदारांना वर्षातून किमान एकदा समक्ष भेट देऊन साठा तपासून तसा अहवाल दप्तरी ठेवला पाहिजे. आलेल्या साठा पत्रकाप्रमाणे डी.पी. (ड्रॉईंग पॉवर) रजिस्टरमध्ये नोंद करून त्या कर्जदाराची डी. पी. लिमिट ठरविली पाहिजे, आणि त्यापेक्षा जादा नावे बाकी असल्यास अशी जादा रक्कम कर्जदाराला कर्जखात्यावर तात्पुरतीच भरावयास लावून कर्ज खाते डी. पी. लिमिटच्या आत आणावयास पाहिजे.

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका
विद्यावार्ता™

Jan. To Mar. 2017
Issue-17, Vol-01

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले
-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

Vidyawarta Research Journal is "Printed by Harshwardhan Publication Pvt.Ltd. Published by Ghodke Archana Rajendra and Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post.Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor Dr. Gholap Bapu Ganpat.

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
Limbaganesh, Dist. Beed, Pin-431126
Mobi. 09850203295, 07588057695

❖ Editorial Board ❖

1) Dr. Vikas Sudam Padalkar (Japan)
2) M.Saleem, Sialkot (Pakistan)
3) Dr. Momin Mujtaba (Saudi Arebia)
4) Dr. Anupama Alvikar (Turkey)
5) N.Nagendrakumar (Sri Lanka)
6) Dr. Wankhede Umakant (Maharashtra)
7) Dr. Dixit Kalyani (Lucknow)
8) Dr. Basantani Vinita (Pune)
9) Dr. Upadhya Bharat (Sangali)
10) Dr. J. David Livingston (Thirupathy)
11) Dr. Kadu S. V. (Akola)
12) Dr. Jubraj Khamari (ORISSA)
13) Krupa Sophia Livingston (Tamilnadu)
14) Dr. Umesh chandr Shukl (Mumbai)
15) Dr. Ambhore Shankar (Jalna)
16) Dr. B.J.Patel (Gujrat)
17) Manmeet Kaur ((Uttrakhand))
18) Dr. Sunil S. Trvedi (Gujrat)
19) Dr. Raj Bala Gaur (New Delhi)
20) Preeti Sarda (Hyderabad)
21) Prof.Surwade Yogesh (Satara)

❖ Advisory Committee ❖

1) Dr. Chodhari N.D. (Kada)
2) Dr. Yallawad Rajkumar (Parli v.)
3) Dr. Yerande V. L. (Nilanga)
4) Dr. Shinde Sunil (Parbhani)
5) Dr. Awasthi Sudarshan (Parli v.)
6) Ghante Pradipkumar , Solapur (MS)
7) A. Durga Prasad, Telangana
8) Dheeraj Kumar Pandey, Varanasi (U.P.)
9) Prof. Machale Ravinda (Parli v.)
10) Vipin Panday, Kanpur (U.P.)
11) Dr.V.Aruna, Chennai (Tamilnadu)
12) Dr. Avineni Kishor, Kuppam(Kerala)
13) Prof. Deshmukh Suryakant (Parli v.)
14) 23) Dr. Dhaigude R. B. (Parli v.)
15) Dr. Rajendra Acharya (Parli v.)
16) Dr. Manoj Kr Sharma (Haryana)
17) Dr. Rajesh Chandra Paliwal (Uttrakhand)
18) Dr. Suresh Babu (Hyderabad)
19) Deepak Nema (M.P.)
20) Dr. Maheswar Panda (Orissa)
21) Dr. Vidya Gulbhile (M.S.)

North Maha. University, Jalgaon. Approved
जा.क्र.उमवि/२१/इ.अ.मं./३९३/२०१३
Dt.२१.१०.२०१३

Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 2611690

Note : The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. 'Vidyawarta' dose not take any libility regarding appoval/disapproval by any university,institute,academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Vidyawarta is not necessary. Disputes, If any shall be decided by the court at Beed (Maharashtra, India)

14) SHOOT GALL PSYLLA, APSYLLA CISTELLATA- A SERIOUS PEST OF MANGO.....
G. P. PAINKRA, Ambikapur || 68

15) State Human Rights Commissions — A Historical Perspective
Anjana Rani, Abohar || 70

16) HiddenVoice of Vidharbha Demanding Separation
Pankaj P. Umbarkar || 72

17) Use of Activity Based Costing as a modern tool for controlling increasing .....
Dr. Sudhakar B. Yadav, Raigad || 78

18) A STUDY ON TOURISTPERCEPTION TOWARDS TOURISM SERVICES IN .....
B.S.V. Meera Setty, Mayabunder, Dr. C. Thiruchelvam, Pudukottai || 83

19) THE TENET OF KARMA— BUDDHISM CONTRARY TO JAINISM
Anjana Rani, Abohar || 92

20) महाराष्ट्र विधानसभा २०१४ च्या निवडणुकीचे राजकारण
डॉ. व्ही.एस. इंगळे, जि.यवतमाळ || 94

21) नव्या अर्थक्रांतीचे पर्व
डॉ. अनिल श्री. खांडेकर, अमरावती || 97

22) दलित कवयित्रींच्या कवितेतील स्त्रीवादी जाणिवा
डॉ. कैलास महाले, जि.सांगली || 100

23) कौटुंबिक हिंसाचाराची कारणमिमांसा
डॉ. सौ. सुजाता ब. सबाने, प्रा. सौ. वर्षा यशोधन पाटील, महाराष्ट्र || 103

24) चंद्रपूर जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत शिक्षकांचे व्यवसाय समाधान.....
श्री. जयंत आ. वानखेडे, जि. चंद्रपूर || 109

25) डॉ.अण्णासाहेब गुंजकर यांचे जीवन व जडण-घडण एक अभ्यास
प्रा.एस.व्ही.शिंदे, नांदेड, डॉ. स्नेहल डी. शेंबेकर, अकोला || 113

26) मराठी आणि हिंदी ग्रामीण कादंबऱ्यांमध्ये चित्रित जातिव्यवस्था, अस्पृश्यता, धर्मांधता
प्रा. राहूल भालेराव पाटील, जि. पालघर || 115

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

27) अनुसूचित जातियों की सामाजिक आर्थिक स्थिति पर मनरेगा का प्रभाव.....
अजय कुमार, डॉ. बी. के. अग्रवाल, उत्तराखण्ड || 123

28) पुरूष तथा महिला प्रधानाचार्यों द्वारा प्रशासित निजी उच्चतर माध्यमिक विद्यालयों .....
डॉ. अमित कुमार, लखनऊ (उ. प्र.) || 128

29) समन्वय साधना के शास्वत प्रतिमान : लोकनायक तुलसीदास
डॉ.चन्द्रकुमार जैन, छत्तीसगढ़ || 135

30) पत्रकारिता की शिक्षा में अहमियत : आज की आवश्यकता
एन. मोहना, डॉ. शशिप्रभा जैन, तमिलनाडू || 139

31) अब्बासी काल में भवन निर्माण कला औरवास्तुकला की उन्नति
डा. गुलाम मोइन उद्दीन, लखनऊ || 142

32) झाबुआ राज्य के ताजीमी व सिरोपाव के सम्मान के अधिकारी प्रथम वर्ग के सरदार .....
प्रो. प्रेमसिंह मोरे, जि—डिण्डौरी (म.प्र.) || 145

33) भारतीय अर्थव्यवस्था में महात्मा गाँधी के विचारों की प्रासंगिकता
डॉ. सन्जू सजवाण नेगी, बादशाहीथौल (टि.ग.) || 147

34) दलित विमर्श : चिन्तन एवं परम्परा
डॉ. अरबिन्द कुमार सिंह, वृन्दावन (मथुरा) || 151

35) वाराणसी जनपद के प्राथमिक विद्यालयों में कार्यरत् शिक्षकों की .....
डॉ. राजकुमार, लखनऊ || 154

36) राजाभोज एवं अवनिकूर्मशतम् पराक्रम एवं पौराणिकता का तुलनात्मक अवलम्बन
डॉ. संजना शर्मा, भोपाल || 157

37) मानवाधिकार : एकपरिचय
विकास कुमार, झारखण्ड || 161

38) भारत में भ्रष्टाचार
डॉ. किशन यादव, झाँसी || 166

39) महाभाष्यानुसार परोक्षे लिट् सूत्रा का विवेचन :वैफयट तथा नागेश वेफ सन्दर्भ में
ललित प्रधन आर्य, दिल्ली || 168

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

सारांश:—

दलितांच्या चळवळीमुळे दलित प्रश्नांबरोबर समाजातील अनेक घटकांचे प्रश्न मार्गी लागले. स्त्रीमुक्तीच्या चळवळीला यामुळेच बळकटी प्राप्त झाली हे दलित कवयित्रींच्या काव्यातून स्पष्ट होते. स्त्रीवादी चळवळीपासून दूर असलेल्या दलित कवयित्रीच्या भावना लक्षात घेत फुले, आंबेडकरी विचारांचा वारसा घेऊन उदयाला आलेला हा स्त्रीवाद मराठी स्त्रीवादीपंरपरेला एक वेगळी दिशा निर्माण करून देईल असे वाटते. दलित कवियित्रींच्या काव्यातील स्फोटक विद्रोहाची जाणीव स्त्रीचे परंपरेने निर्माण केलेले रूप बदलण्यास महत्वपूर्ण ठरू शकते. स्त्रीमुक्तीचा विचार करणाऱ्या स्त्रियांना नवा समाज घडवायचा आहे. जेथे स्त्रीला समान संधी मिळेल यासाठी फुले, आंबेडकरी विचारांचा स्वीकार मराठी स्त्रीवादाने करणे गरजेचे आहे असे वाटते

संदर्भ :—

१. पाटील शोभा, स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

२. धोंगडे अश्विनी,स्त्रीवादी समीक्षा स्वरूप आणि उपायोजन, दिलीपराज प्रकाशन,पुणे.

३. पगारे म. सु, दलित साहित्याचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन्स, औरंगाबाद

४. लांजेवार ज्योती, दलित कवयित्रींची कविता, सुगावा प्रकाशन,पुणे.

५. पारसे बी. डी.,दलित कवयित्रींची कविता, निर्मीती विचारमंच, कोल्हापूर.

❑❑❑

23

कौटुंबिक हिंसाचाराची कारणमिमांसा

डॉ. सौ. सुजाता ब. सबाने
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख,
श्री शिवाजी कला आणि वाणिज्य महाविद्यालय,
अमरावती

प्रा. सौ. वर्षा यशोधन पाटील
(गृहशास्त्र विभाग),
मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय,
इस्लामपूर

गोषवारा

महिला सबलीकरण, स्त्रीवाद, महिलांवरील अत्याचार असे बरेच काही रोजच सातत्याने ऐकायला मिळते. स्त्री समाजाचा, कुटुंबाचा महत्वाचा आणि अविभाज्य भाग आहे. चूल आणि मूल सांभाळणारी स्त्री आता जवळ जवळ सर्वच क्षेत्रात पुरूषाच्या बरोबर अग्रेसर आहे. हे चित्र मात्र कितपत सुखद आहे हा संशोधनाच विषय व्हावा, कारण त्यांना कौटुंबिक कलहाला बळी पडावे लागते. हा चिंतेचा विषय ठरत आहे. त्यासाठी प्रस्तुत शोधनिबंधात कौटुंबिक कलहाची सर्व साधरण कारणे विषद करण्यात आली आहेत.

शोध संज्ञा :

कुटुंब, हिंसा, कौटुंबिक हिंसाचार, कारण मिमांसा

प्रस्तावना

कुटुंब मानवी समाजाचा सर्वात लहान व समाजाशी अत्यंत जवळीक साधलेला समूह असून या ठीकाणी मानवाच्या 'ऐक्य आणि प्रेमासाठी असलेल्या आकांक्षा सर्वतोपरी पूर्ण होवून समाधान लाभते.'

पुरूषप्रधान समाज कुटुंबात पुरूषाचे नेहमीच सत्तावर्चस्व, हुकूमत राहिली आहे. अर्थात सत्ताप्राप्ती मुळे पुरूषाला गर्व, अहंकार, अभिमान होत गेला आणि इच्छेविरूध्द घटना घडल्यास, निर्णयात बाधा

आल्यास कुटुंबातील सदस्यांवर प्रामुख्याने करत्या स्त्रीवर निरनिराळ्या प्रकारचे अत्याचार सुरू झाले. अत्याचाराचे रूपांतर कलह/हिंसाचारात होवून कौटुंबिक कलह/हिंसाचाराची संकल्पना उदयाला आली व ही गंभीर सामाजिक समस्या झाली. परिणामी कुटुंबाचे विघटन होण्यास सुरूवात झाली. याचा कुटुंब, कुटुंबातील सदस्य, स्त्री, समाज व पर्यायाने मानवी विकासावर परिणाम झाल्याचे प्रत्ययास येते.

गिल्स यांचे मते, 'एखाद्या व्यक्तीला प्रत्यक्षात इजा किंवा जखमी करण्याच्या उद्देशाने केलेला हल्ला म्हणजे हिंसा होय.'

स्ट्रास नुसार, 'अशी कृती की ज्यामध्ये दुखापत करण्याची प्रचंड क्षमता असते.'

कर्नॅक नुसार, 'हिंसा म्हणजे व्यक्तिची अशी कृती जिच्यामुळे दुसऱ्या व्यक्तिच्या निरनिराळ्या प्रकारच्या स्वातंत्र्यावर आक्रमण.'

हिंसेची क्रियात्मक व्याख्या बघितल्यास आपणास असे दिसते की, काही तरी देण्याची व्यक्तिची (स्त्रीची) इच्छा नसताना छुप्या किंवा उघडया रित्या ताकदीचा वापर करून ते तिच्याकडून हिरावून घेवून शारीरिक, भावनिक किंवा दोन्ही प्रकारची हानी तिला पोहचविणे म्हणजे हिंसा होय.

हिंसाचाराचे प्रामुख्याने गुन्हेगारी हिंसाचार, कौटुंबिक हिंसाचार आणि सामाजिक हिंसाचार असे तीन प्रकार दिसून येतात.

कौटुंबिक हिंसाचारात शारीरिक हिंसाचार, लैंगिक हिंसाचार, शाब्दिक किंवा भावनिक हिंसाचार व आर्थिक हिंसाचाराचा समावेश होतो.

घराच्या चार भिंतीत होणारा अत्याचार, हिंसाचार आणि अन्याय याला डोमेस्टिक व्हायोलन्स असे म्हटले जाते. व्हायोलन्सचे शब्दश: भाषांतर 'हिंसाचार' असे केले जात असल्याने या कायद्याबद्दल गैरसमज जास्त आहेत. दुर्दैवाने महिला सबलीकरण आणि महिला सुरक्षततेच्या बाबतीत आपल्याला खूप काळजी आहे असे दर्शविणारा आपला समाज घरगुती हिंसाचाराकडे मात्र घरगुती बाब म्हणून काना डोळा करतो. हा विरोधाभास स्त्री हक्क चळवळीला कायमच मागे खेचणारा आहे हे मान्य करावे लागेल.

घरगुती हिंसाचार यात काय काय येवू शकते यांच्या उदाहरणाची कायद्यात दिलेली यादी पाहिली तर अशा घटना आजच्या युगात घडत आहेत यावर आपला विश्वास बसणार नाही. यापैकी कोणती ना कोणती घटना कमी—अधिक गंभीर स्वरूपात स्त्रियांनी त्यांच्या इच्छेविरूध्द सहन करायला लागलेली असू शकते. पितृसत्ताक समाज पध्दतीत स्त्रियांचे घरातील आणि समाजातील दुय्यम स्थान त्यांनी स्विकारावे हाच अत्याचाराचा मूळ उद्देश असतो.

कुठल्याही कृतीमुळे व्यक्तिला प्रामुख्याने घरातील स्त्रीला शारीरिक किंवा मानसिक त्रास आणि इजा होत असेल तर तो अत्याचार होतो. पण त्याही पलिकडे जर व्यक्तीच्या मानवी हक्काचे उल्लंघन होत असेल तर तोही अत्याचारच समजावा. अत्याचार शारीरिक, मानसिक, भावनिक, आर्थिक आणि लैंगिक असू शकतो.

उद्दिष्टे

१. कौटुंबिक कलहाला/ हिंसाचाराला बळी पडलेल्या प्रतिवेदक महिलांची वैयक्तिक, सामाजिक, आर्थिक, मनोवैज्ञानिक व परिस्थितीजन्य पार्श्वभूमी जाणून घेणे,

२. कौटुंबिक कलह/हिसांचाराची कारणे शोधणे.

गृहितके

१. कौटुंबिक कलहाला बळी पडलेल्या प्रतिवेदक महिलांची वैयक्तिक, आर्थिक व मनोवैज्ञानिक पार्श्वभूमीत साम्यता दिसते.

२. कौटुंबिक कलहासाठी काही गोष्टी कारणीभूत ठरतात.

नमुना निवड

प्रस्तुत संशोधन हे इस्लामपूर शहर व आसपास ची खेडयापुरते मर्यादित आहे. यामध्ये कौटुंबिक कलह/ हिंसाचारास बळी पडलेल्या २५ महिलांची निवड केली.

वाड.मयीन पुनरावलोकन

कौटुंबिक कलह/हिंसाचाराची समस्या दिवसेंदिवस वाढत चालली असून त्यामुळे कुटुंबाचे ऐक्य नष्ट होत चालले आहे ही बाब अत्यंत अनपेक्षित आहे. पुरूष, स्त्री, बालक, सर्व कुटुंब व समाजावर त्याचा विपरीत परिणाम होतो याचे गांभीर्य लक्षात

घेवून संशोधकांनी प्रस्तुत संशोधनाशी निगडीत संदर्भ याठिकाणी उपयुक्त केले आहेत.

Davidson, (1977) Many people have suggested that family violence – at least to the degree it is observed today- is a recent phenomenon. Yet violence between intimates has long been a part of family life. It has been described repeatedly in religious and historical documents across many centuries, dating as far back as the Roman Empire. Some have also argued that current levels of family violence reflect a break-down in the moral structure of the family.

Fantuzzo and Mohr, 1999 In the ensuing three decades violence against women at the hands of their male partners has become a less hidden phenomenon (Bograd, 1988). and a growing field of research has focused on better understanding of the complex issues involved in domestic violence.

बेनेलवार जयमाला प्र. (२०१३) यांनी आपल्या लोकमत (मंथन) रविवार दि. १७ मार्च २०१३ रोजी 'पदोपदी भेटतात रावण' या शिर्षकाखाली स्त्रीची सुरक्षितेसंबंधी प्राचीन काळापासून चालत आलेली गोष्ट म्हणजेच 'स्त्रीची असुरक्षितता' 'स्त्री केव्हाही सुरक्षित नव्हती आणि आजही नाही. कारण व्दापार युगात सुध्दा देवादिकांपासून स्त्रीची हेळसांड झालेली आहे. आजच्या कलयुगात तर पदोपदी रावण निर्माण झाले आहेत. या रावणांना रामाची गरज नसून आजच्या नारीने महिषासुरमर्दिनी झाल्याशिवाय तिच्या सुरक्षिततेचा प्रश्नच सुटणार नाही. अशा घटना देशात दररोज स्त्रीबाबत घडत आहेत. स्त्री म्हटले म्हणजे तिला आईच्या गर्भात असतानाच धोका निर्माण झाला आहे. (म्हणजेच स्त्रीभ्रूण हत्या) ईश्वराला सुध्दा निसर्ग तयार करायला एवढा त्रास झाला नसेल त्याच्या हजारो पट आजच्या स्त्रीला उद्याची पिढी घडवताना होत आहे. देशाच्या राजधानीत एक निर्भया अत्याचाराला बळी पडली. परंतु किती तरी निर्भया आहेत.

National Council of Juvenile and Family Court Judges, 1994 Legal definitions or codes may include only acts of physical harm, including involuntary sexual acts or threats of physical harm. Definitions of domestic violence can be broad or fo-cused, amorphous or targeted. The reason that the definition of violence is important because it shapes the response. For example, a community response, whether it be legal reform or the provision of sup-port services, is shaped by a particular understand-ing of what constitutes domestic violence and whether it is to be conceptualized as an intra-family conflict, or a criminal violation of rights. The defini-tion implied by the law is especially critical as it de-fines standards and thus impacts broader social per-ceptions of the problem. Elements of the definition that need to be considered then are the boundaries of the relationship between the perpetrator and the abused, the norms of acceptable behavior, and the specific acts that constitute violence.

Violence is often not restricted to the current husband but may extend to boyfriends, former husbands, and other family mem-bers such as parents, siblings, and in-laws. A defini-tion that acknowledges these multiple possibilities would lead to interventions that are more inclusive of the experiences of all women.

Definitions of domestic violence rest upon not only the nature of the relationship between the perpetra-tor and the victim but also upon norms of accept-able behavior.

प्रिती वडनेरकर यांनी कौटुंबिक हिंसाचाराचे प्रकार सांगताना म्हटले आहे की, पतीने पत्नीचा संशय घेणे, तिच्या चारित्रावर शिंतोडे उडवणं, पत्नीनं, कुठल्याही कारणावरून पतीशी वाद घालायचा प्रयत्न केल्यास, संतापाने पतीनं उसळून उठून अंगावर धावून जाणं, तारस्वरात शिव्यांचा भडिमार करून तिला धमक्या देणं, मुलीला जन्म देण्यावरून पत्नीलाच दोषी धरून तिला घालून पाडून बोलणं, पत्नीच्या माहेरच्या मंडळींच्या घरातील वास्तव्यावरून पतीनं आक्रस्ताळेपणा करणं, पत्नीच्या छोटया मोठया खर्चावरून तिला ठोमणे मारणे, स्वयंपाक पसंत न पडल्यास तो फेकून देवून पत्नीला पुन्हा स्वयंपाक करायला लावणे. पतीनं केलेल्या आरोपाचं खंडन करण्याचा प्रयत्न पत्नीनं केल्यास

तिला भांडकुदळ ठरवून आपली बाजू मांडू न देणं, तिनं माहेराहून पैसे आणावेत म्हणून धाकदपटशा करणं, घरमकाम न करण्यावरून तिला शिवीगाळ करणं, येता जाता, चार चौघात अथवा एकांतात तिची मानहानी निंदानालस्ती करणं, तिला अव्दातव्दा बोलणं, तिच्या मर्जीविरूध्द तिच्याकडून शयनसुख मिळवणं, तिला केव्हाही घराबाहेर काढणं, तिच्या आजारपणातही तिला घरकाम करण्यास भाग पाडणं. कुठल्याही कारणावरून संतापून पतीने पत्नीच्या थोबाडीत मारणं, हात पिरगाळून फ्रॅक्चर करणं, पाठीत धपाटे घालणं, तिच्या दिसण्यावरून निदांनालस्ती करणं.

घटस्फोटाचा कायदा (१९५५) १९५५ च्या हिंदू विवाह कायद्याने कायदेशीर विभक्तपणा व घटस्फोट या दोन्ही गोष्टी मान्य केल्या आहेत. पती पत्नीचे नाते हे घटस्फोटात संपुष्टात येते. त्यानंतर १९७६ साली हिंदू विवाह कायद्यात दुरूस्ती केली गेली. व्याभीचार, क्रुर वागणूक, वेड लागणे, गुप्त रोग, धर्मातर, संन्यास, बेपत्ता होणे अशा कारणांनी पतीला अथवा पत्नीला घटस्फोट मागता येतो.

सांगली सकाळ, सोमवार, दि. ११ मार्च २०१३ पान नं. २ वर प्रसिध्द केलेल्या बातमीत माहेरून एक तोळे सोने आणि मोटारीसाठी पैसे आणण्याच्या कारणावरून नवविवाहितेचा छळ केल्या प्रकरणी पतीसह सहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. मंगळवार पेठेतील गायत्री अजय मोरे हिने जुना राजवाडा पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. इस्लामपूर, जि. सांगली येथील पती अजय रमेश मोरे, सासरे समीर, सासू वैजयंती, दीर अनिकेत नणंद स्मिता पाटील आणि लक्ष्मी मोरे यांनी छळ केल्याची फिर्याद गायत्रीने दिली आहे

लोकमत सांगली, रविवार दि. १६ जून २०१३ दैनिकात विवाहित छळ, पतीवर गुन्हा या शिर्षकाखाली प्रसिध्द झालेल्या बातमीत दुचाकी वाहन आणि घरखर्चासाठी माहेरून एक लाख रूपये आणण्याच्या मागणीसाठी छळ केल्या प्रकरणी पूनम बिरदे व भीरकडे (रा. इस्लामपूर) हिने पती बिरूदेव भोरकडे यांच्या विरूध्द इस्लामपूर पोलिसात फिर्याद दिली. त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

महाराष्ट्र टाईम्स, सोमवार दि. १७ जून २०१३ रोजी प्रसिध्द झालेल्या बातमीत मुलगा पाहिजे या हट्टापायी विवाहितेचा छळ करून तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्या प्रकरणातील संशयित पोलिस सतिश मोरे हा फरारी असल्याचे करवीर पोलिसांनी रविवारी सांगितले. मोरे हा संबंधित महिलेचा नातेवाईक असून त्याच्या घरात गर्भलिंग निदान करून गर्भपात करण्यात आल्याचा आरोप त्याच्यावर आहे.

तरूण भारत, शनिवार दि. २९ जून २०१३ पैशासाठी विवाहितेचा छळ या शिर्षकाखाली, मोटार सायकल घेण्यासाठी माहेरून पन्नास हजार रूपये आणण्यासाठी विवाहीतेचा छळ केल्या प्रकरणी सांगलीवाडी येथील चौघांना अटक करण्यात आली याबाबत कवठेपिरान येथील सौ. पूनम सागर डवरी या विवाहितेने शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

संशोधन पध्दती

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी अनुसुचिचे विकसीकरण केले. त्यामध्ये महिलांची पार्श्वभूमीची माहिती, कलहाची संभाव्य कारणे, याबाबत काही प्रश्न विकसीत केलेल्या अनुसुचिच्या सहायाने प्रतिवेदक महिलांकडून त्यांना उपलब्ध असलेल्या वेळेनुसार उत्तम संबंध प्रस्थापित करून प्रत्यक्ष निरीक्षण व सविस्तर मुलाखतीव्दारे आवश्यक ती माहिती मिळविण्यात आली.

प्राप्त माहितीचे प्राथमिक व दुय्यम स्वरूपाचे तालीकरण व नंतर सांख्यिकीय पृथःकरण करण्यात आले.

कुटुंब कलह/हिंसाचाराची कारणे

कुटुंबसंस्था ऐहिक सौख्य अनुभवत असताना दुसरीकडे त्याच कुटुंबातील सर्वार्थाने त्यागमय, कष्टप्रद जीवन जगणाऱ्या एका स्त्रीला कलाहाला/हिंसाचाराला सामोरे जावे लागते ही विकसित समाजाला लांच्छनास्पद बाब ठरली. कुटुंब कलह/हिंसाचार ही एक गंभीर समस्या असून कुटुंब स्वास्थ्याच्या दृष्टीने अप्रिय अशी घटना म्हणावी लागेल.

घरातील स्त्रीचं आपल्यापेक्षा शिक्षण, सौंदर्य, माहेरची परिस्थिती किंवा कमाई जास्त असेल तर पुरूषांना आनंद वाटण्याऐवजी असुरक्षित आणि

स्वत:बद्दल कमीपणा वाटतो. तिचा हेवा वाटतो आणि त्यातूनच तिच्यावर अत्याचार करून तिला कमी लेखण्याचा आणि स्वत:च्या मुठीत ठेवण्याचा प्रयत्न पुरूष करू लागतात. म्हणूनच आतापर्यंत झालेल्या सर्वेक्षणातून असे निष्पन्न झाले आहे की, शिकलेल्या स्त्रियांना कौटुंबिक अत्याचार मोठया प्रमाणात सहन करावा लागतो. असेही आढळून आलेले आहे की, कमी शिकलेल्या पुरूषांमध्ये अहंगड असतो म्हणून असे पुरूष अत्याचार करण्याची जास्त शक्यता असते. आधीच पुरूषी अहं, त्यात तो अधिक शिकलेला असला तर त्याच्यात श्रेष्ठत्वाची जाणीव वाढून तो अहंकारी बनतो.

कुटुंब कलहाच्या प्रकाराबद्दल विचार केल्यास आपणास प्रामुख्याने शारीरिक (शारीरिक वेदना किंवा इजा पोहचविणे), लैंगिक हिंसाचार (इच्छे विरूध्द संभोग, अनैसर्गिक संभोग), शाब्दिक किंवा भावनिक हिंसाचार, आर्थिक हिंसाचार असे निरनिराळे कुटुंब कलह/हिंसाचार ऐकावयास मिळतात. अशा कुटुंब कलहाचा/हिंसाचाराचा प्रमुख उद्देश म्हणजे कुटुंबातील स्त्रीवर प्रभुत्व वर्चस्व गाजवून आपल्या इच्छा पूर्ण करून समाधान प्राप्त करणे हा असतो.

कुटुंब कलहाची/हिंसाचाराची सर्वसाधारण कारणे जाणून घेण्याच्या प्रयत्नात महिलेचे घरातील अनपेक्षित वागण्याची पध्दती, वैचारिक मतभिन्नता, कुटुंब सदस्यामधील गैरसमज, बेबनाव, गरिबी, दारिद्रय, व्यसनाधिनता, आपलेपणाचा अभाव, पतीचा विचित्र संशयी स्वभाव, उभयंताच्या गुणवैशिष्टयामधील तफावत, फसवणूक, श्रेष्ठता, संस्कारातील फरक, मुलांच्या संगोपनाबाबत मतभेद, चारित्र्यहीनता, चौकटी बाहेरील संबंध, लैंगिक संबंधाला विरोध ही किंवा अशाच प्रकारची कारणे असल्याचे लक्षात येते.

कुटुंब कलह/हिंसाचार हा काही कारणामुळेच घडतो हे आता सर्वश्रृत झाले आहे. प्रस्तुत संशोधनात प्रतिवेदक महिलांच्या बाबतीत कोणती निश्चित कारणे घडली हे जाणून घेण्यासाठी त्यांना विचारणा करण्यात आली मोठया प्रयासाने व अनिश्चेने त्यांनी दिलेली काही कारणे व कारण विषद करणाऱ्या प्रतिवेदक महिलांच्या संख्या पुढील तक्त्यात देण्यात आली आहे.

कौटुंबिक कलह/हिंसाचाराच्या कारणानुसार वर्गीकरण

अ.क्र. अ	कौटुंबिक कलह/हिंसाचाराचे कारण	प्रतिवेदक महिलांचा प्रतिसाद	
		संख्या (N = 25)	प्रतिशत
१	घरातील कामे योग्य प्रकारे करण्यातील असमर्थता	२२	८८.००
२	कुटुंबिय व पतीशी अयोग्य वागणे	५	२०.००
३	वैचारिक संस्कारातील तफावत	१७	६८.००
४	माहेरून पैसे, वस्तुंची मागणी	१९	७६.००
५	गरीबी, व्यसनाधिन पती	९	३६.००
६	शारीरिक संबंधासाठी विरोध	८	३२.००
७	पतीचा विचीत्र स्वभाव	१५	६०.००
८	फसवणूक	१७	६८.००
९	मर्जी विरूध्द झालेला विवाह	७	२८.००
१०	सासर/माहेरच्या लोकांचा अपमानास्पद उल्लेख	२१	८४.००
११	मुलांचे संगोपन /शिक्षण	१६	६४.००
१२	सहनशीलतेमध्ये दोघांचाही अभाव	८	३२.००
१३	कौटुंबिक व वैयक्तिक स्वच्छतेचा अभाव	१६	६४.००
१४	पतीचा नैतिकतेील अभाव, घराबाहेरी संबंध	७	२८.००
१५	श्रेष्ठ–अश्रेष्ठता	८	३२.००

वरील तक्त्यातील कौटुंबिक कलह/हिंसाचाराला निगडीत व कारणीभूत ठरलेले कारणाकडे काळजीपूर्वक अवलेाकन केल्यास कारणांचा खऱ्या अर्थने उलगडा होतो.

संसारात पत्नी ही खऱ्या अर्थने गृहिणी असते व घरातील सर्व कामे तिने आदर्श गृहिणी म्हणून एका विशिष्ट कार्यपध्दतीने करणे तिला अपेक्षितच नव्हेतर बंधनकारक असते. याविषयीची तिची असमर्थता कधीच क्षम्य नसते कारण यामुळे कुटुंबाचे /घराचे घरपण मूळातच रहात नाही आणि तिच्या विषयी सर्व कुटुंब सदस्य व प्रामुख्याने पतीचा गैरसमज होतो, राग येतो वैमनस्य होते आणि पर्यायाने त्याचा अंत कलह/हिंसाचारात होतो. वरील कारणामुळे कलहाला/हिंसाचाराला बळी पडलेल्या प्रतिवेदक महिलांची संख्या सर्वात जास्त ८८ टक्के असल्याचे दिसते. याकारणाचा तक्रशुध्द पध्दतीने विचार केल्यास स्त्रियांना लग्नापूर्वी माहेरी असताना त्यांचे शिक्षणाच्या कारणामुळे घरातील कामासाठी संधी प्राप्त झाली नसावी किंवा पालकांनी मुख्यत्वे आईने याबद्दल काळजी घेतली नसावी म्हणून असे घडले असावे.

वरील कारणाच्या खालोखाल ८४ टक्के प्रतिवेदक महिलांनी माहेरच्या लोकांचा उध्दार व अपमानकारक शब्दांनी झालेला उल्लेख कलहासाठी कारण ठरल्याचे सांगण्यात आले स्त्री सासरी काहीही सहन करण्यास तत्पर असते परंतु तिचा तिच्या माहेरच्या

लोकांबद्दल प्रामुख्याने आई–वडिल भाऊ बहिण यांच्याबद्दल अपमानकारक शब्द ऐकण्यास तिचा स्वाभिमानी स्वभाव तयार नसतो.

वारंवार माहेरून पैसे किंवा काही वस्तु आणण्यासाठी होणारा त्रास ७६ टक्के प्रतिवेदक महिलांना कलहासाठी कारणीभूत ठरला. वास्तविक लग्नकार्यात मुलीचे वडील वाटेल ते करून हुंडा व इतरवस्तू त्याच्या आर्थिक स्थितीला झेपेल तसे देतात परंतु सासरच्या लोकांचे तितक्यात समाधान होत नाही व त्यासाठी हट्ट धरतात व मागणी पूर्ण न झाल्यास, पत्नीला छळण्यास सुरूवात होते व त्याचा शेवट कलह/हिंसाचारात होतो.

वैचारिक व संस्कारातील बऱ्याच प्रमाणात असलेली तफावत हे कारण ६८ टक्के प्रतिवेदक महिलांच्या बाबतीत घडल्याचे कळते. लग्न जुळवताना जेष्ठ लोकांकडून याबाबतीत कुठलाच विचार केला जात नाही. स्वभावातील फरक, शिक्षणतील फरक, आर्थिक परिस्थितीतील फरक विचारातील फरक, राहणीमानातील फरक व मुख्य म्हणजे संस्कारातील तफावत हे कारण पती पत्नीतील संबंध बिघडविण्यास कारणीभूत ठरल्याचे प्रमाण समाजात लक्षणीय दिसून येते.

कौटुंबिक व वैयक्तिक स्वच्छतेकडील दुर्लक्ष, मुलांचे संगोपन, शिक्षणबद्दल वैचारिक भिन्नता व पतीचा विचित्र स्वभाव कौटुंबिक कलहाला घडलेली कारणे सांगणाऱ्या प्रतिवेदक महिलांचा संख्या अनुक्रमे ६४ टक्के, ६४ टक्के व ६० टक्के असल्याचे सांगण्यात आले.

पतीच्या किंवा पत्नीचे शिक्षण, वय, आर्थिक स्थिती, पूर्वी झालेले लग्न, इतर मुलगा किंवा मुलीशी असलेले प्रेम अनैतिक संबंध याबद्दल लग्नानंतर काही वर्ष सत्यता पटली तर दोघांमध्ये बेबनाव होतो. वैमनस्य, गैरसमज निर्माण होवून त्याचा शेवट महिलांना छळण्यात होतो.हे कारण असल्याचे ६८ टक्के प्रतिवेदक मुलाखतीं दरम्यान कबूल करतात.

पती पत्नीमधील श्रेष्ठ–अश्रेष्ठता, पतीची अनैतिकता, दोघांमध्येही सहनशिलतेचा अभाव, व्यसनाधिनता, मर्जी विरूध्द झालेला विवाह व कुटुंबातील सदस्यांशी व पतीशी वागण्याची अयोग्य पध्दत अशी निरनिराळी कारणे कलह/हिंसाचार घडणाऱ्या प्रतिवेदक महिलांची संख्या अनुक्रमे ३२ टक्के, २८ टक्के, ३२ टक्के, ३६ टक्के, २८ टक्के व २० टक्के होती.

ही कारणे संकृतदर्शनी सामान्य वाटत असली तरी प्रतिवेदक स्त्रियांचा छळ होवून त्याचा शेवट कलहात/हिंसाचारात होण्यात आश्यर्च वाटू नये.

निष्कर्ष :

कुटुंब कलह/हिसांचारासाठी प्रामुख्याने घरातील कामे योग्य प्रकारे करण्यातील असमर्थता,पती–पत्नी मधील वैचारिक, संस्कारातील तफावत, माहेरून पैसे, वस्तूंची वारंवार होणारी मागणी, पतीबद्दल प्रतिकूल मत व त्याचा विचित्र स्वभाव, माहेरच्या लोकांचा अपमानास्पद उल्लेख, पतीचा नैतिकतेचा अभाव/घराबाहेरील संबंध ही कारणे असतात.

शिफारशी

१. महिलांना शारीरिक आर्थिक सुरक्षा देण्यात यावी.

२. महिलांना सन्मानाची वागणूक मिळावी.

३. शिक्षण क्षेत्रात महिलासाठी आत्मसंरक्षणाचा विषय अनिवार्य करावा.

४. महिलांचा आत्मविश्वास वाढवावा

५. पोलीसांचे सहकार्य महिलांना प्रसंगी मिळावे

६. समाजात पुरूषांना तथा कलहासाठी कारणीभूत असलेल्या व्यक्तींना कायद्याचे भय असावे

७. स्वत:चे सुरक्षाकवच/ रक्षक असावे.

संदर्भ सूचि

1. Davidson, T. (1977). Wifebeating: A recurring phenomenon throughout history. In Maria Roy (Ed.) Battered women (pp. 2-23). New York: Van Nostrand Reinhold.

2. Fantuzzo John W. and Wander K. Mohan, 'Prevalence and Effect of child Exposure to Domestic Violence' The future of Children-Domestic Violence and Children, Vol.9.No.3, 1999.

3. National Council of Juvenile and Family Court Judges, 1994

4. Unger, R., and Crowford, M.(1992). Women and gender : A, feminist psychology, New York, Ny McGrow-Hill.

पुस्तके

१. मालशे स.गं., शोधनिबंधाची लेखन पध्दती, प्रकाशन : प्रकाश विश्वासराव लोकवाङ्मय गृह मुंबई

२. नाडगोंडे गुरूनाथ द. (१९८६) सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर

३. कोंडेकर ए.वाय., मारूलकर विजय, भारतातील सामाजिक समस्या, फडके प्रकाशन कोल्हापूर

४. गुप्ते अे. के., कौटुंबिक हिंसचारापासून महिलांचे रक्षण करणारा अधिनियमन २००५ व नियम २००६, रमेश सेठी, हिंद लॉ पब्लिकेशन्स, पुणे

५. ताडपत्रीकर मेधा, कौटुंबिक हिंसाचार वास्तवाला सामोरे जातानाकृकृ डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

६. कवी माधवी, महिला कल्याण आणि विकास, विद्या प्रकाशन, नागपूर

वृत्तपत्रे

१. वडनेरकर प्रिती, 'कौटुंबिक हिंसाचार— एक जळजळीत वास्तव' मराठी लेख, सांगली सकाळ सोमवार दि. ११ मार्च २०१३ पृ.२

२. वडनेरकर प्रिती, 'हुंडयासाठी दरतासाला एकीचा बळी' महाराष्ट्र टाईम्स गाईड, कोल्हापूर सोमवार, दि. ०२ सप्टेंबर २०१३

३. विवाहित छळ, लोकमत सांगली रविवार दि. १६ जून २०१३ पृ.३

४. 'पैशासाठी विवाहितेचा छळ' तरूण भारत शनिवार दि. २९ जून २०१३

५. 'विवाहितेचा छळ' सांगली सकाळ, सोमवार दि. ११ मार्च २०१३ पृ.२

❑❑❑

24

चंद्रपूर जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत शिक्षकांचे व्यवसाय समाधान, व अध्यापन परिणामकारकता यांचा चिकित्सक अभ्यास

श्री. जयंत आ. वानखेडे,
संशोधनकर्ता,
प्राचार्य, यशवंतराव शिंदे कनिष्ठ महाविद्यालय,
भद्रावती, जि. चंद्रपूर (म.रा.)

****

प्रास्ताविक :-

कोणत्याही राष्ट्राचा विकास हा तेथील नागरिकांना दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. आज देशाचा, जगाचा विकास होण्यासाठी शिक्षण ही प्रत्येक मुलाची मुलभूत गरज आहे. देशात प्राथमिक शिक्षण सर्वत्र व मोफ त दिले जाते.

भारतीय राज्य घटनेची अंमलबजावणी २६ जानेवारी १९५० पासून सुरू झाली. १९५२ हे साल माध्यमिक शिक्षणाच्या सर्वकष इतिहासात अत्यंत महत्वाचे मानावे लागेल. माध्यमिक शिक्षणाचा सर्वकष विचार करण्यासाठी नेमला गेलेला हाच पहिला आयोग होता. त्यापुढे माध्यमिक शिक्षणाची उद्दिष्टे, अभ्यासक्रम, आकृतिबंध, विविध प्रकारचे माध्यमिक शिक्षण देणाऱ्या शाळांचा परस्परसंबंध व माध्यमिक शिक्षणाचा प्राथमिक व उच्च शिक्षणाशी असलेला संबंध या सर्व दृष्टिकोनातून व अत्यंत सविस्तरपणे इ.स. १९५२ साली या देशात माध्यमिक शिक्षणाचा प्रथमच विचार झाला, असे म्हणणे योग्य होईल.

जीवनातील महत्वाचा असा माध्यमिक शिक्षणाचा काळ आहे. याच कालावधीत विविध गोष्टींकडे पाहण्याचा दृष्टिकोन तयार होत असतो. आयुष्यात आवश्यक असणारी विविध कौशल्ये याच कालावधीत विकसित होतात. शरीर,

भावना, संवेदना व जीवनमुल्ये यांच्या योग्यायोग्यतेची जाणीव माध्यमिक स्तरावरील शिक्षणातून व्यक्तीत निर्माण होत असते.

शिक्षकी पेशा हा एकदा व्यवसाय म्हणून निवडला की त्या व्यवसायात सुखी, समाधानी व्हावयाचे असेल तर आपल्याला कोणत्या प्रतीचा शिक्षक व्हावयाचे याचा निर्णय घ्यावा लागतो. शिक्षक म्हणून काम करीत असतांना आपल्या ज्ञानात, क्षमतेत सतत वाढ करावी लागते. समाजाच्या गरजा जागा बदलतील तसे शिक्षकाला बदलावे लागते; याची जाणीव सदैव ठेवावी लागते. तरच परिणामकारक अध्यापन शिक्षक करू शकतो.

कोणतेही काम करताना आपण सुखी, समाधानी व आनंदी असलो तर कामही तितकेच चांगले होते. पुढे काय केले पाहिजे याबद्दल आपण सतत प्रयत्नशील राहतो. शिक्षकाचे अध्यापन चांगले होते. पुढे काय केले पाहिजे याबद्दल आपण सतत प्रयत्नशील राहतो. शिक्षकाचे अध्यापन चांगले झाले तरी जर त्यांना समाधान नसेल तर आपोआपच कामाकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे परिणामकारकता कमी होते. म्हणजेच शिक्षकाच्या व्यवसाय समाधानाचा परिणाम त्याच्या कामावर होतो.

संशोधनाचे महत्व :-

कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणाने कुमारावस्थेच्या सर्वसामान्य, तांत्रिक, व्यावसायिक अगर विशेष गरजा पुऱ्या झाल्या पाहिजेत. या काळात विद्यार्थ्याच्या ज्ञानात अचूकता आणि संघटन निर्माण झाले पाहिजे. माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यास समाजात प्रभावीपणे वावरता आले पाहिजे. तसेच ज्यांना पुढे उच्च शिक्षण घ्यावयाचे आहे त्यांचीही तयारी उच्च माध्यमिक शिक्षणाद्वारे झाली पाहिजे. म्हणून या संशोधनाचा उपयोग कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना होईल तसेच इतर शिक्षकांनाही एक दिशा मिळेल. आपण व्यवसायात कितपत परिणामकारक होत आहे याची जाणीव होईल. आणि शिक्षक म्हणून काम करीत असताना कोणकोणत्या गोष्टीत सक्षम असले पाहिजे, सक्षम राहण्यासाठी आणखी काय करावे लागते याचे ज्ञान या संशोधनावरून होईल. अध्यपनाची परिणामकारकता कोणकोणत्या गोष्टींवर अवलंबून असते आणि अध्यापन परिणामकारक होण्यासाठी आपल्यातील कच्चे दुवे कोणते, हे शोधण्यास शिक्षकांना मदत होईल.

या संशोधनाचा उपयोग कनिष्ठ महाविद्यालयीन प्राचार्यांना होईल. आपल्या शाळेतील शिक्षक व्यवसायात समाधानी आहेत का, अध्यापन परिणामकारक करतात का, हे जाणून घेऊन त्यावर उपाय योजण्यासाठी मदत होईल.

या संशोधनाचा उपयोग कनिष्ठ महाविद्यालयाचे शाळांचे व्यवस्थापन व प्रशासन पाहणाऱ्या व्यक्तींना होईल. शाळेची प्रगती, विद्यार्थ्यांची गुणवत्ता ही शिक्षकांच्या परिणामकारकतेवरच अवलंबून असते. ती वाढविण्यासाठी काही उपाययोजना व पूर्तता करण्यासाठी त्याचा उपयोग होईल. या संशोधनाचा उपयोग इतर स्तरांवर काम करणाऱ्या शिक्षकांना, शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांना, शिक्षण प्रशिक्षण विद्यालये व महाविद्यालयातील प्राध्यापकांना यांचा फायदा होईल. या संशोधनाचा उपयोग

संशोधनाची उद्दिष्टे :-

१) कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या अध्यापन परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

२) कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा अभ्यास करणे.

३) कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यवसाय समाधान व अध्यापन परिणामकारके मधील सहसंबंध पाहणे.

४) कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या (अनुभवी व अल्प अनुभवी स्त्री व पुरूष) व्यवसाय समाधान व अध्यापन परिणामकारकतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

पदाच्या कार्यात्मक व्याख्या :-

१) परिणामकारक अध्यापन – जे अध्यापन आवड निर्माण करते, वर्गातील आंतरक्रिया योग्य प्रकारे घडवून आणते आणि आकलनास ज्यामुळे सोपे जाते अशा अध्यापनाला परिणामकारक अध्यापन म्हणतात.

२) व्यवसाय समाधान – व्यक्ती करीत असलेले काम आणि तेथील परिस्थिती बाबत समाधान व आनंद वाटत असेल तर त्याला व्यवसाय समाधान म्हणतात.

संशोधनाची व्याप्ती :-

१) चंद्रपूर जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांची अध्यापन परिणामकारकता व व्यवसाय समाधान ह्यांचा अभ्यास केला जाईल.

२) चंद्रपूर जिल्ह्यातील अनुदानीत व विना अनुदानीत कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचा समावेश केल्या जाईल.

३) चंद्रपूर जिल्ह्यातील १०० मराठी माध्यमांच्या कनिष्ठ महाविद्यालयांचा समावेश केल्या जाईल.

४) शिक्षकांच्या अध्यापन परिणामकारकतेमध्ये

RESEARCH BULLETIN

An International Quarterly
Research Journal

Vol - 30 | ISSN 2231-1025

Dec- 2017

"बालकांच्या भावनिक विकासावर मैदानी खेळा अभावी होणारा परिणाम"

डॉ. सीमा पंजाबराव भुईभार /प्रा. डॉ. सुजाता ब. सबाने
गृहअर्थशास्त्र
श्री. शिवाजी कला आणि वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

गोषवारा

परिपूर्ण आणि उत्तम व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी पोषण, आरोग्य, संरक्षण, शिक्षण याबरोबर खेळ ही सुद्धा बालकांची एक प्राथमिक गरजच आहे. सभोवतालची परिस्थिती समजून घेण्यासाठी आणि तिच्याशी जुळवून घेण्यासाठी मैदानी खेळांची मदत होते. त्यामुळे बालकांच्या आयुष्यात हा अत्यंत आवश्यक असा भाग असला तरीही आता बहुतांश मुले मैदानी खेळ विसरुन मोबाईल, लॅपटॉप, दूरदर्शन अशा तंत्रज्ञानामध्ये रममान झालेली दिसतात. मुलांच्या मनात खेळण्याची जी नैसर्गिक गरज आहे ती आता मोबाईल वरील खेळामुळे पुर्ण होत आहे. त्याचा विपरीत परिणाम बालकांच्या भावनिक विकासावर होतो आहे का ? हे जाणून घेणे हा संशोधनाचा विषय झाला आहे. हा दृष्टीकोन लक्षात घेता मैदानी खेळ खेळणाऱ्या व न खेळणाऱ्या बालकांच्या तुलनात्मक अध्ययनातून भावनिक विकासावर होणारा परिणाम विशद करण्यात आला आहे.

शोध संज्ञा :

मैदानी खेळ, बैठे खेळ भावनिक विकासावर होणारा परिणाम.

प्रस्तावना :

बालकांचे जीवन आरोग्य संपन्न होऊन त्यांचा सर्वांगिण विकास साधण्याकरीता मैदानी खेळ आणि बालक यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. मुले मोकळ्या मैदानावर बेधूंद खेळतात ही बऱ्याच वर्षापुर्वीची पालकांची तक्रार होती. गेल्या काही वर्षात मुला-मुलींचे विश्व चांगलेच बदलले. आता बहुतांश मुले खेळण विसरुन मोबाईल, लॅपटॉप अशा तंत्रज्ञानामध्ये रमलेली दिसतात. हे कृत्रिम वातावरण मुलांना वास्तव जीवनापेक्षा जास्त आवडायला लागले. म्हणूनच बालकांची धाव मैदानावर खेळण्यापेक्षा कृत्रिम वातावरणात रममाण होण्याकडे जास्त असते.

बालकांच्या बदलत्या जीवनशैलीचा परिणाम पाहता बालकांसमोरील स्पर्धात्मक आव्हाने दिवसेंदिवस वाढतच आहेत. केवळ अभ्यास करुन परिक्षा देणे एवढ्यापुर्ती बालकांचे जीवन सिमित राहिले नाही. त्याच्या जीवनातील नैसर्गिकता कमी झाल्याने मानसिक ताण निश्चितच वाढत आहे. बालकांचे परिपुर्ण आणि उत्तम व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी पोषण, आरोग्य, संरक्षण शिक्षण याबरोबरच मोकळ्या वातावरणात निसर्गाच्या सानिध्यात खेळणे बालकांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. पुर्वीचे मैदानी खेळ खांब-खांब खांबोल्या, दोरीवरच्या उड्या, लगोऱ्या, विटीदांडू, पकडा-पकडी, मल्लखांब खेळल्या जात होते. परंतु आता हे सर्व खेळ इतिहासात जमा होऊ पाहत आहेत. मुलांनी मोकळ्या मैदानावर खेळले पाहिजे हे सर्व बालकांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

खेळ :

खेळ म्हणजे केवळ आनंदासाठी कोणतेही ध्येय संपादनाचा हेतू न बाळगता केलेली क्रिया म्हणजे खेळ.

बैठे खेळ :

जे खेळ घरात एका जागेवर बसून खेळले जातात. त्यांना बैठे खेळ म्हणतात.


मैदानी खेळ :

मैदानावर विविध शारीरिक क्रिया व कौशल्याद्वारे केलेली शारीरिक हालचाल म्हणजे मैदानी खेळ.

उत्तर बाल्यावस्था (वय वर्ष ६ ते १२)

वयाच्या सहाव्या वर्षापासून सुरु होणारी उत्तरबाल्यावस्था वयाच्या बारा वर्षापर्यंत चालू असते. हा काळ बालकांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा काळ आहे.

भावनिक विकास



उद्दिष्टे :

मैदानी खेळ खेळणाऱ्या व न खेळणाऱ्या बालकांच्या भावनिक विकासावर होणारा परिणाम अभ्यासणे.

गृहितक :

१) मैदानी खेळ खेळणाऱ्यांच्या तुलनेत न खेळणाऱ्या बालकांच्या वर्तणूकीवर परिणाम जाणवतो.

२) मैदानी खेळ खेळणाऱ्यांच्या तुलनेत न खेळणाऱ्या बालकांच्या भावनिक विकास हा कमी होतो.

नमुना निवड :

प्रस्तुत संशोधनाकरीता अकोला शहरातील इंग्रजी शाळेची निवड करण्यात आली. ६४० मुल/ मुली व पालकांची नमुना म्हणून निवड करण्यात आली.


संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी मुलाखत अनुसुची व निरिक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात आला. chi-square चाचणीचा उपयोग करण्यात आला.

सांख्यिकीय विश्लेषण :

बालकांचे जीवन आरोग्यसंपन्न होऊन त्यांचा सर्वांगिण विकास साधण्याकरीता मैदानी खेळ आणि बालक यांचे महत्त्व अभ्यासने गरजेचे आहे. स्पर्धेत भाग घेतांना जिंकण्याचा आत्मविश्वास असण्याचे प्रमाण मैदानी खेळ न खेळणाऱ्या बालकांच्या तुलनेत खेळणाऱ्या बालकांमध्ये जास्त असतो. खेळखेळणाऱ्यांचा आत्मविश्वास हा खेळात भाग घेतल्याने द्विगुणीत झालेला असतो.

Chi-suqare चाचणी मूल्य ५०.९७ ची ०.०५ सार्थकता स्तरावर तक्ता मूल्याची (५.९९) तुलना केली असता सार्थकता दिसून येते. स्पर्धेत भाग घेतांना जिंकण्याचा आत्मविश्वास असल्याचे प्रमाण हे मैदानी खेळ न खेळणाऱ्यांच्या तुलनेत मैदानी खेळ खेळणाऱ्या बालकांमध्ये अधिक असल्याचे दिसुन येते. मोकळ्या वातावरणात मैदानावर इतरांसमवेत मैदानी खेळ न खेळल्यामुळे मनातील प्रत्येक भावनेचे प्रगटीकरण करण्यास वाव मिळत नाही. याच कारणाने वाटणारी भिती ही न खेळणाऱ्या बालकांमध्ये अधिक असते.




स्पर्धेत भाग घेतां जिंकण्याच्या आत्मविश्वासासंबंधी तुलात्मक माहिती

Chi-square चाचणी मूल्य ३०.८१ ची ०.०५ सार्थकता स्तरावर तक्ता मूल्य ५.९९ सोबत तुलना केली असता सार्थकता दिसून येते. मैदानी खेळ खेळणाऱ्या बालकांची इतरांपुढे विचार मांडण्याची क्षमता जास्त असते. मैदानी खेळ खळत असतांना भावनिक विकासाला चालना मिळून इतरांचे विचार एकुण घेणे, आपले विचार इतरांपुढे स्पष्टपणे व्यक्त करणे ह्या क्रिया वारंवार घडत असतात. मैदानी खेळ खेळणाऱ्या बालकांमध्ये कुठल्याही कठीण प्रसंग उद्‌भवला तरी तो सोडवण्याची, सक्षमपणे सामोरे जाण्याची क्षमता समवयस्क बालकांमध्ये मोकळ्या मैदानात खेळल्याने वाढते. जी बालके तासनतास मोबाईल वरील बैठे खेळ खेळतात त्या बालकांमध्ये कठीण प्रसंगाला सक्षमपणे सामोरे न जाता घाबरुन जाणे,

इतरांची मदत घेणे असे प्रसंग उद्‌भवतात. इतरांपेक्षा श्रेष्ठ समजण्याचे प्रमाण मैदानी खेळ खेळणाऱ्यांच्या तुलनेत न खेळणाऱ्या बालकांमध्ये जास्त आहे. इतरांमध्ये न मिसळणे, समुहात न राहणे, माझे म्हणणे इतरांनी एकावे अशी श्रेष्ठत्वाची भावना अधिक असते. मैदानी खेळ खेळणाऱ्या बालकांमध्ये खेळ खेळणे, आनंद प्राप्त करतात. मैदानी खेळ खेळणाऱ्या बालकांना मैत्री करणे, समूहात राहाणे आवडते. न खेळणाऱ्या बालकांना एकटे राहाणे त्यांना जास्त आवडते. मैदानी खेळ खेळणारे बालके स्वतःपुरता विचार न करता इतर समूहाचा, समूहाच्या प्रगतीचा विचार करण्याचे प्रमाणे अधिक असते. Chi-square चाचणी मूल्य ७१.७१ ची ०.०५ तक्ता मूल्यासोबत तुलना केली असता सार्थकता दिसून येते. मैदानी खेळ न खेळणाऱ्यांमध्ये भांडण करण्याचे प्रमाण अधिक असते. इतरांशी जुळवून घेण्याची सवय त्यांना नसते.

Chi-square चाचणी मूल्य १५.९२ ची ०.०५ तक्ता मूल्यासोबत तुलना केली असता सार्थकता दिसून येते.



बालकांच्या पालकांद्वारे सध्याच्या काळात बालकांमधील आक्रमकतेसंबंधी तुलात्मक माहिती दर्शविणारा आलेख

मैदानी खेळामुळे नकारात्मकता कमी होवून सकारात्मक विचार करण्याची शक्ती वाढते. मैदानी खेळ न खेळणाऱ्या बालकांमध्ये चिडणे, ओरडने, मारणे अशा समस्या २.२४ टक्क्याने अधिक असतात. सांख्यिकीय सार्थकता बघता पूर्वी बालके फारशी घरात नसायची. ती मोकळ्या मैदानावर खेळायची त्यांच्यातील अतिरिक्त ऊर्जा चांगल्या पद्धतीने वापरली जायची. दमून बालके घरी यायची घरात येतांना शांत व्हायची, यामुळे पालकांच्या मते बालकांमध्ये आजच्या सारख्या वर्तनसमस्या फारशा नसायच्या.

निष्कर्ष :

वाढत्या बैठ्या खेळाचे प्रमाण लक्षात घेता मैदानी खेळाचे बालकांच्या भावनिक विकासावरील परिणाम अभ्यासने गरजेचे होते. मैदानी खेळ खेळणाऱ्या बालकांचा भावनिक विकास चांगल्या प्रकारे होतो. सकारात्मक विचार करण्याची शक्ती वाढते. विचार मांडण्याची सक्षमता, आत्मविश्वास, सहकार्याची भावना, मैदानी खेळ खेळणाऱ्या बालकांमध्ये अधिक असते. भिती वाटण्याचे प्रमाण मैदानी खेळ न खेळणाऱ्या बालकांमध्ये अधिक असते. बालकांची अतिरिक्त उर्जा मैदानी

खेळात वापरली जात नाही. तर मग अशी मुले इतर मुलांना मारणे, ढकलणे, आई-वडिलांवर जोरजोरात ओरडणे, चिडणे अशा समस्या मैदानी खेळ न खेळणाऱ्या बालकांमध्ये अधिक असतात.

सूचना व शिफारशी

१) शिक्षकांनी व पालकांनी मुलांना वारंवार मैदानी खेळाचे महत्त्व पटवून द्यावे.

२) संगणक व मोबाईल साधनांचा अतिरेक टाळून बालकांना मैदानाकडे वळवावे.

३) बालकांमधील वाढत्या भावनिक समस्या लक्षात घेता बालकांना सवंगड्यांसोबत मैदानी खेळ खेळण्यासाठी प्रोत्साहित करावेत.

४) शालेय स्तरावर मैदानी खेळाचे तास नियमित होत आहे का ? याकडे शासनाचे लक्ष असावे.

५) शासनाने मैदानी खेळ खेळण्याकरीता मोकळी जागा, बाल उद्याने उपलब्ध करुन द्यावी.

संदर्भ सुची

1) Staemptli, M.B. (2009), Reintroducing adventure into children's out door play environments : environment and Behaviour, 41(2), PP. 268-280.

2) Vitch, Bagley (2005), "Children Active free play : Health and place", 12(4), PP. 383-393.

3) Bodbey G. (2009), Outdoor recreation health and wellness, anderstanding and enhancing the relationship htt://www.rff.org/documents/RFT-DP 09-21 P (Volumes)

4) पहिनकर गोपाळ (२०१२), मुलांच्या A to Z व्यक्तिमत्त्व विकासासाठी, सांकेत प्रकाशन, औरंगाबाद ४३१००५.

Doc. No.: 115


International Journal of Commerce and Management Research
HOME
EDITORIAL BOARD
ARCHIVES
INSTRUCTIONS
REVIEWS
CONTACT US
IMPACT FACTOR
RJIF 5.22
2017
FREQUENCY
BIMONTHLY
Management
952
1246003
736045

Doc. No.: 115 (1)

International Journal of Commerce and Management Research
ISSN: 2455-1627, Impact Factor: RJIF 5.22
www.managejournal.com
Volume 3; Issue 2; February 2017; Page No. 82-84

A comparative study on stress management among woman teacher's in higher education and housewives

[1] Mona K. Patil, [2] Dr. B.S. Zare

[1] MBA Human Resource, Research Scholar, Shri Shivaji Arts & Commerce College, Amravati, Maharashtra, India

[2] M.Com, M.Phil., Ph.D., Research Guide, Shri Shivaji Arts & Commerce College, Amravati, Maharashtra, India

Abstract
The study was conducted to assess the stress management on Woman Teacher's in Higher Education and Housewives. The sample consist of 248 woman teachers and 248 housewives from Western Vidharbh Region consisting of five districts- Amravati, Akola, Buldhana, Washim, and Yavatmal. The self-administered questionnaire was used to compare the stress managed by the respondents. The result revealed that there is significant difference in stress managed by woman teachers in higher education and housewives thus, rejecting the null hypothesis. The respondents have however, suggested some measures for managing stress and develop healthy attitude for leading better lives and avoiding outcomes on this accounts.

Keywords: Stress, Stress Management

1. Introduction

Stress at work is a relatively new phenomenon of modern lifestyle. The nature of work has gone through drastic change over the last century and it is still changing at whirlwind speed. Profession stress or job stress poses a threat to physical health. Work related stress in the life of organized workers, consequently affects the health of organization.

Stress is a psychological and physiological reaction that takes place when one perceives an imbalance in level of demand placed on the capacity to meet that demand on individual.

The term stress was first employed in a biological context by Hans Selye in 1930's. He later broadened and popularized the concept to include inappropriate physiological response to any demand. This concept is borrowed from natural sciences and is derived from the Latin word "Stringere" which means to draw tight. In psychophysiology, stress refers to some stimulus resulting in a detectable strain that cannot be accommodated by the organism and which ultimately results in impaired health or behavior.

By the year 2020, depression is predicted to be the second most important cause of disability throughout the world among the various causes like back pain, diabetes, arthritis, heart disease, cancer etc (WHO, 2000). The depression is most prevalent psychiatric condition which affects the women twice as compare to the men (Iowa, 2007). Since women's feeling of being deprived is more than that of the men therefore this study was undertaken to compare the level of stress among the women. In article "Teachers in the Twenty-first century: time to renew the vision" by Day (2000) focuses on the situation within the teaching profession: for many teachers, the last 20 years have been years of survival, rather than development. As social and economic changes have placed new demands upon and created new expectations from schools, hardly a year passes without some form of reform being mooted, negotiated or imposed in the name of raising standards (appraisal, inspection), increasing "user" participation (open enrollment, local financial).

Surveying definitions of stress, Cox (1978), has described as "three clusters of definitions. Stress can be thought of as a response i.e. the stress response to an extreme stimulus, as a stimulus i.e. as the stressor itself and as an intervening variable. As commonly understood, it is the mismatch between personal resources and environmental demands that leads to the condition called "Stress".

"Stress Management is interventions designed to reduce the impact of stressors in the workplace. These can have an individual focus, aimed at increasing an individual's ability to cope with stressors. Stress Management programs can also have an organizational focus and attempt to remove the stressors in a role.

There are three different levels of stress, each of which often has its own types of symptoms. Stress is considered to be either acute, episodic acute, or chronic.

Acute Stress: - The moments of sharp, sudden stress are examples of acute stress. Luckily, these incidents are the easiest to overcome. The symptoms of acute stress are, brief jump in heart rate, increase in bold pressure, recovery is fast and normal activity is resumed.

Episodic Acute Stress: - In this situation, we seem to encounter those acute stress moments repeatedly over time. It occurs when you have multiple disasters in a short time period, such as losing your job, your house, and your good health all in the same month. Yes, the situation may be temporary, but it causes repeated episodes of acute stress before it is done. Some of the symptoms associated with acute episodic stress are: fatigue, indigestion, regular headaches.

Chronic Stress: - Eventually, repeated stress becomes chronic. It becomes the normal state of being instead of an occasional occurrence. When you reach this level of stress, there are a number of symptoms that can be very dangerous for your health and well-being, both at work and in your personal life. These may include: mood swing, sever temper, alcoholism, mental disorders.

1.1 Objectives

- To determine stress management while performing their jobs.
- To compare the stress among working women in higher education and housewives.

Hypothesis: - "There is difference of stress management by working women in higher education and housewives."

2. Research Methodology

The study is conducted in Western Vidharbh Region i.e. in Amravati, Akola, Buldhana, Washim and Yavatmal. The sample of 248 woman teachers in higher education in SGB Amravati University and 248 housewives are participated in the study. A self-structured questionnaire is framed on the basis of stress. The age range of the sample selected for the study was from 23 to 58 years. The collected data were analyzed using statistical techniques such as mean, SD, co-efficient of variation, chi-square test. The results are tabulated and are discussed.

3. Result and Discussion

The present study "A Comparative Study on Stress Management among woman teacher's in higher education and housewives", is conducted in Western Vidharbh Region having sample of 248 women teacher in higher education and 248 housewives.

On the basis of questions asked following results are drawn regarding stress management while performing job.

1) Engaged in stress relieving program.

Women teachers and housewives are asked through questionnaire whether they engaged themselves in stress relieving program and response is shown in Table No. 1

Table 1: Women teachers and housewives - Engage in stress relieving program

Category	Mean	Std. Deviation	Co-efficient of Variation
Teachers	4	1.3	35.20%
Housewife	4	1.1	29.44%

The Table No.1 states that teachers and housewives agree (4) that they engage themselves in stress relieving and entertainment program. It is also found that the percentage of responses given by teachers (35.20%) is greater than housewives (29.44%).

2) Holistic approach to lighten or manage stress.

Women teachers and housewives are asked through questionnaire whether they choose holistic approach to lighten or manage stress and response is shown in Table No. 2.

Table 2: Women teachers and housewives - Holistic approach to manage stress

Category	Mean	Std. Deviation	Co-efficient of Variation
Teachers	4	0.8	21.50%
Housewife	4	0.8	18.74%

From Table No. 2 it is clear that teachers and housewives agree (4) that they choose holistic approach to lighten/manage stress.

It is also found that the percentage of responses given by teachers (21.50%) is greater than housewives (18.74%).

From above two tables it is clear that women teacher in higher education and housewives do manage stress while performing their duties.

3) The hypotheses of the present study "A Comparative Study on Stress Management among Woman Teacher's in Higher Education and Housewives" is analyzed with the help of Chi-square test. As per the responses given by respondents observed and expected values are calculated. The hypothesis is tested for women teachers in higher education on following null and alternate hypothesis.

H_0 = There is no significant difference of stress managed by women teachers and housewives.

H_1 = There is significant difference of stress managed by women teachers and housewives.

In order to test null hypothesis, we first have to calculate degree of freedom. The problem contains 5 rows and 2 columns. Hence degree of freedom will be (r-1)(c-1)=4




Fig 1: Observed frequency of respondents

The above Graph No. 1 shows the comparison of observed frequencies of women teachers in higher education and housewives for stress management.

The observed and expected frequencies are presented in following tables

Table 3: Observed Frequencies of Respondents

Nature of Response	Teachers	House wife	Total
Strongly Disagree	18	0	18
Disagree	43	61	104
Indifferent	20	8	28
Agree	79	115	194
Strongly Agree	88	64	152
Total	248	248	496

Table 4: Expected Frequencies of Respondents

Region	Teachers	House wife	Total
Strongly Disagree	9.0	9.0	18.0
Disagree	52.0	52.0	104
Indifferent	14.0	14.0	28
Agree	97.0	97.0	194
Disagree	76.0	76.0	152
Total	248.0	248.0	496

For 4 degree of freedom, the critical value of χ^2 at 0.05 level of significance is 9.49. Since the calculated value of χ^2 36.73 is greater than the critical value 9.49 (36.73>9.49) with p-value is 0.000, the difference is statistically significant we reject the null hypothesis. And we conclude that there is significant difference of stress management between working women in higher education and housewives.

4. Conclusion

Working women population has in the growth stage. Working women face stress in managing their personal life with work life. The present study title "A comparative study on Stress Management among women teachers in higher education and housewives" was conducted with 406 respondents. The main findings of the study show that all the respondents manage stress while performing their duties by engaging themselves in stress relieving programs and by choosing holistic approach. The stress management is also studied both for women teachers in higher education and housewives, and by using Chi-Square test it is observed that there is significant difference in stress manage by respondents, hence hypothesis accepted.

4.1 Suggestions

- Women teachers should provide with facilities like T.V., satellite, computers with internet connection etc. which act as coping strategy for stress.
- Seminars, guest lecturers should be arranged for women teachers in higher education and housewives on health education so that they are able to take care of their well-being at work and home.
- Partners need to be more sensitive for women as far as their needs are concern and also help them in daily task and in taking care of children.

5. Reference

1. Selye H. The Stress of Life. New York. McGraw Hill, 1975.
2. 9363. Women's Mental Health: An Evidence Based Review. World Health Organization, Department of Mental Health and Substance Dependence. Geneva. World Health Organization, 2000.
3. Iowa UO. Women Are Diagnosed with Depression Twice as Often as Men. 2007-2012, 23. From Iowa, University of: http://www.uihealthcare.com/kxic/2007/august/womens mentalhealth.html.
4. Day C. Teachers in the Twenty-first century: Time to renew the vision.Teachers and Teaching: Theory and Practice. 2000; 6(1):101-115.
5. Cox T. Stress. A review of theories causes and effects of stress in the light of empirical research. London. Macmillan, 1978.

Work Life Balance and Working Women

Dr. Sanjay Keshaorao Katait
Assistant Professor, Department of Commerce, Shri Shivaji Arts & Commerce College, Morshi Road, Amravati, Maharashtra, India.
Dr. Kishor Phule
Assistant Professor, Department of Commerce, Shri Shivaji Arts & Commerce College, Morshi Road, Amravati, Maharashtra, India.

Paper Code : JCT-A18-SKK-KP-7
DOI : https://doi.org/10.26703/JCT.v13i1-7
Web Address : http://jctindia.org/jct/april2018-v13i1-7.pdf
Archive : https://ideas.repec.org/a/jct/journl/v13y2018i1p50-57.html
http://EconPapers.repec.org/RePEc:jct:journl:v:13:y:2018:i:1:p:50-57

Citation: Katait, Sanjay Keshaorao and Phule, Kishore. Work Life Balance & Working Women. Journal of Commerce and Trade, April 2018; 13 : 1; Pp. 50-57. https://doi.org/10.26703/JCT.v13i1-7.

Abstract

The present role of working women has changed worldwide due to economic conditions and social demands. Thishas resulted in to increase in tremendous pressure to develop a career against their malecounterparts while sustaining active engagement in personal life.The mounting work pressure is taking a toll on the workingwomen leaving them with less time for themselves. The increasingresponsibilities on the personal front with the technologicalblessings like mobile phones, notepads, etc. that keepswork life integrated with personal life and creates imbalances, stress onpersonal and professional fronts. Such imbalance has a negative effect on personal life of working women which in turn have taken form of social hazards such as increasing number of divorces, infertility due to high stress levels.Thisaffects the working women's physical, emotional and social well-being.Thus, achieving work life balance is a necessity for workingwomen to have a good quality of life. This research paper is an attempt toexplore the tough challenges faced by working women inmaintaining a balance between their personal and professionallife.

Keywords : *Personal Life, Professional Life. Quality Of Life, Stress, Work Life Balance, Working Women*
Classification-JEL : *B54, D63, E24*

1. INTRODUCTION

